UNIVERSAL
LIBRARY

OU_192218

UNIVERSAL
LIBRARY

OUP—391—29-4-72—10,000.

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M954.7 Accession No M8768

Author B45G

Title બેંદ્રે, વા. સી. ગોવર્ધ કોંડ્યાચી કાવ્ય રાષ્ટ્રી.

This book should be returned on or before the date last marked below.

Qutbshāhi of Golcondā

IN THE

SEVENTEENTH CENTURY

श्री. वा. सी. बेंद्रेकृत इतर ग्रंथ

१. **साधनचिकित्सा**—इतिहासशास्त्र व महाराष्ट्रीय ऐतिहासिक साधनाची लेखन-पद्धति व गुणदोष यांवर सांगोपांग चर्चा करणारा पहिलाच ग्रंथ. ... ... कि. ३॥ रुपये.

केसरी—.....इतिहास लेखनाच्या कलेला इष्ट व अपेक्षित असे वळण लावण्याचा मराठी भाषेंत अपूर्व प्रयत्न.....संशोधकांना हा एक अमूल्य ठेवा...

Princ: H. G. Rawlinson, M.A., C.I.E., I.E.S.—..... .. should be studied by every aspirant who wishes to take the M.A. in history an admirable work .. .

F. B. P. Lory, Esqr M.A., I.E S., D.P.I., Poona— . . most creditable .

Journal of the Bombay Historical Society.— dealt with his subject with such absolute dispassionateness as will do credit to a Langlois or Siegnobos.. all these pitfalls are wonderfully anticipated & solved with surprising ease. .

२. **राजारामचरितम्**—अथवा श्रीछत्रपति राजाराम महाराज याचा जिंजीचा प्रवास. (मूळ संस्कृत. मराठी व इंग्रजी प्रस्तावनेसह) ... .कि. १॥ रुपाया.

ज्ञानप्रकाश—...चिकाटी...अभिनंदनीय आहे...पुस्तक खरोखरच ऐतिहासिक सामुग्रींत चांगल्या प्रकारची भर घालणारें आहे...परिश्रमशीलतेची प्रशंसा करणें जरूर आहे...

Sir Jadu Nath Sarkar, Kt., C.I.E., I.E.S.— corrects some minute points where previous writers were in the dark.. ... .. It is a service to History.....

Indian Historical Quarterly, Calcutta— . . important discovery and valuable find..... ...the introduction is really useful and interesting.....

Revd. Father H. Heras, S. J.—.. ...extremely useful not only for the historians of Maharashtra but for all students of South Indian History...edited with great care and scholarship.. .....

3. **TARIKH-I-ILAHI**—नवा काळ-...संशोधनकार्यात मोठीच गोष्ट घडून आली...

महाराष्ट्र—.....इलाहि सनांतील सारी कोडीं सोडवून दाखविली आहेत.....

Times of India— . should prove of great use to students of History . for it finally sets at rest a knotty .problem so long baffling all attempts at solution .

Hindu— ..The booklet forms an important contribution . . . we heartily endorse the opinion of Shams-ul-Ulema Dr. Sir Jiwanjee J. Modi 'that the paper will be of great use to students of the History of Akbar and Jehangir'.. .. ..

Modern Review— . has done a service to history by publishing his learned paper. ....Mr. Bendrey's study is a distinct advance on previous efforts ..

4. **STENOGRAPHY FOR INDIA** ... ... As. 8

५. **मराठी शॉर्टहँड** व ६. **गुजराती शॉर्टहँड** ... प्रत्येकी कि. २॥ रु.

7. **PORTRAIT OF SHIVAJEE THE GREAT**— . contemporary drawing of 1664 A.D (Von Valentyn's Collection.) ... . Anna 1

सर्वच पुस्तकांवर प्रसिद्ध वर्तमानपत्रें वगैरेचे उत्तम अभिप्राय. मुंबई, मध्यप्रांत व वऱ्हाड, बडोदें, कोल्हापूर इ. सरकारांनी बक्षिसें वगैरेकरितां मंजुर केली आहेत. डेक्कन व गुजराथ ह्यन्यॉक्युलर व इतर वाङ्मयोत्तेजक संस्थांनी बक्षिसे देऊन गौरव केला आहे.

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-स्वीय-ग्रंथमाला, ग्रंथांक ३९.

सतराव्या शतकांतील

गोवळकोंड्याची कुत्बशाही

किंवा

The History of a Late Revolution in the Kingdom of Golcondah Chapters VI and VII from 'Hadiqat u'l Alam' by Mir Alam, and Some Account of Akana and Madana-Chief Ministers of Golcondah, with an Historical Sketch of the Qutbshahi of Golcondah by the editor.

सपादक

वासुदेव सी. बेंद्रे,

मुख्य सपादक, श्री छत्रपती संभाजी चरित्र-कार्यालय,
गायकवाडवाडा, पुणें शहर

साहाय्यक

प्रो. भगवत दयाळ वर्मा, एम्. ए.
प्रोफेसर ऑफ पर्शिअन, फर्ग्युसन कॉलेज, पुणें

१९३४

किंमत चार रुपये

प्रकाशक
प्रो. दत्तो वामन पोतदार, बी. ए.,
सरदार गंगाधरराव नारायणराव मुजुमदार, एम्. एल्. ए.,
चिटणीस, भा. इ. स. मंडळ, पुणें शहर.

मुद्रक
सदाशिव रामचंद्र सरदेसाई, बी. ए., एल्एल्. बी.
नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ-भारत' छापखाना,
९४७ सदाशिव पेठ, पुणें नं. २

निवेदन

प्रस्तुत ग्रंथ कुतुब्शाहीबाबतचा आहे. याचे दोन भाग आहेत. मराठी भागांत संपादक रा. बेंद्रे यांनी कुतुब्शाहीची एक विश्वसनीय सनावळी बनविण्याचा प्रयत्न केला आहे. दुसऱ्या म्हणजे इंग्रजी भागांत मॅकेंझी कलेक्शनमधून तीन इंग्रजी प्रकरणें छापली आहेत. ती साधन स्वरूपाचीं आहेत.

ग्रंथाचे संपादक रा. वासुदेवराव बेंद्रे हे आपल्या मंडळातील एक निस्सीम व्यासंगी गृहस्थ आहेत. त्यांनी मोठ्या परिश्रमानें थेट विलायतेंतून अनेक हस्त-लिखितें आणविलेली आहेत. अशी साधनें हाती येतांच नेमलेल्या मुदतीतच त्यांचा परामर्श उरकून घ्यावा लागतो; कारण साधनें मग परत पाठवावी लागतात.

मराठेशाहीचा इतिहास नीट समजण्यास भोंवतालच्या मुसुलमान व इतर सत्तांचे इतिहास आणि त्यांतील घडामोडी याहि बारकाईनें समजावून घेतल्या पाहिजेत. मराठ्यांचा संबंध दक्षिणेंत दूरवर पोहोंचला असल्यानें कुतुब्शाहीचा इतिहास अभ्यासकांस उपेक्षितां येणार नाही. परतु या कुतुब्शाहीबद्दल फारच थोडी सामग्री उपलब्ध आहे. रा. बेंद्रे यांचे शोधांत जेव्हां मॅकेंझी कलेक्शनमधील प्रस्तुत छापलेले ग्रंथ उपलब्ध झाले, तेव्हां त्यांनी त्या निमित्तानें कुतुब्शाही इतिहासाचा अभ्यास त्यांच्या नेहमीच्या सूक्ष्म चिकित्सक पद्धतीनें व सशास्त्र केला. पुढें मॅकेंझी कलेक्शन मधील हीं प्रकरणें छापण्याजोगी आहेत असे वाटल्यावरून रा. बेंद्रे यांनीं पुढील तयारी चालविली. परंतु काम मूळच्या सकल्पापेक्षां व अदाजापेक्षां भलतीकडेच वाढलें. तथापि मागें पाय न घेतां आज ग्रंथ संपूर्णतेला नेण्याचाच प्रयत्न झाला. मंडळांत बरीच सामग्री छापण्यासाठी जरी पडून आहे तरी कुतुब्शाही इतिहासाच्या विषयाचें नावीन्य लक्षांत घेऊन या ग्रंथास आधी सवड करून दिली. अभ्यास वाढत चालला तसें रा. बेंद्रे यांचें लेखनहि फुगत गेलें आणि स्पष्टतेसाठीं क्वचित् पुनरुक्ति झालेली पुरवली परंतु अनुक्ति किंवा अल्पोक्ति यांपासून होणारे घोटाळे टाळावे असा त्यांचा कटाक्ष असल्यामुळें एकंदर पृष्ठसंख्या ३५० च्यावर गेली. सशास्त्रतेसाठीं अनिवार्य असलेल्या तळटीपा अनिवार झाल्या म्हटलें तरी चालेल. परंतु रा. बेंद्रे यांचे चिकाटीचे परिश्रम कसे आहेत याची साक्ष मात्र येथें उत्तम पटते.

रा. खरे यांचे अभ्यासानें जसें दक्षिणच्या मध्ययुगीन साधनांचें संशोधन चालू आहे तसें आणखी अनेक शाखांचेंहि कार्य चालावें अशी मंडळाची इच्छा आहे. हा सर्व विषय अर्थात् द्रव्याधीन आहे. रा. बेंद्रे यांनीं आपलें काम कसोशीनें केलेलें आहे आणि एका नव्या बाजूकडे आपलें लक्ष्य वेधलें आहे. विलायत, कलकत्ता, मद्रास इत्यादि स्थळी जी दुर्मिळ सामग्री पडून आहे तीहि ते जमवीत आहेत. संपादनाचें काम शास्त्रीय व्हावं याविषयी रा. बेंद्रे हे फारच परिश्रम करितात. ऐतिहासिक प्रश्नांची मीमांसा म्हटली म्हणजे तिजविषयी तज्ज्ञांत मतभिन्नता असणें स्वाभाविक आहे. रा. बेंद्रे यांस साधार व सप्रमाण प्रतिचर्चा केल्हांहि प्रियच होईल. असो.

रा. शेजवलकरांमार्फत जी रु. ८०० ची देणगी आली व जिचा विनियोग प्रकाशनासाठीं व्हावा असें त्यांनी दात्यांच्या इच्छेवरून कळविलें होतें. ती देणगी याप्रमाणें मंडळांतील नाणी व हा प्रस्तुतचा ग्रंथ यांचे कामी व्यतीत झाली. आणखी साहाय्य मिळेल तर त्याचा विनियोग वरीलप्रमाणेंच करण्यास हरकत येईल.

हा ग्रंथ स्वीयमालेंतील क्रमांक ३९चा असून तो शके १८५५ चे सभासदांस यथानियम द्यावयाचें ठरविलें आहे.

या ग्रंथाची छपाई कांही वाईस व कांही पुण्यास झाली. बहुधः अशुद्ध रूप सर्वत्र पडलें आहे ती चूक वाचकानी दुरुस्त करून घ्यावी. रा. बेंद्रे यांनी मुद्रितशोधनहि काळजीनें केलें आहे. परंतु ते मधून मधून बरेच आजार असत, त्यामुळें त्यांच्याहि मनाचें प्रस्तुत मुद्रणानें संपूर्ण समाधान झालेलें नाही.

ज्येष्ठ वद्य ५ शके १८५६,
भा. इ. सं. मंदिर, पुणें.

दत्तो वामन पोतदार,
चिटणीस, भा. इ. सं. मंडळ.

सतराव्या शतकांतील

गोवळकोंड्याची कुत्बशाही

१. उपोद्घात, २. कुत्बशाहींचे संबंध, ३. कुत्बशाही इतिहासाचीं नवीं साधनें, ४. गोवळकोंडा राज्यातील एका क्रांतीचा इतिहास, ५. जॉन ओव्हिंग्टनची हकीकत, ६. क्रांतीच्या इतिहासाचे महत्त्व, ७. 'हदिकत-अल-अलम्', ८. हदिकत-मधील भाषांतरित विभाग, ९. 'मादण्णा व आकण्णा यांची एक जुनी हकीकत', १०. कुत्बशाही इतिहास-लेखनाचे पूर्व प्रयत्न, ११. कुत्बशाहीची पूर्व हकीकत, १२. सुलतान कुली कुत्बशाहा, १३. जमशीद कुत्बशाहा, १४. सुभान कुली कुत्बशाहा, १५. इब्राहीम कुत्बशाहा, १६. महमद कुली कुत्बशाहा, १७. महमद कुत्बशाहा, १८. हयात बख्श बेगम, १९. अबदुल्ला कुत्बशाहा, २०. मीर जुम्ला, २१. अबुल हसनचें पूर्ववृत्त, २२. अबुल हसन ऊर्फ तानाशाहा कुत्बशाहा, २३. मादण्णा व आकण्णा, २४. सामाजिक रीतिभाती, २५. कुत्बशाही लढाया व युद्धपद्धती, २६. मुरार जगदेव, २७. कुत्बशाहीचे इतर पातशाहींशीं संबंध, २८. कुत्बशाहीचे शिवशाहीशीं संबंध व शिवशाहीवरील परिणाम, २९. कुत्बशाहींचा नाश, ३०. उपसंहार.

१. **उपोद्घात** :— कोणत्याहि प्रसगाच्या कालाचा विस्मर त्वरित होतो. हा विस्मर होण्यास लागणारा कालावधि प्रसगांच्या महत्त्वाच्या प्रमाणावर कमी अधिक असतो इतकेच. स्थलनामांचें अगर व्यक्तिनामांचें विस्मरणहि कालावधीनें होतें. कालाचा विस्मर एका पिढींत झालेला दिसतो तर स्थलनामांचे व व्यक्तिनामांचे तपशील दोनतीन पिढ्यात विसरले जातात. त्यामुळे ऐतिहासिक प्रसगांचे तपशील विपर्यस्त होऊ लागतात व शेवटी ते वस्तुस्थितीला धरून नसलेले आढळून येतात. उदाहरणार्थ, अबुल हसनचा राज्यावर येण्याचा प्रसंग. स्थलकालांचा वास्तविक बोध न झाल्यामुळें त्यांत अगदी असभाव्य असा मजकूर इतिहास म्हणून रूढ झाला आहे. स्थलकालांचा बोध जितक्या प्रमाणात बिनचूक होऊ शकेल तितक्या प्रमाणांत प्रसंगांच्या कार्यकारणभावाची उपपत्ति निर्दोष राहील. तें प्रसंगचित्र सबोध व वस्तुस्थितीस धरून झाल्यास इतिहासरचनेंत पर्याप्तत्व व प्रमाणत्व साधेल. जसे

स्थलकालनिर्देशाच्या अभावी निरनिराळ्या वेळी व स्थळी घडलेले अनेक प्रसग एकाच प्रसंगचित्रांत रेखाटले जातात तशीच कांही प्रसगांची द्विरुक्ति झालेली आढळते. अर्थात् अशा प्रकारचे दोष काढून टाकण्याचाच इतिहासरचनेत व सशोधनात मुख्य प्रयत्न करावा लागतो. एकांगी मजकुरांतील स्थलकालांचें दुर्बोधत्वाचे प्रमाण अधिक असतें. हे प्रमाण विरोधी पक्षाकडील अगर स्वधीय माणसे किंवा राज्ये याचेकडील हकीकतीने बरेचसे कमी करिता येते. उदाहरणार्थ, अबुल हसनची शेवटची हकीकत मोगल सरदार जितकी बिनचूक देतील तितकी ती गोवळकोंड्याच्या लोकाना देता येणार नाही. साराश, स्वदेशाचा अगर स्वराष्ट्राचा इतिहास लिहिताना शेजारील सर्व राज्याचा इतिहास फार बारकाईनें तपासणे जरूर पडते. शिवकालीन मराठ्याच्या इतिहासास विजापूरची आदिलशाही, गोवळकोड्याची कुत्बशाही व हिदुस्थानची मोगलपातशाही यांच्या व कर्नाटकांतील हिदु राजाच्या इतिहासांचे आणि विशेषतः ऐतिहासिक साधनांचे परिशीलन होणें आवश्यक आहे. तत्कालीन परिस्थिति, अतर्गत राज्यव्यवस्था, सामाजिक व व्यावहारिक उत्क्रांत्या, राजाराजांचे परस्पर सबध, राज्यव्यवस्थेचे व आर्थिक बाबींचे परस्परांवर झालेले परिणाम इत्यादि सर्व गोष्टीचा चागला अभ्यास झाला पाहिजे. वास्तविक दख्खनी शाह्यांच्या सामर्थ्याचा जितका स्पष्ट बोध होईल तितका मराठ्यांच्या चिकाटीचा, सामर्थ्याचा व राज्यकारभारांतील कार्यतत्परतेचा चांगला व बिनचूक कयास बांधता येईल. अधश्रद्धा व वृथाभिमान धरून एकागी वृत्ति ठेवल्याने स्वदेशाचा इतिहास नुसताच सदोष राहतो असें नाही तर त्यात गौणत्वहि आणले जातें. उदाहरणार्थ, छत्रपतीची साक्षरता सिद्ध करण्यासाठी एखाद्या पाड दीड-पांडाच्या क्षुल्लक निवाड्याची खर्डेघाशी लादण्यांत जसा छत्रपतीच्या कार्यक्षमतेवर अप्रत्यक्षपणें आघात केला जातो, तशीच त्यांच्या राज्यकारभाराची मर्यादा कल्पनातीत सकुचित केली गेल्यानें किंवा सबंध हिदुस्थान जिकणारा व सांभाळणारा 'अवरग' शिवाजीपुढें कःपदार्थ मानल्यानें शिवाजीची योग्यता चिकित्सक माणसास कमी झालेली दिसते. उलट, शत्रुपक्षीय सामर्थ्याचा निखालसपणें बोध करून दिल्यास स्वसामर्थ्यातील तरतम प्रकार उज्ज्वलपणें लक्षांत येऊं शकतो व अपयश हे शक्ति व बुद्धि मोजण्याचें माप ठरत नाही. यामुळें इतिहाससंशोधनाचें व रचनेचें क्षेत्र जसें विस्तृत ठेवावें लागतें, तसेंच तें पूर्वग्रहप्रेरित व भेदाभेदपूर्ण असतां कामा नये. अशा अभ्यासांत संशोधक सोयीप्रमाणें आपल्या अभ्यासांतील दृष्टि व क्षेत्र ही

विषयकालानुसार संकुचित ठेवतो. त्यामुळें इतर अभ्यासकास काही गैरसोय होण्याचा संभव असतो; परंतु त्याच्या अभ्यासांतील क्षेत्रमर्यादेमुळे त्याच्या कार्यात पूर्णत्व व प्रमाणत्व साधले जातें व एकदरीत इतिहासलेखनांत प्रगतीच झालेली असते, हे गैरसोयीमुळें क्षुब्ध झालेल्या अभ्यासकांसहि थोड्याशा विचारांती व स्वकार्याच्याहि पुनर्निरीक्षणानें सहज समजून येण्यासारखे आहे. प्रस्तुत निबंधात शिवशाही कालापुरताच कुत्बशाहीचा इतिहास जरा बारकाईनें परीक्षला जाणार आहे. अर्थात् हाती आलेल्या साधनांचे मुद्रण तितक्या कालापुरतेच झाल्याबद्दल क्षमा होणं जरूर आहे.

२. **कुत्बशाहीचे संबंध :**— कुत्बशाहीची स्थापना प्रथम तेलगणांत झाली. त्यामुळें कुत्बशाहीचा संबंध तेथील लोकांशीच विशेष जडला. बहामनी राज्यांतील आणि विशेषतः निजाम उल्मुल्क हा प्रथम तेलंगण प्रांताचा सुभेदार असल्याने, सुलतान कुलीकडे थोडे मराठे लोक होते. बहामनी राज्य मोडण्यास स्वदेशीय मुसलमान व परदेशीय मुसलमान यांच्यांतील भांडण कारण झाले. परंतु कर्नाटकांतील विजयानगरचे राज्य बलवान् असल्यानें आणि ही सर्व जवळजवळ तुल्यबल राहिल्याने प्रथम कांही वर्षेपर्यंत हे इस्लामी शाहा आपापसांत धर्माच्या नांवाखाली प्रत्यक्ष भांडण्याचें टाळीत असत. राज्यतृष्णा लवकरच वाढूं लागली व हा निर्धार दिवसेंदिवस मत्सरवाढीमुळे मुरत चालला. ते आपापसांत भांडू लागले. मात्र प्रत्येकजण दुसऱ्याची सत्ता प्रबल होऊ न देण्याची शक्य ती खटपट करी व अशा भांडणांत केलेले तह व मैत्रीच्या अटी मोडण्यांत ते फारशी दिक्कत बाळगत नसत. या लपडावींत विजयानगरचा चांगलाच उपयोग होत असे. परंतु इब्राहीम कुत्बशाहाने विजयानगरच्या नाशाचा कट करून दक्षिणेंतील ही राज्यें धुळीस मिळविण्याचा जोराचा प्रयत्न केला. शेवटी तालीकोटच्या रणसंग्रामात हिंदु विरुद्ध इस्लामी सत्तेचा निर्णय झाला. अखेरीस हिंदु राज्यें जवळजवळ नाममात्र राहिली. त्याचा परिणाम असा झाला की, मोठ्या मुसलमानी सत्तांनी लहान मुसलमानी सत्तांचा सहज नाश केला. राहिलेल्या तीन शाह्या उत्तरोत्तर एकमेकींच्या नाशार्थ प्रयत्न करूं लागल्या. परदेशीय मुसलमानांची संख्या कमीकमी होत चालली. मराठे व हिंदु सरदारांवर विशेष भिस्त राहू लागली. जयापजयाचा कांटा झुकविण्याचें सामर्थ्य या दक्षिणी सरदारांत राहिल्यान त्यांनीहि स्वार्थापलीकडे विशेष लक्ष पुरविलें नाही. कुत्बशाहीचें क्षेत्र जसजसें उत्तरेकडे व पश्चिमेकडे वाढू लागलें तसतसा मराठे

सरदारांचा भरणाहि अधिकाधिक होऊ लागला. सतराव्या शतकांत बरेंच मोठ्या तोलाचे मराठे सरदार कुत्बशाहीत शिरले. शेवटीं मादण्णाच मुख्य कारभारी झाला. सतराव्या शतकाच्या सुरुवातीस शाह्यांची उलथापालथ करण्याचें सामर्थ्य आलेले दिसतांच मराठसरदारांनी या शाह्यांचें जूहि फेकून दिलें असतें. परतु विजयानगरच्या राज्यानंतर मोगलपातशाहीचा शह बसू लागला. मात्र मोगलपातशाहीचा पाय रुजतांच तिनें निजामशाही स्वाहा केली; आणि जर शिवशाहीचा उदय झाला नसता तर राहिलेल्या दोन्हीहि शाह्यांचा निःपात सतराव्या शतकाच्या मध्यावर झाला असता. अशा परिस्थितीत कुत्बशाही व शिवशाही यांचे परस्पर सबंध नेहमी मित्रत्वाचे राहूं शकले व शिवशाहीची उभारणी करण्यास या कुत्बशाहीची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पुष्कळच मदत होऊ शकली. हे सबंध सतराव्या शतकाच्या दुसऱ्या अर्धातील होत. कुत्बशाहीची या कालातील प्रवृत्ति सलोख्यानें वागण्याची होती. जेव्हां जेव्हा दक्षिणेंत युद्धप्रसंग उद्भवले तेव्हां तेव्हां ते खंडणी वगैरे देऊन टाळण्याचा प्रयत्न झाला. उघडपणें मदत देतां आली नाहीं तर ती गुप्तपणें दिली गेली. शेजारील राज्यांच्या भांडणांत कुत्बशाहीनें याप्रमाणें तटस्थपणा धारण केल्यामुळें निजामशाहीनंतर दक्षिणी राज्यांतील लढायांचा निकाल बऱ्याच वेळां कुत्बशाहीच्या धोरणावर अवलंबून राहिला व अशा लढ्यांत कुत्बशाहीची प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष मध्यस्थी नेहमी कोणाहि गजास चढाई करू देत नसे. ही राज्यें तुल्यबल राहात. सारांश, या शतकांतील कुत्बशाहीचा इतिहास शिवशाहीच्या इतिहासास अनेक दृष्टीनीं महत्त्वाचा आहे व याच दृष्टीनें या अभ्यासास लागणारी ऐतिहासिक साधनं जमविणें, परीक्षणें व प्रकाशित करणें हें शिवशाहीच्या इतिहासरचनेत व संशोधनांत एक महत्त्वाचें अंग होऊन राहिलें आहे.

३. **कुत्बशाही इतिहासाचीं नवीं साधनें :—** शिवशाहीच्या आणि विशेषतः संभाजीकालीन ऐतिहासिक साधनांचा शोध करितांना कुत्बशाहीसंबंधी कांही ऐतिहासिक साधनें आढळली. त्यांतील पुढील तीन हकीकती अभ्यासकाच्या दृष्टिक्षेपांतून नाहीशा झाल्याचें आढळून आल्यावरून त्या प्रथम सादर करीत आहें. यानंतर आणखी कांही साधनें सवडीप्रमाणें प्रकाशित होतील. ही साधनें उपयुक्त असून महत्त्वाची आहेत. परतु ती छापतांना त्यांतील शिवशाहीस उपयुक्त असलेला तेवढाच भाग घेतला आहे.

१. 'The History of a Late Revolution in the Kingdom of Golconda'— 'गोवळकोंडा राज्यांतील नुकत्याच घडलेल्या एका राज्यक्रांतीचा इतिहास' (पृ. १–२१).

२. Chapters VI and VII from "Hadiqat-u'l-Alam"– 'हदिकत–अल–अलममधील सहावा व सातवा भाग' (पृ. २३-१८५).

३. 'Some Account of Akana and Madana, Chief Ministers of Tanashah Badshah of Golconda' – 'गोवळकोड्याच्या तानाशाहा बादशहाचे मुख्य वजीर आकण्णा व मादण्णा यांची कांही हकीकत' (पृ. १८७–२०३).

४. गोवळकोंडा राज्यांतील एका क्रांतीचा इतिहास :— 'गोवळकोंडा राज्यातील नुकत्याच घडलेल्या एका राज्यक्रातीचा इतिहास' किंवा "The History of a Late Revolution in the Kingdom of Golconda" ही हकीकत 'जॉन ओव्हिंग्टनचा इसवी सन १६८९चा सुरतेचा प्रवास' या ग्रथांत परिशिष्टरूपाने[1] दिलेली आहे. हे प्रवासवृत्त जॅकॉब टोन्सन यानें फ्लीट स्ट्रीटवरील इनर-टेंपलगेटजवळील जजिस हेड येथे इ. स. १६९६ साली प्रथम छापून प्रसिद्ध केले. अठराव्या शतकाच्या सुरुवातीस या ग्रथाचा फ्रेंच भाषेत एक अनुवाद केला गेला.[2] तो दोन भागात प्रसिद्ध झाला. त्यानतर हें पुस्तक अगदी दुर्मीळ झाल्यामुळे इ. स. १९२९ साली प्रिन्सिपॉल एच्. जी. रॉलिन्सन यानी इ. स. १६९६ साली प्रसिद्ध झालेल्या प्रवासवृत्ताचे लडनच्या आक्स्फर्ड युनिव्हर्सिटी प्रेसतर्फे पुनर्मुद्रण करविले. परतु या आवृत्तीत शेवटची चारहि परिशिष्टे गाळली गेली. त्यात हे 'राज्यक्रातीचे' पहिले परिशिष्ट व हिंदी चलनपद्धतींचें- "An Account of the Coins of the Kingdoms of India, Persia, Golconda, etc '–असे तिसरे परिशिष्ट होते. इ. स. १६९६चा प्रत आतां

१ सहरहू पुस्तकाचीं पृष्ठे ५२५ ते ५५२.

2. Voyages De Jean Ovington - Fails a' Surate, & en d'autres lieux de l' Asie & de l' Afrique. AVEC. L'Histoire de la Re'volution du Royaume de Golconde & des observations sur les Vers a' Soye. Traduit de l' Anglois. A PARIS.—chez Guillaume Cavelier Fils, Libraire rue S. Jacques, au Lys d'Or pre's la Fountaine Saint Severin—M.DCC XXV.—Avec Approbation & Privilege du Roi

अगदीच दुर्मीळ झाली असल्यामुळे कुत्बशाहीची समकालीन व महत्त्वाची माहिती देणारें हे ऐतिहासिक साधन पुनर्मुद्रित करणे आवश्यक झाले.

५. **जॉन ओव्हिंग्टनची हकीकत :—** जॉन ओव्हिंग्टन हा इंग्लंडचा रहिवासी. याचा जन्म यॉर्कशायर परगण्यात डार्लिंग्टनजवळील एका मेल्सन्बी (Melsonby) नांवाच्या खेड्यात इ. स. १६५३ मार्चच्या पूर्वी थोडे दिवस झाला. त्याचे एम्.ए.पर्यंत शिक्षण होऊन त्याला ती पदवी इ. स. १६७८त मिळाली. त्यानें लिहिलेली कांही पुस्तके अद्यापि उपलब्ध आहेत. त्याला इंग्लंडच्या बादशहाच्या खास चॅप्लेनचेहि पद प्राप्त झाले होतें. ईस्ट इंडिया कंपनीचे 'बेंजामिन' नावाचे जहाज ग्रेव्हसेंडहून ता. ११ एप्रिल १६८९ रोजी निघाले. या जहाजावर जॉन ओव्हिंग्टनची चॅप्लेनच्या जागी हगामी नेमणूक झाल्याने तोहि त्या जहाजाबरोबर निघाला. हे जहाज मार्गात निरनिराळ्या बंदरांत मुक्काम करीत करीत शेवटी इ. स. १६९०च्या २९ मेला मुंबईस आले. तेथून ते सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यांत निघून सुरतेस गेले. सुरतेचा माल उतरल्यानंतर ते जहाज आंचिन वगैरे बंदरांकडे निघून गेले. ओव्हिंग्टन मात्र सुरतेस राहिला. त्याला तेथेंच त्या वखारीवर चॅप्लेन नेमण्यांत आलें. पुढे 'बेंजामिन' जहाज सुरतेस परत आले व तेथून ते इ. स. १६९३च्या फेब्रुवारीत सुरत सोडून पुन्हां वाटेनें बंदरें करीत करीत ता. ५ डिसेंबर १६९३ रोजी ग्रेव्हसेंडला पोहोंचले. ओव्हिंग्टनहि याच जहाजावरून इंग्लंडला परत गेला. सारांश, ओव्हिंग्टन मुंबईस तीन साडेतीन महिने व सुरतेस दोनअडीच वर्षे राहिला. या अवधीत त्यानें जें जें पाहिले व ऐकले त्याचा व इतर ठिकाणचा वृत्तांत त्यानें लिहून काढला व तो नंतर त्याचेच हयातीत वर लिहिल्याप्रमाणे इ. स. १६९६त प्रथम प्रसिद्ध झाला. जॉन ओव्हिंग्टन इ. स. १७३१च्या जूनच्या अखेरीस वारला व त्याचा अंत्यविधि ता. २ जुलै रोजी करण्यांत आला.[३]

६. **क्रांतीच्या इतिहासाचें महत्त्व :—** ओव्हिंग्टनच्या प्रवासवृत्तावरोबर छापलें गेलेले हें 'राज्यक्रांती'चें परिशिष्ट ओव्हिंग्टनन लिहिलेलें नसून ते कोणी व केव्हां लिहिलें हें समजण्यास आज साधन उपलब्ध नाहीं. या हकीकतीत तारीख-

३. इ. स. १९२९च्या प्रतीस प्रि. रॉलिन्सन यांनी लिहिलेला प्रस्तावना—पृ. IX-XVIII.

सनांचा मुळींच निर्देश नाही. ओव्हिंग्टननें जो काही थोडासा प्रास्ताविक खुलासा केला आहे तोहि अपुरा आहे. ओव्हिंग्टन लिहितो की, "ही क्रांतीची व इतर हकीकत सुदैवाने जर माझ्या ग्रथसमाप्तीपूर्वी हाती आली असती तर तिचा मला या प्रवासवृत्तात ठिकठिकाणी उपयोग करिता आला असता. परतु हे कागद माझा प्रवासग्रथ छापून झाल्यानतर माझ्या हाती आले. त्यातील माहिती माझ्या विषयास धरून होती. ती फार महत्त्वाची व नवीन असल्याचे आढळून आले. अर्थात् अशी माहिती परिशिष्टरूपाने देणे योग्य असे वाटल्यावरून ती या ग्रथास जोडीत आहे. हे टिपण (Memoirs) डॅनिअल शेल्डननें मजकडे पाठविले व त्याचा पूर्णपणे उपयोगहि करू दिला. त्यामुळे त्याचे मजवर वरेंच उपकार झाले आहेत. तरी या गोवळकोंड्याच्या राज्यक्रातीच्या हकीकतीस विशेष प्रस्तावना न जोडतां ती वाचकांस आवडेल असा भरवसा वाटल्यामुळे सादर करीत आहे."[४] यावरून ही हकीकत इ. स. १६९६ पूर्वीच लिहून ठेविली होती हें निश्चित आहे. खास मजकुरातें इ. स. १६७४च्या पूर्वीचीच हकीकत आली आहे. त्यानतरच्या कोणत्याहि प्रसगाचा त्यात उल्लेख नाही. यावरून हा लेखक इ. स. १६७४पूर्वी गोवळकोंड्यास राहात असावा. माहितीतील बारकाई, त्यातील शब्दयोजना, क्रियापदाची वर्तमानकालवाचक कांही रूपे व विशेषतः मुसाखानाची प्रशसा यांचा विचार केला तर हा यूरोपीय लेखक कोणा तरी कुत्बशाही अमलदाराचा, बहुधः मुसाखानाचाच दोस्त अगर परिचयाचा असावा व ही हकीकतहि त्यानें गोवळकोंड्यासच लिहिली असावी. एकदर लेखाची चिकित्सा करिता हें टिपण समकालीन आहे यांत शका नाही. लेखकानें अकराबारा वर्षांत घडलेली हकीकतच मुख्यतः निवेदन केली आहे. ती सागताना त्याने पाचसात वर्षांची थोडीशी पूर्वमाहिती अनुसधानाने दिली आहे. परतु ती विषयपूर्ततेसाठी आली आहे. यात कालाचा व – सातआठ नावे सोडली तर– नावांचा उल्लेख नाही. लेखनाचा मुख्य उद्देश अबुल हसनला तख्तावर आणण्यासाठी कशी कारवाई करावी लागली व अबुल हसननें तख्तावर आल्यानतर योग्य अशी क्राति कशी घडवून आणली एवढेच सांगण्याचा आहे. मात्र या हकीकतीवरून इतरत्र उपलब्ध असलेल्या माहितीवर प्रकाश पडून काही शकित स्थळे उलगडली जातात. या दृष्टीनें हे 'राज्यक्रांती'चें टिपण कुत्बशाहीच्या इतिहासास वरेंच महत्त्वाचे व उपयुक्त ठरेल असा भरवसा वाटतो.

४. प्रस्तुत ग्रंथ, पृ. १-२. ५. प्रस्तुत ग्रंथ, पृ. ३-२१.

७. 'हदिकत-अल-अलम' :— या ग्रथात समाविष्ट केलेली दुसरी हकीकत म्हणजे कुत्बशाही व निजामशाही याची हकीकत देणाऱ्या 'हदिकत-अल-अलम' नांवाच्या फारसी बग्वरीतील काही भाग. या बग्वरीच्या तीन हस्तलिखित प्रती लडन येथील इडिया ऑफिसच्या ग्रथालयात आहेत. त्यांतील २४२८ नवरच्ची (एथे यादीतील न. ४६५) प्रत मी उपयोगिली[७]. त्याचप्रमाणे ही बग्वर हैद्रावाद येथे हिजरी सन १२१८ (इ. स. १८०३-४)त छापली गेली होती. तीहि प्रत मला उपयोगात आणता आली. हदिकत-अल-अलम हा फारसी ग्रथ दुसरा निजाम अली असफझाचा वजीर अबुल कासिम बिन गदिआलदिन अलमुसावी ऊर्फ मीर अलम याने हिजरी सन १२१८ (इ. स. १८०३-४)पूर्वी पुरा केला. मीर अलम हिजरी सन १२२८ (इ. स. १८१३)त वारला. इडिया ऑफिसमधील २४४० नवरच्या हस्तलिखित प्रतीवरून हा ग्रथ कोणा एका मीर अबु तुर्व इब्न अल सय्यद अहमद अरिदावी याने मीर अलमच्या सागण्यावरून इ. स. १८०६त रचला असे म्हटले असून त्यात मीर अलमचे त्रोटक चरित्रहि दिले आहे[८]. परतु हे तेवढे विश्वसनीय दिसत नाही.

या हदिकत-अल-अलमचे दोन मुख्य भाग किवा मग्वला केले आहेत. पहिल्या भागात गोवळकोंड्याच्या कुत्बशाहीचा इतिहास व दुसऱ्या भागात हैद्रावादेच्या निजामशाहीचा वृत्तात दिला आहे. पहिल्या भागात एक मुग्वदिना व सात बाबी असे आणखी विभाग पाडले आहेत. या विभागातहि प्रत्येकी तीन फेसल किवा पोटविभाग काहीत पाडले आहेत. मुग्वदिनात मुलतान कुली कुत्ब उल्मुल्कची पूर्व हकीकत व अखेर [पृ. ६अ] दिली आहे.

पहिली बाब— मुलतान कुली कुत्बशाहाची ४४ वर्षाची कारकीर्द. हा हि.स. ९५० (इ. स. १५४३)त वारला. [पृ. ७अ]

दुसरी बाब— जमशीद कुत्बशाहाची हकीकत. मृत्यु हि. स. ९५७ (इ. स. १५५०). जमशीद कुत्बशाहाचा मुलगा सुभान कुली याची हकीकत. [पृ. ४४अ]

---

६. प्रस्तुत ग्रंथ, पृ. २३-१८५.

७. पहिली प्रत इंडिया ऑफिस नं. २४२८ व एथेच्या यादीतील नं. ४६५, दुसरी प्रत इंडिया ऑफिस नं. २४३९ व तिसरी प्रत इंडिया ऑफिस नं. २४४०.

८. इंडिया ऑफिसातील फारसी हस्तलिखित ग्रंथाची यादी—एथेकृत, पृ. १७९.

तिसरी बाब—इब्राहीम कुत्बशाहा याची कारकीर्द. मृत्यु हि. स. ९८८ (इ. स. १५८०). [पृ. ८३]

चवथी बाब—महमद कुली कुत्बशाहाची कारकीर्द. मृत्यु हि. स. १०२० (इ. स. १६१२). [पृ. १०८ अ]

पाचवी बाब—महमद कुत्बशाहा याची कारकीर्द. मृत्यु हि. स. १०३५ (इ. स. १६२६). [पृ. १४३]

सहावी बाब—अबदुल्ला कुत्बशाहा याची कारकीर्द. मृत्यु हि. स. १०८३ (इ. स. १६७२). [पृ. १६३]

सातवी बाब—अबुल हसन ऊर्फ तानाशाहा कुत्बशाहा याची कारकीर्द. हि. स. ११२३ (इ. स. १७११). [पृ. १९८]

दुसऱ्या मजकूरात निजामशाहीची हकीकत दिली असल्याने तिचा येथें विस्तार करण्याचे कारण नाही.

ही हकीकत समकालीन नाही. परंतु यात ठिकठिकाणी समकालीन पत्रातील, कागदपत्रातील व कबरीवरील लेखातील उतारे व आधार घेतले असल्याने या हकीकतीस ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. शिवाय समग्र कुत्बशाहीची एकत्रित व संकलित हकीकत देणारा इतिहास उपलब्ध नसल्याने ही बखर संशोधकास मार्गदर्शक होईल यात शंका नाही.

८. हदिकतमधील भाषांतरित विभाग :— प्रस्तुत ग्रंथात मात्र अबदुल्ला व तानाशाहा याच्या हकीकतीचा म्हणजे शिवशाहीच्या इतिहासास उपयुक्त इतकाच भाग भाषांतरित करून छापला आहे. हे भाषांतर पुणे येथील फर्ग्युसन कालेजातील पर्शिअन व अरेबिकचे प्रोफेसर श्री. व. द. वर्मा एम.ए. यांनी केले आहे. सहाव्या बाबीतील दुसरा व तिसरा फसल व सातवी बाब एवढाच भाग भाषांतरित झाला आहे. अबदुल्ला कुत्बशाहाची जी हकीकत आली आहे ती कबरीवरील शीलालेख', सुलतान अबदुल्लाच्या कारकीर्दीची हकीकत देणारे 'तरिख इ-निझाम-उद्दिन अहमद' व तरिख-इ-मिरत-उस-सफा' हे दोन ग्रंथ व कोठे कोठे क्वचित् उल्लेख असलेला 'तरिख-इ-काफीखान' याचे आधारे दिली आहे. कांही ठिकाणी फर्मानाचा व हिशेबी कागदाचाहि उल्लेख केला आहे. लेखकाने स्वतःची मर न घालता

मिळाला तेवढाच मजकूर उद्धृत केला असें शेवटी म्हटलें आहे.[९] हकिकतमध्यें दिलेल्या मजकुरावरून अबदुल्ला कुत्बशाहाच्या चरित्राचा समग्र बोध होऊ शकत नाही. कारण साधारणतः यात इ. स. १६२६ ते १६३३ व १६५६चा मजकूर आला आहे. शेहचाळीस वर्षांची कारकीर्द असतां अवघी दहा वर्षांचीहि हकीकत यांत ग्रथित झाली नाही यावरून ही हकीकत किती अपुरी आहे हे समजून येईल. परंतु जी हकीकत दिली आहे ती बरीच बारकाईची असल्यान उपयुक्त आहे.

अबुल हसनचा इतिहास 'काफिखान', 'मासिर-उल-अमारा', व मिर्झा महमद ऊर्फ निमतखान ऊर्फ अली याचा 'बाका-इ-गोवळकोंडा' यांवरून घेतलेला आहे. तिसरा ग्रथकार समकालीन आहे. यांत विशेषतः इ. स. १६७२ व १६८५-७ची म्हणजे अबुल हसनचें राज्यारोहण व मोगलाशी झालेलें शेवटचें युद्ध एवढीच हकीकत आली आहे. मोगली युद्धांत कुत्बशाहीची बाजू ऐकावयास मिळाल्यानें या हकीकतीसहि विशेष महत्व प्राप्त होत आहे.

९. **मादण्णा व आकण्णा यांची एक जुनी हकीकत :—** या ग्रथास जोडलेली[१०] तिसरी हकीकत म्हणजे मादण्णा व आकण्णा यांचे बद्दलचे एक टिपण. हें एका जुन्या तेलगु टिपणावरून क. मॅकेन्झी याने इ. स. १८०१च्या सुमारास इग्रजींत भाषांतर करून घेतलें. हे क. मॅकेन्झी याच्या इडिया ऑफिसमधील सग्रहांत आढळले. त्याचें मूळ कोणी व केव्हां लिहिलें हे समजण्याम आज मार्ग नाहीं. भाषातरामुळे मूळ मजकूर विकृतावस्थेत मिळत आहे. परंतु त्यांत दिलेल्या वारीक-सारीक गोष्टीवरून ही हकीकत बहुधः एखाद्या घरगुती टिपणावरून घेतली असावी असें दिसत. या टिपणाच्या साहाय्यान मादण्णा व आकण्णा यांच्या घराण्याची बरीच माहिती उपलब्ध होत आहे व या माहितीवरून मादण्णाचे बरेच कागदपत्र लाचतां येणार आहेत. शिवाय बऱ्याच नवीन गोष्टीचा उलगडा होतो तें वेगळेंच.

१०. **कुत्बशाही इतिहासलेखनाचे पूर्व प्रयत्न:—**कुत्बशाहीच्या इतिहास-लेखनाचे प्रयत्न खास कुत्बशाहीतच झालेले दिसतात. बहुतेक सर्व पातशाहांची चरित्रें लिहिली गेली असावींत. बहुधः ही सर्व फारसीतच असणार. फेरिस्तानें कुत्बशाहीचा स्वतत्र परंतु अगदीच त्रोटक इतिहास दिला आहे. त्यांत हि. स.९९५ (इ. स. १५८७) पर्यंतची म्हणजे महमद कुली कुत्बशाहाच्या तख्तारोहणानंतर

९. प्रस्तुत ग्रंथ, पृ. ८६ व ८७. १०. प्रस्तुत ग्रंथ, पृ. १८७–२०३.

७ वर्षांपर्यंतची हकीकत आहे.[११] या हकीकतीस ब्रिग्जने याच वेळी लिहिलेल्या 'तरीख-इ-महमद कुत्बशाही' ('The History of Mahomed Kolly Kootb Shah') या फारसी ग्रथाचे भाषातर जोडले आहे.[१२] यात हि. स. १०२० (इ. स. १६१२) पर्यंतची म्हणजे महमद कुली कुत्बशाहाच्या मृत्यूपर्यंतची हकीकत आली आहे. फेरिस्ताने इब्राहीम कुत्बशाहाच्या कारकीर्दीत लिहिलेल्या शाहा खुर्पच्या 'कुत्बशाही घराण्याचा उदय व इतिहासा'चा उल्लेख[१३] केला आहे; तर 'तरीख-इ-महमद कुत्बशाही'त स्वास सुलतान कुलीने स्वमुखाने सागितलेली हकीकत नोद करणाऱ्या मुद्र-इ-जहानच्या 'मखुब-उल-कुलूब'[१४]तील उतारे घेतले आहेत. ब्रिग्जने 'कुत्ब-नुमा-अलम' पाहिला होता.[१५] 'हदिकत-अल-अलम' मध्ये 'तरिख-इ-निजामउद्दिन अहमद', 'तरिख-इ-मिरत-उस्-सफा', मिर्झा महमद ऊर्फ निमतखान ऊर्फ अली याचा 'वाका-इ-गोवलकोडा' याचा उल्लेख आहे.[१६] 'तरिख-इ- कुत्बशाही' या नावाचा ग्रथ ब्रिटिश म्युझिअममध्ये आहे.[१७] हा ग्रथ इ. स. १६१७-८त लिहिला गेला व याची प्रत इस्मायल मुल्ला अरब शिराझी यान अबदुल्ला कुत्बशाहासाठी इ. स. १६६९त केली असा त्यात उल्लेख आहे. हदिकतमध्ये याच ग्रथाचा व फेरिस्ताचा मुख्यतः उपयोग केला आहे. 'तरिख-इ-कादिरि' या नावाचा कुत्बशाहीची हकीकत देणारा ग्रथ हैद्राबादच्या असाफिया ग्रथालयात आहे. क. वालाजी प्रभाकर मोडक यानी आपल्या 'दक्षिणेतील मुसलमानी राज्याचा इतिहास, भाग ३'[१८] यात (पृ. ११३ ते १८५) 'कुत्बशाही घराण्याचा इतिहास' दिला आहे. त्यात उपरिनिर्दिष्ट ब्रिग्जच्या भाषातराचाच बहुतेक अनुवाद केला असून अबदुल्ला व अबुल हसन यांची थोडीशी हकीकत मोगली इतिहासातून घेतली आहे. यात महमद कुत्बशाहा गाळला गेला आहे.

---

११. ब्रिग्जचें फेरिस्ताचे भाषातर, पुस्तक ३ रे, पृ. ३२१-३३५.

१२. ब्रिग्जचे फेरिस्ताचें भाषातर, पुस्तक ३ रे, पृ. ३३९-४८४.

१३. ब्रि. फे. कु. पु. ३, पृ. ३२१.

१४. ब्रि. फे. कु. पु. ३, पृ. ३४०, ३५२ इ.

१५. ब्रि. फे. कु. पु. ३, पृ. ४५१.

१६. प्रस्तुत ग्रंथ पृ. ८७

१७. ब्रिटिश म्युझिअममधील फारसी हस्तलिखितांची यादी, भाग १ ला.

१८. हा ग्रंथ कोल्हापूर येथें शिळाप्रेसवर छापून ऑगस्ट १८९१त प्रसिद्ध झाला.

आतांपर्यंत जे इतिहासलेखनाचे प्रयत्न झाले ते बहुधः मोगल पातशाहीवरील असत. विजयानगरचा इतिहासहि थोडाबहुत अभ्यासला गेला. परंतु इतर दक्षिणी राज्याच्या इतिहासांकडे अद्यापि फारसें लक्ष्य लागले नव्हते. भारत-इतिहास-संशोधक-मंडळाच्या संस्थापनेने मराठ्यांच्या इतिहासाकडे बरेंच लक्ष्य वेधले गेले, व कर्नाटक-संघटनेच्या चळवळीत कर्नाटकाचा इतिहास पुष्कळच उपलब्ध होईल अशी चिन्हें दिसू लागली. अद्यापि आदिलशाही व कुत्बशाही घराण्याच्या इतिहासांकडे जावें तितकें लक्ष्य जात नाही. क्रमिक व इतर आधुनिक पुस्तकांत या राज्यांबद्दल जी कांही माहिती येते ती बहुधः मोगली इतिहासातून घेतलेली असते. फेरिस्ता-वरून घेतलेली हकीकत महमद कुली कुत्बशाहापर्यंतचीच असल्याने व मोगली इतिहासात फक्त अबदुल्ला व अबुल हसनचा उल्लेख आल्याने महमद कुत्बशाहाची इ. स. १६१२ ते १६२६ ची कारकीर्द यूरोपिय व स्वदेशीय ग्रथकागच्या दृष्टिक्षेपातून गेलेली आढळते. शिवाय 'तरिख-इ-महमद कुत्बशाही'तील हकीकत बहामनी, आदिलशाही, निजामशाही वगैरे तत्कालीन इतिहासावरून तपासली जाऊन नतर ती उपयोगिली गेली असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रचलित कुत्बशाहीच्या हकीकतीत बरीच विसगतता व चुका आढळून येतात.

कुत्बशाहीचा समग्र इतिहास लिहिता येण्यासारखा आहे. उपरिनिर्दिष्ट कुत्बशाहीचे इतिहासग्रथ व बहामनी, आदिलशाही, निजामशाही आणि विजयानगरच्या राज्याचे इतिहास उपलब्ध आहेत. अबदुल्ला व अबुल हसन कुत्बशाहाचे पत्रसग्रहहि[१९] मिळण्यासारखे आहेत. कुत्बशाहाच्या पदरी अनेक विद्वान होते. त्यानी निरनिराळे ग्रथ लिहिले आहेत. त्यांतील प्रशस्तीतहि पुष्कळ माहिती मिळण्यासारखी आहे. याशिवाय कुत्बशाहीचे इमारतीवरील शीलालेख, थडग्यावरील लिखाणें,[२०] व इतर कागदपत्रें उपलब्ध होण्यासारखी आहेत व काही उपलब्ध झालेली आहेत. आणखीहि पुष्कळ मिळण्याचा सभव आहे. मद्रास व बगाल येथील यूरोपियन वखारवाल्यानी लिहिलेल्या कागदपत्रातून[२१] या राज्याबद्दल पुष्कळ माहिती मिळते.

१९. ब्रिटिश म्युझिअम, ग्रंथ नं. Add 6600, Add 7688, Sloane 4092 व Sloane 3582. इंडिया ऑफिससंग्रहातहि थोडी फर्माने आहेत.

२०. एपिग्राफिआ इंडो-मोस्लेमिकाचे अंक, १९०७-८ ते १९२९-३०.

२१. मद्रास व बंगाल रेकॉर्ड्स् छापलेले आहेत. मुंबईकरांच्या कागदपत्रातीलहि बराच इनर्वडिक भाग शिवचरित्र कार्यालयाने "English Records on Shivaji" व सर फोस्टरने "English Factories in India" व इतर ग्रंथातून दिला आहे.

ही सर्व साधनें प्रथम परीक्षून नंतर त्यांचा उपयोग केल्यास कुत्बशाहीचा बराचसा निर्दोष व सविस्तर इतिहास देता येईल. प्रस्तुत निबंधांत कुत्बशाहीच्या इतिहासाचा फक्त आराखडा देण्याचा विचार आहे. उपरीनिर्दिष्ट सर्व साधनांचा उपयोग करण्यास कालावधी लागेल. याकरिता अभ्यासाची सुरुवात करण्यास जरूर असणारी रूपरेषा आंखण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

११. **कुत्बशाहीची पूर्व हकिकत :**— कुत्बशाहीचा सक्षिप्त इतिहास येथें देणें अप्रस्तुत होणार नाही. बहामनी राज्याची महमदशाहाच्या मृत्यूनंतर छकले उडाली. दुसरा महमदशाहा १ सफर ८८७ हि. (२२ मार्च १४८२ इ. स.)त मृत्यु पावला. महमुदशाहा गादीवर आला. तो लहान होता. निजाम उल्मुल्क कारभार पाहू लागला. याचें व इतर मुसलमान सरदाराचे न पटल्यामुळे राज्यांत भाडणे उपस्थित झाली. निजाम उल्मुल्कच्या नेतृत्वाखाली दक्षिणी मुसलमान सरदार परदेशीयांशी भाडू लागले. आदिलखान दख्खनी व इमाद उल्मुल्कने आपली सैन्यें राजधानीत घुसविली. दोन्ही सैन्यात सारखे रण माजून राहिले. निजाम उल्मुल्क मुख्य कारभारी झाला. युसुफ आदिलखानादि मुसलमान सरदारांनी स्वतत्रपणे वागण्यास हि. ८९१ (इ. स. १४८६)पासून सुरुवात केली. दिवसेंदिवस बहामनी राज्याचा ऱ्हास होऊ लागला. इ. स. १५१२त कुत्बशाहीची तेलगणांत स्थापना झाली. या शाहीचा सक्षिप्त इतिहास ब्रिग्जच्या 'तरिख-इ-महमद कुत्बशाही'च्या आधारें पुढ दिला आहे.[२२]

कुत्बशाहीचा मूळ सस्थापक सुलतान कुली हा होय. सुलतान हे त्याचे नाव होते. याचा जन्म हमदान (इराण) प्रातांतील सय्यदाबाद नांवाच्या खेड्यांत हि. ८६० (इ. स. १४५६)च्या सुमारास झाला.[२३] हा आपला चुलता अमीर अल्ला

२२. या मजकुरात जो भाग 'तरीख-इ-महमद कुत्बशाही'तून घेतला आहे, त्यास आधारासाठीं स्वतंत्र टीपा दिल्या नाहीत. मात्र जेथें त्याहून निराळा अगर नवीन मजकूर आला आहे तेथे ज्या ग्रंथावरून तो घेतला त्यांचे आधार टीपेत दिले आहेत.

२३. सुलतान कुलीचें मृत्युसमयी वय ९० होतें. मुद्र-इ-जहाननें सुलतान 'मी जवळ जवळ १०० वर्षांचा होत आलों आहें', असे म्हटल्याचें लिहिलें आहे. कॅ. हेगनें तो ९८व्या वर्षी वारल्याचें लिहिले आहे.—बुऱ्हान-इ-मासिरचें भाषांतर, इंडियन अँटिक्वेरी, व्हॉ. XLIX–१९२०, पृ. २२२. हेगच्या म्हणण्याप्रमाणें सुलतान कुलीचा जन्म हि. ८५२ (इ. स. १४४८)त येईल.

कुली याजबरोबर हिंदुस्थानांत प्रथम लहानपणीच आला होता. परंतु तो लवकरच स्वदेशीं परत गेला. तेथील अमीर याकूब बेगच्या[२४] त्रासामुळे त्यास पुन्हा हिंदुस्थानांत आपल्या चुलत्याबरोबर यावें लागले. हा बहुधः इ. स. १४८१चे सुमारास इराणातून निघून इ. स. १४८२नतर महमुदशाहाकडे आला. महमुदशाहा बहामनीने त्यास आपल्या खास तैनातीच्या सन्यात ठेवून घेतले.

हि. ८९१ (१४८६ इ. स.).— कोवाम उल्मुल्कनें जबरदस्तीनें तेलंगणाचा तावा घेतला, तेव्हां त्याचा मोड करण्यासाठी महमुदशाहाने स्वारी केली. वाटेंत बारंगळ येथे बातमी आली की, निजाम उल्मुल्कच्या समतीने त्याचा वडील मुलगा मलिक अहमद बहिरीनें बड उभारलें. महमुदशाहाने सुलतान कुलीस तेलगणाचा तरफदार नेमून[२५] पाठविलें व तो खासा बेदराकडे गेला.

हि. ८९६[२६] (१४ नवंबर १४९० ते ३ नवंबर १४९१ इ. स.).—दख्खनी व सिद्दी मुसलमानी सरदारांनी महमुदशाहाचा खून करण्याचा गुप्त कट केला. कटवाले २१ जिल्काद (२६ सप्टेंबर १४९१ रोजी) रात्री राजवाड्यांत घुसले. त्या वेळी सुलतान कुली महमुदशाहाजवळ होता. त्यानें आपल्या दहा साथीदारांसह मोठ्या शौर्याने शाहाचें सरक्षण केले. त्यांत त्याचे पाच लोक कामास आले. इतक्यांत हुसेन ख्वाजा जहान यास निरोप गेला. त्यानें येऊन बंदोबस्त करण्यास सुरुवात केली. महमुदशाहा ख्वाजा जहानच्या आश्रयास पळाला. बरोबर सुलतान कुली होताच. सकाळपर्यंत कटवाल्यांचा मोड झाला. नतर कटात सामील झालेल्यांस शासन केले. या वेळी सुलतान कुलीने मोठ्या साहसानें शाहाचे प्राणरक्षण केल्याबद्दल त्यास 'मलिक कुत्ब उल्मुल्क' असा किताब देऊन त्यास आपला नायब वजीर केले.

हि. ८९९[२७] (१२ आक्टोबर १४९३ ते १ आक्टोबर १४९४ इ. स.). — गुजराथच्या महमुदशाहानें बहादुर गिलनीविरुद्ध महमुदशाहा बहामनीकडे गलबतें लुटल्याबद्दल तक्रार केली. शिवाय गिलनीहि स्वतत्र होऊ पाहात होता. त्यावरून महमुदशाहा गिलनीच्या पारिपत्यार्थ निघाला. बरोबर कुत्ब उल्मुल्क होता. याच सुमारास गिलनीनें युसुफ आदिलखानाची जमखडी घेतल्यामुळे युसुफने आपला सेनापती

२४. याकुब बेग इ. स. १४७९त कारभारावर आला व इ. स. १४९०त मेला.
२५. ब्रि. फे. ब. पु. २, पृ. ५२७-३१.
२६. ब्रि. फे. ब. पु. २, पृ. ५३३. [ह-अ-अ. (लि.) पृ. १७.
२७. ब्रि. फे. ब. पु. २, पृ. ५३१. हदिकतमध्यें २१ जिल्काद ही तारीख दिली आहे.

कुमलग्वान यास महमुदशाहाच्या मदतीस पाठविले.[२८] महमुदशाहानें तेलगणाचा तरफदार कुत्ब उल्मुल्क यास जमखडीस वेढा घालण्याचा प्रथम हुकम दिला. वेढा चालू असता मुख्य सेनापतीस तीर लागून तो मारला गेला. तेव्हा मुलतान कुलीस तें सेनापतीपद देऊन त्याचेकडे तेलगणांतील भोंगिर[२९] (Bhongeer) व दुर्गी (Doorgy)[३०] हे दोन गाव खर्चासाठी इनाम दिले. जमखडीचा[३१] किल्ला स्वाधीन होतांच तो युसुफच्या सेनापतीचें हवाली केला. बहादुर गिलनी सकेश्वरी पळून जाऊन राहिला होता. म्हणून सकेश्वरावर चालून जाऊन ते काबीज केले. परतु गिलनी आधीच मिरजेच्या किल्ल्यात जाऊन राहिला होता. हा किल्ला पोटा नायकाच्या ताब्यात होता. मुलतान कुलीने मिरजेच्या[३२] किल्ल्यास वेढा दिला.[३३] तेव्हां पोटा नायकाचा मुलगा देव नायक याने चालून येऊन निकराचा हल्ला केला. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत घनघोर रण माजून राहिलें. त्यास मुलतान कुली व देव नायकाचे सगर झालें. त्यात देव नायक ठार झाला. मुलगा मारला गेलेला पाहताच पोटा नायकाचा धर सुटला. किल्ला महमुदशाहाचे हवाली झाला. तेव्हा महमुदशाहानें पोटा नायकाकडे तो परत देऊन. बहादूर गिलनी वाळव्यास[३४] पळून गेला होता म्हणून तो वाळव्यास गेला. प्रथम गिलनीने ख्वाजा निमतउल्लास पाठवून क्षमा मागण्याचा थाट केला. हा २७ रजब (२६ मार्च १४९४) रोजी महमुदशाहास भेटला. परत पुन्हा बडाचें निशाण लावले. तेव्हा महमुदशाहानें मुलतान कुलीस घेऊन जाऊन वाळवें घेतले व कोल्हापुरावर[३५] चालून गेला. कोल्हापूर घेतले. गिलनी पन्हाळ्यास[३६] गेला म्हणून पन्हाळ्यास वेढा घातला.

२८. ब्रि. फे. आ. पु. ३, पृ १४.

२९. भोंगीर (Bhongir) हैद्राबादेच्या ईशान्येस ३० मैल, नलगोंड जिल्हा, निजाम संस्थान हकिकतमध्ये कोटगीर म्हटले आहे. ह-अ-अ. (लि.) पृ. १८.

३०. दुर्गी—बहुधः देवलूर (Deglur) असावे. हें बिदरच्या उत्तरेस ४५ मैल आहे. नादेड जिल्हा, निजाम संस्थान

३१. जमखंडी—विजापूरच्या नैऋत्येस ३५ मैल, जमखंडी संस्थान.

३२. मिरज—विजापूरच्या पश्चिमेस ७५ मैल, मिरज संस्थान.

३३. ब्रि. फे. ब. पु. २, पृ. ५४०–१.

३४. वाळवें.—वाळवे तालुका, सातारा जिल्हा.

३५. कोल्हार म्हटलें आहे; परंतु बहुधः कोल्हापूर असावे. हदिकत-अल-अलम यात २७ रजब ही तारीख दिली–सदर पुस्तक–(लि.) पृ. १९.

३६. पन्हाळा—कोल्हापूरच्या उत्तरेस ५ मैल, कोल्हापूर संस्थान.

शेवटी गिलनीचा पुरा मोड झाला. तो पळून गेला. पुन्हां माफी मागितली. परंतु महमुदशाहानें पाठविलेल्या सरदारांवर तो चालून आला. या झटापटीत तो तीर लागून मारला गेला.[३७] नंतर महमुदशाहाची स्वारी ससैन्य विजापुरास आली. तेथे युसुफखान भेटला. त्यानें महमुदशाहा व सुलतान कुली यास बरेच नजरनजराणे दिले.[३८] नंतर सुलतान कुली तेलंगणांत आपल्या कारभारावर गेला.

हि. ९०१[३९] (२१ सप्टेंबर १४९५ ते ८ सप्टेंबर १४९६ इ. स.). — सुलतान कुलीकडे तेलंगण, गोवळकोंडा व वारंगळ या प्रांतांची तरफदारी होती. याच सुमारास दस्तुर दिनार हा सागर व अहंगनाबाद कुलबर्गा याचा सुभेदार होता. या भागांत कांही गडबड झाल्यामुळें व तो स्वतंत्र होण्याची खटपट करीत आहे असें समजतांच, त्याचे हाताखालील अधिकाऱ्यास महमुदशाहानें परत दरबारी बोलाविले. त्यामुळें दस्तुर दिनारास राग आला. त्यानं ससैन्य कूच करून कुलबर्ग्याजवळील कांही मुलुख घेतला. महमुदशाहाने युसुफखान व सुलतान कुलीस मदतीस बोलाविले. मैंदुर्गी (Myndurgy) येथे लढाई झाली. दस्तुर दिनार कैद झाला. परंतु युसुफखानाच्या मध्यस्थीने त्यास माफी मिळाली व त्याचेकडे पुन्हा कुलबर्गा प्रांत दिला व सागर युसुफकडे[३९] सोंपविला. होटगी[४१] (Ootgy) व उदगीर[४२] (Kotgeer) सुलतान कुलीस खास खर्चासाठी मिळाले व 'अमीर-उल्-उमराव' हा किताब मिळाला. नंतर सर्वजण आपापल्या प्रांती गेले.

हि. ९०३ (३० आक्टोबर १४९७ ते १८ आक्टोबर १४९८ इ.स.).— युसुफखान व दस्तुर दिनार याच्यात भांडण लागले व महमुदशाहानें दस्तुर दिनारास सुलतान कुलीच्या हाताखाली तरफदारी करण्याचा हुकूम दिला. तेव्हां दस्तुर दिनाराची पाठीराखी कासीम बरिदानें केली. महमुदशाहा युसुफखान, सुलतान कुली व मलिक

३७. ब्रि. फे. ब. पु. २, पृ. ५४१-३.

३८. ब्रि. फे. आ. पु. ३, पृ. १५.

३९. ब्रि. फे. आ. पु. ३, पृ. १५-१६ व ब. पु. २, पृ. ५४४.

४०. कुलबर्गा—गुलबर्गा, हैदाबादेच्या पश्चिमेस १०० मैल, कुलबर्गा जिल्हा, निजाम संस्थान.

४१. होटगी—सोलापूरच्या आग्नेयेस १५ मैल, सोलापूर जिल्हा.

४२. उदगीर—बिदरच्या वायव्येस ४५ मैल, बिदर जिल्हा, निजाम संस्थान.

एलिअज[४३] यास घेऊन कासिम बरिदावर चालून गेला. गुजबटीजवळ (Gunjoty) लढाई झाली. तींत कासिम बरिदाचा पूर्ण पराभव झाला[४४].

हि. ९०४ (२० आक्टोबर १४९८ ते ७ आक्टोबर १४९९ इ. स.).— त्यानंतर दुसऱ्या वर्षी युसुफखान पुन्हां दस्तुर दिनारावर चालून गेला. या वेळीं दिनारास मलिक अहमद बहिरीने मदत दिली. तेव्हा युसुफची पिच्छेहाट होऊ लागली. परंतु इतक्यांत सुलतान कुली युसुफचे मदतीस येत आहे असे समजतांच ही देखील मैन्यें माघारी फिरली.[४५]

युसुफखान, मलिक अहमद बहिरी व इमाद उल्मुल्क या तिघांनी ठरविले कीं, दक्षिणेत अवघ्या तीनच शाह्या असाव्यात. तदनुसार कोणी इतर कोणत्या शाहीवर घाला घालावा हेहि ठरवून घेतले. त्यात कासिम बरिदाने तेलगण घेऊन अहमदाबादचे बहामनी राज्य चालवावे असे ठरले. परंतु या कटापासून फारशी निष्पत्ति झाली नाही.[४६] उलट कासिम बरिदाने महमुदशाहास वाजूस सारण्याचा बेत केलेला कळतांच इतर सर्वजणास त्याची चढाई सहन झाली नाही. ते व सुलतान कुली धावून आले. तेव्हा कासिम बरिदाने माघार घेतली व शेवटी महमुदशाहाकडे राज्य कारभार सोपवावा व कासिम बरिदाने आवसा[४६] व कंदाहार[४७] या जहागिरीत राहावे असे ठरले.

हि. ९०८ (५ जुले १५०२ ते २६ जून १५०३ इ. स.). —महमुदशाहानें हिंदु राजावर नववरचे मुसाफरास स्वारी करण्याचे ठरवून तो उदगिरास आला. तेव्हा त्यास सुलतान कुली येऊन मिळाला. युसुफखानादि सुभेदारहि येऊन मिळाले. महमुदशाहानें रायचूर[४८] व मुदगल[४९] घेतले व ते युसुफखानाचे हवाली करून तो परत राजधानीस गेला.

---

४३. ब्रि. फे. आ. पु. ३, पृ. १७-८, व ब पु. २, पृ. ५४५-६.
४४. ब्रि. फे. आ. पु. ३, पृ. १८, व ब. पु. २, पृ. ५४६.
४५. ब्रि. फे. आ. पु. ३, पृ. १८-९.
४६. आवसा—बिदरच्या पश्चिमेस ७० मैल, उस्मानाबाद जिल्हा, निजाम संस्थान.
४७. कंदाहार—बिदरच्या उत्तरेस ८० मैल, नादेड जिल्हा, निजाम संस्थान.
४८. रायचूर—विजापूरच्या आग्नेयेस १०५ मैल, रायचूर जिल्हा, निजाम संस्थान.
४९. मुदगल—रायचूरच्या नैऋत्येस ५५ मैल, रायचूर जिल्हा, निजाम संस्थान.

याच वर्षी जमादिलावल महिन्यांत[५०] (नवंबर १५०२ इ. स.) युसुफखानानें शिया पथाचा जाहीर स्वीकार करून त्याप्रमाणें खुत्बाहि वाचविला. तेव्हां महमुदशाहा व सुनी पथाचे इतर सरदार त्याचेवर चालून गेले. मुलतान कुली शिया पथाचा पुरस्कारी; परंतु तोहि त्यांस मिळाला. या वेळी युसुफने माघार घेतली. त्यामुळे हे प्रकरण थोडक्यांत मिटलें.

९ जिल्हेज ९०९ हि. (२३ मे १५०४ इ. स.) गोजी कासिम बरिदाने महमुदशाहा एकटाच परतत आहे हें पाहून त्यास वाटेंत वेढलें. हें ऐकून युसुफखानादि सर्व सरदार धांवून आले. कासिमखानान युसुफला पराजित करण्याची वेळ आणली होती. परंतु मलिक कुत्ब उल्मुल्कनें त्या वेळी बाजू सावरली व कासिम बरिदास पळवून लावले. तो आवशाच्या किल्ल्यांत जाऊन राहिला. नंतर युसुफखानादि सरदारांनी महमुदशाहास पुन्हां तख्तनशीन केले.

हि. ९१० (१४ जून १५०४ ते ३ जून १५०५ इ. स.).— कासिम बरिद वारला. तेव्हा अमीर बरिदानें महमुदशाहास पुन्हां बाहुले करून त्रास देण्यास आरंभ केला. याच वेळी युसुफखानाने दस्तुर दिनारास ठार करून त्याचा मुलुख घेतला. पुन्हा शिया पथाप्रमाणे खुत्बाहि वाचविला. हे पाहून अमीर बरिदान महमुदशाहाच्या नांवे जानेवारीफेब्रुवारीत खलिते रवाना केले. कुत्ब उल्मुल्क, इमाद उल्मुल्क व खुदावदखान युसुफखानाचे विरुद्ध मोहिमेत मदतीस आले. परंतु ही मोहिम म्हणजे युसुफखानाचा नाश करून अमीर बरिदानें तें राज्य गिळकृत करण्याचा व स्वतः सामर्थ्यवान् होण्याचा प्रयत्न आहे असें इमादनें भासविले. तेव्हा कुत्ब उल्मुल्क व मलिक अहमद वहिरी हे महमुदशाहाचा निरोप न घेताच एका रात्री ससैन्य निघून गेले. इमादने महमुदशाहाचीहि समजूत घातली व युसुफखानास माफी देवविली.[५१]

हि. ९११ (४ जून १५०५ ते २३ मे १५०६ इ. स.).— महमुदशाहानें पुन्हा सर्व मांडलीक सरदाराना बोलावून विजयानगरावर स्वारी केली. देवली (Dewly) येथे लढाई झाली. मलिक कुत्ब उल्मुल्कनें डावी फळी फोडली. परंतु महमुदशाहा मधल्या फळीत घोड्यावरून खाली पडताच तुडविला गेला. तेव्हा महमुदशाहाचें सैन्य माघारें फिरलें.

---

५०. ब्रि. फे. आ. पु. ३, पृ. २२–९ व बुसातिन-इ-सलातिन, पृ. ३४.

५१. ब्रि. फे. ब. पु. २, पृ. ३४८-९.

हि. ९१६ (१० एप्रिल १५१० ते ३० मार्च १५११ इ. स.) — युसुफखान वारला[२]. त्यामुळे दक्षिणेंतील सर्व कर्ते मुसलमानी शाहा नाहीसे झाले. इस्मायल आदिलशाहानें कुत्ब उल्मुल्कशी प्रथम मैत्रीच सपादिली.

हि. ९१८ (१९ मार्च १५१२ ते ८ मार्च १५१३ इ. स.). — सुलतान कुलीहि आपला कारभार स्वतत्रपणें करू लागला. खुत्बाहि आपल्याच नावाने वाचविला. महमुदशाहास प्रतिवर्षी खडणीवजा खासगी मदत मात्र देत असे.[५३] मात्र हि. ९२४ (१५१८ इ. स.) पर्यत तरी तो आपल्यास 'कुत्ब उल्मुल्क'च म्हणवीत असे. शाहा हे पद धारण केलेले दिसत नाही. कदाचित् महमुदशाहा च. ४ जिल्हेज ९२४ हि. (६ डिसेंबर १५१८) रोजी वारल्यानतर त्याने शाहा म्हणविण्यास सुरुवात केली असावी.

१२. सुलतान कुली कुत्बशाहा:—मलिक सुलतान कुली कुत्ब उल्मुल्कने इ. स. १५१२–३त स्वतःचे नावानें खुत्बा वाचविल्यानतर गोवळकोंडा हे राजधानीचे शहर केले. गोवळकोड्याचा किल्ला सुधारून त्याचे नाव महमुदनगर ठेवले.

हि. ९२० (२६ फेब्रुवारी १५१४ ते १४ फेब्रुवारी १५१५ इ. स.).— अमीर बरिदाच्या लोकास काढून लावून इस्मायल आदिलशाहाने कुलबर्ग्यातील कांही मुलुख मिर्झा जहागीर यास दिला. त्यावरून अमीर बरिदानें महमुदशाहाच्या नावानें बुऱ्हाण निजामशाहा, कुत्ब उल्मुल्क व अल्लाउद्दिन इमादशाहाची मदत घेतली व

५२. हि. स. ९१३, ९१६ व ९२५ अशी मृत्यूची वर्षे इतरत्र दिली आहेत. बु. स. ३७. हि. ९१० 'तारिख-इ-महमद कुत्बशाहीं'त नमूद केलें आहे तें आदिलखान दरूखनींचें आहे. ब्रि. फे. कु. पु. २, पृ. ३५०. हि.९१६ ब्रि.फे. आ. पु ३, पृ. ३० व ब. पु. २, पृ. ५४९ वर दिलें आहे.

५३. ब्रि. फे. ब. पु. २, पृ. ५४९.

५४. हि. ९२४ (इ. स. १५१८) त 'सुलतान कुली ऊर्फ कुत्ब उल्मुल्क याने महमुदशाहाच्या कारकीर्दीत गोवळकोड्याच्या किल्ल्यांतील नवी मर्शाद बाधली' असा शिलालेख आहे. एंप.–इंडो-मॉस्लेमिका–१९१३–४, पृ ४८.

५५. ब्रि. फे. ब. पु. २, पृ. ५५२ व वरील नं. ५५ ची टीप पहा. 'तरीख–इ–महमद कुत्बशाहीं'त महमुदशहा च. २८ जिल्हेज ९१२ हि. (६ मे १५०७) रोजी वारल्याचें दिलें आहे.–ब्रि. फे. कु. पु.३, पृ. ३५१. त्याचप्रमाणें हदिकत-अल-अलम (लि.) पृ. २९ व बुऱ्हान-इ-मासिरींतहि हीच तारीख दिली आहे.—किंवा बहामनी राज्याचा इतिहास, पृ. १४७. परंतु ते चुकीचे दिसतें.

ते सर्व इस्मायल आदिलशाहावर चालून गेले. त्याचा इस्मायल आदिलशाहाने अल्लापूर येथें पूर्ण पराभव केला. तेव्हां अमीर बरिदादि महमुदशाहास मागें सोडून पळून गेले. महमुदशाहा कैद झालें[५६].

हि. ९२४ (१३ जानेवारी १५१८ ते २ जानेवारी १५१९ इ. स.).— इ. स. १५१८च्या अखेरपर्यंत सुलतान कुली स्वतंत्र शाहा म्हणवून घेत नसे. याला दोन मुख्य कारणे होती. सुलतान कुली येथपर्यंत फक्त तरफदार होता व कासिम बरिद महमुदशाहाच्या नावानें कारभार पाहात असल्यानें त्याच्या मृत्यूपर्यंत सुलतान कुलीला त्याच्या हुकुमाप्रमाणे वागणे भाग होते. तो वारल्यानंतर सुलतान कुलीनें स्वतंत्र होण्याची प्रथम खटपट केली व महमुदशाहा वारल्यानंतर त्याला स्वतंत्र शाहा होता आले. तेलगणातील कुत्ब उल्मुल्ककडील मुलूख थोडा व त्यात आदिलशाहा व निजामशाहासारखी कर्तृत्ववान माणसें असल्यानें त्याला यापूर्वी स्वतंत्र होणें शक्य नव्हते. मात्र त्याने या अवधीत गोवळकोंड्याची डागडुजी करून राजधानी सुधारली.

[हि. ९२५[५७] (३ जानेवारी १५१९ ते २९ डिसेंबर १५१९ इ.स.)].— वेंकटी नायकाने तेलगणातील कांहीं मुलुखात लुटालूट केली. कुत्बशाहाने चालून जाऊन राजकोंड्यास वेढा घातला. शेवटी वेंकटी नायक कैद झाला व किल्ला कुत्बशाहाच्या स्वाधीन झाला.

[हि. ९२६ (२२ डिसेंबर १५१९ ते १२ डिसेंबर १५२० इ.स.)].— कुत्बशाहाने देवरकोंड्यास वेढा घालून तो बरेच दिवस झगडून घेतला. हिंदु देवळांची व इमारतींची जाळपोळ केली व त्या जागी मशिदी बांधल्या. हे ऐकून कृष्णदेवरायाने

---

५६. ब्रि. फे. ब. पु. २, पृ. ५४९–५०, ब्रि. फे. आ. पु. ३, पृ. ४६–७. याच लढाईत महलोजी घोरपडे पडले. त्याबद्दलचे आदिलशाही फर्मान ९२८ हि.चें, पृ. २६, परिशिष्ट अ, मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याचा इतिहास.

५७. मागील टीप नं. ५४ पहा. त्याचे थडग्यावरील शिलालेखांतहि फक्त 'सुलतान कुली कुत्ब उल्मुल्क ऊर्फ बडे मालिक' असेच म्हटले आहे. ए. इं मॉ. १९०७–८, पृ. २४ व १९१५–६, पृ. २७ परंतु कदाचित् ही जमशीदचीहि कारवाई असूं शकेल.

५८. सुलतान कुलीच्या हकीकतीत सनांचा निर्देश नाही. परंतु जेथे जेथे अदमासानें वर्ष दिलें आहे तेथे तेथे तें चौकोनी कंसात दिलें आहे. त्यास आधार नाही.

५९ देवरकोंडा – हैद्राबादेच्या आग्नेयेस ६० मैल, नलगोंड जिल्हा, निजाम संस्थान.

आदिलशाहाविरुद्ध आणलेल्या सैन्यापैकी काही भाग (रायचूरच्या[६०] येथेच तर —हि. ९२७. १५२१ इ. स.) कुत्बशाहावर पाठविला. पानगळ[६१] येथें लढाई झाली. प्रथम कृष्णदेवरायाची चांगलीच सरशी झाली. परंतु कुत्बशाहाच्या राखीव सैन्याने रात्री अचानक हल्ला चढवून हिंदु सैन्याची दाणादाण उडविली. तेव्हा विजयानगरचे सैन्य किल्ल्याच्या आश्रयास गेले. दुसऱ्या दिवशी कुत्बशाहाने किल्ल्यास वेढा दिला. कृष्णदेवरायाकडील आणखी कुमक आली. दोन महिनेपर्यंत वेढा चालू होता. शेवटी किल्ला कुत्बशाहाच्या स्वाधीन झाला. तेव्हा कुत्बशाहाने गणपुऱ्यावर हल्ले चढवून गणपुरा घेतल्यानंतर कोंडलकोंड्या[६२]स वेढा घातला. हाहि घेण्यास बराच विलंब लागला. शेवटी कुत्बशाहा परत गोवळकोंड्यास आला.

[हि. ९२८ (१५२२ इ. स.)]. —कुत्बशाहा कोंडलकोंड्याच्या वेढ्यांत गुंतला असता मुलतान कोवाम उल्मुल्कने एलगुंदल (Elgundel) व मलंगूर (Mulungoor) व इतर काही कुत्बशाहाचे किल्ले घेतले. मुलतान कुलीने गोवळकोंड्यास आल्यानंतर कोवामास मुलूख परत देण्याविषयी व इस्लामियाशी न भांडण्याबद्दल लिहिले. परंतु त्याचा उपयोग झाला नाही. उलट त्याने पुन्हां मुलूख घेण्यास सुरुवात केली. तेव्हा मुलतान कुली त्याचेवर चालून गेला. त्याची एलगुंदल-जवळ गांठ पडली. दुसऱ्या दिवशी लढाई झाली. कोवामचा पराभव झाला. तो अल्लाउद्दिन इमादशाहाच्या आश्रयास पळून गेला. नंतर कुत्बशाहाने एलगुंदल, मलंगूर वगैरे किल्ले परत घेऊन गोवळकोंड्यास आला.

[हि. ९२९ (१५२३ इ. स.)].—कोवाम इमादच्या मदतीने पुन्हा सावरासावर करूं लागला. तेव्हा इमादला कुत्बशाहाने कळविलें कीं, त्याला मदत करूं नये व इमादने घेतलेला तेलंगणातील सर्व तपाचा प्रांत परत करावा. इमादने कुत्बशाहाची अवहेलना करूनच उत्तर लिहिलें. तेव्हा कुत्बशाहास राग आला. कुत्बशाहा त्याचेवर चालून गेला. इमादहि तोंड देण्यास एलिचपुरावरून[६३] रामगिरास आला. येथें लढाई झाली. कुत्बशाहाचा पुरा मोड झाला. परंतु येथेहि कुत्बशाहाच्या

६०. रायचूर कृष्णदेवरायाने इ. स. १५२०त घेतला.—ए फरगॉटन एंपायर, सिवेलकृत, पृ. १४७.

६१. पानगळ—हैद्राबादेच्या पश्चिमेस ६० मैल, नलगोंड जिल्हा, निजाम संस्थान.

६२. कोंडलकोंडा—हैद्राबादेच्या नैऋत्येस ७५ मैल, महबुबनगर जिल्हा, निजाम संस्थान.

६३. एलिचपूर—नागपूरचे पश्चिमेस १०५ मैल, अमरावती जिल्हा, वऱ्हाड.

राखीव सैन्याने शत्रूची फळी फोडली. त्यामुळे शत्रुसैन्याची दाणादाण उडाली व इमाद परत राजधानीस गेला व कुत्बशाहा गोवळकोंड्यास आला.

[हि. ९३० (१५२४ इ. स.)].—खमामेट[६४]च्या राजाने कुत्बशाहाचा कांही मुलूख कायीज केला. म्हणून कुत्बशाहा त्याचेवर चालून गेला व बेलमकोंड्यास[६५] वेढा घातला. पुष्कळ दिवस किल्ला झुंझविला गेला. सरतेशेवटी तो घेतला. फार नुकसान झाले व बरेच सरदारहि कामास आले. परंतु किल्ला कुत्बशाहाने घेतलेला पहाताच सीतापती खासाच कुत्बशाहावर चालून गेला. त्यात सीतापतीस माघार घ्यावी लागली. कुत्बशाहाहि त्याचा पाठलाग न करिता गोवळकोड्यास परत आला.

हि. ९३१ (२९ आक्टोबर १५२४ ते १७ आक्टोबर १५२५ इ. स.).—सीतापतीने कोंडपल्ली[६६], इद्रकोंडा, वरपल्ली, एतगीर वगैरे ठिकाणच्या सरदारांचे साहाय्य घेतले व पुन्हां कुत्बशाही मुलखात शिरला. खमामेटजवळ लढाई झाली. सीतापतीचा पराभव झाला. तो रामचद्रदेवाकडे पळून गेला. कुत्बशाहाचे सैन्य कोंडपल्ली, इद्रकोंडा व एतगीर या प्रांतात शिरले. कुत्बशाहानें खमामेटास वेढा दिला. कुत्बशाही सैन्याने निकराचे हल्ले केले. पुष्कळ सरदार पडले. शेवटी तो किल्ला सर केला. फार मोठी कत्तल केली. परंतु सीतापतीच्या विनंतीवरून ओरिसाच्या गजपती रामचद्रदेवान सीतापती विद्याद्री व हरिश्चद्र यासह चालून येऊन गोदावरीतीरावरील पालचिनरजवळ लढाई दिली. त्यात रामचद्रदेव केद झाला. त्याचा पुतण्या विद्याद्री मारला गेला. या यशानतर कुत्बशाहा कोंडपल्लीस[६७] गेला. तो किल्ला घेतला. येल्लेरेहि[६८] घेतले. राजमहद्रीजवळ[६९] लढाई झाली. तीतहि

६४. खमामेट.—हैद्राबादेच्या पूर्वेस ११० मैल, वारंगळ जिल्हा, निजाम सस्थान

६५. बेलमकोंडा—खमामेटच्या दक्षिणेस ५० मैल, गुंतुर जिल्हा, मद्रास.

६६. कोंडपल्ली—बेलमकोंड्याच्या पूर्वेस २२ मैल, कृष्णा जिल्हा, मद्रास.

६७. कोंडपल्ली व आसपासचा प्रात इ. स. १५२३पर्यत विजयानगरच्या माडलिकाकडे असल्याबद्दल शिलालेखातून उल्लेख आढळतात. उलट इ. स. १५२४ च्या उत्तरार्धात कोंडपल्ली व बेझवाडा या प्रातातील कांही गावे 'मलिक-कुत्ब-उल्मुल्कने ख्वाजा खिझरच्या स्मरणार्थ धर्मादाय' दिलेली आढळतात. यावरून ही मोहिम इ. स. १५२४च्या सुमाराची असावी.—(V. R. II, Kistna 104, 153 of 1913)—सिवेलचा 'हिदुस्थानातील ऐतिहासिक शिलालेख', पृ. २४३.

६८. एल्लोर—खमामेटच्या आग्नेयेस ६५ मैल, गोदावरी जिल्हा, मद्रास.

६९. राजमहेंद्री—एल्लोरच्या ईशान्येस ५० मैल, गोदावरी जिल्हा, मद्रास.

गजपतीच्या सैन्याचा पराभव झाला. नंतर गजपती वेंजनाथाने कुत्बशाहाशी तह केला. त्यात कुत्बशाहाच्या व गजपतीच्या राज्यांची सीमा गोदावरी ठरली. येल्लूर प्रांत कुत्बशाहास मिळाला. नंतर सुलतान कुली कुत्बशाहा गोवळकोंड्यास आला.

हि. ९३३[७१] (१५२६ इ. स.).— बाबरशाहाकडे कुत्बशाहानेहि आपला वकील त्याच्या अभिनंदनार्थ पाठविला.

[हि. ९३३ ते ९३६ (८ आक्टोबर १५२६ ते २४ आगस्ट १५३० इ. स.)].— कुत्बशाहाने घेतलेले कोंडपल्ली, वेलमकोंडा वगैरे किल्ले कृष्णदेवरायाने काबीज केले, हे समजताच कुत्बशाहा स्वारीवर निघाला. कोंडविडूंस वेढा दिला. परंतु वेलमकोंडा व इद्रकोंडा वगैरे ठिकाणाहून कुत्बशाही सैन्यावर हल्ले होऊ लागले. तेव्हा कोंडविड सर करणे कुत्बशाहास बरेच कठीण वाटू लागले. शेवटी त्याने नाइलाजाने कोंडविडचा वेढा उठविला व वेलमकोंड्यास जाऊन त्याला वेढा दिला. तेथेहि त्याला यश येईना. पुष्कळ सैन्य व सरदार कामास आले. शेवटी एकदा निकराचा हल्ला चढविला. त्यात त्याला यश आले व किल्ला स्वाधीन झाला. तेथून तो कोंडपल्लीवर चालून गेला. येथे कुत्बशाहास मदत देणाऱ्या कांही नायकवाडींनी बंड केले. परंतु चार महिन्यांनी हे बंड मोडले.

कृष्णदेवरायाने कुमक पाठविली. ती येऊन पोहोचली. या सैन्याने वेलम कोंड्यास वेढा घातला. गड हाती येणार तोच सुलतान कुली कोंडपल्लीहून किल्ल्याचे मदतीस आला. वेढा उठविला व पुन्हा कोंडपल्लीस गेला. किल्ला घेतला.

हे तीनहि किल्ले शत्रूचे स्वाधीन झालेले ऐकताच कृष्णदेवरायाने शिवरायास पाठविले. हे सैन्य कोंडविडाजवळ येताच सुलतान कुलीने कोंडविड किल्ल्याची नासधूस केली. किल्ला सोडून गेला व कृष्णेवर मुक्काम केला. शिवरायाने किल्ल्याची डागडुजी केली. कुत्बशाहावर चालून गेला. सुलतान कुलीने शिवरायाच्या सैन्यावर अचानक छापा घातला. शिवराय कोंडविडाच्या आश्रयास आला. कुत्बशाहाने कोंडविडास वेढा दिला. शेवटी पांच दिवसांनी शिवरायांनी किल्ला

---

७०. राजमहेंद्रीची लढाई व हा तह इ. स. १५४० त झाला असावा असे कांही ग्रंथकारांचे म्हणणे आहे. हिं. ऐ. शि.–सिवेलकृत, पृ. २४८.

७१. ब्रि. फे. व. पु. २, पृ. ५५८.

७२. कोंडविड – हैद्राबादेच्या आग्नेयेस १४० मैल, गुंतुर जिल्हा, मद्रास

सोडून[७३] विजयानगरास प्रयाण केले. मुलतान कुलीही दोनतीन वर्षांची स्वारी संपवून परत गोवळकोंड्यास आला.

हि. ९३६ (५ सप्टेंबर १५२९ ते २४ आगस्ट १५३० इ. स.).— सुल्तान कुलीनें अमीर बरिदाच्या मदतीस ४००० घोडेस्वार पाठविले. असद-खानानें त्याचा पुरा मोड केला.[७४]

हि. ९३९–९४१ (३ आगस्ट १५३२ ते १ जुलै १५३५ इ. स.).— इस्मायल आदिलशाहा, अमीर बरिद व अच्युतराव यांनी हि. स. ९३८त[७५] तह केला. त्याअन्वये हि. ९४०त आदिलशाहाने तेलगणावर स्वारी केली. कोइलकोंड्यास वेढा घातला. तेथील किल्लेदार जाफर बेग याने तो एक महिनापर्यंत लढविला व कुत्बशाहाकडे मदतीसाठी लिहिलें. कुत्बशाहाला आदिलशाहाने काढलेले हे भाडण समजतांच त्यानें निजामशाहाची मदत मागितली. ती त्यानी कबूल केली. परंतु ती येऊन पोहोचली नाही. एन उत्सूक. फत्तेखान व हैदरखान यास घेऊन सुलतान कुली आदिलशाहावर चालून गेला. कोइलकोंड्याजवळ चार दिवस लढाई झाली. परंतु दरम्यान आदिलशाहाने आपल्या सैन्याची एक तुकडी गोवळकोंड्याची लुटालूट करण्याच्या इराद्याने पाठविली. ही बातमी सुलतान कुलीस समजताच त्याने माघारा केला व ती तुकडी समूळ कापून काढली. कोइलकोंड्याचा वेढा चालूच होता; म्हणून कुत्बशाहा तिकडे परत जात होता, तो गणपुऱ्याजवळ मोठी निकराची लढाई झाली. तींत सुलतान कुलीच्या तोंडावर जखम झाली. त्याचे थोडेसे नाक व गाल ही कापली गेली. पुढे अकरा महिने वेढा चालू राहिला. दरम्यान इस्मायल आदिलशाहा आजारी झाला. त्यामुळे लढाईत शिथिलता आली. शेवटी इस्मायल च. १६ सफर ९४१ हि. (६ सप्टेंबर १५३४ इ. स.) रोजी मेला. नंतर लवकरच तह झाला.[७६]

---

७३. कृष्णदेवरायाने २३ जून १५१५त गजपतीचा पराभव करून कोंडबिड घेतला. त्यानंतर २ मे १५२०ला तो किल्ला विजयानगरच्या नंदेल्ल गोपाकडे असल्याचा उल्लेख आहे. उलट कोंडपल्लीच्या प्रांतांत कुत्बशाहाच्या देणग्या इ. स. १५२४ व २० मार्च १५३१च्या आहेत. त्यावरून असे दिसते की, कृष्णदेवराय इ. स १५२९च्या नवंबरऑक्टोबरात वारला, म्हणून शिवराय परतला व कुत्बशाहाकडे तो मुलुख आला.— सिवेलकृत हिंदुस्थानातील ऐतिहासिक शिलालेख, पृ. २४०, २४३ व २४६

७४. ब्रि. फे. आ. पु. ३, पृ. ५८.

७५. ब्रि. फे. नि. पु. ३, पृ. २२८, व ब्रि. फे. आ. पु. ३, पृ. ७०–७१.

७६. ब्रि. फे. आ. पु. ३, पृ. ७१, ७४ व ७५; बु-इ-स, पृ. ७२.

हि. ९४० (२३ जुलै १५३३ ते १२ जुलै १५३४ इ. स.).— बुऱ्हाण निजामशाहाविरुद्ध गुजराथच्या बहादुरशाहास चिथविल्यावरून तो परत जातांच बुऱ्हाण निजामशाहानें आदिलशहाचे मागण्यावरून कल्याणीस[७७] वेढा घातला. परंतु आदिलशाहा मृत्यु पावताच कुत्बशाहाने बुऱ्हाण निजामशाहाशी तह केला.

[हि. ९४२ (२ जुलै १५३५ ते १९ जून १५३६ इ. स.)].- हे युद्ध चालू असता अमिर बरिदाने कुत्बशाहीत बरीच लुटालूट केली होती. परंतु काही दिवस कुली गोकळकोंड्यास राहिला. तयारी होताच वेदरावर चालून गेला. बरिदाचा पराभव केला. याच वेळी राजवील, एल्लूर व तिप्रानचे जमीनदार कुलीस येऊन मिळाले. नंतर कुत्बशाहा कोहीरवर[७८] जाऊन किल्ल्यास वेढा दिला. शेवटी कोहीर पडला परंतु सुलतान कुलीने पावसाळ्यामुळे माघार घेण्याचे ठरवून तो परत गोवळकोंड्यास आला.

हि. ९४४ (२० जून १५३७ ते ९ जून १५३७ इ. स.). -- पुन्हा काही दिवस गोवळकोंड्यास विसावा घेऊन कुत्बशाहा हिंदू राजावर स्वारी करण्याकरितां निघाला. प्रथम नलगोंड्यावर चालून गेला. वेढा घातला. हरिश्चंद्राचा भाऊ पुढे चालून आला. तो केद केला. किल्ला हाती येण्याची चिन्हें दिसेनात; तेव्हा कुलीने हरिश्चंद्रास कळविले की, जर माडलिकत्व स्वीकारण्यास राजा असशील तर वेढा उठविता. हरिश्चंद्राने कबूल केले. कुलीने वेढा उठविला. परंतु किल्ला पाहाण्याच्या मिषाने तो किल्ल्यावर गेला व त्याच वेळी दबा धरून बसविलेल्या सैन्याच्या साहाय्याने लुच्चेगिरीने हरिश्चंद्रास केद केले व तेथ अमानुषपणे कत्तल केली. तेथून तो कोंडविडाकडे गेला. कोंडविडचा राजा त्याला कबूल केलेली खंडणी देत नसे. तोंहि हाती आला.

हि. ९४९ (१७ एप्रिल १५४२ ते ५ एप्रिल १५४३ इ. स.).—कोहीरचा वेढा चालू असतांच इब्राहिम आदिलशाहाने तेलगणात लुटालूट केली होती; म्हणून कुत्बशाहा एतगीरावर चालून गेला. इतर सैन्य काकनी, गोरोवली, व नारगीवर पाठविलें. सीतापति व रामचंद्र यांची व कुत्बशाहाची लढाई चालू असतां आदिल-

---

७७. कल्याणी – बिदरच्या पश्चिमेस २५ मैल, बिदर जिल्हा, निजाम संस्थान.

७८. ब्रि. फे. कु. पु. ३, पृ. ३२३.

७९. कोहीर – बिदरच्या दक्षिणेस २५ मैल, बिदर जिल्हा, निजाम संस्थान.

शाहानें ही ठाणी घेतली होतीं. कुत्बशाही सैन्यानें हा प्रांत परत घेतला. एतगीरचा वेढा चालूच होता. याच वेळी अमिर बरिदाला मेदक[८०] व कौलस[८१] हे परत देण्याची ताकीद केली. निजामशाहाची मदत कुत्बशाहास येऊन मिळत आहे हे पाहून अमिर बरिदाने कुत्बशाहास मेदक दिला. पावसाळा लागला म्हणून कुत्बशाहान एतगीरचा वेढा उठवला व निजामशाहाशी मैत्रीचा तह केला.

हि. ९५० (६ एप्रिल १५४३ ते २४ मार्च १५४४ इ. स.).—याप्रमाणें सारख्या लढाया मारून कुत्बशाहा जवळ जवळ नव्वद वर्षांचा झाला. विसावा घेण्यासाठी गोवळकोड्यास येऊन राहिला. तो आता बराच अशक्त झाला होता. त्यानें गोवळकोड्यातील मशिदी वगैरे सुधारण्याचे काम चालू केले होते.

सुलतान कुली म्हातारा झाला होता व त्याचा पहिला मुलगा हैदरखान आधीच वारला होता. त्यामुळे त्याने आपल्या दुसऱ्या मुलास म्हणजे कुतुबुद्दिनास राज्य द्यावें असा निश्चय केला होता. हे त्याचा तिसरा मुलगा जमशीद यास न साहून त्याने अल्लाउद्दीनास मारण्याचा कट केला. हा कट उघडकीस आल्यावरून जमशीदला सुलतान कुलीनें गोंवळकोडा येथे कैदेंत ठेवले. परंतु जमशीदने त्या किल्लेदाराशीच स्नेहयुत करून बापाचाच खून करविला व इतर भावाचा कांटा दूर केला. रविवार च. २ जमादिलाखर (३ सप्टेंबर १५४३) रोजी सुलतान कुली मशिदीत निमाज पढत असता गोंवळकोड्याचा फौजदार मीर महमुद हमदानी याने एकाच घांवासरशी त्याला ठार केले.

त्याला सहा मुलगे व चार मुली होत्या. पहिला हैदरखान बापापूर्वीच वारला. दुसरा कुतुबुद्दिन यास जमशीदने बापाचा खून होताच पकडून त्याचे डोळे काढले. तिसरा यार कुली जमशिदखान राज्यावर आला. चवथा अबदुल करीम याने बंड केल्यावरून त्यास ठार मारण्यात आले. पांचवा दौलतखान यास वेडा म्हणत असत.

---

८०. मेदक – हैद्राबादेच्या उत्तरेला ४५ मैल, मेदक जिल्हा, निजाम संस्थान.

८१. कौलस – बिदरचे उत्तरेस ३० मैल, बिदर जिल्हा, निजाम संस्थान.

८२. सुलतान कुलीच्या थडग्यावरील लेखात सोमवार चं. २ जमादिलाखर ९५० हि. अशी तारिख दिली असून त्याला कुत्ब उल्मुल्क व बडा मलिक असे संबोधले आहे. ए. इं. मां. १९०७–८, पृ. २४, व १९१५–१६, पृ. २८. हदिकतमध्यें हीच तारीख घेतली आहे.

हा इब्राहीम कुत्बशाहाच्या कारकीर्दीत वारला. सहावा इब्राहीम हा बापाच्या पश्चात् झाल्यानंतर विजयानगरच्या राज्यांत पळून गेला. जमशीदचा मुलगा सुभान कुलीनंतर हा राज्यावर आला.

१३. **जमशीद कुत्बशाहा :**— पहिला मुलगा हदरखान वारल्यानंतर सुलतान कुलीने दुसरा मुलगा कुतुबुद्दिन याम आपले राज्य देण्याचे ठरविले. परंतु तिसरा मुलगा यार कुली जमशीदखान याम ते न मानवून त्याने कुतबुद्दिनास मारण्याची खटपट आरंभिली. हे सुलतान कुलीस समजताच त्याने जमशीदास गोवळकोंड्याच्या किल्ल्यात कोंडून ठेवले. परंतु जमशीदने तेथील किल्लेदार मीर महमुद हमदानी याच्याशी कट केला. नंतर मीर महमदने सुलतान कुलीस मारून कुतबुद्दिन याच्या वाड्यात शिरून त्याचे डोळे काढले व त्याला कैद केले. नंतर जमशीदास (३ सप्टेंबर १५४३ रोजी) राज्यावर बसवून जमशीद कुत्बशाहाच्या नावाने खुत्बाहि वाचविला.

हि. ९५० (जमादिलाखर ते जिल्हेज—३ सप्टेंबर १५४३ ते २४ मार्च १५४४ इ. स.).— जमशीदचा भाऊ भाऊ या वेळी दक्षकोंड्यास होता. त्याला पकडण्याचा हुकूम झालेला समजताच तो अमीर बरिदाकडे बिदरास गेला. अमीर बरिदाने ही संधि साधून तेलंगण काबीज करण्याचा पुन्हा बेत करून तो इब्राहिमास बरोबर घेऊन चालून आला. वेस गोवळकोंड्यापर्यंत आला व वेढा घातला. हे पाहून दक्षला बरिदाचा उत्कर्ष न साहून बुऱ्हाण निजामशाहा जमशीदच्या मदतीस धावला. कोहीगीर वेढा घालून तो घेतला व गोवळकोंड्यास मदत पाठविली. अमीर बरिदास धीर न निघून त्याने आदिलशाहाच्या आश्रयास जाण्याचा बेत करून माघार फिरला. अमीर बरिदाने इब्राहिमास दगा देण्याचा विचार केला आहे हे समजताच इब्राहिम बहुतेक सर्व सामानसुमान टाकून विजयानगरास रामराजाच्या आश्रयास गेला. जमशीद बुऱ्हाण निजामशाहास कोहीर येथे भेटला. तेथे बुऱ्हाण-निजामशाहा, इमादशाहा व कुत्बशाहा यांचा मैत्रीचा तह होऊन ते सोलापुरावर चालून गेले. परंतु आदिलशाहाने परक्यास वेढा दिला. याचा परिणाम असा झाला की, बुऱ्हाण निजामशाहा सोलापुरावरून परक्यास जाऊ लागला, तेव्हा आदिलशाहाने त्यास खासपुरीस गाठून लढाई दिली. कुत्बशाहाने मोठी शौर्याची कामगिरी केली. इब्राहिम आदिलशाहाचा पराभव झाला व तो पळून गेला. नंतर जमशीदने अली

बरिदाचा बेदरपर्यंत पाठलाग केला. याच वेळी आदिलशाहाचे काकनी, कुलबुर्गा व एलगीर हे प्रांत घेतले.[८३]

[हि. ९५१ (२५ मार्च १५४४ ते १४ मार्च १५४५ इ. स.)].— बुऱ्हाण निजामशाहा व आदिलशाहा यांच्यांतील लढाई चालू असताच जमशीद परत गोवळकोंड्यास गेला. यावरून त्याचा बुऱ्हाण निजामशाहाशी झालेला मघ तुटलेला पाहतांच अली बरिदानें गोवळकोंड्यावर पुन्हा स्वारी केली. गोवळकोंड्याजवळील चार मैलावरील चिलकूरास तो अचानक आलेला दिसताच जमशीदनें घाईने बचावार्थ राजधानी सोडली व विदरचे बाजूकडे चालून गेला. कुमटाणा जाळून फस्त केला. तेव्हां अली बरिदानें वेढा उठविला व जमशीदावर चालून गेला. पट्टणचेरू-जवळ[८४] लढाई झाली व बहुधः पावसाळ्यामुळे दोन्हीहि सैन्यें आपापल्या राज्यात परत गेली.

[हि. ९५२ (१५ मार्च १५४५ ते ३ मार्च १५४६ इ.स.)].— जमशीदनें सैन्याची वगैरे पुन्हा जमवाजमव करून अली बरिदाच्या समाचारार्थ (सप्टेंबर १५४५च्या सुमारास) निघाला. कोलसला पोहोचल्यावर त्याने आपल्या सैन्यास लुटारूट करण्यास रवाना केले. अली बरिदहि चालून आला. तेव्हा जमशीदनें नारायणखेड येथे लढाई दिली. अली बरिदाची चढाईच होत गेली. इतक्यात कोलसची डागडुजी पुरी झाल्याचे वृत्त जमशीदास समजताच जमशीद कोलसच्या आश्रयास परतला. अली बरिदाने जमशीदचे सैन्य लुटून फस्त केले. परंतु त्यानें जमशीदचा पाठलाग न करिता तो परत विदरास गेला. बहुधः या वेळी बुऱ्हाण निजामशाहाशी केलेला तह त्याने मोडल्यावरून व आदिलशाहा व बुऱ्हाण निजामशाहा यांचा मैत्रीचा तह झाल्यामुळे[८५] हा परतला असावा. हे पाहून जमशीदनें कोलस, नारायणखेडा व अहशनाबाद कबीज करून ती जगदेवरावाच्या हवाली केली. बुऱ्हाण निजामशाहा व आदिलशहा याचा तह होताच आदिलशहाने आसदखानास जमशीदवर पाठविले. आसदखानाने प्रथम काकनीस वेढा घालून तो तीन

८३. ब्रि. फे. आ. पु. ३, पृ ९३, बु. इ मा. हेगचें भाषांतर, इंडियन अँटिक्वेरी, व्हॉ. XLIX-१९२० पृ. २२२-२४.

८४. पट्टणचेरू – हैद्राबादेच्या उत्तरेस १५ मैल, मेदक जिल्हा, निजाम संस्थान.

८५. बुऱ्हान-इ-मासिर-हेगचे भाषांतर, इं. अं , व्हॉ. L–१९२१, पृ. २–३.

महिन्यांनी घेतला. जमशीदने नवीन बांधलेला किल्ला जमीनदोस्त केला. एतगीरचा[८६] घातलेला वेढाहि उठविला व जमशीदचा थेट गोवळकोंड्यापर्यंत पाठलाग केला. येथे लढाई झाली. त्यात जमशीदचा पूर्ण पराभव झाला. बहुधः पावसाळा लागतांच आसदखान परतला असावा.

हि. ९५३ (४ मार्च १५४६ ते २१ फेब्रुवारी १५४७ इ. स.). — जमशीदने बुऱ्हाण निजामशाहाकडे मदत मागितली. निजामशाहा व इमादशाहा आवसा व उदगीरवर चालून आले. जमशीदहि तेथे गेला. आवशाचा वेढा चालू असतांच जमशीदने मेदकचा किल्ला घेण्याचे ठरले. त्याप्रमाण तो तिकडे गेला. मेदकचा किल्ला बरेच दिवस लढून घेतला. आवसा व उदगीरहि निजामशाहाने घेतले.[८७] तेव्हा अली बरिदने आदिलशाहाची मदत मागितली. हे जोड सैन्य जमशीदवर कालसला चालून आले. तेव्हा जमशीदने नागायणखेडा येथे लढाई दिली. त्यात अली बरिदचा शेवटी पराभव झाला. बहुधः पावसाळ्याच्या मुमारास जमशीद गोवळकोंड्यास परत आला.

हि. ९५४ (२१ फेब्रुवारी १५४७ ते १० फेब्रुवारी १५४८ इ. स.). — अली बरिदचा हा नेहमी होणारा उपद्रव दूर करण्याकरिता जमशीदने आदिलशाहास मिळवून घेण्याचा प्रयत्न केला व त्याला यश येऊन आदिलशाहाने रामराजावर व निजामशाहा सर्वांनी अली बरिदावर स्वारी करण्याचे ठरले. निजामशाहानें व जमशीदने बराच मुलुख घेतला. तेव्हा अली बरिद आदिलशाहाच्या आश्रयास गेला. तेथे त्यास जमशीदच्या मागण्यावरून कैद केला.[८८]

हि. ९५५ (११ फेब्रुवारी १५४८ ते २९ जानेवारी १५४९ इ. स.). — इब्राहीम आदिलशाहाने दक्षिणेतील हिंदु राज्यातील बराच मुलुख कावीज केला. हे बुऱ्हाण निजामशाहाला न साहून त्याने सोलापुरावर हल्ला चढविला. तेव्हा

८६. एतगीर - यादगीर अथवा यादगिरी - विजापरच्या पश्चिमेस ९५ मैल, गुलबर्गा जिल्हा, निजाम सस्थान.

८७. त्रि. फे. आ. पु ३, पृ. ९४. च. १ रजब ९५३ हि. (२८ आगस्ट १५४६)च्या यादगीर येथील शिलालेखावरून यादगीर यापूर्वीच इब्राहाम आदिलशाहाकडे आलेला दिसतो. ए. इं. मो., १९२९-१९३०, पृ. ३.

८८. बुऱ्हान-इ-मासिर, हेगचे भाषांतर, इ. अ., व्हॉ. I–१९२१, पृ ३–४

८९. त्रि. फे. नि. पु. ३, पृ. २३२; व ह-अ-अ. (लि.) पृ. १००.

दोघांनींहि जमशीदची मदत मागितली. जमशीद सोलापुराकडे चालून गेला. कोणास मिळावे तें न मिळतां कांही दिवस तसेच तेथें त्याने त्रयस्थपणे काढले. नतर आदिलशाहास निरोप पाठवून अली बरिदाची मुक्तता करून त्यास आपल्या ताब्यात देणे वगैरे अटी कबूल केल्या. आदिलशाहानें त्या मान्य केल्या. अली बरीद हातीं येताच जमशीदनें मला कोणासच्या कोणाविरुद्ध मदत करणें इष्ट नाही असे सांगून अली बरिदाला बिदरचे राज्यावर पुन्हां स्थापला. अली बरिदानेहि त्याला पुष्कळ जडजवाहीर वगैरे नजर केले. नतर जमशीद गोवळकोड्यास परत आला.

हि. ९५६ व हि. ९५७ (३० जानेवारी १५४९ ते ८ जानेवारी १५५१ इ. स.).—जमशीद दोन वर्षे आजारीच होता. हा हि. ९५७च्या सुरुवातीस वारला.[९१] बहुतकरून अली बरिदाची त्याच्या राज्यावर स्थापना करून जमशीद इ. स. १५४८च्या पावसाळ्यापूर्वी गोवळकोड्यास आला व त्या वेळेपासून तो आजारीच असावा. त्यानतर तो इ. स. १५५० च्या जानेवारी–मार्चात वारला असावा.[९२]

१४. **सुभान कुली कुत्बशाहा**:—जमशीद कुत्बशाहाच्या मृत्यूनतर त्याच्या बेगमेने आपला मुलगा सुभान यास इतर सरदारांच्या साहाय्याने गादीवर बसविलें. सुभान हा या वेळी अवघा सात[९३] वर्षांचा होता. म्हणून राणीनें सैफखान

९०. सोलापूरचा वेढा इ. स. १५४९ नंतरचा असावा असे कांहीं इतिहासकाराचे म्हणणे दिसतें. बुऱ्हाण–द–मासिरींत हि. ९५४ त बुऱ्हाणशाहा वेढा घालण्यास निघाला व नंतर कल्याणीचा वेढा घातला असे वर्णन केले आहे. ही दोनतीन वर्षाची मोहीम आहे. फेरिस्ताने कल्याणीचा वेढा हि. ९५६ त दिला आहे. बु. इ. मा., कं. हेगचें भाषातर, इं. अ., व्हॉ. L–१९२१, पृ. ५–७; ब्रि. फे. आ. पु. २, पृ. १०२; व नि. पु.२, पृ. २३२-४. जमशीदचा २ वर्षाचा आजार व त्याच्या मध्यस्थीचा विचार करितां सोलापूरचा वेढा इ. स. १५४८ च्या सुरुवातीस पडला असावा. सोलापरच्या वेढ्याचे प्रसंग अनेकवार आल्याने हे मतवैचित्र्य दृष्टीस पडते.

९१. ब्रि. फे. कु. पु. ३, पृ. ३२७.

९२. इब्राहीम कुत्बशाहा २७ जुलै १५५० रोजी तुख्तनशीन झाला. यापूर्वी ४–५ महिने जमशीद वारला असला पाहिजे.

९३. सुभान या वेळीं २ वर्षांचा होता असे फेरिस्ता म्हणतो. ब्रि. फे. कु. पु. ३, पृ. ३२९.

ऐन उत्मुल्कास परत बोलाविले व त्याजकडे कारभार सोपविला. जगदेवराव या वेळी मोठ्या तोलाचा सरदार होता. त्याने जमशीदचा भाऊ दौलतखान यास तख्तावर आणण्याचा बेत ठरविला. भोगिगम जाऊन शेजारील नायकवाडीस त्याने मिळवून दौलतखानाची मुक्तता केली. इतक्यात गोवळकोंड्यास सफरखान आला व त्याने कारभार आपलेकडे घेऊन तो जगदेवरावावर चालून गेला. जगदेवरावाने कऱ्हाडच्या तोफलखानाची मदत मागितली. तोफलखान मदतीस आला. परंतु सफरखानाचे व त्याचे सिंगामास युद्ध झाले. त्यात त्याचा पराभव झाला. जगदेवराव दौलतखानास घेऊन भागीरथीच्या किल्लथात जाऊन वसला. थोड्या दिवसानी सफरखानाने किल्ला घेतला. दौलतखानास पुन्हा तेथेच कैदेत ठेवले व जगदेवरावास गोवळकोंड्यास आणले.

येथे सरदार सफरखानाच्या विरुद्ध होते. त्यानी इब्राहीमखानास राज्यावर आणण्याची खटपट केली. इब्राहिमाने रामराजाच्या सल्ल्याने कुत्बशाहीचे तख्तावर येण्याची तयारी केली. तो प्रथम पानगलास आला. तेथ कुत्बशाहीतील येथे सरदार व सैन्य येऊन मिळाले. तेथून त्याला कोइलकोंड्याच्या नाइकवाडीनी बोलाविले. तेव्हा इब्राहीम कोइलकोंड्यास गेला व तेथे काही दिवस मुक्काम केला. येथे दोन महिन्यात त्याला पुष्कळच सैन्य व सरदार मिळाले. सफरखानानेहि तयारी करून तो इब्राहीमचा मोड करण्यास आला. गणपुऱ्यापर्यंत त्याची स्वारी येऊन ठेपली. परंतु मध्यतरी कोइलकोंड्याच्या नायकवाडीने गोवळकोंड्याच्या नायकवाडीचा फितुर करून जगदेवरावास सोडविले. गोवळकोंड्याचा मुख्य फाजदार जगतराव यास कैद केल. सुभानकुलीकडील सरदारास ठार मारले व गोवळकोंडा जगदेवरावच्या ताब्यात जाताच त्याने इब्राहिमास तातडीने बोलाविले. हे पाहून सफरखान घाबरला. त्यान इब्राहिमने माफी करण्याचे पत्र मागितले. परंतु, ते त्याने देण्यात दिरंगाई केल्यावरून सफरखान घेता येईल ती मालमत्ता व सैन्य घेऊन कोलसवरून सरहद्दीवर जाऊन राहिला. इब्राहीम गोवळकोंड्यास आला. तेव्हा जगदेवरावाने त्याचे हाती किल्ला देऊन त्यास सोमवार च. १२ रजब हि. ९५७ (२७ जून १५५० इ. स.) गादी मुहमदनगरास तख्तनशीन केले.

१५. इब्राहीम कुत्बशाहा:—इब्राहीम कुली हि. ९२८च्या सफाल महिन्यात (जन १५३० इ. स.) जन्मला. इ. स. १५४३च्या अखेरीस त्याला

रामराजाच्या आश्रयास विजयानगरास जाऊन रहावे लागले. तेथें त्याचे व मलिक ऐन उल्मुल्क गिलनीचे वाटेवरून भाडण झाले. प्रकरण हातघाईवर आले व शेवटी इब्राहीम बळजबरीने वाट काढून निघून गेला. नतर इ. स. १५५० च्या मार्चच्या सुमारास विजयानगराहून निघून नायकवाडी व जगदेवराव याच्या साहाय्याने ता. २७ जुलै १५५० रोजी तख्तावर आला. प्रथम त्याने आपला राज्यकारभार पहाण्यातच कांही दिवस घालविले. जगदेवरावाचे उपकार स्मरून त्यास मुख्य वजिरीपर्यंत चढविलें. परतु जगदेवराव व त्याचा सहकारी रायराव याच्या मनातून बेडश्या दौलतखानास तख्तावर आणण्याचा बेत असल्यामुळे इब्राहीम कुत्बशाहाने रायरावास कैद करून ठार मारले. तेव्हा जगदेवराव आपल्या भावासह मुरुख उध्वस्त करीत करीत एलगुडलवरून वऱ्हाडात गेला व इमादशाहाच्या नोकरीस राहिला. तेथे जगदेवरावाने खानदेश वगैरे प्रात इमादशाहास मिळवून दिला. परतु तेथेंहि त्यास त्याच्या आकांक्षेप्रमाणें वागण्यास न मिळाल्यामुळे तो तेथून इ. स. १५५८च्या सुमारास निघाला.

हि. ९६५ (२४ आक्टोबर १५५७ ते १३ आक्टोबर १५५८ इ. स.). —बुऱ्हाण निजामशाहाच. २४ मोहरम ९६१ हि. (३० डिसेंबर १५५३ इ. स.) रोजी वारलो[१४] व हुसेन निजामशाहा गादीवर आला. तेव्हा इब्राहीम कुत्बशाहानें मुस्तफाखानास त्याच्या अभिनदनार्थ पाठविले होते. हा निजामशाहाचा वजीर कासिम बेग शिराझी यास बरोबर घेऊन आला. यांनी कुत्बशाहा व निजामशाहा यांचा तह घडवून आणला. त्यात त्या दोघांनी मिळून विदर व कुलबर्गा घेण्यासाठी प्रथम कुलबर्ग्यास एकत्र व्हावे असे ठरले. ठरल्याप्रमाणे ते कुलबर्ग्यास आले व वेढा घातला. दोन महिने निकराने हल्ले चढविले. परंतु किल्ला हाती आला नाही. किल्ला लढविणें कठीण वाटतांच तेथील किल्लेदारानें इब्राहीम आदिलशाहाकडे कुमक मागितली. तेव्हां आदिलशाहानें रामराजाची मदत मागितली. रामराजा चालून आला. या वेळी निजामशाही व कुत्बशाही सैन्यानें विदरासहि वेढा घातला होता. परतु रामराजानें कुत्बशाहास निजामशाहाला मदत न करण्याविषयी लिहिल्यावरून व रामराजाचा भाऊ एल्लमराज यानें कुत्बशाहाच्या पानगळ प्रांतांत लुटालूट आरंभिल्याचें समजतांच कुत्बशाहानें निजामशाहास सोडलें व तो एकाएकी परत गोवळकोंड्यास निघून

१४. बु. इ. मा., हेगचें भा., इं. अँ., व्हॉ. L–१९२१, पृ २८.

गेला. तेव्हा निजामशाहासहि परतावे लागले. दरम्यान इब्राहीम आदिलशाहा वारला. त्यामुळे अली आदिलशाहा, रामराजा, कुत्बशाहा व निजामशाहा याचा भिमाकृष्णेच्या सगमावर तह झाला. नतर प्रत्येकजण आपापल्या राजधानीस (जन १५५८ चे पूर्वी) परत गेले.[९५]

याच सुमारास जगदेवराव व इमाद उल्मुल्क याच्यात वेमनस्य आल्याने वऱ्हाड प्रातात जाळपोळ करीत करीत जगदेवराव एलगडलला आला. हे ऐकून कुत्बशाहाने मुस्तफाखानास त्याचेवर पाठविले. खमामेटजवळ गाठ पडली. तेथे लढाई झाली. तीत जगदेवरावाचा भाऊ वेकटराव व इतर अरब व मुसलमान सरदार पडले व जगदेवरावाचा पूर्ण पराभव झाल्याने तो विजयानगरास पळून गेला.

हि. ९६६ (१४ आक्टोबर १५५८ ते २ आक्टोबर १५५९ इ. स.):---भीमा व कृष्णेच्या सगमावर झालेला तह फार दिवस टिकला नाही. पावसाळा सपताच वऱ्हाण निजामशाहाने अली आदिलशाहाच्या मुलखात स्वारी केली. आदिलशाहाने रामराजाची मदत घेऊन तो हुसेन निजामशाहावर चालून गेला. अलीने मागील तहान्वये कुत्बशाहाची मदत मागितली. आदिलशाही सैन्याचा जोर पाहून नाइलाजास्तव तोहि आदिलशाही सैन्यात कुत्बशाही सैन्य येथे मिळाला. परतु त्याचा ओढा व आतून मदत निजामशाहासच होत होती. या जोड सैन्याने अहमदनगरास वेढा घातला. तेव्हा निजामशाहा दौलताबादेस पळाला. दोन महिने वेढा पडला. कुत्बशाहाने पावसाळ्याच्या सबबीवर रामराजास परतण्याचा गळ घातला. अलीने आणखी एक महिना वेढा चालूच ठेवला. परतु शेवटी कुत्बशाहाचा मुख्य वजीर मुस्तफाखान याने कोट्यवधी रामराजास देण्याचे कबूल करून वेढा उठविला. कल्याणी आदिलशाहाचे ताब्यात दिली. निजामशाहाला या वेळी अपमान सहन करून रामराजाचे माडलिकत्व स्वीकारावे लागले.[९६]

अहमदनगरचा वेढा चालू असताच इमादशाहाच्या तोफखान्याने तेलगणात धुमाकूळ माजला होता. त्यावरून कुत्बशाहाने दस्तुरखानास त्याच्या पारिपत्त्यार्थ

९५. बु. इ. मा., हेगचें भा., इं अ., व्हा. L–१९२१, पृ. १०१-२; ब्रि. फे. नि. पु. ३, पृ. २३८-९, व कु. पु. ३, पृ. ३३०.

९६ ब्रि. फे. कु. पु. ३, पृ. ३३०, नि. पु. ३, पृ. २३९-४२, व आ. पृ. ३, पृ. १२०-२२; बु. इ. मा., इ. अं., व्हा. L–१९२१, पृ. १०५-६.

पाठविलें. त्यानें भिमकळें[९७] गावी लढाई दिली. तोफलखान जखमी होऊन पळून गेला.

हि. ९७० (३१ आगस्ट १५६२ ते २० आगस्ट १५६३ इ. स.).— निजामशाहाची व कुत्बशाहाची पुन्हा मैत्री झाली व कल्याणी घेण्याचे ठरले. आक्टोबर १५६२च्या सुमारास कल्याणीजवळ इब्राहीम कुत्बशाहा व हुसेन निजामशाहाची वडील मुलगी बिबी जमाली यांचें लग्न झालें. नतर त्यांनी कल्याणीस वेढा घातला. तेव्हां आदिलशाहा, तोफलखान व रामराजा हे एकत्र होऊन चालून आले. काही सैन्य तेलगणातील दक्षिण भाग घेण्यास पाठविले. तेव्हा निजामशाहाने कुत्बशाहाच्या आग्रहावरून वेढा उठविला. परतु आदिलशाही सैन्याने त्याचा चांगलाच पाठलाग केला. कुत्बशाहा जेमतेम निभावून गोवळकोड्यास आला.[९८]

हि. ९७१ (२१ आगस्ट १५६३ ते ८ आगस्ट १५६४ इ. स.).— आदिलशाही सैन्य अहमदनगराहून परतले ते तारपल्ली (गोवळकोंड्यापासून ३२ मैल) येथें येऊन राहिलें होतें. शिवाय यापूर्वी वेकटाद्रि, जगदेवराव व ऐन उल्मुल्क यानी दक्षिण तेलगणांत स्वारी केली होती. कुत्बशाहाने मुझाहिदखानास त्याचेवर पाठविलें होतें. त्याची तोरकळ येथे मारामारी चालूच होती. तारपल्लीस आल्यावर रामराजाने गोवळकोंड्याजवळील मुलुख लुटण्यास प्रारभ केला. शिवाय कोंडाविडचा राजा सिद्धराज तिमाप्पा यास कोडपल्ली व मच्छलीपट्टणवर व जावई जोतमराव यास देवरकोडा व इद्रकोंड्यावर पाठविलें. चार महिनेपर्यंत लढाई चालू होती. शेवटी जगदेवरावाने पानगळ, कोइलकोडा, गणपुरा व इद्रकोडा हे रामराजास मिळवून दिले. सिद्धराजानें कोडपल्ली व एल्रला वेढा दिला होता. या वेळी कुत्बशाहाला गोवळ-कोंड्यांत अडकून राहावें लागले होतें. सरतेशेवटी अली वरीद व मुस्तफाखान यानी तह घडवून आणला व रामराजास गणपुरा व पानगळ द्यावे लागले.[९९] याप्रकारें कुत्बशाहाची दैनावस्था झाली. तेव्हा त्याने प्रथम गोवळकोड्याचा कोट बाधला.

---

९७. भिमकळ – भिमगळ–हैद्राबादेच्या उत्तरेस ११० मैल, निझामाबाद जिल्हा, निजाम संस्थान.

९८. बु. इ. मा., हेगचें भा., इं. अँ., व्हॉ. L–१९२१, पृ. १४१; ब्रि. फे. कु. पु. ३, पृ. ३३०–१, व नि. पु. ३, पृ.२४२–४.

९९. ब्रि. फे. आ. पु ३, पृ. १२२–३, कु. पु. ३, पृ. ३३१, व नि पु ३, पृ. २४५.

जगदेवरावाच्या सांगण्यावरून काशीरावानें इद्रकोड्याच्या हवालदारास केद केले. तेव्हां मुस्तफाखान त्याच्या मदतीस गेला. मुस्तफाखानाने वेढा देऊन किल्ला घेतला व काशीरावाचा शिरच्छेद केला. मुस्तफाखान परत राजधानीस आला. नतर सूर्यरावादि नायकवाडीने कट करून बड केले. ते मोडले व सूर्यरावादि बऱ्याच लोकास ठार केले.

एट्टरास विद्याद्रीने वेढा दिला होता. त्याला कुमक पाठविली व वेढा उठल्यानतर नरसिंडोल्चा बदोबस्त करण्यास आजा केली. एट्टरच्या हवालदाराने राजमहेंद्री घेण्याबद्दल कुत्बशाहास सागितलें. तेव्हा कुत्बशाहाने रफतखान लारी उर्फ मलिक नायब यास स्वारीवर पाठविले. तेव्हा नरसिंडोल येथे विद्याद्री, सीतापती वगैरे चाल्न आले. लढाई झाली. तींत उरकोड्याचा राजा मारला गेला आणि विद्याद्री व सीतापती राजमहेंद्रीस पळून गेले. त्याचा धौलेश्वर[९९] पर्यंत पाठलाग केला. धौलेश्वराचा किल्ला घेऊन नरसिंगरावाच्या तत्पक किल्ल्यास वेढा दिला. नरसिंगराव केद झाला. पावसाळ्यासाठी लारी धौलेश्वरी राहिला. पावसाळ्यानतर तत्पक घेतला व राजमहेंद्रीच्या मुलखात लारी शिरला. परतु कुत्बशाहाने लारीस मोठ्या मोहिमेसाठी तावडतोब परत बोलाविलें. तेव्हां तो सैन्यासह गोवळकोड्यास परत आला.

हि. ९७२ (आगस्ट १५६४ ते २८ जुले १५६५ इ. स.).—आदिलशाही किश्वरखान व कुत्बशाही मुस्तफाखान यानी धर्मयुद्ध या नावाखाली सर्व मुस्लमानी पातशाहा रामराजाविरुद्ध लढण्यासाठी एकत्र होण्यास सिद्ध केलें. या शाहाचे सख्य व्हावे म्हणून हुसेन निजामशाहाने आपली मुलगी चादबिबी हिला अली आदिलशाहास द्यावी व सोलापुरचा किल्ला तिला देज म्हणून द्यावा व अलीची बहीण हदिआ सुलताना मुर्तुझास करून घ्यावी असे ठरले. नतर रामराजाशी बितुष्ट आणण्यासाठी म्हणून आदिलशाहाने एतगीर, रायचूर वगरे प्रात परत मागण्याकरिता वकील पाठविला. रामराजाने त्यास नीट वागविले नाही. तो परत गेला. लग्नसोहळे चालत असता (सप्टेंबर १५६४ इ.स.) तो जालनापुरास गेला व सर्व हकीकत निवेदन केली. तेथे लढाईवर निघण्याचा बेत कायम ठरला. अली मनापासून या कटात सामिल झाला नव्हता. परतु नाइलाजास्तव तो त्यात मिळाला. बेत कायम झालेला रामराजास कळताच त्यानें दसऱ्याच्या दरबारात (आक्टोबर १५६४ इ.स.) या

९९. धौलेश्वरम्—कृष्णच्या काठावर राजमहेंद्रीच्या दक्षिणेस ५ मैल, पूर्व गोदावरी जिल्हा, मद्रास.

भावी महायुद्धाचा आपल्या माडलिकांस इशारा दिला व लढाईची तयारी चालविली. अलीस फोडण्याचा प्रयत्न केला व अलीनेंहि आतून रामराजासच्च मदत करण्याचे कबूल केलें. सोलापुरास ता. ८ जमादिलावल (१२ डिसेंबर १५६४ इ. स.) रोजी सर्व पादशहाचें सैन्य गोळा झाले. ता. २० जमादिलावल (२४ डिसेंबर १५६४ इ. स.) रोजी या सेनासमुहाने प्रयाणास प्रारंभ केला. या सैनेने कृष्णाकाठी मुक्काम केला. तेव्हां रामराजा चालून गेला. कृष्णेच्या पलीकडे राहून मुसलमानी सैन्यानें रामराजाच्या मुलखात धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. त्याच्या बदोबस्तार्थ रामराजानें सन्य पाठविलें. रक्कसगीतगडगीजवळ[१००] रामराजाने तळ दिला. नतर लढाईस प्रारंभ झाला. तीन दिवस सारखी धुमश्चक्री उडून राहिली. निजामशाहा व कुत्बशाहानें चांगलेच शौर्य दाखविले. अली तटस्थ राहिला. दोन्हीहि सैन्यातील पुष्कळच लोक जाया झाले व मारले गेले. रामराजाने चवथ्या दिवशी पुन्हा धीर देऊन रक्कसगीतगडगीच्या मैदानांत आपली सेना नेऊन रणगादी स्थापून रणस्तभ उभारला व आपली सेना सज्ज केली. नतर पुन्हां दोन दिवस धुमश्चक्री उडाली. याच वेळी जलालउद्दिनाने तालिकोट[१०१] च्या चाळीस घरामागे जाऊन तळ दिला. तेव्हा सर्व सेना सेनापतीच्या ताब्यात देऊन तो खासा तिकडे गेला. इकडे तिन्ही पादशाहानी रक्कसगीतगडगीच्या सैन्यावर तुटून हल्ला चढविला. तेव्हा सेनापतीने मदत मागितली. ती रामराजाने दिली. रामराजाच्या सैन्याचा बराच नाश झाला. तेव्हा खासा रामराजाने लढाई चालविली. तीन दिवस व नऊ तासपर्यत सारखें रण माजून राहिले. सरते शेवटी इस्लामी पादशाहाची पिच्छेहाट झाली व त्यानी आपली छावणी दोन कोस मागे नेली. या जयाने रामराजाचे सैन्य आनदमग्न झाले व विसावा खात पडले असता अलापर्यत तटस्थ वृत्ति ठेवून रामराजाकडे कल ठेवलेल्या आदिलशाहाने निमाज पटन असता इस्लामीयाचा मोड झालेला ऐकला व तो तात्काळ निघाला आणि रामराजाच्या छावणीवर घाला घातला. या अकस्मात् घातलेल्या छाप्याने रामराजा पकडला गेला व त्याने आपला शिरच्छेद आपला मानलेला मुलगा अली आदिलशाहा याच्याच हातें व्हावा असा आग्रह धरल्यावरून अली आदिलशाहाने त्याचा शिरच्छेद केला. रामराजा[१०२]

१००. रक्कसगी-तंगडगी — तालिकोटच्या पूर्वेस २० मैल.

१०१. तालिकोट — विजापूरच्या दक्षिणेस ४० मैल, विजापुर जिल्हा, मुंबई

१०२. निजामशाही इतिहासकार रामराजाला मारण्याचे श्रेय निजामशाहास देतात, तर आदिलशाही इतिहासकार अलीकडे देतात. या बाबतींत रामराजाचा नोकर रामाजी

मारला गेल्याची वातमी समजताच इतर पातशाही सैन्य शत्रूवर तुटून पडले व रामराजाच्या सैन्याची दाणादाण उडवली. रामराजा वैशाख शुद्ध अष्टमी, सोमवार, श्रवण नक्षत्री, रक्ताक्षी सवत्सरी, गत शक १४८७ (२३ एप्रिल १५६५ = २२ रमजान ९७२ हि.) रोजी मारला गेला[१०३]

विजयानगरच्या सैन्याची दाणादाण उडताच ते तेथून परत फिरले. परंतु इस्लामी सैन्याने तेथे दहा दिवस मुक्काम केला व नतर विजयानगरास जाऊन लूटालुट केली. तेथून कुत्बशाहातर्फे मुस्तफाखान, निजामशाहातर्फे मौलाना इनायतउल्ला व आदिलशाहातर्फे किश्वरखान हे मुदगळ व रायचूर घेण्यासाठी रवाना झाले. ते किल्ले घेतल्यानतर मुस्तफाखानाने किल्ल्या किश्वरखानास दिल्या. हे पाहून निजामशाहास राग आला. त्याने कुत्बशाहास मुस्तफाखानाला ठार मारण्याबद्दल लिहिले. कुत्बशाहाने त्याला राज्याबाहेर जाण्यास सांगितले. तो अली आदिलशाहास जाऊन मिळाला. आदिलशाहाने त्याला मुल्क वर्जार नेमले. इस्लामी शाहानी विजयानगरात सहा महिने राहून हस्तगत केलेला सर्व मुलुख परत घेतला. नतर ते सर्व आपापल्या राजधानीस आले. परत आल्यानतर बुधवार ७ जिल्काद ९७२ हि. (७ जून १५६५ इ. स.) रोजी हुसेन निजामशाहा मृत्यु पावला.

हरकारा हा समकालीन अस्सल्याने व त्याचा वृत्तांत फार बारीक सारीक तपशील देऊन दिलेला अस्सल्याने तो फार महत्त्वाचा व विश्वसनीय आहे.

१०३. रामाजी हरकाऱ्याची रामराजाची बखर, मॅकेन्झी कलेक्शन, व्हॉ. १३, बु. इ. मा., हेगचे भा., इं. अॅ., व्हॉ. ८–१९२१, पृ. १४३-६ व १९३, ब्रि. फे. आ. पु.३, पृ. १२४–३०, नि पु ३, पृ. २४६-९, व कु. पु.३, पृ. ३३०-१. बु.र.मा.त शेवटच्या लढाईचा दिवस शुक्रवार २ जमादिलाखर हि. ९७४ दिला आहे. फेरिस्ताने नक्की दिवस दिला नाही. त. इ. म. कुत शुक्रवार २२ जमादिलाखर हि. ९७२ दिला आहे. २२ जमादिलाखरास शुक्रवार नसून मंगळवार येतो म्हणून तो चुकीचा आहे व बुऱ्हाण-इ-मासिरीतील वर्षच चुकीचे आहे. उलट रामाजी हरकाऱ्याने दिलेली तिथि, वार, शक, संवत्सर व नक्षत्र बिनचूक आहेत. शिवाय एवढी मोठी सन्ये सोलापुराहून निघाल्यानंतर एकाच महिन्यात तालिकोटला एकत्र येऊन रामराजाशी लढाई होते हे तितके सभवनीय दिसत नाही. वाटेत आदिलशाहाने मोठी मेजवानी दिली. कृष्णाकाठी आल्यानतर काहीं आठवडे लुटालुट चालू होती. लढाई ७-८ दिवस झाली. या सर्व गोष्टीचा विचार करितां मुसलमानी इतिहासकारांनी दिलेला महिना चुकीचा दिसतो.

हि. ९७२ (२९ जुलै १५६५ ते १८ जुलै १५६६ इ. स.).—हुसेन निजामशाहा मेलेला समजतांच अली आदिलशाहानें पुन्हां आपापसांत भांडण्यास सुरुवात केली. निजामशाहाचा कारभारी किश्वरखानाचे व मुर्तुजाच्या आईचे न पटल्यामुळें त्याने अली आदिलशाहास निजामशाहावर स्वारी करण्यास सांगितलें. तेव्हा आदिलशाहा चालून येऊ लागला. परतु खोजा हुमायुन राणीने कुत्बशाहाकडे मदत मागितली. ही मदत येण्यापूर्वीच आदिलशाही सैन्य सरहद्दीवर आलें. मुर्तुझा निजामशाहा अहमदनगराहून बऱ्हाडात तोफलखानाकडे गेला. तेथून मदत घेऊन कौलसला आला. नतर त्याची व कुत्बशाही सैन्याची कौलस-कदाहारच्यामध्यें गांठ पडली. तेथून ते विजापुरावर चालून गेले. विजापुरास वेढा घातला. परतु आदिलशाहा कोंकणात पळून गेला. आदिलशाहा लढाईच देईना व पावसाळ्यात वेढाहि चालविणे कठीण म्हणून शेवटी मुर्तुझा निजामशाहाच्या आईने तह केला व पावसाळ्यात ही सैन्ये परत फिरून आपापल्या राजधानीस गेली.[१०४]

तालिकोट किंवा रक्कसगीतगडगीच्या लढाईपूर्वी रफतखान लारीची राजमहेंद्रीची मोहीम थांबविली होती. ती पुन्हा चालू झाली. धौळेश्वरावर आल्यानतर त्यानें राजमहेंद्रीकडे कूच केले. प्रथम पेंटापूर[१०५] घेतला. राजपुडीच्या किल्ल्यापर्यंत सीतापतीचा पाठलाग केला. जगलांतून मोठ्या प्रयासानें वाट काढून राजपुडीचा डोंगरी किल्ला घेतला. सीतापती राजमहेंद्रीच्या किल्ल्यात गेला. तेव्हा राजमहेंद्रीस रफतखानाने वेढा दिला. वार्तेत कासिमकोट्याच्या विद्याद्रीनें रफतखानावर हल्ला चढविला. परतु त्यात त्याचा पराभव होऊन तो पळून गेला. चार महिने किल्ल्यास वेढा पडला. शेवटी सीतापतीस व विद्याद्रीस आपल्या कुटुंबांसह बिनधोक जाऊ द्यावें व यल्लु पंडितानें किल्ला रफतखानाचे ताब्यात द्यावा असें ठरले. नतर किल्ला रफतखानाने ताब्यात घेतला[१०६].

हि. ९७४ (१९ जुलै १५६६ ते ७ जुलै १५६७ इ. स.).—कासिमकोट्यावर मोहीम करण्याचा रफतखानास हुकुम आला. तेव्हां तो ओरिसाच्या

---

१०४. बु. इ. मा., इं. अँ., व्हॉ. L–१९२१, पृ. १९६-७; ब्रि. फे. आ. पु. २, पृ. १३१-२, व नि. पु. ३, पृ २५१.

१०५. पेटापूर – पेडापूर ?–राजमहेंद्रीच्या ईशान्येस २० मैल, गोदावरी जिल्हा, मद्रास.

१०६. 'तरिख-इ-महंमद कुत्बशाही'त अब्जद पद्धतीनें दिलेला हि. ९७९ हा सन चुकीचा दिसतो.

जगलांतून वाट काढू लागला. प्रथम वेंकटराजानें येऊन त्याच्यावर हल्ला चढविला. वेंकटराज पळून गेला व गोपाळपल्ली व वीरगुत्तम रफतखानाच्या हाती आले. तेथून तो कास्मिकोट्यावर चालून गेला. तेव्हा सर्वराज व भाईबुलदर यांनी येऊन तह केला. खंडणी देऊन माडलिकत्व स्वीकारिलें. नंतर रफतखान गोपाळ ओरियारच्या मुलखांत शिरला. गोपाळ ओरिआर पळून गेला होता. प्रांत बिनतक्रार हाती आला. तेथून विद्याद्रीच्या मुलखावर स्वारी झाली. वेलपराज चालून आला. देवपुरलच्या किल्ल्याजवळ लढाई झाली. पराभव झाला. तेव्हा वेलपराज किल्ल्यांत जाऊन बसला. किल्ल्यास चार महिने वेढा दिला. वेलपराज रफतखानास शरण आला व कुत्बशाहाचे माडलिकत्व स्वीकारले. नतर रफतखान चद्रबारला गेला. त्यास वेढा घातला. किल्ला तोफांच्या साहाय्याने घेतला. तेथे नरसिंग व सूरसिंग कद झाले.

अली आदिलशाहानें निजामशाहाशी गुप्त तह केला. त्यात त्यानी आपसास मेटावे असे ठरले. भेट झाली. तीत निजामशाहाने बन्हाडांत तोफलखानावर स्वारी करावी व आदिलशाहाने बिदर व तेलगणात शिरून त्याचा मुलुख घ्यावा असे ठरले. प्रथम ते तोफलखानावर चालून गेले. परतु तोफलखानाने आदिलशाहास लाच देऊन गावलचा वेढा उठविण्याचा प्रयत्न केला व आदिलशाहाने किल्ल्यास वेढा घालून बसण्यापेक्षा तेलगणात स्वारी करणे योग्य असा सल्ला देऊन वेढा उठविला व ते दक्षिणकडे वळले. कौलस घेण्यासाठी निजामशाहीतर्फे एखलासखान व आदिलशाहीतर्फे ऐन उल्मुल्क रवाना झाले. परतु वाटेंत विजापुरी काही सैन्यानें निजामशाही सैन्यावरच वाटेंत हल्ला केला. त्यांत बरेच लोक पडले. त्यामुळें दोन्हीहि पातशाहांत वैमनस्य आलें व तह मोडून ते प्रथम आपापल्या राजधानीकडे गेले.[१०७]

हि. ९७५ (८ जुलै १५६७ ते २५ जून १५६८ इ. स.).—निजामशाहा व कुत्बशाहा याचा मैत्रीचा तह होऊन त्यानी रामराजाचा भाऊ एलतमराज याजसह जाऊन आदिलशाहावर स्वारी करण्याचें ठरविलें. तिन्हीहि सैन्यें कृष्णेवर जमली. परतु या वेळीं मुर्तुझाच्या आईने एलतमराजाकडून खंडणी घेण्याचा आग्रह धरिला. कुत्बशाहानें तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. शेवटी कुत्बशाहा व एलतमराज एका रात्री अकस्मात् आपापली सैन्यें घेऊन निजामशाहास सोडून गेले. निजामशाही सैन्य परतलें. अलीच्या सांगण्यावरून कुत्बशाहानें तह मोडला असावा असे समजून

१०७. बु. इ. मा., इं. अँ., व्हॉ. I – १९२१, पृ. १९७-८; ब्रि. फे. आ. पु. ३, पृ. १३२.

निजामशाहानें तेलगणांतून जातांना कोइलकोंडा व गणपुरा येथे नासधूस केली. नंतर कुत्बशाहानें निजामशाही सैन्याच्या वाटेत अडथळे आणण्याचा प्रयत्न केला व शेवटी घोडदळ पाठवून हल्ला चढविला. त्यांत दोन्हीहि बाजूकडील मुख्य मुख्य सरदार पडले व जखमी झाले. शेवटी निजामशाही सैन्य विदर प्रांतातून अहमदनगरास गेले.[१०८]

कुत्बशाहानें रफतखान लारीस वैजनाथदेवावर स्वारी करण्याची आज्ञा दिली. त्यान प्रथम पांतनूरास वेढा घालून तो घेतला. वैजनाथदेवाचा भाऊ कैद झाला. नंतर त्यानें कडुदेवपल्लीस वेढा घातला. पुष्कळ दिवस वेढा पडला होता. वैजनाथान निकराची लढाई दिली. पराभव पावला. तेव्हा वैजनाथदेवाने खंडणी देऊन माडलिकत्व स्वीकारले. याप्रमाणे थेट पूर्वेस समुद्रकिनाऱ्यापर्यंत (राजमहेंद्रीपर्यंत) कुत्बशाही राज्य वाढविले.

हि. ९७८ (५ जून १५७० ते २५ मे १५७१ इ. स.).—इ. स. १५७०त मुर्तुझा निजामशाहाने आपल्या आईस कैद केले व अली आदिलशाहाने धारूर वगैरे प्रांतात गडबड केली. मुर्तुझा निजामशाहाने धारूर घेतला व बेरीच शौर्य दाखविले. ही संधी पाहून कुत्बशाहाने मुर्तुझा निजामशाहाशी मैत्री संपादण्याचा प्रयत्न केला. नंतर तह झाला. त्यात कुत्बशाही व निजामशाही सन्यानी विजापुरावर चालून जावे असे ठरले. नागनुरीजवळे या दोन्ही सैन्याचा तळ पडला. परंतु उलट आदिलशाहाने खटपट करून इब्राहीम कुत्बशाहाविरुद्ध मुर्तुझाचे मन वळविले. मुर्तुझाने कुत्बशाही सैन्यास वेढून हल्ला चढविण्याचा हुकुम दिला. हा अकस्मात् हल्ला झालेला पाहून इब्राहीम कुत्बशाहा जिवानिशी पळाला. सर्व जडजवाहीर सामानसुमान मुर्तुझाच्या हाती लागले. या वेळी इब्राहीम कुत्बशाहाच्या वडील मुलाने सैन्याची जुळवाजुळव करून मुर्तुझावर चालून जाण्याची परवानगी मागितली. परंतु इब्राहीम कुत्बशाहास त्याचा संशय आल्यावरून त्याने त्यास प्रथम देवरकोंड्यास कैदेत ठेवले व नंतर विष घालून ठार मारले. मुर्तुझाने नंतर उदगीरावर चालून जाऊन उदगीर घेतली.

---

१०८. बु. इ. मा., इं. अ., व्हॉ. L – १९२१, पृ. २०५-६; ब्रि. फे. नि. पु. ३, पृ. २५१.

१०९. वुन्हाण-इ-मासिरीत वाकडी म्हटले आहे.

११०. बु. इ. मा, इं. अ, व्हॉ. L – १९२१, पृ २२९-३१; ब्रि. फे नि. पु. ३, पृ. २५३-५.

हि. ९८० (१४ मे १५७२ ते २ मे १५७३ इ. स.).—इब्राहीम कुत्बशाहानें मुर्तुझाचा सूड उगविण्यासाठी तोफलखानाशी मैत्री सपादली. मुर्तुझाच्या मुलुखावर स्वारी करण्याचे ठरलें. तोफलखानाने आपला मुलगा समशीर उल्मुल्क यास पाठविले. कुत्बशाहानें शिकारीचा बहाणा करून कूच केले. कालसला अली बरिदं, कुत्बशाहा व तोफलखान याची सैन्ये एकत्र जमली. त्यानी अली आदिलशाहाचीहि मदत मागितली. अली आदिलशाहा स्वासाच स्वारीवर निघाला. परतु चगीजखानाने त्याला नलदुर्गास[111] गाठले व त्याला या सघातून फोडले. कुत्बशाहा घाबरला व अली बरिदास व तोफलखानास आपापली सैन्ये मागे नेण्यास सागितले. जरूर लागल्यास एकमेकास एकमेकानी साहाय्य करण्याच्या शपथा घेतल्या. नतर इब्राहीम कुत्बशाहा गोवळकोड्यास आला[112].

हि. ९८१ (३ मे १५७३ ते २२ एप्रिल १५७४ इ. स.).—आदिलशाहाचा व निजामशाहाचा तह झाला की, आदिलशाहाने विजयानगरावर स्वारी करावी व निजामशाहाने तेलगणातील मुलुख त्यावा. या तहान्वये त्यानी प्रथम विदरास वेढा घातला. परतु पुढे त्याचा असा बेत झाला की, विदरास वेढा घालून बसण्यापेक्षा तेलगणातील मुलुख त्यावा व तोफलखानास प्रथम शिक्षा यावी. त्याप्रमाणे आदिलशाहातर्फे दिलावरखान व मुर्तुझातर्फे अमिन उल्मुल्क वगैरे मुलुखगिरीस निघाले. कालसजवळ वरीच लुटालुट केली. कुत्बशाहातर्फे सलाबतखान त्या सैन्यावर हल्ले चढवीतच होता. पावसाळा लागल्याकारणाने निजामशाहाचे सैन्य कोलसच्या आसपास राहिले. कुत्बशाही सैन्याने त्यास पुरकळच त्रास दिला. पावसाळ्यानतर आदिलशाहाचे सैन्य वकापुरकडे गेले व निजामशाहाचे सैन्य पार्थीवरून वऱ्हाडात गेले.[113] या वेळी आदिलशाहाचा जनाना यशवतराव, भोजमलनायक व देवनायक याचे हवाली केला होता. या सगट सरदारानी परत जाताना गोवळकोड्याच्या मुलुखात लुटालुट केली. सलाबतखानाने त्याच्यावर जाऊन त्याचा पराभव केला. यशवतरावास बराच त्रास दिला. परतु तो जनान्यासह सुरक्षित निघून गेला.

कोलस-कदाहारचे सरहद्दीवरील निजामशाही सैन्यान कुत्बशाहाच्या मुलुखात पुन्हा लुटालुट करण्यास सुरवात केली. तेव्हा इब्राहीम कुत्बशाहाने मीर शहा

१११. नलदुर्ग—विदरच्या पश्चिमेस १०० मैल, उस्मानाबाद जिल्हा, निजाम संस्थान.

११२. बु. इ. मा., इं. अॅ., व्हा. L – १९२१, पृ. २६१–३.

महमद अजू त्याच्यावर पाठविला. देगलूरचा[113] निजामशाही हवालदार सय्यद हैदर हा अजूबर चालून आला. त्यात अजूने त्याचा पुरा मोड केला व देगलूर घेतला. नतर तो देगलूर-कदाहारच्या मैदानात छावणी देऊन राहिला असता, वसवतराव, विश्वासराव आणि कोळीराव यानी अजूबर हल्ले चढविले. परतु त्यात निजामशाही सैन्याची पिछेहाट झाली. निजामशाहाने माहूरहून[114] मिर्झा यादगारास मदतीस पाठविले. कुत्बशाहाने सलाबतखानास पाठले. कुमक येऊन पोहोचली तेव्हा कुत्बशाही सैन्य ताम्री[115] होते. कुमक आलेली पाहताच ते कोलमला गेले. लढाया झाल्या. एक महिनापर्यंत त्याचे एकमेकावर हल्ले चढत होते. दोन्ही बाजूचे बरेच नुकसान झाले. कुत्बशाहाने निजामशाही सैन्याचा बऱ्याच वेळा मोड केला व ते लुटले. नतर कुत्बशाहाने कालमच्या किल्ल्यात जरूर तितके सैन्य ठेवून बाकीच्या सैन्यास गोवळकोड्यास परत बोलाविले. सैन्य परत गेलेले पाहताच ९ मोहरम (३ मे १५७४ इ. स.) रोजी निजामशाही सैन्याने कालमच्या आसपास लुटालुट केली व ते परत कदाहारास गेले. नतर मोहरमच्या अखेरीस (मेच्या शेवटच्या आठवड्यात) निजामशाहाने आपले कदाहारचे सैन्य उदगीरास नेले. पावसाळ्यात ते तेथे राहिले.[116]

हि. ९८२ (२३ एप्रिल १५७४ ते ११ एप्रिल १५७५ इ. स.).— निजामशाहाने वऱ्हाडच्या राज्याचा नाश केलेला पाहताच कुत्बशाहाने शहा मीराम पाठवून निजामशाहाची माफी मागितली व तहाचे बोलणे लावले. निजामशाहाने त्यास मान्यता दिली. तेव्हा शहा मीर परत गोवळकोड्यास आला. नतर नजरनजराणे घेऊन जाऊन त्याने निजामशाहाची बाळापुरास[117] पुन्हा गाठ घेतली व ज्या वेळी निजामशाहाची आदिलशाहावर स्वारी होईल त्या वेळी कुत्बशाहाने प्रत्येक मुक्कामास वीस हजार होन याप्रमाणे रवडणी द्यावी असे ठरले.[117]

विदरवरून आदिलशाहा परतल्यानतर विजयानगरकडे चालून गेला. पेनकोड्यास वेढा दिला. तेव्हा श्रीरगरायाच्या मागणीवरून इब्राहीम कुत्बशाहाने शहा महमद अजम आदिलशाही सरहद्दीवरील मुलुखात लुटालुट करण्यास पाठवून तो

११३. माहूर – देगलूरच्या उत्तरेस १० मैल, आदिलाबाद जिल्हा, निजाम संस्थान.
११४. ताम्री–देगलूर पासून चार मैलावर.
११५. बु. इ. मा., इं. अँ., व्हॉ.I–१९२१, पृ. २६७, २६८ व २७८.
११६. बाळापूर–अकोल्याच्या पश्चिमेस १२ मैल, अकोला जिल्हा, वऱ्हाड.
११७. बु. इ. मा., इं. अँ, व्हॉ.I–१९२१, पृ. २७९-८० व २८३.

विजयानगराकडे गेला. सरहद्दीवर अजू, इब्राहीम कुत्बशाहा व श्रीरंग हे मिळताच आदिलशाहानें माघार घेतली. तेव्हां इब्राहीम कुत्बशाहा परत गोवळकोंड्यास आला.

हि. ९८३ (१२ एप्रिल १५७५ ते ३० मार्च १५७६ इ. स.).— श्रीरंगरायाच्या सरदारानी कोंडविड वगैरे कोडपल्लीजवळील सर्व किल्ले घेतले.[११८]

हि. ९८६ (१० मार्च १५७८ ते २७ फेब्रुवारी १५७९ इ. स.).— इब्राहीम कुत्बशाहाने कोडविडादि किल्ले परत घेण्यासाठी हैदर उल्मुल्क यास पाठविले. त्यानें प्रथम इनकोडा घेतला. काचरलोटा व कममहि त्याच्या हाती आले. नंतर तो कोडविडाकडे वळला. वेढा घालण्यापूर्वी त्याची व हिंदु सन्याची लढाई झाली. तीत त्याला यश येताच तो गुरमवर चालून गेला. गुरम काबिज केला. नंतर बेलमकोंड्यास वेढा दिला. हा व आणखी काही लहान किल्ले घेतल्यानंतर हैदर कोंडविडास वेढा घालून बसला. किल्ला पडणे कठिण वाटताच मदत मागितली. कुत्बशाहाने अमीर शहा मीरास पाठविले. पुन्हा हल्ले चढविले. त्यात कुत्बशाही सन्याचा बराच नाश झाला. शेवटी हत्तीकडून दार फोडून निकराचा हल्ला केला व हि. ९८७ च्या सफर महिन्यांत (एप्रिल १५७९ इ. स.) त्याने कोंडविड घेतला. कपूरी तिमराज कद झाला. या स्वारीवर इब्राहीम कुत्बशाहाने आपला मुलगा महमद कुली यास पाठविले होते.[११९]

हि. ९८७ (२८ फेब्रुवारी १५७९ ते २६ फेब्रुवारी १५८० इ. स.).— मुर्तुझा निजामशाहाने विदर घेण्याचा निश्चय केला. त्याने मीर अबुल कासिमास इब्राहीम कुत्बशाहाकडे पाठवून वेळ्याच्या मदतीस येण्याबद्दल कळविले. कुत्बशाहाने अमीर शहा मीरास पाठविले. मलिक अली बरिदाने अली आदिलशाहाची मदत मागितली. ती त्याने कबूल केली. परन्तु त्याबद्दल त्याने अली बरिदाकडील दोन स्वरूपवान स्त्रीजे मागितले. ते त्याने नाइलाजास्तव देण्याचे कबूल करून पाठविले. तेव्हा आदिलशाहाने कुमक पाठविली. परन्तु अली आदिलशाहाने मिळविलेल्या दोन

११८. मर्रादेपल्ली (बेल्लारी जिल्हा) येथील इ. स १५७४-५ मधील शिलालेखात श्रीरंगाने कोंडविड, उदयगिरी व वेनुकोंडा हे काबिज करण्यात मिळविलेल्या यशाचें वर्णन केले आहे सिवेलकृत ' हिंदुस्थानातील दक्षिणेतील ऐतिहासिक शिलालेख.' पृ. २६१.

११९. श १५०२ मध्ये इब्राहीम कुत्बशाहाने आपला मुलगा महमद कुली यास सैन्य देऊन पाठविले व त्यानीं उदयगिरी, वेनुकोंडा, बेलमकोंडा, नंगेटा व कोंडविड हे किल्ले घेतले. त्यास तेथील सुभेदार केलें. असा गुंतूर जिल्ह्यातील अमिनाबाद येथील इ.स. १५९२-३च्या शिलालेखात उल्लेख आहे. सिवेलकृत ' हिंदुस्थानातील ऐतिहासिक शिलालेख', पृ. २६२ व २६६ आयंगारकृत 'सोर्सेस ऑफ विजयानगर हिस्टरी', पृ. २३९-४०.

खोजापैकी एकानें आदिलशाहाचा गुरुवार च. २३ सफर हि. ९८७[१२०] (२१ एप्रिल १५७९ इ. स.) रोजी रात्री खून केला. विदरचा वेढा चालूच राहिला.[१२१]

इब्राहीम आदिलशाहा विजापूरच्या तख्तावर आला. हा लहान होता. त्यामुळे आदिलशाही सरदारात भांडणे लागली. हे पाहून निजामशाहाने आदिलशाहावर चालून जाण्याचे ठरविले. इब्राहीम कुत्बशाहाशी मागे केलेला तह पुन्हा कायम करविला व निजामशाहाने विद्याजदखानाबरोबर सैन्य देऊन त्याला आदिलशाही मुलुखावर पाठविला. परंतु ही बातमी आदिलशाही सरदारांना लागली. त्यांनी अली बरिदाच्या मदतीस पाठविलेल्या सैन्यास कुमक म्हणून आणखी सैन्य पाठविले. या सैन्याची भिवंडीवर गाठ पडली. तेथे त्यांना कुत्बशाही घोडदळ मिरज व मंगळवेढ्याच्या रस्त्याने आदिलशाही मुलुखात शिरत असल्याची बातमी लागली. तेव्हा आदिलशाही सैन्याने त्यांचा फैरोझाबादजवळ बादेगपर्यंत पाठलाग केला व पहिल्याच वेळी यश मिळाले म्हणून मोठ्या आनंदाने निजामशाही सैन्यावर चालून जाऊ लागले. आदिलशाही व निजामशाही सैन्यांची नलदुर्ग व सोलापूर यांमधील भोगेवजवळ गाठ पडली. लढाई झाली. तीत विद्याजदखानाचा पूर्ण पराभव झाला. आदिलशाही सैन्य विदराकडे जाऊ लागले. नंतर सय्यद मुर्तुझाकडे सेनापतीपद आले. सय्यद मुर्तुझा आदिलशाही सैन्यावर चालून जाऊ लागला. शहा मीरहि आपल्या कुत्बशाही सैन्यासह त्यास जाऊन मिळाला. नंतर ते नलदुर्गावर चालून गेले. नलदुर्गास वेढा घातला. दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत चांगलीच जुपली. आदिलशाही सैन्य पळून किल्ल्यात जाऊन बसले. नंतर वेढा चालू राहिला. नेहमी लढाया होतच होत्या. शेवटी निजाम-कुत्बशाही सरदारांनी आपल्या अश्वा सैन्यानिशी विजापुरावर स्वारी करावयाची व राहिलेल्या सैन्याने वेढा चालू ठेवावयाचा असे ठरवून एका रात्री निजाम-कुत्बशाही सैन्याने विजापुराकडे कूच केले. परंतु ही बातमी आदिलशाही सैन्यास लागताच नलदुर्गावरील अर्धे आदिलशाही सैन्य दुसऱ्या वाटेने आधीच विजापुरास जाऊन पोहोचले. निजाम-कुत्बशाही सैन्य सोलापुरावरून विजापुरास गेले. तेथे गेल्यानंतर दुसऱ्याच दिवशी मोठी लढाई झाली.

---

१२०. बुऱ्हाण-इ-मासिरात हि. स. ९८८ दिला आहे. फेरिस्ता व कुत्बशाही इतिहासकार हि. ९८७ देतात. हि. ९८८ च्या २३ सफरला गुरुवार येत नाही. बु. इ. मा.त ९८८ हि. हा ९८७ हि. साठी चुकून पडला असावा.

१२१. ब्रि. फे. आ. पु. ३, पृ. १४२, नि. पु. ३, पृ. २६२ व कु. पु. ३, पृ. ३३२; बु. इ. मा., इं. अ., व्हॉ LII–१९२३, पृ. २९-३०.

कुत्बशाही सैन्याने चांगलेच शौर्य दाखविले. आदिलशाही सैन्याचा मोड होऊन ते जेमतेम विजापुरात जाऊन पोहोचले. दुसऱ्या दिवशीहि असाच पराभव झाल्याने आदिलशाही सैन्य विजापुरात कोंडून राहिले.[१२२]

नलदुर्गचा वेढा घालण्यास निजाम-कुत्बशाही सैन्य जात असता इब्राहीम कुत्बशाहाने अमीर झेनास नाग्वची, कल्लूर व काकनी हे घेण्यास पाठविला होता. त्याने प्रथम आदिलशाही हवालदाराचा पराभव करून सुभान कुलीच्या कारकीर्दीत गेलेला काकनी, नाग्वची व कर्नूलचा प्रांत काबीज करून कल्लूरास वेढा घातला. तो हाती येताच झेन सागराकडे गेला. तेथे लढाई झाली. तीत आदिलशाही फौजेचा मोड झाला. तेथून त्याने मादगींचा किल्ला घेऊन एतगीरास वेढा दिला. तोहि हाती आला. तेथे त्याला विजापुरास गेलेल्या निजाम-कुत्बशाही सैन्याच्या मदतीस जाण्याचा हुकूम मिळाला. तो तेथून निघाला. परंतु ही वातमी आदिलशाही सरदारास लागताच त्यानी मिर्झा नूर महमदास त्याला अडविण्यासाठी पाठविले. अलमल येथे गाठ पडली. तेथे अमीर झेनाने आदिलशाही सैन्याचा पुरा मोड केला. नंतर अमीर झेन आदिलशाही मुलुख लुटीत लुटीत विजापुरापर्यंत आला. आदिलशाही सैन्याने त्याला अडविण्याचा प्रयत्न केला. परंतु तो निष्फळ झाला.[१२३]

परदेशीय मुसलमान सरदारानी विजापूर लढविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पुन्हा एकदा निकराची लढाई दिली. तीत आदिलशाही सैन्याचा बराच नाश झाला. तेव्हा पुन्हा दरवाजे लावून आदिलशाही सैन्य विजापुरात बसले. वेढा चालू राहिला. आदिलशाही सरदारानी कुत्बशाही व निजामशाही सैन्यात विघाट उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. निजामशाही सय्यद मुर्तझाने कुत्बशाही सैन्यास दूर करण्याचेहि ठरविले. परंतु या कटाची वातमी कुत्बशाही सेनापती सय्यद शहा मिरास कळताच त्याने सय्यद मुर्तुझाची चांगलीच कानउघाडणी केली. सय्यद मुर्तुझा पुन्हा पूर्ववत् वेढ्याचे काम चालवू लागला. हा कट फसला. तेव्हा आदिलशाही सरदारानी मराठा घोडदळास निजाम-कुत्बशाही सैन्यावर हल्ले चढविण्यासाठी व दाणागोटा न मिळू देण्यासाठी पाठविले. त्याचा बराच उपयोग झाला व शेवटी निजाम-कुत्बशाही सैन्यास वेढा चालविणे जड जाऊ लागले.[१२४] तेव्हा विजापूरच्या आसपासच्या मुलुखात लुटालूट व नासधूस करण्यास प्रारंभ केला.[१२५]

१२२. बु. इ. मा., हेगचे भाषांतर; इ. अ., व्हॉ. LI-१९२२, पृ. ६८-७३, १२७-१३०, ब्रि. फे. नि. पु. ३, पृ. २६३, व ब्रि. फे. आ. पु. ३, पृ. १४४-५४.

हि. ९८८ (१७ फेब्रुवारी १५८० ते ४ फेब्रुवारी १५८१ इ. स.).— निजाम कुत्बशाही सैन्यानें मोहरम महिना (फेब्रुवारी-मार्च) बहुतेक लुटालूट करण्यांतच घालविला. नतर वेढा उठवून कोल्हारास गेले. तेथून रायबाग, फल्हाळा, सातारा, हुकेरीवरून गुलबर्ग्यास गेले. वाटेत मिरझेस लढाई झाली. परतु मिरझेस वेढा न घालतांच हे सैन्य पुढे गेलें. कुलबर्ग्याहून जाऊन नलदुर्गास वेढा द्यावयाचा तर वाटेत नलदुर्गाजवळील नादगांवास इब्राहीम कुत्बशाहा बारल्याची वातमी आली.[१२२]

दक्षिण तेलगणांतील मुलुग्वगिरीवरून शहा मीरास आदिलशाही सैन्याविरुद्ध लढण्यास पाठविला. तेव्हा तेथील कारभार मुरारी नावाच्या एका तोलदार ब्राह्मण सरदाराकडे सोपविला होता. या वेळी त्याने व त्याचे हाताखालील मुसलमान सरदारानीं अदोनी लुटून वरीच सपत्ति व खडणी इब्राहिमास मिळवून दिली.

इब्राहीम कुत्बशाहा गुरुवार च. २१ रबिलाखर ९८८ हि. (२ जन १५८० इ. स.) रोजी वारंगल[१२३]. याला वीस मुले झाली. त्यातील सहा मुलगे व तेरा मुली जगल्या. वडील मुलगा अबदुल कादर देवरकोंड्यास कैदेत वारला. दुसरा मुलगा मिर्झा हुसेन कुली बुट्टन मेला. तिसरा महमद कुली तख्तावर आला. चवथा मिर्झा अबदुल फत्ते या वेळी तेरा वर्षाचा होता. तो पुढे १००३ हि.त वारला. पांचवा मिर्झा महमद खुदावदा आपल्या भावास पदच्युत करण्याचा कट केल्यावरून गोवळकोंडा येथे कैदेत असता हि. १०१८त वारला. सहावा मिर्झा महमद अमीन हि. १००४ च. २५ साबान (२७ मार्च १५९६ इ. स.) रोजी वारला[१२४].

१६. **महमद कुली कुत्बशाहा:**—इब्राहीम कुत्बशाहाचा तिसरा मुलगा महमद कुली हा शुक्रवार च. १४ रमजान ९७३ हि. (५ एप्रिल १५६६ इ. स.) रोजी जन्मला. याला बाराव्या वर्षीच कोंडविड-कोंडपल्लीच्या लढाईवर पाठविले होतें. त्याने शके १५०२ विक्रम सवत्सर चैत्र वद्य १४ मगळवार (१३ एप्रिल

१२३. इब्राहीम कुत्बशाहाच्या कबरीवरील लेखातहि हीच तारीख दिली आहे. ए. इं. मॉ., १९०७-८, पृ. २४ व १९१५-१६, पृ. २७.

१२४. अमीर महमद अमीनच्या शिलालेखांत रविवार चं. २५ साबान १००४ हि. (२७ मार्च १५९६ इ. स.) ही तारीख दिली आहे.-ए. इं. मॉ., १९०७-८ पृ. २४ व १९१५-१६, पृ. २९.

१५८० इ. स.) रोजी उदयगिरी घेतला. वेंकटराजाचा पराभव करून बेनुकोंडा, बेलमकोंडा, तगेडा व कोडविड घेतले. त्याला तेथील सुभेदार नेमलें होतें. इब्राहीम कुत्बशाहा आजारी झाला तेव्हा तो गोवळकोड्यास आला व च. २१ रबिलाखर ९८८ हि. (२ जून १५८० इ. स.) रोजी तख्तावर आला.[१२५]

हि. ९८८ (रबिलाखर जून १५८० ते ४ फेब्रुवारी १५८१ इ.स.). —महमद कुली राज्यावर आला त्या वेळी निजाम-कुत्बशाही सैन्य विजापूरचा वेढा उठवून नलदुर्गाकडे येत होते. या सैन्यातील मुख्य सरदारात तितका बनाव नव्हता. नलदुर्गास खासा कुत्बशाहानें आल्याशिवाय या जोड सैन्याला आदिलशाही सैन्यावर चढाई करिता येणार नाही असे वाटून शहा मीरने कुत्बशाहास लढाईवर नेले. परंतु यात यावे तितकें यश आले नाही. उलट कुत्बशाही सैन्यातच एकमत राहिले नाही. महमदकुली व निजाम-कुत्बशाही सैन्य नलदुर्गास रमजानचे अग्वेरीस (आक्टोबर १५८० इ.स.) आले. तोफा वगैरे आल्यावर किल्ल्यास वेढा दिला. दोन महिनेपर्यंत सारखे हल्ले व फितुरीचे प्रयत्न चालू होते. शेवटी विजापुराहून मदत आली. तीहि किल्ल्यांत जाऊन पोहोचली. तेव्हा महमद कुलीने पुढाकार घेऊन अगेजाने निकराचा हल्ला केला. दुपारपर्यंत संग्राम झाला. परंतु इतक्यात पाठीवर मोठी मराठी फौज आल्याची वर्दी आली. तेव्हा हे जोड सैन्य माघारे फिरले. नतर वेढा उठवून विजापुरास जाण्याचा बेत झाला. सैन्य भिवरेवर मुक्कामास आले. तेथे महमद कुलीने लढाई थांबवून राजधानीस परत जाण्याचे ठरविले. ती जोड सैन्ये नतर काही फौज सरहद्दीवर ठेवून परत फिरली.[१२६]

गोवळकोड्यास आल्यानतर महमद कुलीने सय्यद शहा मीरच्या मुलीशी लग्न केले.[१२७]

महमद कुलीने सरहद्दीवर मीर झेनुल ऊर्फ मुस्तफाखान यास ठेवले होते. परतु आदिलशाही अफाट सैन्य चालून येत आहे अशी वातमी लागताच त्यानें कुमक

१२५. अमिनाबाद शिलालेख, (अंके १५१४ चा) क्र. ७७, सोर्सिस ऑफ विजयानगर हिस्टरी, अयंगारकृत, पृ २३९-४०.

१२६. बु. इ. मा., हेगचें भाषातर, इं. अ, व्हॉ. LI –१९२२ पृ. २००; ब्रि. फे. कु. पु. ३, पृ. ३३३.

१२७. बु. इ. मा., इं. अ., व्हॉ. LI –१९२२ पृ. २०१; ब्रि. फे. कु. पु. ३, पृ. ३३४.

मागितली व ती मिर्झा यादगर याजबरोबर तावडतोब पाठविण्यात आली. याच वेळी मीर शहा मीर आदिलशाहास फितूर आहे असें कांही दरबारी लोकानी सांगून महमद कुलीचे मन कलुषित केले. त्यानें शहा मीरास कैद केला. त्यामुळे परदेशीय सरदारांनी आदिलशाहाशी लढण्याचे नाकारलें. कुत्बशाही सैन्याचा पुरा मोड झाला. सामानसुमान लुटलें गेले व आदिलशाही दिलावरखानाने त्याला पाकटवीत[१२८] थेट गोवळकोंड्यापर्यंत आणून सोडले. याप्रमाणे मागे ठेवलेले सैन्यहि तीन महिन्यात परत आले. नतर आदिलशाहाशी तह झाला.[१२९]

[९८९ हि. (५ फेब्रुवारी १५८१ ते २५ जानेवारी १५८२ इ. स.)].— अली खान व्हर नावाच्या सरदाराने कोडविडाजवळ बड केले. त्याला मिकर तम्मय्याने मदत केली. तो कोडविडावर चालून आला. वाटेत कम्ममेट[१३०] वेढा दिला. कोडविडचा सुभेदार राय रायने त्याचा पराभव केला. तेव्हा तो विजयानगरच्या आश्रयास जाऊ लागला. परतु आश्रय मिळाला नाही.

अली खानान सैन्याची जमवाजमव करून कोंडपल्ली प्रातात लुटालुट केली. कुत्बशाहान रहिमदाद व तहीर महमद असे दोघे सरदार पाठविले. अली खान आदिग्यास गेला. परतु किल्ला पडताच तो जगलात जाऊन चोरटे हल्ले करू लागला. त्याचा पाठलाग केला तेव्हा तो पळून गेला. पातशाही सैन्याच्या मदतीस सत्रावळचा हवालदार अफजलखान आला. तेव्हा व्हर निझामपट्टणास[१३१] गेला व लुटालुट करून कोडविडास आला. तेथे किश्वरखानाचा पराभव करून त्याचे सामानसुमान लुटले. नतर अनवोले येथे अफजलखानास लुटला. तेव्हा रहीमदादने पाठलाग करून त्याच्यावर हल्ला केला. त्यात तो मारला गेला.

हि. ९९५ (२ डिसेंबर १५८६ ते २१ नवबर १५८७ इ. स.).— इब्राहीम आदिलशाहाचा मुख्य वजीर दिलावरखान याने कुत्बशाहाची मैत्री सपादण्यासाठी महमद कुलीजवळ त्याची बहीण मलाका-इ-जहान इब्राहीम आदिलशाहास देण्याबद्दल मागणी घातली. महमद कुली कुत्बशाहने प्रथम ती निजामशाही

---

१२८. बु. इ. मा., इं. अ., व्हॉ. LI–१९२२, पृ. २०१; ब्रि. फे. आ. पु. ३, पृ. १५४, ब्रि. फे. कु. पु. ३, पृ. ३३४.

१२९. कंबम – कोंडविडच्या नैऋत्येस १०० मैल, कर्नूल जिल्हा, मद्रास.

१३०. निझामपट्टण – कोडविडच्या आग्नेयेस ४० मैल, गुंतुर जिल्हा, मद्रास.

आसदखानाच्या धास्तीनें नाकारली. परंतु आसदखान कैद झालेला समजताच लग्न ठरले व इब्राहीम आदिलशाहा व कुत्बशाहा यांनी नलदुर्गास जाऊन लग्नसोहळा केला[131].

हि. ९९८ (३१ आक्टोबर १५८९ ते १९ आक्टोबर १५९० इ. स.).—भागानगर उर्फ हैद्राबाद वसविले व तेथे राजधानी नेली.[132]

[हि. ९९९ व १००० (२० आक्टोबर १५९० ते २७ सप्टेंबर १५९२ इ. स.)].—वेंकटपती इ. स. १५८६त राज्यावर आला. त्यानंतर त्याने कोडविडच्या राजाचा बराच प्रांत आक्रमिला[133]. तो परत घेण्यासाठी कुत्बशाहाने हिंदु राजावर स्वारी करण्याचे ठरविले. त्याने कृष्णा उतरून जाऊन मुसलमुरूस वेढा घालून तो घेतला. बसवत राजाजवळून नदिअंलें[134] व नरसिंगराजाजवळून कलगर घेतले. नंतर जमलमुरू, जुद्री, चरवल, नदोतकोंटा, दोल व चिन्नरचे जमीनदार येऊन मिळाले. अमिर उल्मुल्कास गडिकोट्यास वेढा घालण्यास लावला. नरसिंग राजाने कुत्बशाहाचे माडलिकत्व स्वीकारले. कुत्बशाहाने गडिकोटा काबिज केला.

महमद कुली पेनकोंड्यांवर चालून गेला. तेथे वेंकटपतीने कुत्बशाहाचा पूर्ण पराभव केला. पावसाळ्यात माघारा जाण्याचीहि अडचण होईल म्हणून तो त्याच्यापेंचि गोवळकोंड्यास कसा तरी येऊन पोहोंचला[135].

गडिकोट्याच्या मदतीस कोंडविडचें सैन्य गेले. हे पाहून वेंकटपतीने उदयगिरीच्या[136] कौलानदास कोंडविड व कृष्णा प्रांतात धुमाकूळ घालण्यास पाठविले. उरिआचा राजाहि त्यास मिळाला. त्यानी कोंडविडात शिरून लूटालूटीस प्रारंभ केला.

---

१३१. बु इ. मा., इ. अ., व्हो. LII–१९२३, पृ. ३२, ब्रि. फे. कु. पु. ३, पृ. ३३५, व आ. पु. ३, पृ. १५८-९, बु. स. ४३०.

१३२. ब्रि. फे. कु. पु. ३, पृ. ३३५.

१३३. वैशाख वद्य १४ शके १५०६च्या अहोबलम येथील शिलालेखावरून श्रीरंगाचे कारकीर्दीतच मुकुंदराजाने हा प्रांत पुन्हा काबिज करण्यास सुरुवात केली होती असें दिसते. आयंगारकृत ' सोर्सिस ऑफ विजयानगर हिस्टरी', पृ. २३३–४.

१३४. नंदियाल—हैद्राबादच्या दक्षिणेस १३० मैल, कनुल जिल्हा, मद्रास.

१३५. पेनकोंडा—बंगलूरच्या उत्तरेस ९० मैल, अनंतपूर जिल्हा, मद्रास.

१३६. रघुनाथाभ्युदयम्, आयंगारकृत ' सोर्सिस ऑफ विजयानगर हिस्टरी', पृ. २४५ व २५९, शके १५२७च्या सिद्धांतचा शिलालेख, सदर पुस्तक, पृ. २४८ आणि रामराजीयमु, सदर पुस्तक, पृ. २४३

१३७. उदयगिरी—कोंडविडच्या नैऋत्येस ९० मैल, नेलोर जिल्हा, मद्रास.

परतु याचवेळी अफझलखानानें हुनगोळच्या[138] बाजूस आपले लोक पाठविले. त्यामुळे कौलानदास परतावे लागले. अफझलखानाने शिकस्त करून कौलानदाच्या सैन्यावर हल्ले चढविले. त्याचा उपयोग झाला नाही. लवकरच अब्दखानाची कुमक आली व याने पार्श्वभूमीवरून अकस्मात् हल्ला चढविला. त्यात उरिआ राजाचें नुकसान झाले.

पावसाळयाचा फायदा घेऊन वेंकटपतीने सजरखानाकडून गडिकोटा परत घेण्यासाठी सरदार पाठविले. गडिकोटयास वेढा घातला. परतु याच वेळी मुर्तुझाखानाने कडप्पास[139] जाऊन ते लुटले. त्यामुळे गडिकोट्याचें अर्धे सैन्य तिकडे रवाना केले. मुर्तुझाखानाने कसा तरी तीन महिने दम काढला. नतर त्याला कुमक म्हणून रुस्तुमखान मुख्य सेनापती करून पाठविला. परतु त्याचे व मुर्तुझाचे पटले नाही. रुस्तुमने चाल करून जाऊन लढाई देण्याचा प्रयत्न केला. तीत त्याचे घोडेस्वार चिखलात रुतल्यामुळे त्याचे फार हाल झाले व कुत्बशाही सैन्याचा पुरा नाश झाला. रुस्तुमखानास कुत्बशाहाने परत बोलावून त्यास फजित केले.

महमदकुलीन कोडविडचा हवालदार इतबारखान याजबरोबर राहिलेले सर्व सैन्य देऊन त्याला पेनकोंड्यावर पाठविले. अनतगीरच्या[140] नरस नदीराजाने त्याच्यावर सारखे हल्ले चढविले. त्यात त्याला बराच हैराण केला. एका रात्री हल्ला घालण्यास आला असता वादळ व पावसामुळे नदीराजाला मध्येच अडकून राहावे लागले. त्यात त्याचा पराभव झाला व त्याला थोडीशी माघार घ्यावी लागली. नतर इतबारखान सालिर्वीवर चालून गेला. गोवळकोंडयाहून येथपर्यंत पोहोचण्यास त्याला एक महिना लागला होता.

इ. १००१ (२८ सप्टेंबर १५९२ ते १६ सप्टेंबर १५९३ इ.स.).— अर्मीन उल्मुल्क उर्फ अमीर जुम्लास खडणी वसुलीसाठी पाठविले होते. पुष्कळ वर्षे खडणी न दिल्यामुळे तेथील जहागिरदार ती देण्यास साहजिकच नाखुष होते. परतु तगादा लावल्यामुळें अलमखान पठाण, खान खान, साबाजी मराठा, बळीराय वगैरे हिंदुमुसलमान सरदारानी कोडविडास वेढ केले. त्यांनी तो प्रातहि बळकाविण्यास सुरुवात केली. अर्मिन उल्मुल्कास गोवळकोंड्याहून वेढाचा मोड करण्यास रवाना केलें. त्याने कौलानदास प्रथम ठार मारले. आदिग्यावर अधिक सैन्य देवले. इतर वडखोर

१३८ हुनगोळ—कोडविडच्या दक्षिणेस ४० मैल, गुंतुर जिल्हा, मद्रास.

१३९. कडप्पा—पेनकोंड्याच्या ईशान्येस ७५ मैल, कडप्पा जिल्हा, मद्रास.

१४०. अनंतपूर—पेनकोंड्याच्या उत्तरेस ४० मैल, अनंतपूर जिल्हा, मद्रास.

विजयानगरच्या आश्रयास पळून जाऊ लागले. त्यातील काही नायकवाडी केद झाले व कांहीं मारले गेले. शेवटी वड मोडून अमीन उल्मुल्क परत हैद्राबादेस गेला.[141]

याच सुमारास इब्राहीम कुत्बशाहाचा मोठा मुलगा अबदुल कादर याचा तोतया उभा राहिला. त्यास खुदाबदखान मिळाला. परतु इतबारखानाने त्याच्यावर चालून जाऊन कोंडविडाजवळ त्याला गाठले व त्याचा मोड केला. तो आदिलशाहाचें आश्रयास जाऊन राहिला.

[हि. १००२ (१७ सप्टेंबर १५९३ ते ५ सप्टेंबर १५९४ इ.स.)].—कासिमकोट्याचा भाईबुलदर वारल्यानतर मुकुदराज गादीवर आला होता. यानें कुत्बशाहाचे माडलिकत्व मान्य केले होते. ते झुगारून देऊन त्याने त्या प्रातातील कुत्बशाहाचा सुभेदार विर्लसखान यास केद केले. तेव्हा कुत्बशाहाने मिर झुनल अबिदिन त्याच्या पारिपत्यार्थ पाठविला. तो कासिमकोट्यास आला. मुकुदराजाची तयारी पाहून त्याने कुत्बशाहाकडे आणखी मदत मागितली. कुत्बशाहाने अमीर उल्मुल्क अमीर जुम्ला यास पाठविला. राजमहेंद्रीजवळ लढाई झाली. कुत्बशाही सन्याचे बरेच नुकसान झाले. मुकुदराज कासिमकोट्यास गेला. विर्लसखानास व घझनफर खान यास ठार मारले. इतरहि मुसलमानाची कत्तल केली. कुत्बशाही सैन्य कासिमकोट्यावर चालून गेले. मुकुदराज प्रथम मदवाड व नतर चिकाकोलला पळून गेला. त्याचा पाठलाग केला. तेव्हा तो पेटापुर[142]ला गेला व नतर गावोगाव रानावनातून हिंडत राहून हल्ले चढव लागला. शेवटी त्याला रामचद्रराजाच्या आश्रयास जावे लागले.

[हि. १००३ (६ सप्टेंबर १५९४ ते २६ आगस्ट १५९५ इ.स.)].—रामचद्रराज यानें बगाल सरहद्दीवरील माधोसिगची मदत मिळवून तो मुकुदराजाचें राज्य परत घेण्यासाठी आला. त्यानी मुसलमानी सैन्यावर पुरकळ हल्ले चढविले. परतु कुत्बशाही सैन्याने रेटीत रेटीत थेट बगाल्याचे सरहद्दीपर्यत नेले. माधोसिगास बगाल्यातच मोगलाचे मदतीस जावे लागले म्हणून त्याने आपले सैन्य परत घेतलें. तेव्हा रामचद्रराजानें खडणी देऊन तह केला. कासिमकोटा अलमखान व असीराव याच्या ताब्यात देऊन कुत्बशाही सेनापती माघारा आले.

---

१४१. अमिनाबादेचा शके १५१४चा शिलालेख, आयंगारकृत 'सोर्सेस आफ विजयानगर हिस्टरी', पृ. २४०.

१४२. पेटापूर—राजमहेंद्रीच्या पश्चिमेस ३५ मैल, गोदावरी जिल्हा, मद्रास.

हि. १००४ (२७ आगस्ट १५९५ ते १४ आगस्ट १५९६ इ. स.).— अकबराने मुरादला अहमदनगरचा किल्ला घेण्यास पाठविलें. या वेळी निजामशाहीत बरीच यादवी माजून राहिली होती. बरेच सरदार मुरादला येऊन मिळाले. मुरादची सेना मंगळवार च. २४ रविलाखर रोजी (२४ डिसेंबर १५९५ इ. स.) अहमदनगराजवळ येऊन दाखल झाली. दुसरे दिवशी वेढा घातला. दोन महिने वेढा चालूच होता. शेवटी शुक्रवार १ रजब (१ मार्च १५९६ इ. स.) रोजी रात्री सुरुंग लावून निकराचा हल्ला दिला. त्यात मुरादचा पराभव झाला. नंतर लढण्याचा जोर कमी होऊन तहाची वाटाघाट चालू झाली. परंतु वेढा चालूच राहिला. चांदबिबीकडून किल्ला हाती येत नाही हे पाहून मुरादला फार लागून राहिले. परंतु दक्षिणी सैन्याची आणखी कुमक जवळ आली आहे असे समजताच च. २७ रजब (२७ मार्च १५९६ इ. स.) रोजी रात्री वेढा उठवून मुराद माघारा गेला.[१४३]

या वेळी कुत्बशाहीचे सैन्य अहमदनगराकडे गुंतले होते व मुरादच्या यशापयशावर दक्षिणी शाह्यांची तख्ते डळमळणार असल्याने महमद कुलीचे तिकडे डोळे लागून राहिले होते. अशा विवंचनेत कुत्बशाही आहे असे पाहून वेंकटपतीने कोंडविडावर मोठे सैन्य पाठविले. कुत्बशाहीने आदिलखान बगशला त्याच्या प्रतिकारार्थ रवाना केले. विजयानगरचे सैन्य कममला तळ देऊन राहिले व आदिलखानाचे कोंडविडाजवळ येऊन वसले. लढाई झाली नाही. याच सुमारास राजमहेंद्री व एल्लोर येथील सैन्य कासिमकोट्याच्या बंदोबस्तास गेल्यामुळे तेथील रेड्डीआर जमीनदारांनी बंड केले व नीरटोल व एल्लोर लुटले. धर्मराव व आदिलखान बगश यांस तिकडे जावे लागले. त्यांनी कष्टाच्या प्रयत्नाने ते बंड मोडलें. नंतर आदिलखान व मीर झुलफ अविदिन गोवळकोंड्यास परतले.

[हि. १००५ (१५ आगस्ट १५९६ ते ४ आगस्ट १५९७) इ. स.].— राऊतराव याने कासिमकोटा येथे बंड केले. मदतीस हरिश्चंद्रास मिळविले. जंगलात राहून हल्ले चढवू लागला. एका हल्ल्यात तो मारला गेला. हरिश्चंद्र वैजनाथदेवाच्या आश्रयास पळाला.

[हि. १००६ (५ आगस्ट १५९७ ते २४ जुलै १५९८ इ. स.)].— वैजनाथदेव व मुकुंदराज यांस मदत घेऊन हरिश्चंद्राने जुरजुऱ्यास वेढा दिला. मलिक नायकने किल्ला लढविला. त्याच्या मदतीस चंगीजखान आला. तेव्हां वैजनाथ व

१४३. बु. इ. मा., इं. अ., व्हॉ. LII–१९२३, पृ ३३९-४६.

हरिश्चंद्र मीर झेनुल अबिदिनवर चालून गेले. परंतु त्यांना माघार घेऊन वीरगुत्तमच्या आश्रयास जावे लागले. मुसलमानी सैन्य नारायणपट्टणास राहिले. याच वेळी मुकुदराजान जलमुराहून येऊन महमद कुली कुत्बशाहाबादेस वेढा दिला. परंतु वेंजनाथदेवाचा पराभव झालेला ऐकून त्याने तो उठविला. चरगीजखानाने त्याचा दोन महिनेपर्यंत पाठलाग केला. वेंजनाथाने मुकुंदराजास कुमक पाठविली. तीत हरिश्चंद्र होता. परंतु चरगीजखानाने मुकुंदराजाचा पराभव केला. तेव्हा वेंजनाथदेवाने कुत्बशाहाबरोबर मैत्रीचा तह केला.

[हि. १००७ (२५ जुलै १५९८ ते १३ जुलै १५९९ इ.स.)].— मुकुंदराजावर चरगीजखान चालून गेला. वेलुरास गाठला. दोन दिवस लढाई झाली. मुकुंदराज पराल्यात गेला. जलमुर चरगीजखानाने घेतला. सर्व कासिमकोटा प्रांतातून पराचा खटपणी वसूल केली.

[हि. १००८ (१४ जुलै १५९९ ते २ जुलै १६०० इ. स.)].— राऊतरायाचा मुलगा कृष्णराव याने मुकुंदराजास बोलावून वध केले. पोतनूर व मदवाड घेतला. चरगीजखान, धर्मराव व वळीराव चालून गेले. एक दिवस लढाई झाली. कृष्णराव मदवाडास गेला. किल्ला विकट. धर्मरावने मुकुंदराजास त्याचे राज्य परत देऊन मांडलिक करून या प्रांतात शांतता स्थापावी म्हणून सुचविले. ते मीर झेनुल अबिदिनास मानवले नाही. परंतु कुत्बशाहाने मीर झेनुलास परत बोलावले. त्याच्या जागी सय्यद हुसेनची नेमणूक केली.

[हि. १००९ (३ जुलै १६०० ते २१ जून १६०१ इ. स.)].— सय्यद हुसेनने प्रथम हरिश्चंद्रास त्याचे राज्य परत दिले व मुकुंदराजाचा कांटा दूर करण्याची अट घातली. मुस्तफाबाद, कुत्बशाहाबाद व अहमदाबाद असे तीन नवीन किल्ले बांधले. मुकुंदराजाने महमदाबादेवर हल्ला चढविला. परंतु त्यात कृष्णराय मारला गेला. मुकुंदराजाने मदाशिवराय पाठविला. तोहि मारला गेला. नंतर मुस्तफाबादेवर अप्पिराजाने हल्ला चढविला. त्यात तो व भपणराज मारले गेले. सय्यद हुसेनने मदवाडास वेढा देऊन तो घेतला. तेव्हा मुकुंदराज पुन्हा वराल्यांत गेला.[१४४]

१४४. याच सुमारास वेंकटपतीने कुत्बशाही मुलखांत स्वारी केली, आणि त्याच्या व कुत्बशाही सैन्याच्या बऱ्याच झटापटी झाल्या असे इ. स. १६०१ मेच्या ताम्रपटात म्हटले आहे. (The Vilappakam Plates, V R 1, N. Arcot, 663 A; E. I. IV, 269) सिवेलकृत 'दक्षिण हिंदुस्थानांतील ऐतिहासिक शिलालेख', पृ. २६८.

हि. १०१० (२२ जून १६०१ ते १० जून १६०२ इ. स.).— कासिमकोटा राज्याच्या लहान लहान जहागिरी पाडून त्या वाटण्याच्या कामावर सूर्यरावाची नेमणूक झाली. त्यानें येऊन सर्व बंदोबस्त केला. त्यालाच या परगण्यावर सुभेदार नेमलें.

याच वेळी मीर महमद अमीन अस्त्राबादी यास मीर जुम्लत व दोन लाख होनांचा तनखा दिला.

अलीमर्दनखानाने तेलगणात शिरून लुटालुट केली. तेव्हा कुत्बशाही सन्याने त्याचा पराभव करून त्याला तेलगणातून कादून लावले.[१४५]

हि. १०१२ (१ जून १६०३ ते १९ मे १६०४ इ. स.).— शोझर् सुलतान नांवाचा इराणचा येलची महमद कुली कुत्बशाहाच्या दरबारात आला. तो नंतर पांच वर्षांनी परत गेला.

गजम व विजगापट्टण प्रांतात मुकुंद भाईबुलदरचा पुन्हा पराभव झाला.[१४६]

हि. १०१७ (७ एप्रिल १६०८ ते २६ मार्च १६०९ इ. स.).— बरेच परदेशीय मुसलमान हैद्राबादेस येऊन राहिले होते. त्यानी राजमहालात दंगा केला. या कारणावरून दक्षिणी लोकानी त्यांची कत्तल व लुटालुट करण्यास प्रारंभ केला. नंतर मीर जुम्ल्याने ही कत्तल व लुटालुट थांबविली.

हि. १०१८ (२७ मार्च १६०९ ते १५ मार्च १६१० इ. स.).— शाहा राजूच्या चिथावणीवरून महमद कुली कुत्बशाहाचा धाकटा भाऊ मिर्झा महमद खुदाबंडा यानें अबदुल करीम व अनवरखानाच्या साहाय्याने बंड केले. परंतु कुत्बशाहाने पुढाऱ्यास पकडून त्यास गोवळकोंड्याच्या किल्ल्यात कैद केले. खुदाबंडा हि. १०२० (१६११ इ. स.)त मृत्यू पावला.

दिल्लीच्या जहागीर बादशाहाने सुलतान परवीजला दक्षिण हिंदुस्थानच्या मोहिमेवर पाठविले. याचा फायदा घेऊन हिंदु राजानी पुन्हा बंडास सुरुवात केली. वेंजनाथदेवाने कासिमकोट्याच्या मुसलमानी सैन्यावर हल्ले चढविण्यासाठी सैन्य रवाना केले. त्या सैन्याने बराच धुमाकूळ घातला. चंगीजखान व धर्माराव सय्यद हुसेनच्या मदतीस आले. वेंजनाथाचा पुतण्या कृष्णराज व इतर सरदार कुत्बशाहास

---

१४५. इलिअट डॉसन, व्हॉ. ६, पृ. १०२ व ३१४.

१४६. श्रीकूर्मम् व विजगापट्टणचे शिलालेख, सिवेलकृत 'दक्षिण हिंदुस्थानातील ऐतिहासिक शिलालेख', पृ. २६९.

मिळाले. लढाई होण्यापूर्वीच वेंजनाथ म्हातारपणामुळे वारला. तेव्हा त्याला पुत्र नाही म्हणून कुत्बशाही सरदार धर्मराव याने कृष्णराजास गादीवर बसविले व खंडणी घेऊन मांडलिक केले.

• हि. १०१९ (१६ मार्च १६१० ते ५ मार्च १६११ इ. स.).— बस्तरचा राजा प्रतापशा याने कुत्बशाही मुलुखात लुटालुट केली. असीरावास त्याच्यावर पाठविले. असीरावने त्याचा पराभव केला व बस्तरपर्यंत पाठलाग केला. परंतु किल्ल्यास वेढा देण्याचे सामर्थ्य नाही हें पाहाताच कुमक मागितली. मीर महमद अमीन मदतीस आला. परंतु प्रतापशाने झुलवणी देऊन मुसलमानी सैन्यास बराच ताण पाडला. पावसामुळे तर मुसलमानी सैन्यास त्या प्रांतात राहणेच कठीण झाले. तेव्हा ते सैन्य माघारा फिरले. पावसाळ्यानंतर मलिक बिलेसखान हा मीर महमद अमीनच्या मदतीस गेला.

हि. १०२० (६ मार्च १६११ ते २२ फेब्रुवारी १६१२ इ. स.).— महमद कुली कुत्बशाहा दोन दिवसाच्या आजारानंतर शनवार च. १७ जिल्काद हि. १०२० (१७ डिसेंबर १६११ इ. स.) रोजी मृत्यु पावला. या वेळी परदेशीय मुसलमानांवर दक्षिणी लोक चालून जाऊ लागले. परंतु शहर कोतवालाने लोकांस आवरून धरून महमद कुत्बशाहाच्या तख्तारोहणाकडे नेले.

येथपर्यंतची हकीकत 'तरिख-इ-महमद कुली कुत्बशाही'तून दिली. यापुढील महमद कुत्बशाहाची हकीकत मुख्यत. हदिकत-अल-अलममधूनच घेतली आहे. हदिकत-अल-अलमच्या बाहेरील जो मजकूर येईल त्यास नेहमीप्रमाणे आधाराच्या टापा देण्यात येतील.

१७. **महमद कुत्बशाहा:**—महमदाचे टोपण नाव 'झिल्ले इलाहि' असे होते. याचा जन्म बुधवार च. २३ रज्जब १००१ हि. (१५ एप्रिल १५९३ इ. स.) रोजी सकाळी झाला[१४७]. याचा बाप मिर्झा मुहम्मद अमीन हा महमद कुली

१४७. बस्तर—वारंगळच्या ईशान्येस १५० मैल, बस्तर संस्थान, सी. पी

१४८. ए. इं. मॉ.. १९०७-८, पृ. २६ व १९१५-१६, पृ. ३१.

१४९. महमदाचे कबरीवरील शिलालेखात तो चं. २३ रजब महिन्यात जन्मला असे लिहिले आहे. ए. इं. मां. १९०७-८, पृ. २६ व १९१५-६ पृ. ३२ व ३०८. परंतु हदिकतमध्ये रबिलाखर महिना दिला आहे. बहुधः हदिकतमध्ये रजब ऐवजी रबिलाखर चुकीनें पडले असावे.

कुत्बशहाचा सर्वांत धाकटा सख्खा भाऊ. हा २७ मार्च १५९६ इ. स. रोजी वारला[१५०]. नंतर त्याचा चुलता महमद कुली कुत्बशाहा यानेच महमदाचे पालनपोषण केलें. यास कुराण शिकविण्यासाठी काझी मुहम्मद सम्नानी यास ठेवले होते. चाद मिया युसुफ नांवाच्या एका युद्धकलेतील निष्णात सरदाराने महमदास युद्धकला. शिकविली. महमद मोठा झाल्यानतर त्याला महमद कुली कुत्बशाहाने आपली हयात बख्श नांवाची कन्या हि. १०१६ (१६०७ इ. स.)त दिली[१५१] व अशा तऱ्हेनें पुतण्या व जावई या दोन्ही नात्यानी महमद राज्याचा वारस झाला.

हि. १०२० (६ मार्च १६११ ते २२ फेब्रुवारी १६१२ इ. स.).— महमद कुली वारल्यानतर त्याची बायको व तिचा भाऊ कमालउद्दिन आर्दिस्तानी ऊर्फ मुस्तफाखान यानी सोमवार च. १७ जिल्काद हि. १०२०[१५२] (११ जानेवारी १६१२ इ. स.) रोजी सकाळी मीर महमद मोमीन पेशवा याच्या हस्ते महमदास तख्तारोहण करविले. महमदाच्या अभिनदनार्थ इब्राहीम आदिलशाहाकडून मीर महमद ताकी व मुर्तुझा निझामशाहाकडून मीर अबुल फत्तह हे वस्त्र नजरनजराणे घेऊन गोवळकोंड्यास जिल्हेज महिन्यात (फेब्रुवारी १६१२ इ. स.) आले. त्याचा चागला मानमरातब ठेवून त्याची कुत्बशाहाने बोळवण केली.

हि. १०२१ (२३ फेब्रुवारी १६१२ ते १० फेब्रुवारी १६१३ इ.स.).— इ. स. १६१०त महमद कुलीन वस्तरचे राज्य काबिज करण्यासाठी मीर महमद मोमीनास पाठविले होते. परतु राज्य काबीज न होतां खडणी घेऊनच त्याला परत यावें लागले. मीर महमद मोमीनास हे राज्य घेण्याची आकाक्षा फार होती. म्हणून सय्यद कमालउद्दिनास सरलष्कर करून व त्याच्या मदतीस सय्यद हैदर हवालदार, आरबखान, चित्ताखान व इतर सरदार देऊन त्याला मोठ्या सैन्यासह हि. १०२१च्या जमादिलाखर महिन्यांत (आगस्ट १६१२ इ. स.) रवाना केले. हे कुत्बशाही सैन्य सरहद्दीवर जाताच वस्तरचा प्रतापशा शरण आला व त्याने आपल्या सरदारासह पुष्कळ नजरनजराणे पाठविले. सय्यद कमालउद्दिनाने वस्तरच्या राजाचे मागणे कुत्बशाहास कळविलें व कुत्बशाहानें फर्मान काढून प्रतापशास त्याचे राज्य त्याला

१५०. त. इ. म. कु., पृ. ४४५, व टीप १२४ पहा.

१५१. त. इ. म. कु., पृ. ४७६.

१५२. महमदाचे कबरीवरील शिलालेख, ए. इं. मॉ., १९१५-१६, पृ.३२, ३११ व १९०७-८, पृ. २६.

उपभोगण्यास दिले. तेव्हा त्याने कुत्बशाहास बरेच हत्ती पेशकश म्हणून नजर दिले. कुत्बशाही सैन्य राजधानीस परत आले.

हि. १०२३ (१ फेब्रुवारी १६१४ ते २० जानेवारी १६१५ इ. स.).— इराणच्या शाहा आब्बासकडून हुसेन बेग कब्चीबशी नावाचा वकील आला. तो प्रथम दाभोळास आला. तेव्हा त्याच्या सत्कारार्थ मिर्झा झैनुल अबिदीनीस तेथे पाठविले. राज्याचे सरहद्दीवर कुलीखानाने जाऊन त्या वकीलाचा सत्कार केला. हुसेन बेगची कुत्बशाहाने महमदनगर किल्ल्यातील काळाचबुतऱ्यात च. १० रजब १०२३ हि. (५ आगस्ट १६१४ इ. स.) रोजी भेट घेतली. त्या वेळी त्याने पातशाहाकडून आणलेला रत्नखचित मुकुट, तरवार व खजीर पट्ट्यासह, पन्नास उत्तम घोडे वगैरे नजर केले. हुसेन बेग गोवळकोड्यास दोन वर्षे चार महिने राहिला. त्याला वार्षिक बारा हजार होन खर्चास देत असत.

हि. १०२५ (१० जानेवारी ते २९ डिसेंबर १६१६ इ. स.).—शाहा आब्बासकडून आलेला हुसेन बेग जिल्काद (नवंबर) महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात इराणात जाण्याकरिता बऱ्हाणपुरास गेला. त्यास निरोप देताना कुत्बशाहाने पातशाहासाठी बऱ्याच हिंदी मौल्यवान चिजा वगैरे नजर पाठविल्या. शिवाय चार हजार होन खर्चास दिले. त्याऱ्यावरोबर शेख महमद खाटून यास दिले.

बालापूर व फत्तेपूर यांचे दरम्यान मलिक अबराने मोगली सन्याशी जहागीरचा जुलुस १०च्या बहमन महिन्याचे अखेरीस (फेब्रुवारी १६१६ इ. स.) लढाई दिली. त्या वेळी कुत्बशाही सन्य त्याचे मदतीस गेले. मलिक अबराचा या लढाईत पराभव झाला.[१५३]

हि. १०३० (१६ नवंबर १६२० ते ५ नवंबर १६२१ इ. स.). — मलिक अबराच्या नेतृत्वाखाली दक्षिणी सन्याचा मोगली सन्याने पुन्हा पराभव केला. मलिक अबराने घेतलेला मुलुख परत देऊन व ५० लाख रुपये खंडणी देऊ करून मोगलाशी तह केला. यापैकी २० लाख कुत्बशाहास द्यावे लागले.[१५३अ]

हि. १०३३ (१५ आक्टोबर १६२३ ते २२ सप्टेंबर १६२४ इ. स.).— परवीज व महाबतखानाने शहाजहानाचा पाठलाग केला. तेव्हां तो १२ आक्टोबर रोजी गोवळकोड्याच्या राज्यात शिरला. परवीजने त्याचा पाठलाग करण्याचे

१५३. वाकियात–इ.–जहागिरी, इलिअट व डॉसन, व्हॉ. ६, पृ. ३४३–८.

१५३अ. वेणी प्रसादकृत 'हिस्टरी ऑफ जहागीर,' पृ. ३२९.

सोडून (जहांगीरच्या) १८ जुलुसच्या १ आबान (१४ आक्टोबर १६२३ इ. स.) रोजीं तो परत फिरला. शहाजहान मच्छलीपट्टणास ता. ५ नवंबर १६२३ इ. स. रोजीं आला. मोंगली सरदारांने शहाजहानला राज्यात येऊ देऊ नये, काढून लावावें म्हणून कुत्बशाहास लिहिलें. कुत्बशाहाने त्यास दाणागोटा वगैरे पुरवून त्याला बंगाल-कडे जाण्यास मदत केली.[१५४]

हि. १०३४ (२३ सप्टेंबर १६२४ ते १२ सप्टेंबर १६२५ इ. स.).— मलिक अंबर कुत्बशाहाकडून 'झर-इ-मुकर्ररी' वसूल करण्यासाठी गोवळकोंड्याच्या सरहद्दीवरील कंदाहारला आला. हा वसूल गेली दोन वर्षे थकला होता. तें वसूल घेऊन व कुत्बशाहाशी मैत्रीचा तह कायम करून विदरगंवर गेला.[१५५]

शहाजहान बंगाल्यात पराभूत झाल्यामुळें व मलिक अंबरास मिळण्यासाठी म्हणून कुत्बशाहीतून परत दक्षिणेत आला. खुर्रम पुन्हा मच्छलीपट्टणास आला. त्या वेळीं त्याचेजवळ बरेच सैन्य होते. त्यामुळे तेथील लोक भिऊन पळाले. उचा-नींहि आपला माल गलबतात भरला, तेव्हा कुत्बशाही अधिकाऱ्यानें उचास नगररक्षणार्थ मदत देण्याविषयी विनंति केली. त्यानीं नाखुषी दाखविली. कुत्बशाहाने उंच गव्हर्नरास गोवळकोंड्यास बोलाविलें. परंतु तो जाईना. तेव्हा त्यास मारहाण व कैद करून तेथे नेले.[१५६]

हि. १०३५ (१३ सप्टेंबर १६२५ ते २ सप्टेंबर १६२६ इ. स.).— महमद कुत्बशाहा रबिलाखरच्या अखेरीस (२३-४ जानेवारी १६२६ इ. स.) आजारी झाला. त्याला ताप आला. त्याची आई व मनसूरखान ऐन उल्मुल्क हवली हवालदार यानी हकीम व वैद्य बोलाविले. औषध देण्यात त्यांचा बराच मतभेद

१५४. वाकियात-इ-जहांगिरी, इलिअट व डॉसन, व्हॉ. ६, पृ. ३८९-९१. मच्छली-पट्टण ते सुरत, पत्र, १२ नवंबर १६२३चें, इंग्लिश फॅक्टरीज इन इंडिया, भाग २, फोस्टरकृत, पृ. ३१३, परचास, त्याच्या सफरी, व्हॉ. ३, पृ. २२१.

१५५. इकबल-नामा-इ-जहांगिरी, इलिअट डॉसन, व्हॉ. ६, पृ. ४१२ व ४१४. फुलून अस्त्राबादीचा 'फतुहत्-इ-आदिलशाही' पृ. २८८ब सर जदुनाथ सरकारचें भाषांतर—इंडिअन हिस्टॉरिकल क्वार्टरली, व्हॉ. ९, अं. ३, सप्टेंबर १९३३, पृ. ६४०; वेणीप्रसादकृत 'हिस्टरी ऑफ जहांगीर' पृ. ३८०.

१५६. इकबल-नामा-इ-जहांगिरी, इलिअट-डॉसन, व्हॉ. ६, पृ. ४१६ व सारसंग्रह, पृ. ५१; मच्छलीपट्टण ते बटेबिया, ऑक्टोबर १६२७चे पत्र, हेग ट्रॅन्सक्रिप्टस, व सुरत तें लंडन २९ नवंबर १६२६चें पत्र इंडियन फॅक्टरीज इन इंडिआ, भा. ३, पृ. ३१६ व १५१.

झाला. शेवटी पांच दिवस वैद्याकडून औषध देवविले. आठव्या दिवशी महमद कुत्बशाहाची तब्येत बरीच नादुरुस्त झाली. अबुदुल्लास राज्य द्यावें व चवदा हजार इब्राहीमशाही होन धर्मार्थ वाटावेत असे त्याने सांगितले. नतर बुधवार च. १३ जमादिलावल १०३५ हि. (१ फेब्रुवारी १६२६ इ. स.) रोजी सकाळी पहिल्याच तासात त्याचे प्राणोत्क्रमण झाले.[१५७] महमद कुत्बशाहाने गुरूबाद नावाचा घुमट मोहरम हि. १०३५ (आक्टोबर १६२५ इ. स.)त पुरा केला[१५८]. त्यातच त्याला दफन केले.

महमद कुत्बशाहाने निआमतउल्लाखान यास प्रथम मिर जुम्ला नेमले. तो हि. १०२८ (१६१९ इ. स.)त वारला. नतर त्याचा जावई मिर्झा शरिफ हा त्याच्या जागेवर आला. तो हि. १०३० (१६२१ इ. स.)त वारल्यानतर मुझाफर अली डबीर हा मिर जुम्ला झाला. पण तोहि हि. १०३२ (१६२३ इ. स.)त मला. तेव्हा महमद हुसेन शिराझी यास मिर जुम्लत मिळाली. हाहि हि. १०३३ (१६२४ इ. स.)त वारला. नतर हुसेन मुआलिम मिर जुम्ला झाला. मीर महमद मोमीन अस्त्राबादी याजकडे पेशवाई होती. तो महमदशाहापूर्वी थोडीच वर्षे वारला. नतर कोणालाहि पेशवा न नेमता महमद कुत्बशाहाने स्वतःच कारभार पाहिला. अखेरीस काही महिने पेशवाई ख्वाजा मुझाफरकडे होती. तो वारल्यानतर मीर महमद रेझाईस पेशवा केला होता.

महमद कुत्बशाहास पाच मुले झाली:—

१. सुलतान अबदुल्ला. जन्म—च. २८ सव्वाल १०२३ हि. (२१ नवंबर १६१४ इ. स.).

२. मुलगी. हिला इ. स. १६३३त महमद आदिलशाहास दिली.

३. सुलतान अली ऊर्फ इब्राहीम मिर्झा. जन्म हैद्राबादेस सोमवार च. २८ सव्वाल हि. १०२५ (२३ नवंबर १६१६ इ. स.). हा इब्राहीम आदिलशाहाच्या मुलीपासून झाला. तो १०३७ हि. (१६२८ इ. स.)त वारला.

४ व ५. खुर्शिद बिबीपासून दोन मुलगे झाले.

महमद कुत्बशाहाने पुढील इमारती बाधल्या:—

१५७. महमद कुत्बशाहाचे कबरीवरील शिलालेख, ए. इ. मा., १९०७-८, पृ. २२ व १९१५-१६, पृ. ३२ व ३११.

१५८. ए. इं. मा., १९१७-१८, हैद्राबादेतील कुत्बशाही शिलालेख, पृ. ५५.

१. मस्जिद इ-जमिआ. ही हैद्राबादेस बांधली. तीस लाख होन खर्च झाला. परंतु ती अपुरी राहिली. अबदुल्ला व अबुल हसननें ती पुरी करण्याचे काम चालू ठेवलें होतें. राहिलेला भाग औरंगजेबाने बांधला. ही आता 'मक्का मस्जिद' या नांवानें संबोधली जाते.

२. हैद्राबादेच्या पूर्वेस सुलतान नगर वसविले.

३. गोवळकोंडा किल्ल्याचा तट बांधला.

४. गोवळकोंड्याजवळ सुलतानपूर वसविले.

५. इलाहि महाल, नवीन दाद महाल व महम्मदी महाल बांधले.

६. बाग-इ-मुहम्मदशाही लावली. बागेत मोठमोठ्या दोलेजग इमारती उठविल्या.

महमद कुत्बशाहाची कविता बरीच असावी. हा 'झिल्ले-इलाहि' या टोपण नांवानें ती लिही. काही बेचे तरीख-इ-कुत्बशाहीत व हदीकतमध्ये दिले आहेत. याला वाचनाचा बराच नाद असे. निरनिराळ्या पुस्तकातून काढलेल्या उतऱ्याचे त्यानें भले मोठे पुस्तक झाले होते असे म्हणतात.

१८. हयात बख्श बेगमः — महमद कुली कुत्बशाहाची एकुलती एक मुलगी हयात बख्श बेगम हिचा जन्म बहुधः १५९५-६ इ. स.च्या सुमाराचा असावा. महमद कुली कुत्बशाहाने तिचा सख्खा चुलतभाऊ महमद याच्याशी इ. स. १६०७ त तिचें लग्न केले. त्या वेळी महमदाचे वय १५ वर्षाचे होते. हिला अबदुल्ला इ. स. १६१४त झाला व नतर एक मुलगी झाली. तिला महमद आदिलशाहास इ. स. १६३३त दिली.[१५९] महमद कुत्बशाहा वारला तेव्हा अबदुल्लाचे वय अवघे अकरा वर्षाचे होते. त्यामुळे राज्यकारभार तीच पाहात असे. हिने हयातनगर वसविले. औरंगजेबाने गोवळकोंड्यावर इ. स. १६५६ त स्वारी केली त्या वेळी हिनेच चतुराईनें राज्यावरील ते मोठे सकट टाळले.[१६०] अबदुल्ला मोठा झाला तरी आपल्या आईच्या सल्ल्याने चालत असावा असे दिसते. हिच्या खाजगीकडे

१५९ परिशिष्ट २, पृ. ४९–५५, महमदनामा, (मो वर्मा) शिवाजीनवावली, २, पृ. ८४.

१६०. परिशिष्ट २, पृ. ७३.

अबदुल्ला कुत्बशाहानें बरीच गावे इनाम दिली होतीं.[१६१] हयात बख्श बेगम मंगळवार चं. २८ साबान १०७७ हि. (१२ फेब्रुवारी १६६७ इ. स.) रोजी रात्री वारली.[१६२]

१९. **अबदुल्ला कुत्बशाहा:**—अबदुल्ला मिर्झा सोमवार चं. २८ सव्वाल हि. १०२३ (२१ नवंबर १६१४ इ. स.) रोजी ७ तास ५४ मिनटांनी जन्मला.[१६३]

अबदुल्लास प्रथम निआमतुल्ला शिकवीत असे. परंतु अबदुल्ला पांच वर्षांचा झाला तेव्हा तो वारला. नंतर निआमतुल्लाचा जावई मिर्झा शरीफ याने तो आठ वर्षे होईपर्यंत शिकविले. मलिक मुबारक व मलिक युसुफ हे अबदुल्लाला सोबती दिले. मिर्झा शरीफानंतर ख्वाजा मुझाफर अली उबीर यांची अबदुल्लाचा शिक्षक म्हणून नेमणूक झाली. परंतु हाहि दोन वर्षांनी मेला. तेव्हा महमद हुसेन शिराझीस त्याचे जागी नेमले. अबदुल्ला दहा वर्षांचा असतांच हुसेन वारला. नंतर त्याचे जागी हुसेन मुआलिम नेमला. हुसेन मुआलिम बरीच वर्षे जगला व शेवटी त्याच्या ८०व्या तो वर्षी वारला.[१६४]

हि. १०३३ (१५ आक्टोबर १६२३ ते ३ आक्टोबर १६२४ इ.स.) — अबदुल्ला मिर्झा दहा वर्षांचा झाला, तेव्हा मोठ्या समारंभाने त्याचा प्रथम दरबारप्रवेश साजरा केला. पुष्कळ बक्षिसे दिली व दानधर्महि केला.[१६५]

१६१. परिशिष्ट २, पृ. ४७.

१६२. हयात बख्श बेगमच्या थडग्यावरील शिलालेखावरून हदीकत-अल-अलममध्ये (परिशिष्ट २, पृ. ६७) तीं मंगळवार चं २८ साबान १०८० हि. ही तारीख दिली आहे. परंतु याच लेखाचें मंगळवार चं. २८ साबान १०७७ हि. हे ए. इ. सो., १९०७-८ पृ. २६वर व १९१५-१६, पृ. ३५ वर वाचन दिलें आहे. वार, तारीख व महिना सर्वांनी सारखाच दिला आहे. फक्त हिजरी सनात मतभेद आहे. दोन्हीहि वर्षा २८ साबानला मंगळवार येतो. बहुधः हदीकत अलममधील वाचन चुकीचें असावे.

१६३ परिशिष्ट २, पृ ६७; ए. इं. सो. १९०७-८, पृ. २६ व १९१५-१६, पृ. २६ व ४०., ह. अ. अ. (लि.), पृ. २७४.

१६४. ह. अ. अ. (लि.), पृ. २७६-७.

१६५. ह. अ. अ. (लि.), पृ. २७७.

हि. १०३५ (२३ सप्टेंबर १६२५ ते ११ सप्टेंबर १६२६ इं. स.).— महमद कुत्बशाहा १ फेब्रुवारी १६२६ रोजी वारला. काही लोकांनी गडबड करण्यास सुरुवात केली. तेव्हा मनसुरखान हबशी, मलिक अलमास, मलिक युसुफ व मलिक अबर हे बड मोडण्याच्या खटपटीस लागले. कासिम बेग कोतवाल यानें आपल्या लोकानिशी बाजारपेठेतील चावडीत जाऊन बडग्वोरास दहशत बसविली. हसेन बेग नायब कोतवाल यास चहार-मिनार येथे ठेविले. दुसरे दिवशी च. १४ जमादिलावल १०३५ हिजरी (२ फेब्रुवारी १६२६) रोजी सकाळी महमदी महालात अबदुल्ला मिर्झास तख्तारोहण करविले. नतर बाजारपेठेत व इतरत्र तख्तारोहण झाल्याचा हत्तीवरून डका पिटविला. सर्व दरबारी लोकास त्याच्या इतमामाप्रमाणे बक्षिसे दिली. पुष्कळ दानधर्म केला. सर्व कैद्याची मुक्तता केली.[१६६]

अबदुल्लाच्या तख्तारोहणाच्या अभिनदनार्थ इब्राहीम आदिलशाहाकडून शहा अबुल हसन व बुऱ्हाण निजामशाहाकडून मीर जाफर आला. खुर्रम ऊर्फ शाहजहानाकडून इख्लासखान काज्विनी आला. अबदुल्ला कुत्बशाहास नजरनजराणे दिले व अबदुल्लानेहि प्रत्येकाच्या योग्यतेनुरूप नजरनजराणे देऊन आलेल्या वकिलास सन्मानाने निरोप दिला.[१६७]

अबदुल्ला कुत्बशाहा लिगमपल्ली येथे महमद कुली कुत्बशाहाने मोठा बाग लावून त्यात टोलेजग इमारती उभारल्या होत्या तेथे गेला. एक आठवडाभर महोत्साह करून शेजारील टेकडीवर बाधलेल्या हुसेनसागरावर जाऊन राहिला. तेथे १४ जून १६२६ रोजी व नतर एक आठवडाभर जन्मदिवसोत्साह केला. पावसाळ्यात तो तेथेच राहिला.[१६८]

महमद कुत्बशाहाने मीर महमद मोमीन वारल्यानतर काही वर्षे पेशवाई कोणासच दिली नव्हती. परतु शेवटी ती त्याने ख्वाजा मुझाफर यास दिली व तोहि मेल्यानतर मीर महमद रेझाई यास दिली होती. परतु त्या जागेस तो लायक नाही असे वाटल्यावरून आणि हुशार व चागला पेशवा नेमावा या इच्छेने महमद

१६६. निजाम-उद्दीन अहमदचा उतारा, ह. अ. अ. (लि.), पृ. २८२ व ३०१, ए. इं. मो., १९०७-८, पृ. २६ व १९१५-१६, पृ ४०.

१६७. ह. अ. अ. (लि.), पृ. २०२-३.

१६८. ह. अ. अ. (लि.), पृ. ३०५.

कुत्बशाहाच्या आईने आपला जावई व शहा अली अरब शहा पीरजादे याचा मुलगा शहा महमद यास पेशवा केले. शेख महमद ऊर्फ इब्न-इ-खातून यास नायब पेशवा नेमले व त्यास डबीरीचेहि काम सांगितले. मनसुरखान हबशी सेकावी लष्कराचा हवालदार होता त्यास महमद कुत्बशाहाने ख्वाजा अफजल तुर्कचा मीर जुम्ल्त दिली होती. परंतु मनसुरखानास नीटसा कारभार करिता येईना व त्याला चागलेसे लिहिताहि येत नव्हते. त्यामुळे तो ब्राह्मण कारकुनाच्या आहारी गेला. मलिक युसुफ, मलिक अवर यासारखे विश्वासू ख्वाजा सराई काढून टाकले. त्याने गुर्जी व हबशी लोकाची एक लढाऊ गुलामाची तुकडी ठेवली होती. त्यातील चौघास फिरुझखान, आदमखान, याकुतखान व हमीदखान अशा पदव्या देऊन त्याना सरदाऱ्या दिल्या. कासिम बेग कोतवालीच्या जागेवर, हसन बेग शिराझी नायब कोतवालीवर, कासिम बेग आर्दिस्तानी नाझिर-उल्मुल्कीवर कायम ठेवले. ख्वाजा अफजल तुर्कला मनसुरखानाच्या शिफारशीवरून सर खायली पुन्हा बहाल केली. इतिमतरावाकडे हिंदी फर्मानाची डबीरी, नारायणरावाकडे मुजुमदारी व सूर्यरावाकडे सबनिविशी पूर्ववत् चालविली. धर्मराव व अर्सारावासारख्या नायकवाडीचेहि इतमाम पूर्ववत् चालविले.[१६९]

हि. १०३६ (१२ सप्टेंबर १६२६ ते १ सप्टेंबर १६२७ इ. स.).— कुत्बशाहीत हजरत हसन व हुसेन याच्या निधनानिमित्त ताजियाचा उत्सव माहरमात होत असे. अबदुल्ला कुत्बशाहाने तोच रिवाज पुढे चालविला याकरिता दरवर्षी बारा हजार होन खर्च होत. काळे व निळे कपडे देण्यात येत. दाद महालाच्या पटागणात दोन मडप उभारून त्यात चबदा पजे ठेवीत. साल्याबादप्रमाणे या वर्षीहि च. ६ मोहरम (१७ सप्टेंबर १६२६ इ. स.) रोजी उत्सव चालू झाला. च. १० मोहरमचे (२१ सप्टेंबर १६२६ इ. स.) रात्री पजाची मिरवणूक निघाली. मिरवणुकीत अबदुल्ला कुत्बशाहा अनवाणी चालत असे.[१७०]

मोहरममधील ताजियाच्या उत्सवाप्रमाणे कुत्बशाहीत महमद पगबराच्या जन्मदिवसाचा उत्सव होत असे. तो महमद कुत्बशाहाने बद केला होता. त्यास पुन्हा सुरुवात झाली. च. १७ रबि-उल-अव्वल हा महोत्सवाच्या मुख्य दिवस असे.

---

१६९. ह. अ. अ. (लि.), पृ. ३०३-५

१७०. ह. अ. अ. (लि.), पृ. ३०८-९.

दादमहालाममोरच हा उत्सव बारा दिवस चाले. यासाठी दर वर्षी तीस हजार होन खर्च होत असत. या वर्षी हा जन्मदिवस २६ नवंबर १६२६ इ. स. रोजी होता.[१७१]

हि. १०३७ (२ सप्टेंबर १६२७ ते २० आगस्ट १६२८ इ.स.).— कासिम बेगने मनसुरखानाच्या लोकांनी अपमान केल्यावरून कोतवालीचा च. ९ मोहरम (१० सप्टेंबर) रोजी राजिनामा दिला. ही जागा लाहोरच्या मिर्झा सय्यद महमद अस्फहानी यास देण्याचा मनसुरखानाचा विचार होता. त्यास त्याने बोलाविले. परंतु त्याला येण्यास कालावधि लागेल म्हणून मनसुरखानाने मच्छलीपट्टणच्या मुल्ला महमद तकी तफ्रशी यास बोलावून आणले. परंतु त्यास तीन महिनेपर्यंत कुत्बशाहाची भेटच झाली नाही. सरतेशेवटी नायब कोतवाल हसन बेग याने त्या जागी दरम्यान चांगले काम केल्यावरून त्यासच कोतवालीवर च. १७ रबिलावल (१६ नवंबर १६२७ इ. स.) रोजी कायम केले. मीर महमद तकी तफ्रशीचा मुलगा मीर फसिह्-उद्दीन यास मच्छलीपट्टणास हवालदारी दिली व मीर मुल्ला महमद तकी यास मनसुरखानाने आपल्या नायब मीर जुल्मतीचे काम सांगितले.[१७२]

हि. १०३८ (२१ आगस्ट १६२८ ते १० आगस्ट १६२९ इ. स.).— शहाजहानाकडून शेख मुहिउद्दिन फिरजादा वेलची आला. तेव्हा सय्यद अबदुल्ला माजिद्रानी यास पुढे सामोरा पाठवून त्याचा सत्कार करविला. नतर मीर कासिम नाझिर-उल-मुमालिक याने त्याचा सत्कार केला. शेख मुहिउद्दिन जेव्हा हौज-इ-दुर्गला आला तेव्हा कुत्बशाहा स्वतःच सामोरा गेला. त्या वेळी वेलचीने काही घोडे, दोन हत्ती वगैरे कुत्बशाहास नजर केले. माजी मिर्झा महमद अमीन मीर जुम्ला याचे बागेत त्यानी राहण्याची सोय केली. त्याचेबरोबर शंभर सव्वाशे माणसांचा लवाजमा होता. प्रथम दरबारात आला तेव्हा कुत्बशाहाने त्यास दोन घोडे व एक हत्ती बक्षिस दिले. शिवाय पाच हजार होन व चार हजार मण धान्यसामग्री त्याच्या खर्चास दिली. त्याचा दर महिन्याचा तीन हजार होनाचा खर्च कुत्बशाहास द्यावा लागे त्याचेकडे एक लाख पन्नास हजार होनाचा ऐवज व पन्नास घोडे व दहा हत्ती गेले. तरी तो सारखा मागणी करू लागला. शहा महमदाने त्याचा कारभार नीट मिटवावयाचा, पण ते त्याला जमले नाही. शहाजहानाकडून शेख मुहिउद्दिनास

१७१. हा. अ. अ. (लि.), पृ. ३०७.
१७२. ह. अ. अ. (लि.), पु. ३११.

परत बोलावण्यास अहदी आले. परंतु तो त्यानाहि दाद देईना. शेख महमदाचा व बायकी कारभाराचा तो फायदा घेत हैद्राबादेसच राहिला.[१७३]

च. १ मोहरमला (२१ आगस्ट १६२८ इ. स.) मनसुरखान हबशी वारला. तेव्हा त्याच्या सरखेलीच्या जागेसाठी पुष्कळ लोकानी प्रयत्न केले. कुत्बशाहास बरेच नजरनजराणेहि दिले. परंतु मुल्ला महमद तकी तफ्रशी हा सरखेलाजवळ दिवाणीचें काम पहात होता. मनसुरखानानेहि त्याची शिफारस करून ठेवली होती. म्हणून त्यास च. २३ सफर (१३ सप्टेंबर १६२८ इ. स.) रोज सरखेली दिली. यानेहि त्या जागेसाठी कुत्बशाहास बरीच पेशकश पाठविली होती. मुल्ला महमद तकीने लवकरच कुत्बशाहाचा बराच विश्वास संपादला. ब्राह्मण कारकुनाचा पगडा कमी केला. हिशेबातील अफरातफरीसहि आळा घातला. एक लाख तीस हजार होन अफरातफर केल्याचा नागयणराव मक्तदारावर आरोप ठेवून व त्यास कैद करून त्याचेकडून पैसे वसूल केले. त्याची मालमत्ता जप्त केली. नंतर चांदीचे वड मोडले. त्याच्या या कामागिरीबद्दल कुत्बशाहाने त्यास 'शरिफ उल्मुल्क' हा किताब व रत्नजडित कलमदान बहाल केले. मोगली सत्य दक्षिणेत येणार असे समजल्यावरून त्यास पाच हजारी दिली. तेव्हा त्याने दखनणी, अरब, अफगाण व इतर परदेशीय लोकाची फौज तयार केली. कुत्बशाहाने दादमहालाचे मैदानात तिची पाहाणी केली तेव्हा त्याची बरीच वाहवा झाली.

याच वेळी मनसुरखानाकडे असलेला ऐन उल्मुल्काचा कारभार आदमखान हबशीकडे दिला व रेकाबी लष्कराची हवालदारी मनसुरखानाचा या मुलास दिली.[१७४]

शहा महमदास पेशवाई दिली होती. परंतु त्याचेकडून म्हणावा तसा कारभार होईना. शहाजहानाचा वेलची मुहिउद्दिन याचेहि प्रकरण मिटेना. शहा महमदाच्या नालायकीमुळे तो अधिकाधिक चढून जाऊ लागला. शिवाय शहा महमद फितुरी करीत असल्याहि संशय आला. त्याने आदिलशाहास गुप्त खलिता पाठविला होता. तो ख्वाजा महमद तुर्कने वाटेत पकडून कुत्बशाहास दाखविला. नंतर लेखरूप हवालदार शहा काझी याचेकडून लिहविलेला दुसरा खलिताहि त्याचे बलमदानांत लपवून ठेवलेला मिळाला. तेव्हा शहा महमदाकडून पेशवाई काढली व ती च. ९ रमजान १०३८ हि. (२३ एप्रिल १६२९ इ. स.) गोरी शेख महमद खातून यास दिली.

---

१७३ ह अ. अ. (लि.), पृ ३१३-४.

१७४. ह. अ. अ. (लि.), पृ. ३१४-५.

पेशवाईकर येताच खातूननें आसदखान व इतर मोगल अमीर उमरावास पत्रे लिहिलीं. शहाजहानाकडून कुत्बशाहास तकलीफ न पोहोंचविण्याविषयी शेख मुहिउद्दिनास ताकीद आणविली. या त्याच्या कामगिरीबद्दल त्यास बारा इमामच्या दरवाज्यापासून थेट नदीमहालापर्यंत पालखींत येण्याचा बहुमान दिला. हा कर्वी व ज्ञाते लोकांचा चहाता असल्यानें अशा लोकास मोठमोठे हुद्दे मिळूं लागले.[१७५]

मुल्ला ओव्हेस खुपनवीस यास डबीरी मिळाली. लाहोराहून आलेला मीर सय्यद महमद अस्फहानी यास पाच हजार होनांचा वार्षिक तनखा देऊन त्यास व त्याच्या दोन मुलांस दरबारी सरदार केले. खर्चास एक गांव इनाम दिला.[१७६]

खैरातखान व महमद कुली बेग हे मुरतेबरून व बाटेंत शहाजहानाचेंहि पत्र घेऊन इराणात गेले होते. त्यास आग्रासी बदरात शहा आग्रास मेल्यानंतर चं. २२ जमादिलावल १०३७ हि. रोजी शहा सफी बहादुरखान शाहा झाल्याची बातमी लागली. ती त्यांनी कुत्बशाहास कळविली. ही खबर हैद्राबादेस हि. १०३८ सावानच्या अखेरीस (१३ एप्रिल १६२९ इ. स.) रोजी कुत्बशाहास पोहोचली.[१७७]

महमदनगर किल्ल्याच्या तट दुरुस्तीचे काम मलिक युसुफ व मलिक नूर महमद यांजकडे दिले होते. ते सावानच्या अखेरीस (१०–३ एप्रिल १६२९ इ. स.) पूर्ण झाले.[१७८]

हि. १०३९ (११ आगस्ट १६२९ ते ३० जुलै १६३० इ. स.).- नासिर उल्मुल्क यास मलिक अबरची खास-इ-खेलो दिली व त्याच्या मुलास त्याची सरनोबती मांगितली. मलिक अबरास पुन्हा त्याचे जागेवर नेमलें. मलिक अबरची एक हजार होनांची जहागीर जप्त केली होती. तीहि त्यास परत दिली. नासिर उल्मुल्कने परदेशीय, अफगाण, रजपूत वगैरेची एक नवीन फौज उभारली होती. या फौजेस तो रोज आठ मैल कूच करण्यास लावी.[१७९]

---

१७५. ह. अ. अ. (लि.), पृ. ३१६.
१७६. ह. अ. अ. (लि.), पृ. ३१६.
१७७. ह अ. अ (लि.), पृ. ३१७-१८.
१७८. तटावरील शिलालेख, ए. इं. मॉ., १९१३-१४, पृ. ५०.
१७९. ह. अ. अ. (लि.), पृ. ३१९.

मुर्तुझानगराच्या बाजूस नेहमी वडे होत. म्हणून ती मोडण्याकरिता मीर अबुल मआलीम उर्फ दिआनतखान यास मुस्तफानगर, मच्छलीपट्टण व समुद्रकिनाऱ्या-वरील इतर बंदराचा सुभेदार करून मुर्तुझानगरास पाठविला होता. त्याने बरा बंदोबस्त राखला होता. परंतु त्याचा तेथील लोकांनी खून केला व कुत्बशाहास अर्ज केला की, आम्ही अत्यंत राजनिष्ठ आहोत. दिआनतखान फार जुलूम करी म्हणून तो मारला गेला. परंतु कुत्बशाहाने दिआनतखानाच्या जागी ख्वाजा महमद तुकाची नेमणूक केली. त्याने तेथे जाऊन प्रथम चारशे पुट लोकांना ठार केले. त्याने तेथील कारभार सुरळीत केला व नंतर १६३० इ. स.च्या दुष्काळात पुष्कळ महिने चालून तेथे चांगली व्यवस्था राखली.[१८०]

या वर्षाच्या मुक्कामात एक नवीन चार मजली महाल बांधला. त्यात सुंदर तजवीरहि काढविल्या.[१८१]

हि. १०४० (३१ जुले १६३० ते २० जुले १६३१ इ. स.).— अबदुल्ला कुत्बशाहा गोवळकोंडा येथील बाग पाहण्यास गेला. तो तेथे एक महिना राहिला. बाग पाहून झाल्यानंतर त्याने किल्ल्यातील त्याच्या पूर्वजांच्या कबरींस भेट दिली. तेथील मतावली लोकांस बक्षिसे वाटली.[१८२]

कुत्बशाहा गोवळकोंड्यास असता शरिफ हा मुल्कने त्यास विनंति केली की, कर्नाट येथील पेंडा रेड्डीचा मुलगा अलममय्या चांधरी हा धनवान असून त्याने दोन तीनशे स्वार ठेवले आहेत. त्याच्या साहाय्याने तो सरहद्दीवरील लढालुटीस आदिलशाहास मदत करितो. खंडणी देत नाही व दरबारासहि येत नाही. तेव्हा त्याच्या पारिपत्यार्थ बोलची वेग यास पाठवावे. कुत्बशाहाने त्याप्रमाणे हुकूम दिला. तेव्हा बोलच्या वेगने झपाट्याने एक दिवस व दोन रात्रीत कल्याणपर्यंतचा प्रवास आटोपून अलममय्याच्या वाड्यात गेला. दरबानास मारून भेट त्याच्या आपल्याच खोलीत शिरला व त्याला बेसावधपणे पकडले. त्याचा शिरच्छेद केला. त्याचे शीर गोवळ-कोंड्यास आणून कुत्बशाहापुढे ठेवले. तेव्हा कुत्बशाहाने एक घोडा व चांधरीची लुटून आणलेली मालमत्ता त्यास बक्षिस दिली.[१८३]

१८०. ह अ अ (लि), पृ ३१९-२०
१८१ ह. अ अ (लि.), पृ. ३२०
१८२ ह. अ अ (लि.), पृ. ३२१.

शहाजहान परत दक्षिणेंत आल्यानंतर[183] शेख मुहिउद्दिनास ताकीद करून परत नेले. त्याच्यावरोबर युसुफशहा ऊर्फ वफाखान यास बरोबर नजरनजराणे देऊन पाठविले. हा वयोवृद्ध व अनुभवशीर असल्याने त्यान मुहिउद्दिनाच्या गोवळकोंडा येथील वागणुकीवद्दल तक्रार केली. तेव्हा शहाजहानानें मुहिउद्दिनाची सर्व मालमत्ता जप्त केली आणि त्यास व त्याच्या सर्व नातलगास कामावरून दूर केलें. ही वातमी वफाखानाने कुत्वशाहास कळविली. ती हैद्राबादेस च. ७ रज्जव १०४० हि. (३० जानेवारी १६३१ इ. स.) रोजी पोहोंचली.[184]

शहाजहानाने तेलगणावर स्वारी करण्याकरिता नासिरीखानास पाठविले. कुत्वशाहास ही वातमी लागताच त्यानेहि अदमखान हवशी, अल्ला कुली बेग व इतर सरदार सरहद्दीवरील कोलसला पाठविले.[185] नासिरीखानानें प्रथम कंदाहारला वेढा देण्याचे ठरवून तो कंदाहारला आला व किल्ल्यापासून एका कोसावर च. २३ जमादिलावल (१८ डिसेंबर १६३० इ. स.) रोजी तळ दिला. कंदाहारचा किल्लेदार या वेळी याकुत खुदावदखानाचा मुलगा सादिक हा होता. नासिरीखानानें दुसऱ्या दिवशी कंदाहार शहरावर हल्ला करण्याचे ठरविले. परंतु कुत्वशाही सर्फराजखान त्यास तोड देण्यासाठी तोफा वगैरे डागून किल्ल्याचे पायथ्याशी वसला होता. लढाई झाली. सर्फराजखान निजामशाही मुलुखात पळून गेला. तेव्हा नासिरीखानानें कंदाहारास वेढा दिला. नंतर कुत्वशाही सैन्याने आदिलशाही व निजामशाही रणदुल्लाखान, मुकरबखान व इतर सरदारासह येऊन पुन्हा हल्ला चढविला. परंतु त्यांतहि कुत्वशाही सैन्याला तीन कोस मागे हटावे लागले. इतक्या अवधीत नासिरीखानानें एकवीस सुरुग खणविले. त्यातील तिहीत दारू वगैरे भरून झाली. याच वेळी नासिरीखानास अझमखान कुमक घेऊन आला. तेव्हा सुरुग उडवून हल्ला द्यावयाचा बेत ठरला. एक सुरुग फुकट गेला. परंतु बाकीच्या दोन सुरुंगानी शेरहाजी नावाचा बुरुज अर्धा अधिक उडविला. सबध दिवसभर लढाई चालूच होती. रात्री आणखी सुरुग भरले, तेव्हा किल्ल्यातील लोक शरण गेले. चार महिने व

---

१८३. इ. स. १६३०चे सुरुवातीस शहाजहान बऱ्हाणपुरास आला सुरत-लंडन-पत्र, १३ एप्रिल १६३० चे, इं. फॅ इन इ., भा. ४, पृ. २२ व ३३.

१८४. ह. अ. अ. (लि.), पृ. ३२२.

१८५. ह. अ. अ. (लि.), पृ. ३२३.

एकोणीस दिवसांच्या वेढ्यानंतर कदाहारचा किल्ला च. १५ सव्वाल (७ मे १६३१ इ. स.) रोजी मोगली सैन्यानें ताब्यांत घेतला.[१८६]

इ. स. १६२०च्या जूनच्या पूर्वी शहाजहानाने बाकरखानास ओरिसांतून मनसुरगडावर जाण्याचा हुकुम दिला. त्याप्रमाणे त्यानें छत्रद्वारापासून दोन कोसावर एका काळापहाड खिंडीच्या टोकावर असलेल्या मनसुरगडाच्या आसपासचा मुलुख उध्वस्त केला. परंतु पावसाळ्यामुळे तो परतला. पावसाळा संपतांच तो पुन्हां चालून येईल म्हणून कासिमकोटचा सिपैसालार मीर जमील मुस्तफाखानाचा मुलगा सय्यद महमद याने कुत्बशाहकडे लिहिले की, बाकरखान जर्गी फौज बरोबर घेऊन येण्याच्या तयारीत आहे तरी मदत पाठवावी. कुत्बशाहने सय्यद अबदुल्लाखानाबरोबर मुधान कुलीचा मुलगा शहा अली व एक बडा अमीर याकुतखान हबशी यास बरोबर देऊन पाठविले. नायकवाडी व खास-इ-खेलने हवालदारहि रवाना झाले. ही सेना काळापहाडास जाऊन पोहोंचले. बाकरखान त्यांना वाटेने येणार म्हणून तेथेच तळ दिला. मोगलांशी तोंड देण्यासाठी सय्यद मुस्तफाखान, सय्यद अबदुल्लाखान, शेरखान अहमदनगरी, धर्माराव, अर्जीराव, राय कृष्णदेव व इतर मनेवार व नायकवाडीचे सज्ज होऊन राहिले. परंतु इतक्यात सय्यद मुस्तफाखान वारला. तेव्हा कुत्बशाहने सय्यद अबदुल्लाखानास सरलष्करी दिली व एक तलवार बक्षिस दिली. नवे बोडेय दिवसाना मैदानात उतरण्याचे ठरले. मनसुरगडावर चांगला बंदोबस्त राखला होता. बाकरखान च. ८ जमादिलावल (३ डिसेंबर १६३० इ. स.) रोजी मनसुरगडाजवळ आला. त्या वेळी किल्ल्यावर कुत्बशाही सैन्य लढण्यास सज्ज होऊन राहिले होते. बाकरखानाने किल्ला वेढिला. त्यामुळे कुत्बशाही सैन्यास माघारी हटावे लागले परंतु मागे नदी व खिंडीत राहिल्यानें कुत्बशाही सैन्याचा पराभव झाला. शहा अली मारला गेला. बाकरखानाने किल्ल्यास वेढा दिला व तोफांच्या माऱ्यात निकराचा हल्ला चढविला. कुत्बशाही किल्लेदारानें किल्ला बाकरखानास दिला. मोगली फौजेने एकदम ताबा घेतला.[१८७] सय्यद अबदुल्लाखानानें कुत्बशाहकडे मदत मागितली. कुत्बशाहने सेनेचा अफजल तुर्कला मुर्तुझानगरहून बोलावून घेतले. (७ रजब १०४० हि. / ३० जानेवारी १६३१ इ.स.)

१८६. बादशाह-नामा, डॉक्युमेंट्स ऑफ [illegible], पृ. २१०-१

१८७. बादशाह-नामा, डॉक्युमेंट्स ऑफ [illegible], पृ. १०-८, इ. अ. अ. (इं.), पृ. ३२३-८

रोजी सय्यद अबदुल्लाच्या मदतीस पाठविले. बरोबर मुजा उल्मुल्क, शेर महमदखान व इतर दख्खणी सरदार दिले. राजा तबोजीरावाबरोबर सरहद्दीवरील जमीनदारांस सलकडी पाठविली व त्यांना सरहद्दीवरील संरक्षणार्थ मदत करण्याबद्दल लिहिलें. मिया हुसेनीस राजमहेंद्रीचा बुरुज व तट नीट करण्यास पाठविलें. त्याचप्रमाणें किल्ल्याची सरबराई करून ठेवण्याचाहि त्याला हुकूम झाला. बाकरखान राजमहेंद्रीवर चालून जाऊन वेढा घालण्यापूर्वीच ख्वाजा अफजल तुर्क तेथें जाऊन पोहोंचला. या वेळी शहाजहानानें दक्षिणची मोहीम तहकूब करण्याचें ठरविलें व बाकरखानास परत बंगाल्यांत जाण्याचा हुकूम केला. शहाजहानानें एक अहदी हैद्राबादेस पाठविला. त्यालाहि कुत्बशाही मुलुखांतून बाकरखानाकडे जाण्याची पेशव्यानें परवानगी दिली. त्याच्या मागोमाग सादिक बेग तुर्कास ठेवलें. लवकरच बाकरखान मनसुरगडाहून बंगाल्यांत परत गेल्याची बातमी सय्यद अबदुल्लानें कुत्बशाहास कळविली.[१८८]

गेल्या दोनतीन वर्षांत जसा पाऊस पडावा तसा पडला नाही. त्यामुळे तांदुळाचा भाव दर होनास बारा मण होता तो सात मण झाला. इ. स. १६३०च्या पावसाळ्याचे सुरुवातीस (जून) हा भाव साडेतीन मणांवर आला. अर्धा पावसाळा गेला तरी पाऊसाचा एक थेंबहि पडला नाही. या आवर्षणाने पाण्याचा अगदीच तुटवडा पडला. शंभर गज खणलें तरी पाणी लागेना. तेव्हा कुत्बशाहानें जाहीर फर्मान काढलें की, सर्व लोकांनी तीन दिवस उपवास पाळावा व मुसलमानानी उपवासाचे शेवटी शुक्रवारी धुळीनेंच हात धुवून निमाज पढावी व सर्व हिंदूनी नदीवर जाऊन त्यांच्या रिवाजाप्रमाणें सामुदायिक प्रार्थना करावी. हुकुमाप्रमाणें पेशवा वगैरे सरदार, धर्मनिष्ठ व इतर मुसलमान नदीमहालाच्या मैदानांत जमले. काझी हसन ऊर्फ काझी मक्का यांस पेशनमाज केले. त्यांनी नमाज पढली. हिंदूंनीहि मुसा नदीवर जाऊन प्रार्थनेस प्रारंभ केला. तेथे हत्ती व उंट यांचेवर लादून नेलेले रुपये व अश्रफी पेशव्यानें गरीबांना व मुलांना वांटल्या. सायंकाळी लोक परत आले. थोडासा पाऊस पडला. परंतु त्यानंतर कांही पडला नाही. पांगळचा सागर, हुसेन सागर, इब्राहीम पट्टणचा तलाव, हैद्रावादेंतील तलाव, खोल विहिरी वगैरेस कांटेंच पाण्याचा थेंब राहिला नव्हता. बागेंतील झाडें वाळून गेली. घरांत मेलेल्यांस व

१८८. ह. अ. अ. (लि.), ३२५-६; सुरत-बंटम-पत्र, ८ सप्टेंबर १६३१, इं. फॅ. इन इं., १६३०-३३, पृ. १६५.

त्याचप्रमाणें बाजारांत व इतरत्र मेलेल्यांस मूठमाती देण्यास कोणी मिळेना. अशी भयंकर स्थिति प्राप्त झाली. कुत्बशाहानें फर्मान काढून जेथें जेथें धान्य सामग्री सांठविली होती तेथून ती शहरांत आणविली. ती विकण्यास व सांठविण्यास आज्ञा केली. तेव्हां शहरांत खावयास मिळूं लागलें. इतरत्र सोन्याच्या भावानें धान्य मिळूं लागलें. तेव्हां कुत्बशाहानें सर्वत्र आणखी लगरखाने काढले. येईल त्यास त्याच्या पोटापुरतें फुकट अन्न पुरविण्याचा हुकूम दिला. लोकांच्यांत चालण्याची शक्ति राहिली नाहीं म्हणून अन्न जवळपास मिळावें याकरितां लंगरखान्यांची संख्या वाढविली. आळीआळीतून लंगरखाने काढले. भुकेनें बेजार होऊन रस्त्यांत पडलेल्या लोकांसाठी मोठमोठी (आघ) कांजीचीं तपेली गाड्यांवर घालून रस्यारस्यानें हिंडवावीत व चमच्यानें प्रत्येकाच्या तोंडांत कांजी घालीत जावें असे हुकूम दिले. सरदार, सरकारी नोकर व इतर मोठमोठ्या लोकांस या कामांत शक्य ती मदत करण्याचा हुकूम दिला. मोठमोठे सरदार व श्रीमंत शक्य तें अन्नदानहि देऊं लागले. पाणी लागेपर्यंत ठिकठिकाणी विहिरी खणण्याचें काम सपाट्यानें चालू केलें. अशा तऱ्हेनें शक्य ते प्रयत्न केले. खास हैद्राबादेंतच एक लाखांवर माणसांस कफनी पुरविल्या. याशिवाय असंख्य लोक इतरत्र मेले असतील ते वेगळेच. याप्रमाणें या वर्षी आवर्षणाने कहर उडविला.[१८९]

मंगळवार च. ६ रमझान हि. १०४० (३० एप्रिल १६३१ इ. स.) रोजी सायकाळी अबदुल्ला कुत्बशाहास मुलगी झाली. शरिफ-उल्मुल्कनें शंभर गाड्या साखर वांटली व अबदुल्लानें अतर्गृहांत दरबार भरवून पडदानशीन स्त्रीवर्गास बरीच बक्षिसें दिली.[१९०]

---

१८९. ह. अ. अ. (लि.), पृ. ३२६-२७. या दुष्काळाची हृदयद्रावक वर्णने जॉन व्हायनानें आपल्या ७ आक्टोबर १६३०च्या बातमीपत्रात व सुरतेच्या इंग्रज व्यापाऱ्यांनीं आपल्या १७ नवंबर १६३० व ३१ डिसेंबर १६३० व इतर पत्रातून दिली आहेत. (इं. फॅ. इन इं., पृ. ४५, ९७, १२२, इ.). बऱ्हाणपूर व गुजराथ येथेंहि मोठाच दुष्काळ पडला. ' माणसाने माणसास खाण्याची वेळ ' आली होती. गुजराथेंत व उत्तर हिंदुस्थानांतील काहीं भागात दुसऱ्या वर्षी अति वृष्टीनें दुष्काळ पडला. शके १५५३ आषाढ वद्याच्या पूर्वी " पुण्यांत दुष्काळ कहोर पडला. " रा. खं. १७, ले. २९., रा. खं. १५, ले. ४१४, भा. इ. स. मं., वा. इ., १८३८ चें, पृ. ५१, जेधे शकावली, इ. इ..

१९०. परिशिष्ट २, पृ. ३५.

चं. १९ सव्वाल हि. १०४० (११ मे १६३१ इ. स.) रोजीं सकाळीं मुल्ला महमद तकी तफशी शरीफ उल्मुल्क पोलो खेळत असतां घोड्यावरून पडल्यामुळें आजारी होऊन वारला. या वेळीं त्याचें वय ३९ वर्षांचें होतें. तो मेल्यानंतर त्याच्या बायकांमुलांस बराच ऐवज वगैरे देऊन इराकला पाठविलें. नंतर दिवाणीकडील कारभार मीर नाझीर उल्मुल्क, मीर महमद मश्रिफ, नारायणराव मज्मुदार व इतर कामगारांकडून नवाब-इ-अलामी घेऊं लागला. परंतु त्यामुळें अव्यवस्था माजली.[१९१]

हि. १०४१ (२१ जुलै १६३१ ते ८ जुलै १६३२ इ. स.).— कुत्बशाहानें आदिलशाहास वार्षिक खंडणी दिली नव्हती.[१९२] ती वसूल करण्याकरितां शहा अबुल हसन आदिलशाहाकडून हैद्राबादेस आला. याच सुमारास (जून १६३१ इ. स.) मोगली सेना परत गेल्यानें मुरारि पंडितास स्वास्थ्य मिळालें. त्यानें सरहद्दीवर येऊन शहा मदमद पीरजादा पेशवा होता त्या वेळीं (१६२९ इ. स.) कुत्बशाहाच्या सरहद्दीवरील लोकांनीं आदिलशाही मुलखांत लुटालुट केली होती व त्याबद्दल शहा महमदनें तो प्रांत परत वसविण्यास लागणारा खर्च देण्याचें कबूल केलें होतें. मुरारि पंडितानें हा खर्च ताबडतोब देण्याची निकड लावली. वसूल मिळेना. तेव्हां त्यानें कौल्लला वेढा दिला. एक महिनापर्यंत वेढा चालू ठेवला. किल्ल्यावर हल्लेहि चढविले. परंतु वेढा घालून बसण्यापेक्षां आपल्या वीस हजार मराठा फौजेनिशीं कुत्बशाही प्रांतांत लुटालुट करीत राहावें असें ठरवून त्याप्रमाणें वेढा उठविला व मुलुखांत जाळपोळ करूं लागला. तेव्हां कुत्बशाहानें बोलची बेग, खुदावर्दी मुलतान, काझिल बशखान, इतर मुसलमान सरदार, खास-खेलचे हवालदार अझदहाखान व इस्ति-कलालखान, दशसहस्री सरदार जगदेवराव, भालेराव व असीराव, आणि इतर मनेवारांस मुरारि पंडितावर चालून जाण्याचा आज्ञा केली. इतक्यांत आदिलशाही व निजामशाही सैन्यें एकमेकांस मदत करीत आहेत असें समजतांच या जोड सैन्यास तोंड देण्यासाठीं ख्वाजा अफझल तुर्क, शेर महमदखान व इतर खास-इ-खैलच्या हवालदारांस लढाईवर जाण्यास तयारी करण्याची आज्ञा झाली. सुजा उल्मुल्कास कासिमकोट्यास राहण्याचा हुकूम झाला. अली बेगखान अफसर तुर्क, मैराम बेग, मुहमद सय्यद बेग बदक्षी, सय्यद बाबू, मल्दून मुल्क दख्खणी व इतर

१९१. ह. अ. अ. (कि.), पृ. ३२८.

१९२. महमदनामा, शिवाजी निबंधावली २, पृ. ८१.

दख्खणी लोकांस जहागिरी देऊन फौज उभारण्यास सांगितले. दादमहालासमोर या फौजेची कुत्बशाहाने पाहाणी केली व त्यांच्या इतमामांप्रमाणे बक्षिसें दिली. मुरारि पंडिताच्या सैन्यांत फितुर करण्याचा प्रयत्न केला. तेव्हां बाबाजी काटे आदिलशाहीतून फुटून आपल्या दोन तीन हजार घोडदळासह कुत्बशाहास येऊन मिळाला. शत्रूकडील सैनिकाना सतावून त्यांचीं नाकें व कान कापून आणण्यास मनेवार सैन्याला हुकूम झाला. प्रत्येक नाकास व कानास एकेक होन देऊ केला. कुत्बशाही सैन्य चालून जात आहे इतक्यात मुरारि पंडिताचा भाचा हैद्राबादेस आला. त्याने शहाजहान दक्षिणी पातशाहाचा निर्दयपणें नाश करीत आहे, अशा प्रसंगी सर्व दक्षिणी शाहानी एक होऊन त्यास तोड देणें इष्ट आहे, शहाजहानाशी तोड देण्यासाठी पैसा पाहिजे व सैन्याची मदतहि पाहिजे, ती देण्याचे नाकारले म्हणून नाइलाजास्तव आदिलशाही सख्यास कुत्बशाही मदतीवर चाल करावी लागली. तर्ी अशा प्रसंगी मंत्री राखणे योग्य आहे, वगैरे बोलणे झाल्यावर च. १५ सफर १०४१ हि. (२ सप्टेंबर १६३१ इ. स.) रोजी तह झाला. त्याअन्वय कुत्बशाहान आपले सैन्य मुरारीच्या मदतीस रवाना केले.[१९३] बाकी राहिलेल्या खंडणीनिमित्त कुत्बशाहाने दीड लाख होन आदिलशाहास दिले.[१९४]

गेली दोनतीन वर्षें आवर्षणामुळे दुष्काळ पडला होता. या वर्षी सर्वत्र अतिवृष्टि झाली. बुधवार च. २७ सफर (१४ सप्टेंबर १६३१ इ. स.) रोजी सकाळी मुसा नदीस भयंकर पूर आला. दोनतीन प्रहर पाण्यास जोर होता. हैद्राबादेंतील बाग व घरें यांचा फार नाश झाला.[१९५]

च. २४ जिल्हेज हि. १०४० (१५ जुलै १६३१ इ. स.) रोजी मुल्ला तर्कीच्या मृत्यूमुळे दिवाणी कारभाराची रिकामी पडलेली जागा मिर्झा हमजा अस्त्राबादी यास देऊन त्याच्याकडे या सर खलीसाठी साठ हजार होनांचा महाल सोपविला. परंतु त्याला हे हिशेबी काम जमेना. तो कारकुनांचे आहारीं

---

१९३. परिशिष्ट २, पृ. ३०-३

१९४. महमदनामा, शिवाजी निबंधावली २, पृ. ८१.

१९५. परिशिष्ट २, पृ. ३६, गुजराथ, मच्छलीपट्टण वगैरे ठिकाणच्या अतिवृष्टीमुळे ओढवलेल्या आपत्तींचें वर्णन त्या वेळच्या इंग्लिश फॅक्टरीजच्या रेकॉर्डसमध्यें वरीच आलें आहेत.

चालूं लागला. म्हणून कुत्बशाहा स्वतःच ते काम पाहूं लागला. शेवंटी च. ३ रबिउलआखर (१९ आक्टोबर १६३१ इ. स.) रोजी मिर्झा हमजास दिवाणीच्या कामावरून दूर करून तें काम मिर्झा रझ बिहान अस्फहानीस दिलें.[१९६]

इ. स. १६३१च्या सप्टेंबरांत आदिलशाहाशी तह झाल्यानंतर विठोजी काटे नांवाचा शूर सरदार हैद्राबादेजवळ आला. तेव्हां त्यास कुत्बशाहानें एक घोडा व वस्त्रें वगैरे बक्षीस पाठविली. परतु तो लवकरच आजारी होऊन वारला. कुत्बशाहानें सावोजी हरकारा निजामशाही यास त्याच्या व त्याच्या भावांच्या मुलांचा कारभार पाहण्यास नेमलें. मुलाच्या समाधानार्थ नारायणरावास पाठविलें. बक्षिसेंहि दिली. नारायणराव परत आल्यानंतर त्याने कुत्बशाहाजवळ विठोजीच्या सैन्याची स्तुति केली. तेव्हां कुत्बशाहानें ख्वास-इ-खैलचा हवालदार नासीर-उल्मुल्क यास दोन हजार घोडदळ घेऊन जाऊन विठोजीच्या सैन्यास दादमहालापुढें सन्मानानें घेऊन येण्यास सांगितले. त्याप्रमाणे विठोजीचे सहा हजार घोडदळ व पायदळ दादमहालासमोर आले व कुत्बशाहास मुजरा दिला. तेव्हा विठोजीच्या व त्याच्या भावाच्या मुलांस व त्यांच्या तीस इतर नातलगांस मराठा सैन्याच्या सरदाऱ्या दिल्या. विठोजीच्या मुलास मोल्यवान वस्त्रे व रत्नखचित खंजीर पट्ट्यासह, रत्नांचा कंठा, २७ घोडे व पांच हत्ती दिले. इतर सरदारासहि त्यांच्या योग्यते नुरूप वस्त्रे वगैरे दिली. विठोजीच्या मुलास तीन लक्षांची जहागिरी दिली.[१९७]

कुत्बशाही दरबारांतील निजामशाही जुने वकील मीर जाफर व सावाजी हरकारा याचे ऐवजी फत्तेखानाने शहा अबुल हसनची नेमणूक केली. शहा अबुल हसन हैद्रावादेस आला. तेव्हा त्याचीहि कुत्बशाहाने त्याच्या योग्यतेप्रमाणे व्यवस्था लाविली. सावाजी हरकारा कुत्बशाही सरदार झाला व त्यास वार्षिक नेमणूक ठरून दिली. नंतर कांहीं दिवसांनी मीर जाफरहि कुत्बशाही नोकरीत शिरला.[१९८]

मुरारपंडितानें घातलेल्या कौलसच्या वेढ्याचे प्रसगी अदमखान हबशी यानें बरीच दिलाई दाखविली म्हणून त्याला काढून ऐन उल्मुल्कीची जागा नासीर उल्मुल्कास दिली. नासिरखानाची ख्वास-इ-खैलच्या हवालदारीची जागा मुर्शिद कुली बेगचा मुलगा कासीम बेग तुर्क यास दिली. मुरारीच्या लढाईच्या वेळी राजमहेंद्रीहून ख्वाजा

१९६. इ. अ. अ. (लि), पृ. ३२९.
१९७. परिशिष्ट २, पृ. ३४–५.
१९८. परिशिष्ट २, पृ. ३७–८.

अफजल तुर्कास बोलाविलें होतें. तो हैद्राबादेस येतांच आजारी झाला व चं. १८ जमादिलाखर १०४१ हि. (१ जानेवारी १६३२ इ. स.) रोजी वारला. तेव्हां त्याची जागा काझील बशखानास दिली व त्याची एक हजार घोडदळाची सरदारी बौलची बेग यास देऊन मुर्तुझानगराचा सुभा मीर फसिहउद्दीन मुहमदाकडे सोंपविला.[१९९]

याच सुमारास मोगली असफखानानें विजापुरास वेढा घातला. तेव्हां मोगलांचा तीन हजारी उमराव नासीरखान नादेडाजवळ येऊन राहिला. सरहद्दीच्या सरक्षणाची आवश्यकता जाणून कुत्बशाहानें सरहद्दीवर नासीर उल्मुल्कास मुख्य सेनापती करून व त्याचे मदतीस बोलची बेग, खुदावर्दी काझिल बशखान, विठोजी काट्याचा मुलगा, अलमखान, शेर महमदखान, मुझाफरखान, धर्माराव व इतर हजारी नायकवाडी, जगदेवराव, भालेराव वगैरे सरदार रवाना केले. ते सरहद्दीवरील किल्ल्यांत जाऊन वदोबस्तानें राहिले. चार लाख होनाचा जहागिरदार मलिक अबर यास गोंवळकोंडा किल्ल्याची डागडुजी व सरवराई करण्यास आज्ञा झाली. त्यानें कामास सुरुवात केली. सरकारी शस्त्रागारांतून लोग्वडी चिलग्वतें, जिरेटोप व पितळी पत्रे वांटले.[२००]

आगस्ट १६३१ इ. स.च्या सुमारास कुत्बशाहाचा वयोवृद्ध वकील वफाखान शहाजहानास भेटून मोगली वकील व एक हजारी उमराव शहा अलीबेग यास बरोबर घेऊन गोंवळकोंड्यास येण्यास निघाला. निजामशाहीतून रामगीरास आला. तेथे तो मेला. शहा अली बेग वफाखानाच्या मुलांसह हुसेनसागरास आला. मीर फसिहउद्दिनाने प्रथम त्याचे स्वागत केलें. चं. १० जमादिलावल (२४ नवबर १६३१ इ. स.) रोजी कुत्बशाहा हुसेनसागरास गेला. तेथे भेटी झाल्या. एकमेकांनीं एकमेकांस नजरनजराणे दिले. चं. १२ जमादिलावल (२६ नवबर १६३१ इ. स.) रोजी शहा अली बेगास राजधानीस बोलाविलें. चं. १७ (१ डिसेंबर १६३१ इ. स.) रोजी दरबार भरला. मीर फसिहउद्दिन व करीमखान सरनौबत यांस पाठवून शहाजहानाच्या त्या वकिलास मोठ्या सन्मानानें आणविलें व त्यास व त्याचे मुलांस त्यांच्या योग्यतेनुरूप बक्षिसें दिली. रमझानचे अखेरीपर्यंत (एप्रिल १६३२ इ. स.चा दुसरा आठवडा) ते तेथेंच राहिले. शहाजहानाने कुत्बशाहाकडे

१९९. परिशिष्ट २, पृ. ३७.

२००. परिशिष्ट २, पृ. ४१-२.

तीन वर्षांची थकलेली नऊ लाख पगोड्यांची खंडणी मागितली. कुत्बशाहाने पाच लाख पगोडे रोख व दोन लाखांचे जडजवाहीर दिले. मांडलिकत्व स्वीकारले. राहिलेल्या रकमेची शहाजहानाने सूट दिली. कारण या वेळी शहाजहानास लढाई थांबवून परत जाणे प्राप्त झाल्यानें च. १ जिल्काद (११ मे १६३२ इ. स.) रोजी वकील व इतर मोगली मंडळी परत गेली. या वेळी शहा अली बेगनें रिक्त हस्तें न जाऊ देण्याबद्दल चतुराईचें बोलणें लावले. परंतु एकदर परिस्थितीचा विचार करून त्याला रिकामेच परतावे लागले.[२०१]

अबदुल्ला कुत्बशाहा वयात येताच त्याची मातुश्री हयात बख्श बेगम हिने हयातनगरास दाढी-वपनाच्या संस्काराचे मंगलकार्य केले. त्याकरिता अबदुल्ला कुत्बशाहा हैद्राबादेहून च. २४ रज्जब (५ फेब्रुवारी १६३२ इ. स.) रोजी सय्यदाबादेस गेला. दुसरे दिवशी (६ फेब्रुवारी) तेथून मनमुराबादेस जाऊन राहिला व तिसरे दिवशी (७ फेब्रुवारी) सकाळी हयातावादेस गेला. यात्रा दिवस समारंभ झाला. जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला. यात्रेच्या दिवशी (१९ फेब्रुवारी) सर्वांस योग्यतेनुरूप बक्षिसे दिली. हयात बख्श बेगमेने या समारंभाप्रीत्यर्थ दोन लाख होनाचा खर्च केला. कुत्बशाहाने मातोश्रीस हत्ती, रत्नजडित पालख्या बंगरे दिल्या शिवाय कांही गांवेहि इनाम दिली.[२०२]

सोमवार च. ११ जिल्काद १०४१ हि. (२१ मे १६३२ इ. स.) रोजी कुत्बशाहास एक पुत्र झाला. हा च. २९ जमादिलाखर १०४२ (३१ डिसेंबर १६३२ इ. स.) रोजी रात्री वारला. याला त्याच्या आजोबाशेजारीच दफन केले.[२०३]

कुत्बशाहा हयातावादेहून परत आल्यानंतर असफखान विजापुराहून व वाकरखान कासिमकोट्याहून परत गेल्याची वातमी आली. तेव्हा सरहद्दीवर पाठविलेल्या सैन्यास परत येण्याचा हुकुम झाला. हे सैन्य १०४१ हि.च्या जिल्काद महिन्यात

---

२०१. परिशिष्ट २, पृ. ४०, ४२–५, मॉन्युमेंटा हिस्टोरिआ इंडिआ, जर्नल ऑफ दि बॉंबे हिस्टॉरिकल सोसायटी, व्हॉ. १, नं. २, सप्टेंबर १९२८, पृ. १८५-६; निकोलस मनुची, व्हॉ. १, पृ. २०५.

२०२. परिशिष्ट २, पृ. ४५–७.

२०३. परिशिष्ट २, पृ. ४८ व ५९

(१० मे ते ७ जून १६३२ इ. स.) परत आले. दादमहालासमोर प्रथम मुजरा आला. तेव्हा सर्व सरदारास त्यांच्या योग्यतेनुरूप बाक्षिसे दिली.[२०४]

हि. १०४२ (९ जुलै १६३२ ते २७ जून १६३३ इ. स.).— च. १८ सफर १०४२ हि. (२५ आगस्ट १६३२ इ. स.) रोजी रात्री मिर्झा रुस्तम बिहान वारला. तेव्हा त्याची जागा मीर फसिहउद्दीन यास दिली. रत्नखचित कमलदान दिले. मीर फसिहउद्दिनानें रात्रदिवस फार झटून काम केलें. परतु हा मुर्तुझानगराहून आल्यानंतर तेथे अव्यवस्था माजली. म्हणून तेथे खुदावर्दी मुलतान यास वस्त्रे देऊन च. ८ रबिउलाखर (१३ आक्टोबर १६३२ इ. स.) रोजी मुर्तुझानगरास रवाना केले.[२०५]

महाबतखानाने दौलताबादेस वेढा घातला. तेव्हा आदिलशाहाने या दक्षिणेवरील मोगली परचक्राविरुद्ध दक्षिणी पातशाहाचा सघ करण्याचा प्रयत्न केला. त्यानें कुत्बशाहाकडे शेख हबीर या नावाचा हेजीब पाठविला. तो च. २७ सफर (२३ आगस्ट १६३२ इ. स.) रोजी हैद्राबादेस आला. त्याने आदिलशाही वकील शहा अबुल हसन याच्या साहाय्यानें बोलणे लावून कुत्बशाहाने किवा आदिलशाहाने एकमेकास विचारल्याशिवाय शहाजहानाशी तह करू नये. उलट मोगली सैन्यास दक्षिणेतून काढून लावण्याचा दोघांनी मिळून प्रयत्न करावा असे ठरले. नतर तो हेजीब विजापुरास परत गेला.[२०६]

आदिलशाही शहा अबुल हसन व शेख महमद रहिम यांनी गोवळकोंड्यास आल्यानतर अबदुल्ला कुत्बशाहाकडे त्याची बहीण महमद आदिलशाहास देण्यासाठी मागणी केली. ती कबूल केल्यानतर आदिलशाही सरलष्कर मुरारि पडित व अबरखान हबशी लग्नाच्या तयारीस विजापुराहून निघाले. सरहद्दीवर येताच करिमखान सर नोबत व खास-इ-खेलचे चार हवालदार सामोरा जाऊन त्याना घेऊन आले. दुसऱ्या मुक्कामास मिर्झा हमजाने त्याचा सन्मान केला. तिसऱ्या दिवशी नासीर उल्मुक भेटला. नतर मलिक अबर, मलिक अदम व मलिक अल्मास यांनी सत्कार केला. शेवटी मीर फसिहउद्दिनान आपल्या लोकानिशी जाऊन त्यांचा सत्कार करून त्यास तूर मुक्कामी आणले. तूर येथे मोठमोठे शामियाने उभारले होते. तेथें कुत्बशाहानें

२०४. परिशिष्ट २, पृ. ४७–८.
२०५. ह. अ. अ. (लि.), पृ. ३३०.
२०६ परिशिष्ट २, पृ. ६१.

जाऊन ता. १७. फेब्रुवारीच्या सुमारास दरबार भरला. नजरनजराणे व मानसन्मान झाले. च. १९ सावान (१८ फेब्रुवारी १६३३ इ. स.) रोजी रात्री आदिलशाहाची बहीण मोठ्या लवाजम्यानिशी नदीमहालांत गेली. तीस लाख होनाचा हुंडा दिला. काझीने रात्री लग्न लोंदले. नतर हयात बख्श बेगमेने पुष्कळ आहेर देले. मोठा समारंभ झाला. मेजवान्याहि दिल्या. च. २६ सावान रोजी कुत्बशाहाने आपल्या बहिणीची राजधानीहून रवानगी केली. बरोबर मीर फासिहउद्दिन देला. त्यास ऐशी हजार होनाची जहागीर व घोडे वगैरे देऊन सन्मान केला. शेख महमद बिन खातून, काझी अहमद ऊर्फ काझी-इ-मक्का, शेख दादन मलिक दालतखान. करीमखान सरनावत, सय्यद बाबू, मखदुन-इ मुल्क, खास-इ-खलचे चार हवालदार चारशं घोडेस्वारानिशी आदिलशाही गणीस पोहोचविण्यास तिच्या पालखीबरोबर होते. तूरला प्रथम मुक्काम झाला. सावानच्या शेवटच्या दिवशी (१ मार्च १६३३ इ. स.) आपल्या बहिणीस निरोप देण्यास कुत्बशाहा तेथे गेला. आदिलशाही सरदारानी दरबार भरवून कुत्बशाहास मोठे मानसन्मान दिले. बक्षिसे वाटली. ५० हजार होन समारंभास व पाच लाख होन देस देण्यास खर्च झाला. मगरि पण्डित आदिलशाहाच्या या नतन बेगमेस घेऊन रमजानच्या दुसऱ्या पंधरवड्यात (माचचा दुसरा आठवडा) परतला. सरहद्दीपर्यंत बेगच सरदार त्यास निरोप देण्यास गेले. मीर फासिहउद्दिन महमद व शेख महमद विजापुरापर्यंत पोहोचविण्यास गेले. जुलवा (मुखदर्शन) समारंभहि झाला. कुत्बशाहाच्या बहिणीस हाजी वडी बी साहेबा असे सबोधू लागले. नतर कुत्बशाही सरदारास आहेर वगैरे देऊन त्यास परत जाण्यास निरोप दिला. ही मडळी च. १ मोहरम १०४३ हि. (२८ जून १६३३ इ. स.) रोजी हेद्राबादेस परत आली.[२०७]

मुजा उल्मुल्क अमीरजादे माजिद्राणी कासिमकोट्याहून कलमकला जात असता शेर महमद खान च. ६ जमादिलावल १०४२ हि. (९ नवबर १६३२ इ. स.) रोजी कुत्बशाहास भेटला. तेव्हा त्याला दरबारी केले. थोडयाच दिवसानी त्यास सरलष्कर करण्यात आले.[२०८]

च. १३ जमादिलाखर (१५ डिसेंबर १६३२ इ. स.) रोजी शेख

२०७ परिशिष्ट २, पृ. ४९ ५०; बु स ५५९ व ५६३; महमदनामा, शिवाजी निबंधावली २, पृ. ८४.

२०८. परिशिष्ट २, पृ. ५०, ५८.

महमदाची पेशवाई व नवाब-इ-अलामी मीर महमद रेझाई अस्त्राबादी यास दिली. परंतु कुत्बशाहाच्या मनातील किल्मिष लवकरच दूर झालें. शेख महमद कुत्बशाहाच्या बहिणीस पोहोंचवून परत आल्यानंतर पुन्हा त्यास पहिला सर्व अधिकार मोठ्या मानमरातबाने च. १० मोहरम १०४३ हि. (७ जुलै १६३३ इ. स.) रोजी दिला.[२०९]

च १७ जमादिलाखर (१९ डिसेंबर १६३२ इ. स.) रोजी कासिम बेगचा खास-इ-खेलची हवालदारी त्याच्याकडून काढून मलिक आदम यास दिली.

साल अखेरीस (एप्रिल-मे १६३३ इ. स.) मिर्झा जलालुद्दिन महमद हुसनी मेला मुजा उल्मुल्काम गोवळकोड्यास बोलाविले. तेव्हा शेर महमदखानाच्या विनंतीवरून कासिमकोड्याचा कारभार त्याचा जावई मीर मुस्तम माजिद्राणीकडे दिला. तसे वर्ष झाले. ते वशीर महमदखान व मीर मुस्तम यास एकमेकांनी एकमेकास साहाय्य करून मोठ्यास आज्ञा आली मुजा उल्मुल्क जिल्हेजच्या तिसऱ्या आठवड्यात हैद्राबादेस आला.[२१०]

हि १०४३ (२८ जून १६३३ ते १६ जून १६३४ इ. स.). च १८ सफर १०४३ हि (१४ आगस्ट १६३३ इ. स.) रोजी मुजा उल्मुल्काम एक लाखाची जहागीर व एक हजार घोडदळ व एक हजार पायदळाची सरदारी दिली. नंतर दादमहालासमोर त्या सन्याने मुजरा दिला.[२११]

दौलताबाद मोगलांनी घेतल्याचे वर्तमान समजताच हाजीखान दख्खणी व याकुतखान यास कालमचे सरहद्दीच्या संरक्षणार्थ रवाना केले. निजामशाही सरहद्दीवरील रामगीर किल्ल्याची डागडुजी वगैरे करण्याचे काम हसन बेग शिराझी याजकडे देऊन व त्यास बीस हजार होन खर्चास देऊन रामगीर किल्ल्याची दुरुस्ती करविली. हसन बेग शिराझीची कोतवाली मिर्झा इब्राहीम इस्फहानीकडे सोंपविली होती. ती परत शिराझीकडे दिली. शिर अलीच्या गोटावरील हवालदार मिया हुसेन यास पानगळास पाठविले. विठोजी व मलिक नर महमद यास मुस्तफानगरास रवाना केले. याप्रमाणे सरहद्दीवरील बंदोबस्त केला.[२१२]

---

२०९ परिशिष्ट २, पृ. ५९.

२१०. परिशिष्ट, २, पृ. ५९-६०

या वर्षाचे सुरुवातीस (जून १६३३ इ. स.) मीर फसिहउद्दिन मुर्तझा-नगराहून परत आला. तेव्हां त्याची सर खेली मिर्झा हमजास देऊन त्यास तिकडे रवाना केलें. मीर फसिहउद्दिनास वस्त्रें दिली.[२११]

शेख महमदास ७ जुलै १६३३ इ. स. रोजी पेशवाई दिल्यानंतर त्यास च. ९ सव्वाल १०४३ हि. (२९ मार्च १६३४ इ. स.) रोजी मुद्दाम दरबार भरवून जुम्लत-इ-मुल्कीचे अधिकार व वस्त्रें दिली. दोन घोडे व चादीची पालखी बक्षिस दिली. त्याच्या बहिर्णीचा मुलगा वयात आल्यावरून त्यास सरकारी कारभार सांगितला. दुसऱ्या दिवसापासून (३० मार्च) ते कारभार करू लागले. त्याचे तैनातीस मखदुन-इ-मुल्क व सय्यद बाबू त्याच्या प्रत्येकी एक हजार पायदळ व शभर घोडयासह दिले. दर गुरुवारी नवाब-इ-अलामीने खास-इ-खेलच्या मैदानात मृत शाहांच्या कबरीस भेट द्यावी अशी आज्ञा झाली.[२१२]

अबदुल्ला कुत्बशाहाने हैद्राबादेत तोली मशीद बाधली.[२१३]

अबदुल्ला कुत्बशाहान मच्छलीपट्टण, निझामपट्टण, भिमलीपट्टण वगैरे बदगत इंग्लिश लोकांस व्यापार करण्याची परवानगी दिली.[२१४]

हि. १०४४ (१७ जून १६३४ ते ६ जून १६३५ इ. स.).— जझार-सिग बुदेल्यावर खानदुराण जमादिलाखराच्या सुरुवातीस (नवबर १६३४चा तिसरा आठवडा) चालून गेला. तेव्हा डिसेंबरच्या सुरुवातीस बुदेल्याने आपली माणसें व जडजवाहीर गोवळकोड्यास पाठविले. मोगली सैन्य गोवळकोड्याच्या हद्दीत शिरले. बुदेल्याची मालमत्ता वगैरे वाटेतच पकडून ताब्यात घेतली.[२१५]

इराणच्या पातशाहाकडे पाठविलेला खैरातखान सरनौबत इमाम कुली बेग येसावल यास बरोबर घेऊन हि. १०४४त इराणाहून निघून कदाहारचे रस्त्याने हिदुस्थानांत आला. प्रथम शहाजहानास भेटून नतर तो हैद्राबादेस गेला. ते येत असल्याची बातमी च. १ जिल्काद (९ एप्रिल १६३५ इ. स.) रोजी कुत्बशाहास

२११. परिशिष्ट २, पृ. ५६ व ६१.

२१२. परिशिष्ट २, पृ. ५६-७.

२१३. ए. इं. मॉ., १९१७-८, पृ. ५०.

२१४. इं. फॅ. इन इं., १६३४-३६, पृ. १४-२०; मॉन्युमेंटा हिस्टॉरिआ इंडिआ, जर्नल ऑफ दि बॉबे हिस्टॉरिकल सोसायटी, व्हॉ. १, नं. २, सप्टेंबर १९२८, पृ. १८८.

२१५. बादशाह-नामा, इलिअट डॉसन, भाग ७, पृ. ४९-५०.

मिळाली. 'तेव्हां त्यांस प्रथम मीर मुअझउद्दिन महमद मुर्त्राफ व नंतर शेख महमद तहीर वगैरे सामोरा गेले. त्यांचा सत्कार केला. च. १७ जिल्काद (२५ एप्रिल) रोजी कुत्बशाहा खैरातावादेस गेला व तेथें त्यांचे नजरनजराणे घेतले. चं. २२ जिल्काद (३० एप्रिल) रोजी दरबार भरवून त्यांस बऱ्याच मोल्यवान वस्तू नजर दिल्या. शिवाय इराणच्या वकीलाच्या खर्चास मुझाहिदपुरचा महाल दिला. खैरातखानाने बरेच नजरनजराणे दिले. कुत्बशाहानेहि त्यास सन्मान दिला.

हि. १०४२ (७ जून १६३५ ते २५ मे १६३६ इ. स.). —शहाजहानाने च. १० सावान जुलुस ९ (९ जानेवारी १६३६ इ. स.) रोजी[२१६] कुत्बशाहास एक फर्मान काढले. त्यातील आशय असाः—" आम्ही असे ऐकतों कीं, तुम्च्या राज्यातील लोक नीट धर्माने चालत नाहींत. तुम्हीहि त्याच्या उच्छृंखल वर्तनास मना करीत नाहीं व त्यांना योग्य ते शासनहि देत नाहीं. तरी आम्ही तुम्हास असे फर्मावितों कीं, तुम्ही आपल्या मुलखात अशी अव्यवस्था चालूं देऊ नये. कोणी केलीच तर त्यास ताबडतोब शासन करावे. तुम्ही असे जर न केले व आमच्या म्हणण्याप्रमाणे वागण्याचे न ठरविले तर आम्हास तुमच्या मुलखाचे भाग पडेल. आणि त्या विलायतेतील पैसा व माणसें आमचींच आहेत असे समजावे लागेल. शिवाय आम्हास असेहि समजते कीं, तुम्ही आपल्या मुलखा-मध्यें इराणच्या शाहाच्या नावाने खुत्बा पढविता. आता तुम्ही आमचे चाकर झाला असता तुम्हास इराणच्या शाहास खुश असण्याची गरज काय ? तरी खुत्बा पढणे तो आमच्याच नावाने पढला पाहिजे. सोबत पाठविलेल्या दिवाणाच्या कागदावरून पेशकशीची रक्कम किती येणे आहे ती समजेल; ती सर्व आदा करावी. हे फर्मान घेऊन येणारा अबदुल लतीफ हा आमचा विश्वासू व अनुभवी मनुष्य आहे. तो या फर्मानांतील सर्व मजकूर नीट समजून देईल. तुमचे वडील मोहमद कुत्बउल्मुल्क मरहुम यानीं आमच्या चाकरीच्या बाबतींत जे लक्ष पुरविले व त्यानी आमची जी योग्य चाकरी केली त्यामुळे त्यांचेवर कृपा करून त्याचेकडे तो मुलुख ठेवला होता हे तुम्हास जाहीर असावें. जर तुम्ही आपल्या दौलतीविषयी सदिच्छा दाखविलीत व आमचे हुकुम पाळण्याची शर्त मान्य केलीत तर तुमच्या मुलुखास आमचे कडून

२१६. यातील ताजा कलम चं. १५ सावानचा (१४ जानेवारी १६३६ इ. स.) आहे.

इकडील सर्व मजकूर आमचा वकील निवेदन करील.'[२२०] हा तहनामा शाहाजहानास मान्य झाला व त्यांतील शेवटच्या अटीप्रमाणें आदिलशाहाशी केलेल्या तहांत अशी अट घातली कीं, 'तुम्ही दक्षिणेंत सर्वांत मोठे जमिनदार आहात तरी तुम्ही कुत्बउल्मुल्काशी वडील भावाप्रमाणें वागावें व त्याच्या मुलखास कोणत्याहि प्रकारे तोषीस लावूं नये. पैसा, मुलुख अगर इतर रीतीने काहीहि पेशकशी वगैरेच्या निमित्तानें त्यास देण्यास लावूं नये. माजरा नदी ही राज्यांची सीमा समजावी. तुमच्या व त्यांच्या पूर्वजांचे जे ऋणानुबंध झाले ते जाणून समाधानान राहावें.'[२२१] ही अट आदिलशाहाने मान्य केली.

हि. १०४६ (२६ मे १६३६ ते १५ मे १६३७ इ. स.).—शाहाजहानानें च. ७ रबिलाखर १०४६ हि. १७ माहे शहरेवर ९ जुलुस (२९ आगस्ट १६३६ इ. स.) रोजी कुत्बशाहास अहदनामा पाठविला. त्यातील साराश असा:—"कुत्बउल्मुल्क यानें जाणावें को. ज्या अर्थी ते आमचे चाकर बनले आहेत आणि त्यांनी आपल्या मुलखामध्ये आमच्या नावाने खुत्बा पढावयास लाविला आहे व आमच्या शुभ नांवानें नाणी (दिनार व दिरम) पाडण्याचें ठरविलें आहे; व त्याचप्रमाणें ठरवून दिलेली पेशकशहि त्यानी दरबाराकडे भरली आहे व यापुढे निजामउल्मुल्कला जें काही देत होते त्यापेकी दोन लाख होन दर वर्षी सरकारी खजिन्यात खडणी म्हणून देण्याचे शपथपूर्वक वचन दिलें आहे त्याअर्थी त्याचे सर्व जुने गुन्हे माफ करून त्यांस क्षमा केली आहे. आणि त्यांच्याकडे हल्ली जो मुलुख आहे तो त्यांचेकडे ठेवला आहे. आता त्याच्या वंशजानी या अटीप्रमाणे वागावे, विरुद्ध आचरण करू नये. तसेच आम्ही किंवा आमची मुले अगर आमचे उमराव यानी त्यांच्या मुलुखास उपद्रव देऊ नये. आणि सुवर्णपत्रावर लिहिलेल्या तहाच्या अटीविरुद्ध जाऊ नये. हा करार वंशपरंपरेने कायम राहावा.'[२२२] याप्रमाणे तह कायम झाल्यानंतर आदिलशाहा व कुत्बशाहा यांचेहि सख्य झाले.

२२०. बादशाहनामा, मूळ फारसी, भाग १, प्रकरण २, पृ. १७८–९, डाग रजिस्टर, १६३६, पृ. २५०.

२२१. महमदनामा, शिवाजी निबंधावली २, पृ ९३: प्रो. सरकार, औरंगजेब, व्हॉ. १, पृ. ३८.

२२२. बादशाहनामा, मूळ फारसी, भाग १, प्रकरण २, पृ २१०.

मच्छलीपट्टण येथे डच व तेथील सुभेदार सय्यद महमद याच्यात तंटा लागला. परंतु अबदुल्ला कुत्बशाहाने च. २९ जमादिलाखर (१७ नवंबर १६३६ इ. स.[२२३]) रोजी फर्मान काढून दोघांसहि ताकीद करून डचांस व्यापार करण्याची परवानगी कायम केली. हे फर्मान ता. १८ डिसेंबर १६३६ रोजी[२२३] मच्छलीपट्टणास पोहोचले. तेव्हा ते त्या वेळच्या रिवाजाप्रमाणे मोठ्या समारंभाने शहरात नेले.[२२४]

इंग्रज व मच्छलीपट्टणचा सुभेदार सय्यद महमद यांच्यात मलावल (Malawola) गावाच्या भाडेपट्ट्यावरून व कराच्या रकमेत ८०० पगोडे अधिक मागितल्यावरून भांडण लागले. त्यावरून गोवळकोंडा येथील इंग्रजाच्या रॉजर्स नावाच्या अधिकाऱ्यास कैद करून मारझोड केली. काही सरदारांच्या मध्यस्थीने त्याची नंतर मुक्तता झाली. परंतु त्यास गोवळकोंड्याबाहेर जाण्यास लवकर परवानगी दिली नाही.[२२५]

हि. १०४० (२५ एप्रिल १६३० ते १२ एप्रिल १६४० इ. स.).— ता. २७ नवंबर १६३० रोजी अबदुल्ला कुत्बशाहा आपल्या पाच हजार लवाजम्यासह मच्छलीपट्टणास गेला. तेथे तो ८ डिसेंबर १६३० पर्यंत राहिला. डच व इंग्रजांच्या वखारींत आपल्या नायकांमुलांसह जाऊन त्या पाहिल्या. डचांनी ३०० पगोडे, घोडे, हत्ती व इतर रत्ने पेशकश दिली. कुत्बशाहास इतर लोकांकडून सुमारे आठ लाख पगोडे किमतीची पेशकश मिळाली.[२२६]

हि. १०५० (१३ एप्रिल १६४० ते १ एप्रिल १६४१ इ. स.).— अबदुल्ला कुत्बशाहाने स्वगतखानाकडून शाजारपेठ व एक मोठा कुवा रज्जब महिन्यात (आक्टोबर १६४० इ. स.) बांधला.[२२७]

२२३ जुन्या पद्धतीप्रमाणे हीं तारीख दिली आहे. डच नवी पद्धत वापरीत असत. त्यामुळे त्यांच्या किंवा मळातील तारखेपेक्षा हीं १० दिवसांनी अलिकडची दिली आहे.

२२४. मॉन्युमेंटा हिस्टॉरिआ इंडिआ, जर्नल ऑफ दि बॉबे हिस्टॉरिकल सोसायटी, व्हॉ. १, अं. २, सप्टेंबर १९२८, पृ. १९०-१.

२२५. मॉन्युमेंटा हिस्टॉरिआ इंडिआ, जर्नल ऑफ दि बाबे हिस्टॉरिकल सोसायटी, व्हॉ. १, नं. २, सप्टेंबर १९२८, पृ. १९०; मच्छलीपट्टण ते बंटम-पत्र, १ डिसेंबर १६३६चे—ई. फॉ. इन इ., १६३३-३६, पृ. ३२५-६.

२२६. मच्छलीपट्टण ते सुरात, पत्र, १४ डिसेंबर १६३९चे, इ फॉ. इन इ., १६३७-४१, पृ. २२१-२२.

२२७. ए इ मॉ., १९१३—४ प. ५५ व १९०३-८, पृ. २७

हि. १०५२ (२२ मार्च १६४२ ते ११ मार्च १६४३ इ. स.).— रज्जब महिन्यात (आक्टोबर-नवंबर १६४२ इ. स.) अबदुल्ला कुत्बशाहाने खैरातखानाकडून अबरखाना व एक मोठे धान्यगृह बांधले.[२२८]

अबदुल्ला कुत्बशाहाचा सरदार गाझी अली याने उदयगिरी घेतला.[२२९]

अर्मागावच्या नायकावर स्वारी करून त्याचा बराच मुलुख कार्वीज केला. कुत्बशाही सैन्याने किल्ले गडकी (Cowle Galdanche) येथे तळ दिला.[२३०] श्रीरंगरायानेंहि त्याचा मुलुख घेतला. तेव्हा तिरुमल वेंकटप्पाने कुत्बशाही सैन्याची मदत मागितली. ही कुणकुण कळताच श्रीरंगाने त्यास कैद केले. त्याचा मुलुखहि घेतला. तेव्हा तिरुमलाचा भाऊ व इतर नातलगांनी सैन्य जमविण्याचा प्रयत्न केला व अर्ध्या दिवसाच्या मुक्कामावर तळ देऊन राहिलेल्या कुत्बशाही सैन्याची मदत घेऊन तिरुमलास सोडविण्याची खटपट केली. कुत्बशाही सैन्य तिरुमलाच्या मदतीस जाऊन गेले.[२३१]

हि. १०५३ (१२ मार्च १६४३ ते २० फेब्रुवारी १६४४ इ. स.).— कुत्बशाही सैन्य कर्नाटकातील नायकवाडीकडून त्याचा मुलुख कार्विज करण्याची खटपट करीत होते.[२३२]

हि. १०५४ (१ मार्च १६४४ ते १७ फेब्रुवारी १६४५ इ. स.). जुले १६४४त गाझी अली याने मच्छलीपट्टणजवळील सर्व मुलुख कार्विज केला. पुलिकतापासून तीन मलावर तळ देऊन राहिला किल्ला ताब्यात देण्याबद्दल बोलणे लावले. परंतु किल्ला मजबूत. सहज हाती येण्यासारखा नव्हता. म्हणून वेढा दिला नाही. आगस्ट महिन्याचे अखेरीस श्रीरंगरायाच्या विरुद्ध उठलेला जिंजीचा नायक

२२८. ए. इ. मा., १९१३–१४, पृ. ५७ व १९०७–८, पृ. २७.

२२९. V R. n. Nell 790 B and V C 1385 सिवेलचा 'दक्षिण हिंदुस्थानांतील ऐतिहासिक शिलालेख', पृ. २७८.

२३०. मद्रास ते बटम, पत्र, २० सप्टेंबर १६४२, इं. फॅ. इन इं., १६४२–४५, पृ. ४४.

२३१. मद्रास ते बंटम, पत्र, ४ जानेवारी १६४३ व कन्सल्टेशन, २९ डिसेंबर १६४२, इं. फॅ. इन इं., १६४२–५, पृ. ७० व ८०; डाग रजिस्टर १६४१–२, पृ. २७२–९५ व १६४३–४, पृ. २४४ व २५४.

२३२. मद्रास ते बटम, पत्रें, २५ आगस्ट १६४३ व २८ जानेवारी १६४४, इं. फॅ. इन इं., १६४२-५, पृ. ११५ व १५४.

कुत्बशाहास घेऊन मिळाला. श्रीरंगराय अर्मागांवचा नायक व कृष्णापा नायक यांस बरोबर घेऊन डचांचे मदतीस आला. लढाई झाली. तींत गाझी अली व इतर मोठमोठे कुत्बशाही सरदार मारले गेले. कुत्बशाही सैन्य उधळून लावलें. नंतर अर्मागांवच्या पलीकडे कुत्बशाही सैन्य पुन्हां जमूं लागले.[२३३]

महमद आदिलशाहाचा मुलगा अली याची सुंता करण्याचा समारंभ सोमवार चं. ६ रमजान (२८ आक्टोबर १६४४ इ. स.) रोजीं झाला. गुरुवार चं. १० रोजी मिरवणूक निघाली. या वेळीं अबदुल्ला कुत्बशाहानें आदिलशाहास बराच आहेर पाठविला.[२३४]

हि. १०५५ (१८ फेब्रुवारी १६४५ ते ७ फेब्रुवारी १६४६ इ. स.).— मागील वर्षांत श्रीरंगरायावर त्यांचे माडलिक नायक उठले होते. आदिलशाहानेंहि त्यांचे राज्यांत मोहिम चालू ठेवली होती. इ. स. १६४५ आक्टोबरानंतर कुत्बशाहानें मीर जुम्ला यास त्यांचेवर पाठविलें. मीर जुम्ला चालून गेला. उदयगिरी व दुसरे दोन किल्ले घेतले. तेथील सरदार मल्लय्या पळून गेला. नतर मीर जुम्ला वेलोरास गेला व किल्ल्यास वेढा दिला. तेथें श्रीरंगाचें सैन्य चालून आलें. परंतु तें पराभूत झालें. मीर जुम्ल्यानें नतर कर्नाटकांतील बराच मुलुख आक्रमिला.[२३५]

अबदुल्ला कुत्बशाहानें महमद आदिलशाहास नजराणा पाठविला. तो जिल्हेजच्या सुरवातीस (जानेवारी १६४६ इ. स.चा पहिला आठवडा) त्यास रसुलपुरास मिळाला.[२३६]

हि. १०५६ (८ फेब्रुवारी १६४६ ते २७ जानेवारी १६४७ इ. स.).— पुलिकत व सेंट थोमचा सुभा मीर जुम्लास दिला. त्यानें सर्वत्र हिंडून मुलुखाची व्यवस्था

२३३. मद्रास ते कौंसिल, पत्रे, ५ जुलै १६४४ व ८ सप्टेंबर १६४४, इं. फॅ. इन इं., पृ. १८४ व १९३; डाग रजिस्टर, १६४४-५, पृ. ३२५, हेग ट्रॅन्सक्रिप्टस्, मा. १, भा. १४, नं. ४३१.

२३४. महमदनामा व बुसातिन सलातिनात रज्जब महिना दिला आहे. महमदनामा, पृ. १०६ व बु. स., ३६३. परंतु त्यांत दिलेले सोमवार, गुरुवार व शुक्रवारांप्रमाणें रज्जब महिना चुकीचा ठरतो. रज्जबच्या ऐवजीं रमजान धरल्यास तारिख वारांच्या तपशीलास मेळ बसतो.

२३५. मद्रास ते सुरत, पत्रें, २१ जानेवारी १६४६ व १० फेब्रुवारी १६४६, इं. फॅ. इन इं., १६४६-५०, पृ. २५-६; डच रेकॉर्डस, इ.

२३६. महमदनामा, शिवाजी निबंधावली २, पृ. १०८.

लावली. दुष्काळानें कर्नाटकांत बराच कहर उडविला. मीर जुम्ल्यानें आपला तळ जिंजीपासून दोन दिवसांच्या मुक्कामावरील वेलोरास दिला होता. त्याला तोंड देण्यासाठी जिंजीचा नायक किंवा श्रीरंगराय पुढे येण्यास धजेना. मीर जुम्ल्याने आपल्या सैन्यांत युरोपीय लोकांचा भरणा करण्याचा सपाटा लाविला.[२३७]

हि. १०५७ (२८ जानेवारी १६४७ ते १६ जानेवारी १६४८ इ. स.).—इंग्रजांनी तोफा वगैरे पुरविल्यावरून मीर जुम्लाने त्यांचेकडील येणें माफ केलें व कुत्बशाहाचें फर्मान आणवून देऊन त्याम व्यापाराच्या बऱ्याच सवलती मिळवून दिल्या.[२३८]

च. २० जिल्काद (७ डिसेंबर १६४७ इ. स.) गोजी कुत्बशाहा आदिलशाहाविरुद्ध कट करीत असल्याची वातमी मिळाली. तीवरून आदिलशाहाने शासन देण्यासाठी खानखानास कुत्बशाहावर नेमले. कुत्बशाहाने नजरनजराणे पाठवून समजूत घालण्याचा प्रयत्न केला. परंतु खानखान जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात हसनावादेहून जिजीकडे जाण्याम निघाला.[२३९]

च. ६ जिल्हेज (२३ डिसेंबर १६४७ इ. स.) गोजी अबदुल्ला कुत्बशाहाचा वकील हाजी नसीरा याने आदिलशाहास कळविले की, शहाजी भोसल्याकडून 'मला तुमच्या आश्रयाखाली घ्या' अशा अर्थाचे पत्र आले. परंतु शहाजीची या वेळची व यापूर्वीचीहि अनेक वेळची विनति आम्ही अमान्य केली व आदिलशाहाच्या नोकरीतच राहावे असे त्याम कळविले.[२४०]

हि. १०५८ (१७ जानेवारी १६४८ ते ४ जानेवारी १६४९ इ. स.).—जिंजीचा विजयराघव नायक व मदुरेचा तिरुमल नायक याच्यात वैमनस्य आले. तेव्हां तिरुमलाने कुत्बशाहीची मदत घेतली. मीर जुम्लास जिंजीस वेढा घालण्यास सांगितलें. मीर जुम्ला जिजीवर चालून जाताच विजयराघव घाबरला. त्याने किल्ला मीर जुम्लास देऊ केला. मीर जुम्ला आपणास धाब्यावर बसवून किल्ला घेत आहे असे पाहातांच त्याने आदिलशाहाकडे मदत मागितली. विजापुरी सैन्य

---

२३७. मद्रास ते सुरत, पत्रे, ४ व २१ जानेवारी १६४७, इं. फॅ इन इं. १६४३-५०, पृ. ७० व ७४.

२३८. मद्रास, पत्र, ९ आक्टोबर १६४७, इं. फॅ. इन इं., १६४३–५०, पृ.१६७.

२३९. महमदनामा, शिवाजी निबंधावली २, पृ. १२०-१.

२४०. सारसंग्रह, नं. ५३९, पृ. ११७.

तिरुमलाची बाजू घेऊन चालून आले. कुत्बशाही व आदिलशाही सैन्ये परस्परापासून अवघ्या दोन दिक्साच्या अतरावर छावणी देऊन राहिली होती. या दोन्ही सैन्यांनी देश उध्वस्त करण्याचा सपाटा लावला. तेवनापट्टण, पोटेरी नोव्हो, पाडेचरी वगैरे मुलुखाची फारच दुर्दशा उडविली. थोड्याच अवधीत मुसलमानी सैन्य एक झाली. तेव्हा तिरुमल विजयराघवास मदत करू लागला. नतर मीर जुम्ला व आदिलशाही सरदाराचे पटेनासे झाले. किल्लाहि कठीण, लवकर पडणार नाही, हे पाहून मीर जुम्ल्याने वेढ्याचे काम आदिलशाही सैन्याकडे सोपवून आपण मुलुखाच्या बदोबस्ता-करिता म्हणून प्रथम गडिकोट्यास जाऊन बसला. मुस्तफाखान ता. ९ नवबर गोंजी वारला. ही बातमी समजताच मीर जुम्लाने कडप्पा प्रातात घुसून मुलुख बळकाविण्यास सुरुवात केली.[२४१] मोगल-कुत्बशाहा-आदिलशाहा याचा इ. स. १६३६त जो तह झाला त्या तहान्वये जिंजीच्या वेढ्यात आदिलशाहाने मध्ये पडण्याची जरूर नव्हती, तसे त्याने केल्याने तहाच्या अटी मोडल्या गेल्या वगैरे शहाजहानाकडे कुत्बशाहाने तक्रार केली.[२४२]

हि. १०६० (२५ डिसेंबर १६४९ ते १४ डिसेंबर १६५० इ स.).— कुत्बशाहाने आदिलशाहास चार लाख होन व चार उत्तम रत्ने दिली व त्याची गडिकोटा व कोकणवाडीचा मुलुख घेण्याबद्दल अनुमति मिळविली. ही मिळतांच मीर जुम्लाने इ. स. १६५०च्या सुरुवातीस गडिकोटा घेतला. तेथून तो चद्र-गुत्तीवर चालून गेला व ताहि घेतला.[२४३]

हि. १०६१ (१५ डिसेंबर १६५० ते ४ डिसेंबर १६५१ इ.स.).— मीर जुम्लाने उत्तर कर्नाटकातील बराच भाग काबिज केला व उत्पन्नहि बीस लाख पगोट्यावर नेले. शिवाय हिंदु नायकाकडून दरसाल चाळीस लाख पगोड्याची खडणीहि मिळविली. त्याचे पाशी स्वागत चार हजार घोडदळ, तीनशे हत्ती, चारपाचशे उट, दहा हजार बैल व दहा जहाजे झाली. त्याचा व्यापारहि फार मोठा

२४१. मद्रास, पत्र, २२ नोव्हेंबर १६४८, इं. फॅ. इन इं., १६४६-५०, पृ. २१५; पोर्तुगीज रेकॉर्डस १६०८, सारसग्रह, ले. ५४८-९, पृ. ११९; महमदनामा, शिवाजी निबंधावली २, पृ. १२२-३; ला मिशन दु मदुरे, वही. ३, पृ. ४५६; बालकृष्णकृत शिवाजी दि ग्रेट, व्हॉ. १. पृ. १२२-२५; बु. स., ५११.

२४२. प्रो. सरकार, मॉडर्न रिव्ह्यु, जुलै १९२३.

२४३ महमदनामा, शिवाजी निबंधावली २, पृ.१३१-३२; मद्रास, पत्र, १८ जानेवारी १६५१, इं. फॅ इन इ., १६५१-४, पृ. २२-३.

व दूरचर होता. मोंगलाशीहि त्याने दोस्ती केली होती.[२४४] या संपत्ति व शक्तीमुळे तो चढून गेला. त्याने आदिलशाहीतहि थोडी गडबड केली. तेव्हां आदिलशाहानें इ. स. १६५१च्या अखेरीस खान महमदास त्याचेवर पाठविले. मीर जुम्ला चंद्रगुतीस होता. तेथें खान महमद चालून गेला. मीर जुम्ला किल्ल्यांत जाऊन बसला. आदिलशाही बाजी घोरपड्याच्या सैन्याने हल्ला चढविला. तेव्हा मीर जुम्लाने महमदखान लोदीस त्याच्यावर पाठविले. परंतु त्यात कुत्बशाही सैन्याचा पुरा मोड झाला.[२४५]

हि. १०६२ (५ डिसेंबर १६५१ ते २२ नवंबर १६५२ इ. स.).— सबंध जानेवारी महिना आदिल-कुत्बशाही युद्धात गेला. खान महमदाने मीर जुम्ल्यास गोवळकोंड्याच्या एका डोंगरात अडकावून ठेवले. दोन्ही सैन्यांचा बराच नाश झाला. शेवटी आदिलशाही सैन्याने गोवळकोंड्यावर अकस्मात् हल्ला चढविला. तेव्हा मीर जुम्लाने (फेब्रुवारीचे सुरुवातीस) आदिलशाहास सहा लाख होनाची खंडणी दिली. तह झाला. कुत्बशाहाचा सर्व मुलुख परत दिला.[२४६]

हि. १०६८ (१२ नवंबर १६५३ ते ३१ आक्टोबर १६५४ इ. स.).— आदिलशाहाचें वाढते सामर्थ्य पाहून मीर जुम्लाने कर्नाटकातील हिंदु नायकांस त्याच्याविरुद्ध उठविण्याचा प्रयत्न केला. आदिलशाही सरदारांशी सख्यत्वाने न वागतां त्यांच्याशी अडवणुकीचेच वर्तन स्वीकारिले. म्हैसूरच्या नायकास असेच भरीस घातले. औरंगजेब दख्खनचे सुभेदारीवर आल्याने मीर जुम्ला याचे विशेषच फावले. त्याने म्हैसुरकरास औरंगजेबाची मदत मिळवून देण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याने ती नाकारल्याने मीर जुम्लाहि म्हैसुरकराचे मदतीस गेला नाही. शेवटी वेदूरचा किल्ला आदिलशाहाने घेतला व खान महमदास मीर जुम्ल्यावर पाठविले. मीर जुम्ल्याने कर्नाटकातील मुलुखाचा स्वतंत्र पातशाहा होण्याचे मनात आणले व

२४४. लिटलटन व वेंकटचे मद्रासहून पत्र, १७ जानेवारी १६५१, ई. फ�े. इन इं., १६५१-४, पृ. १२; हेग ट्रान्सक्रिप्टस, मा. १. भा. १७, न. ५१८.

२४५. महमदनामा, शिवाजी निबंधावली २, पृ. १३२; मनुची, भा. १, पृ. २३४.

२४६. महमदनामा, शिवाजी निबंधावली २, पृ. १३२; मद्रास, पत्रे, १४ जानेवारी व १२ फेब्रुवारी १६५२, ई. फॅ. इन इं., १६५१-४. पृ. ९९ व १११.

त्याप्रमाणें त्यानें आदिलशाहाशी बोलणें लावलें. त्यामुळें कुत्बशाहा व मीर जुम्ला याच्यात वैमनाव उत्पन्न झाला.[२४७]

हि. १०६५ (१ नवंबर १६५४ ते २० आक्टोबर १६५५ इ. स.).— अबदुल्ला कुत्बशाहानें मीर जुम्ला यास गोवळकोंड्यास आणण्याबद्दल पुष्कळ प्रयत्न केला. मीर जुम्लाची स्वतंत्र होण्याची खटपट चालूच राहिली. तो राज्यच बळकाविती की काय याची लोकांस भीति वाटूं लागली.[२४८]

हि. १०६६ (२१ आक्टोबर १६५५ ते ९ आक्टोबर १६५६ इ. स.).—मीर जुम्ल्यानें शहाजहानाशी बोलणें लावून मोगलांच्या नोकरीत शिरण्याचें ठरविलें. औरंगजेबानें मीर जुम्लास ताबडतोब मिळवून घेण्याचा प्रयत्न केला. त्याचेकडे महमद अमीन नांवाचा मनुष्य पाठविला. मीर जुम्लाचा मुलगा मीर महमद अमीन याजकडेहि बोलणे लावलें. मीर महमद अमीन याचा स्वभाव मुळांतच उद्दाम होता. तो आपल्या बापाच्या संपत्तीच्या व सामर्थ्याच्या जोरावर खास कुत्बशाहाशीहि बेपर्वाईनें वागत असे. मीर जुम्लाची बायको व इतर नातलग गोवळकोंड्यास होते. त्यामुळें त्याला मोगलाकडे सहज निघून जातां आलें नाही. औरंगजेबाजवळ चाललेलें हें खलबत उघडकीस येतांच कुत्बशाहास राग आला. शेवटी मीर जुम्ल्यानें औरंगजेबाकडे संरक्षणार्थ अर्ज केला. तो त्याने शहाजहानाकडे रवाना केला. ही बातमी समजताच कुत्बशाहानें मीर महमद अमीन व मीर जुम्लाच्या इतर नातलगांस कैद केले. मीर महमद अमीन याने दारूच्या धुंदीत कुत्बशाहाच्या खास बैठकीवर निजल्यानें व त्याची बैठक खराब केल्यावरून त्यास २१ नवंबर १६५५ रोजी कैद केले. कैद करितांना मीर जुम्ल्याच्या लोकांनी थोडासा विरोध केलाच. शहाजहानानें ता. ३ डिसेंबर १६५५ रोजी फर्मान काढून मीर जुम्ला व त्याच्या मुलास आपल्या नोकरीत घेतले. या फर्मानाबरोबरच शहाजहानानें कुत्बशाहास एक खलिता लिहून मीर जुम्लास मोगली हद्दीत आपल्या सर्व मालमत्तेसह येऊं देण्या-

---

२४७. हेग ट्रॅन्सक्रिप्टस, माला १, भाग १९, नं. ५५० व ५५१; मद्रास, पत्र, १८ सप्टेंबर १६५४, इं. फॅ. इन इं., १६५१-४, पृ. २९०; महमदनामा, शिवाजी निबंधावली २, पृ. १३३; बु स., पृ. ५३६.

२४८. मद्रास, पत्र, १७ डिसेंबर १६५५, इं. फॅ. इन इं., १६५५-६०, पृ. ४०.

विषयी लिहिलें होतें. हें पत्र औरंगजेबास ता. १८ डिसेंबर १६५५ रोजी मिळाले. त्यानें कुत्बशाहाचें पत्र हैद्राबादेस रवाना केले. त्यापूर्वी औरंगजेबाने मीर जुम्लास कैद केल्याची बातमी शहाजहानास कळविली व जरूर पडल्यास कुत्बशाहावर चालून जाण्याची परवानगीहि मागितली होती. परंतु मीर जुम्लाच्या सूचनेप्रमाणे औरंगजेबाने अकस्मात् हल्ला घातल्यास कुत्बशाहाकडून राज्य हिसकाविणे शक्य होते. कुत्बशाहाचे उत्तर येण्यापूर्वीच व शहाजहानाकडून दुसऱ्या खलित्यास फर्मान येण्यापूर्वीच औरंगजेबानें आपला मुलगा सुलतान महमद यास च. ८ रबिलाखर (२६ डिसेंबर १६५५) रोजी कूच करून नांदेडास मुक्काम करण्यास सांगितले. 'सुलतान महमद आपल्या चुलत्याकडे ओरिसाच्या मार्गाने बंगाल्यात जात आहे तरी त्यास कुत्बशाहींतून जाण्यास वाट मिळावी' म्हणून कुत्बशाहास कळविले.[२४९] सुलतान महमद नांदेडास ता. ७ जानेवारी १६५६ रोजी आला. अधिक कुमक येण्याची व पुढील हुकुमाची तो वाट पहात होता. शहाजहानाने औरंगजेबाच्या दुसऱ्या पत्राचे उत्तर पाठवून त्यास कुत्बशाहावर लढाई करण्याची परवानगी दिली. ती ता. ७ जानेवारी रोजी पोहोंचली. या फर्मानात मीर जुम्ला व त्याच्या सर्व नातलगास सोडण्याची ताकीद होती. हें फर्मान औरंगजेबाने कुत्बशाहाकडे पाठविले व त्याचबरोबर सुलतान महमदास कुत्बशाही मुलखांत घुसण्यास सांगितले. तो ता. १० जानेवारी रोजी नांदेडाहून निघाला व ता. २३ जानेवारीस हैद्राबादेजवळ आला. दुसरें फर्मान व सुलतान महमद चालून आलेला पाहतांच कुत्बशाहानें मीर महमद अमीन व इतर मंडळी व नोकरचाकर यास सोडले व सुलतान महमदाच्या हवालीं केले. स्वामिनिष्ठेचे पत्रहि त्याचबरोबर रवाना केलें. सुलतान

---

२४९. अकीलखान रझी, मनुची व बर्नीअर यांनी दिलेली ही हकीकत (हदिकतमध्येंहि ही दिली आहे) प्रो सरकार यांच्या मतें बरोबर नाही. परंतु ज्या अर्थी शहाजहानाचें लढाईस परवानगी देणारें फर्मान बऱ्याच उशीराने आले त्या अर्थी तत्पूर्वी सुलतान महमद मीर जुम्लाने सुचविल्याप्रमाणे कुत्बशाही घशांत टाकण्यास जात आहे असें बाह्यतः तरी दाखविणे शक्य नव्हते. यामुळें प्रो. सरकार यांचे या बाबतींतील मत ग्राह्य वाटत नाहीं. सरकार, औरंगजेब, व्हॉ. १, पृ. २५२, बर्नीअर पृ. २०, मनुची, व्हॉ. १ पृ. २३४, परिशिष्ट २ पृ. ७१. कर्नाटकाचे बाबतीतहि सर्व जबाबदारी मीर जुम्लावर टाकून अबदुल्ला कुत्बशाहास मी तुमची बाजू घेऊन प्रयत्न केला हे सांगण्यात तरी औरंगजेबाने कुत्बशाहाशी जे वर्तन ठेवलें तें दारा व इतर मंडळीच्या भीतीने आत एक व बाहेर एक असेच होतें असें दिसून येते. सरकार, औरंगजेब, व्हॉ १, पृ. २४६ टीप.

महमद हुसेनसागरास आल्यानंतर त्याजकडे जडजवाहिराचा मोठा नजराणा पाठविला. औरंगजेब २० जानेवारीस दौलताबादेहून निघाला. ता. २१ जानेवारी रोजी कुत्बशाहाचा वकील त्यास जाऊन भेटला. परंतु अद्यापि सर्व मालमत्ता रूजू केली नाही या सबबीवर त्या वकीलाचे त्याने ऐकले नाही. रोजचे रोज नवीन नवीन नजराणे कुत्बशाहा पाठवीत होता. कुत्बशाही वकीलाची अशी संभावना झालेली पाहतांच कुत्बशाहाने आपली सर्व मालमत्ता, जडजवाहीर वगैरे ता. २२ जानेवारी रोजी रात्री गोवळकोड्यास नेले. औरंगजेबाने सुलतान महमदास कुत्बशाहास ठार मारण्याचा हुकूम केला होता. परंतु सुलतान महमद हुसेनसागरास येण्यापूर्वीच कुत्बशाहा गोवळकोड्याच्या किल्ल्यांत जाऊन बसला. ता. २४ रोजी सुलतान महमद हैद्राबादेत शिरला. ता. २२ च्या रात्रीपासून ते ता. २४ च्या दुपारपर्यंत शहरात भयंकर लुटालुट झाली व जाळपोळ केली. कागदसग्रह, ग्रथसग्रह वगैरेचा नाश केला. सुलतान महमदाने स्थिरस्थावर करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु फारसा उपयोग झाला नाही. कुत्बशाहाने रोज मोल्यवान नजराणे व माणसे पाठवून तह करण्याचा शक्य तो प्रयत्न चालूच ठेवला होता. शेवटी कुत्बशाहाने विजापुरकरांची मदत मागितली. ता. ६ फेब्रुवारीस औरंगझेब हैद्राबादेस आला. तेव्हा कुत्बशाही सैन्याने हल्ला चढविला. सायकाळपर्यंत लढाई झाली. तीत दोन्हीहि बाजूंचे बरेच नुकसान झाले. रात्री कुत्बशाही सैन्य जगलात व किल्ल्यांत आश्रयास गेले. दुसऱ्या दिवशी गोवळकोड्याचा वेढा चालू झाला. औरंगजेबाच्या अपेक्षेप्रमाणे शाहिस्तेखानाकडून मदत यावी ती आली नाही व आवश्याच्या तोफाहि आल्या नाहीत. त्यामुळे अकस्मात् छापा घालून कुत्बशाही बुडविण्याचा डाव फसला. कुत्बशाही सैन्य बाहेरून सारखे हल्ले चढवीत होते. किल्ल्यावरून तोफांचाहि मारा चालू होता. परंतु त्याच वेळी तहासाठीहि कुत्बशाहा सारखी खटपट करीत होता. शहाजहानाकडे माफीची याचना केली. उलट औरंगजेबाची आकांक्षा वाढत होती. कुत्बशाही राज्य गिळंकृत करण्याचा त्याचा विचार होता. त्यानें शहाजहानास कुत्बशाहाची अगर त्याच्या तर्फे दारा वगैरेनी केलेली विनति मान्य करूं नये असेंच लिहिलें. परंतु शहाजहानाने दाराच्या विनतीवरून कुत्बशाहानें खंडणी दिल्यास लढाई थांबविण्याचा हुकुम दिला. तो औरंगजेबास ता. २४ फेब्रुवारी रोजी मिळाला. परंतु कुत्बशाहाची विनति मान्य केल्याचें ता. ८ फेब्रुवारीचें फर्मान कुत्बशाहास पोहोचूच दिले नाही. मार्चचे सुरवातीस कुत्बशाहानें आपला जांवई

मीर महमद यास आरंगजेबाकडे पाठवून बोलणे लावले. शाहिस्ताखान व सुलतान महमद याच्या तर्फे हयात बख्श बेगमने स्वतःच भेट घेण्याची इच्छा प्रदर्शित केली. शहाजहानाचे फर्मान आलेच होते व शाहिस्तेखान व सुलतान महमदाने कुत्बशाहाची बाजू घेतल्यानें मागील खडंणीची बाकी व एक कोट रुपयाची पेशकश ,व कुत्बशाहाची दुसरी मुलगी हिचे सुलतान महमदाशी लग्न या अटींवर तह करण्याची तयारी दाखविली. परंतु पेशकशीची रक्कम जबरदस्त असल्याने तह कायम होण्यास बराच अवधि लागला. दरम्यान लढाई चालूच होती. कुत्बशाहाचा सरलष्कर मुसाखान याने किल्ला लढविला. रात्रंदिवस झटून मेहनत घेतली. मोगलातर्फे मीर-इ-मीरान तोफखाना चालवीत होता. तो ता. २७ मार्च रोजी मारला गेला. नंतर ता २९ रोजी शहाजहानाचे आरंगजेबास वेढा तावडतोब उठविण्याबद्दल फर्मान आले. त्यात औरंगजेबाच्या वर्तनाबद्दल शहाजहानाने राग प्रदर्शित केला होता. नाइलाजास्तव ता. ३० मार्च रोजी आरंगजेबाने गोवळकोंड्याचा वेढा उठविला. नंतर चार दिवसांनी सुलतान महमदाचे कुत्बशाहाच्या दुसऱ्या मुलीशी लग्न झाले. ता. १० मार्च रोजी कुत्बशाहाची मुलगी सुलतान महमदाच्या हद्दीत दाखल झाली व कुत्बशाहाने आरंगजेबासमोर कुराण हाती घेऊन राजनिष्ठ राहण्याची शपथ घेतल्यानंतर शहाजहानाचे माफी केल्याचे फर्मान, तहनाम्याच्या अटी मान्य केल्याचे शहाजहानाच्या दसकर्तीचे फर्मान, वस्त्रे वगैरे ता. १३ एप्रिल रोजी कुत्बशाहाकडे पाठविली. हयात बख्श बेगम व औरंगजेबाचा जनानखाना याच्या विनंतीवरून पेशकशीच्या २५ लाख रुपयांच्या पहिल्या हप्त्यातून दहा लाखांची सूट मिळाली व नंतर शहाजहानाने खडंणीच्या किमतीच्या फरकाबद्दल द्याव्या लागणाऱ्या पैशातून वीस लाखांची सूट दिली. कुत्बशाहाला रामगीरचा प्रांतहि हातचा घालवावा लागला. मोगली सैन्य ता. २१ एप्रिल रोजी हैद्राबादेहून निघाले व कंदाहारावरून परत दौलताबादेस गेले.[२५०]

मोगली सैन्य परतल्यानंतर कुत्बशाहाने गोवळकोंड्याच्या तट दुरुस्तीचे वगैरे काम मुसाखानाकडे सोपविले. किल्ल्यासभोवतालील चार मैलापर्यंतची घरे वगैरे पाडून रुंदक वाढण्यास सुरुवात केली. तरहि उंच केला. धर्माचार्य नावाच्या खास

२५०. सरकार, औरंगजेब, ब्रह्मा. १, पृ.२११-४१; मनुची, ब्रह्मा. १, पृ. २३१-४, बादशाहनामा, इलिअट डॉसन, ब्रह्मा. ७, पृ. १०६-१९. ए. इ मॉ., १९१३-१४ पृ. ५२-५५.

अधिकाऱ्याची त्या कामावर देखरेख होती. हे काम बरीच वर्षे चाललें. हि. १०७७ (इ. स. १६६६)त तें पूर्ण झाले.[२५१]

कुत्बशाहाशी एप्रिलमध्ये तह झाला. परतु मीर जुम्लाने मिळविलेला कर्नाटकातील प्रांत त्याची जहागीर म्हणून मोगलाकडे द्यावा असा औरंगजेबाने आग्रह धरला. त्याने वारवार लिहून व मीर जुम्ला शहाजहानास भेटला तेव्हा त्यांच्या तर्फे बोलणें लावून कुत्बशाहास फर्मान आणले की, कर्नाटक प्रांतांतील तुमचे सर्व अधिकारी काढून घ्यावेत व मीर जुम्लास कुत्बशाही राज्यात पूर्ववत् व्यापार करू द्यावा. अबदुल्ला कुत्बशाहास हा हुकूम मान्य करणे भाग होते. परतु कुत्बशाही सरदारानीं कर्नाटकाचा तावा हातून न जाऊ देण्याचे शक्य ते प्रयत्न केले व मीर जुम्लाच्या सरदारास तावा देण्यास दिरंगाई केली. मीर जुम्लाने दहा हजार घोडदळ पाठविलें. या सैन्यास ५०,००० कर्नाटकी सैन्य मिळालें. परतु कुत्बशाही सरदारानी कर्नाटकांतील जमिनदार व मांडलिक यास चिथावून त्यांस बंडास प्रवृत्त केलें. श्रीरंगरायासहि उठवून त्यास आपला मुख्य पक्ष घेण्यास उत्तेजित केलें. श्रीरंगरायाचा सासरा वेंगम नायक हा ८००० सैन्यानिशी पेटापोलमवर चालून गेला. परतु मीर जुम्ल्याचा सरदार मीर सय्यद अली त्यास तोंड न देता पुलिकतास गेला. तेव्हां कोनेर चेटीने पुलिकत व पुनामल्लीस वेढा घातला. जिकडे तिकडे अशा तऱ्हेने गोंधळ माजल्यामुळे मीर जुम्लाच्या सरदारांचा धीर सुटत चालला. तिरुपति, चिंगलपुट, पुलिकत वगैरे प्रांत श्रीरंगाने घेतला. कुत्बशाही सरदारानीहि शक्य तो अडथळा केला.[२५२]

हि. १०६७ (१० आक्टोबर १६५६ ते २८ सप्टेंबर १६५७ इ. स.).—श्रीरंगाने मीर जुम्ल्याच्या कर्नाटकातील सरदारांचा पराजय केला व कुत्बशाही कर्नाटकांतील बराच भाग त्याने परत घेतला.[२५३]

औरंगजेबाने इ. स. १६५७त आदिलशाहीवर स्वारी करण्याची तयारी केली. मीर जुम्लास तिकडे जाण्याचा हुकूम झाल्याने कर्नाटकाचा बंदोबस्त व्हावा तसा राहू शकला नाही. औरंगजेबाने कुत्बशाहास पत्रे लिहून त्याच्या

२५१. ए. इं. मॉ., १९१३-१४, पृ. ५२-५४, मद्रास ते सुरत, पत्र १६ जुलै १६५६, इं. फॅ. इन इं., १६५५-६०, पृ. ९१.

२५२. सायमंडचें पत्र, २ ऑगस्ट १६५६, मद्रास पत्रें, ७ जुलै १६५६, २१ आक्टोबर १६५६, ५ नवेंबर १६५६, व २८ जानेवारी १६५७, इं. फॅ. इन इं., १६५५-६०, पृ. ९०-९९; सरकार, औरंगजेब, व्हॉ. १, पृ. २४२-५१.

वर्तनाबद्दल त्याला जरबहि देण्याचा प्रयत्न केला. परंतु शहाजहानाच्या दुखण्याने व आदिलशाहावर केलेल्या स्वारीचा फायदा घेऊन कुत्बशाहाने मीर जुम्ल्याच्या सरदारांपासून प्रांत सोडविण्याची खटपट चालूच ठेवली. शेवटी गडिकोटा, सिद्धौत वगैरे किल्ले घेतल्यानें कुत्बशाहास पुन्हां कर्नाटकात हातपाय पसरण्यास अवसर मिळाला.[२५३]

हि. १०६८ (२९ सप्टेंबर १६५७ ते १८ सप्टेंबर १६५८ इ. स.).— मीर जुम्ल्याचा सरदार तुपाकी कृष्णप्पा याने फोर्ट सेंट जॉर्जला सप्टेंबर १६५७त वेढा घातला. तोफांच्या अभावी त्या वेढ्यापासून काहींच निष्पन्न झालें नाही. शेवटी १९ एप्रिल १६५८ रोजी वेढा उठविला.[२५३]

वळीरावाने पुनामल्लीस वेढा घातला होता. तोहि कृष्णाप्पा व अय्यापा नायकांच्या सांगण्यावरून त्याने उठविला.[२५३]

कृष्णाप्पाने चिनाताबी मुदलिआर यास पुलिकतवर पाठविले. त्यानें तेथे जाऊन मीर जुम्ल्याचा सरदार सय्यद अली यास ठार मारले व शहर ताब्यांत घेतलें. पुनामल्लीच्या लोकानी बंड केले म्हणून मुदलिआर पुलिकतहून पुनामल्लीवर चालून गेला.[२५३] तुपाकी कृष्णाप्पाहि त्यास जाऊन मिळाला. परंतु पुनामल्लीच्या लोकांनी कुत्बशाहाच्या मदतीवर विश्वासून किल्ला निकराने लढविला. आक्टोबर १६५८ मध्ये कुत्बशाहाचा सरदार कुली बेग याने जाऊन लढाई दिली. त्यांत तुपाकी कृष्णाप्पाचा पूर्ण पराभव झाला. तो जखमी होऊन कद झाला. नंतर कुली बेगने मद्रास या सभोवतालील सर्व मुलूख काबिज केला.[२५४]

हि. १०६९ (१९ सप्टेंबर १६५८ ते ८ सप्टेंबर १६५९ इ. स.).— चंद्रगिरीचा राजा व कुत्बशाहा यांची लढाई चालूच होती.[२५५]

कुत्बशाहाने मच्छलीपट्टणास ब्राह्मण सुभेदार त्या मुलखाचा बंदोबस्त करण्यास पाठविला. त्यास डच व इंग्रज वखारवाल्यानी पेशकशी दिल्या.[२५६]

---

२५३. मद्रास, पत्रें, १४ जून, २२ जुलै व आगस्ट १६५८, इ. फॅ. इन ई., १६५५-६०, पृ. १७४-६.

२५४. मद्रास, पत्र, २८ आगस्ट १६५८, इं. फॅ. इन इं., १६५५-६६, पृ. १७५-६; हेग ट्रॅन्सक्रिप्टस, मा. १, भा. २३, नं. ६३९.

२५५. मद्रास, पत्र, ८ आगस्ट १६५९, ई फॅ. इन. इं., १६५५-६६ पृ. २५७.

२५६. मच्छलीपट्टण, पत्र, १४ जाने. १६६० इं. फॅ. इन. इ., १६५५-६०, पृ. २५८.

हि. १०७० (९ सप्टेंबर १६५९ ते २७ आगस्ट १६६० इ.स.).— मीर जुम्लाच्या कर्नाटकाच्या प्रांतात नीट व्यवस्था लागेना. म्हणून औरंगजेबाने मीर अहमद खाफीस मुस्तफाखान असा किताब देऊन या वर्षाचे सुरुवातीस बंदोबस्ताकरिता पाठविलें.[२५७]

हि. १०७१ (२८ आगस्ट १६६० ते १६ आगस्ट १६६१ इ. स.).— नेलोर परगण्यात एक देऊळ पाडून मशिद बांधली.[२५८]

औरंगजेबाने शाहिस्तेखानास दक्षिणेत शिवाजीवर पाठविल्यावरून तो जानेवारी १६६१च्या सुमारास दक्षिणेत आला. कुत्बशाहाने आपली खडणी चुकती केली होती. परतु ती रुपयात दिली होती. औरंगजेबाने ती पगोड्यात पाहिजे असल्याचें कळविले. नवीन १२८ पगोड्यांची किमत जुन्या १०० पगोड्यांइतकी उतरल्यानें कुत्बशाहाने थोडी दिरंगाई लावली. तेव्हां शाहिस्तेखानास ती जरब दाखवून वसूल करण्याचा हुकुम झाला असल्याने त्याने गोवळकोंड्यावर चालून जाण्याचें ठरविले. कुत्बशाहाने सैन्याची भरती करण्यास सुरुवात केली व किल्ल्याचीहि डागडुजी केली. ४० लाख होन खडणीबाबत भरले. शेवटी तफावतीचीहि भरपाई केल्याने लढाईचा प्रसंग टळला.[२५९]

इंग्रज, डच वगैरेकडील कर वसूल करण्यासाठी कुत्बशाहाने मुसलमान सरदार मोठ्या सैन्यानिशी मच्छलीपट्टणास रवाना केला.[२६०]

इंग्रजांनी आपल्या कोलीअरच्या तर्फे सेंट थोमवरून पोर्तुगीजांना काढून लावण्याबद्दल बोलणे लावले. कुत्बशाहा आजारीच असल्याने त्याने मीर हकीम मुल्क

२५७. औरंगजेबनामा, हिंदी, देवीप्रसादजी मुन्सिफकृत भा. १, पृ. ४७.

२५८. V. R 11, Nellor. 787. B. and V. C. 1381. सिवेलकृत 'दक्षिण हिंदुस्थानांतील शिलालेख' पृ. २८२.

२५९. मॉन्युमेंटा हिस्टॉरिआ इंडिया, १६६१, जर्नल ऑफ दि बॉबे हिस्टॉरिकल सोसायटी, व्हॉ. २, नं. २, सप्टेंबर, १९२९, पृ. २६४-५; मद्रास, पत्र, १९ फेब्रुवारी १६६१, इं. फॅ. इन इं., १६६१-४, पृ. ३५; मनुर्शा, भा. २, पृ. २५; डाग रजिस्टर १६६१, नवीन भाग १८, पृ. ३२१.

२६०. मच्छलीपट्टण, पत्र, १५ फेब्रुवारी १६६१, इं. फॅ. इन इं., १६६१-४, पृ. ३९.

(Mr. Hakkim Molk) सरलष्कर याजकडे तो कारभार सोपविला. कांहींहि निश्चित झालें नाही.[२६१]

अबदुल्ला कुत्बशाहानें आपली तिसरी मुलगी अबुल हसन यास दिली. मुसाखान व सय्यद मिरजाफर यांनी तें लग्न जुळविण्यांत बरीच खटपट केली.[२६२]

हि. १०७२ (१७ आगस्ट १६६१ ते ५ आगस्ट १६६२ इ.स.).— कुत्बशाही सरलष्कर रेझा कुली उर्फ नेकनामखान याने सेंट थोमच्या पोर्तुगीजाजवळ दोन मोठ्या तोफा मागितल्या. त्या त्यांनी देण्याचें नाकारलें. या कारणावरून रेझा कुलीनें किल्ल्यास वेढा दिला. यापूर्वी डच टपून बसले होते. तेव्हा त्याची मदत मिळणें शक्य नव्हतें. म्हणून पोर्तुगीजांनीं इंग्रजाची मदत मागितली. ती त्यानी दिली नाही. उलट रेझा कुली व सेंट थोमच्या शहरवासीयानी त्यांस मदत न केल्याबद्दल दोष दिला. नेकनामखानाने जोराचे हल्ले चढविले व दाणागोटाहि बद केला. शेवटीं पोर्तुगीजानीं सेट थोम ता. १ मे १६६२ रोजी नेकनामखानाचे हाती दिला व पोर्तुगीज मद्रासला पळून गेले. नेकनामखानानें ५००–६०० घोडेस्वार सेट थोमच्या सरक्षणार्थ ठेवले.[२६३]

हि. १०७३ (६ आगस्ट १६६२ ते २५ जुलै १६६३ इ. स.).— तजावरचा नायक व आदिलशाहा याची लढाई चालू असल्याने नेकनामखान आपल्या सैन्यानिशी तिरुवेल्लराला जाऊन बसला.[२६४]

मच्छलीपट्टणचा सुभेदार फतुल्लाखान यांचें आणि इंग्रजांचे भाडण आलें. कुत्बशाहाचा सरखैल (the next man to the king) सय्यद मीर जाफर याजकडे मारहाण केल्याबद्दल तक्रार नेली. कुत्बशाहानें ती अमान्य केली व नुकसान झालेंच असेल तर त्याचा विचार करण्याचे आश्वासन दिले. फतुल्लाखानाने

२६१. मॉन्युमेंटा हिस्टॉरिआ इंडिया, १६६१, जर्नल ऑफ दि हिस्टॉरिकल सोसायटी, व्हॉ. २, नं. २, सप्टेंबर १९२९, पृ. २६०–६५.

२६२. परिशिष्ट १, पृ.६–१३ व परिशिष्ट २, पृ. ७९–८२.

२६३. मनुशी, भा. ३, २७५–६; मद्रास, पत्रें, ११ मार्च, ७ एप्रिल व १२ मे १६६२, ३० जानेवारी १६६३, इं. फॅ इन इं., १६६१–४, पृ १४६, २५८–६४.

२६४. मद्रास, पत्र, १६ नवंबर १६६२, इं. फॅ. इन इं., १६६१–४, पृ. १७४.

कुत्बशाही तराफ्यांस समुद्रांतील परवाने देण्यांत दिरगाई केली होती. ते इंग्रजांनीं ताबडतोब दिले.[२६५]

मार्च १६६३त मच्छलीपट्टणास बड झालें. मोठमोठ्या लोकांत मारामारी लागली. बरेच लोक प्राणास मुकले. २००० घोडदळ व २०००० पायदळ बदोबस्तास गेले.[२६६]

हि. १०७४ (२६ जुलै १६६३ ते १४ जुलै १६६४ इ. स.).— नवाब मीर जाफर कांही दिवस आजारी पडून १६३३च्या जुलैत वारला.[२६६अ]

इंग्रजाकडून करवसुलीचा हप्ता बरोबर आला नाही. तेव्हां नेकनामखानानें आपल्या तीसचाळीस हजार सैन्यासह फोर्ट सेंट जॉर्जजवळ इ. स. १६६३च्या आक्टोबर-नवंबरांत तळ दिला. इंग्रजांचा व नेकनामखानाचा हिशेब मिटेना. कुत्बशाहाने काही जरुरीच्या कामासाठी नेकनामखानाला परत गोंवळकोड्यास ताबडतोब बोलाविल्यानें हिशेब तसाच गोधळांत राहिला. शेवटी इंग्रजांनी मुसाखानास पेशकश व इतर नजरनजराणे पाठवून भाडण मिटविण्याचा प्रयत्न केला.[२६७]

सयामच्या राजाचा हेजीब कुत्बशाहाच्या मुलाखतीस आला. बरोबर बरेच हत्ती वगैरे सामान आणले होते.[२६८]

हि. १०७५ (१५ जुल १६६४ ते ४ जुले १६६५ इ. स.).— (आक्टोबर-नवंबर १६६४) गोवळकोड्यांत हिंदु-मुसलमानांत मोठी तंढ आली. त्याचा इतरत्रहि परिणाम झाला.[२६९]

---

२६५. मच्छलीपट्टण, कन्सल्टेशन, ४ नवंबर, मद्रास, पत्र, १७ डिसेंबर १६६२, १० जानेवारी १६६३, इं. फं. इन इं, १६६१–४, पृ. १७३, १७५–६.

२६६. मच्छलीपट्टण, पत्र, २ एप्रिल १६६३, इं. फॅ. इन इं., १६६१–६४,पृ.२६८.

२६६अ. मद्रास, पत्र, २० जुलै, १६६२, ओल्ड मद्रास ऱ्हेस्टिजिस, भा. १, पृ. २१२.

२६७. मद्रास, पत्रें, ३० जुलै, १० डिसेंबर १६६३, ७ जानेवारी व १८ आक्टोबर १६६४ व ९ जानेवारी १६६६, इं. फॅ. इन इं., १६६१–४, पृ. २७७–८.

२६८. मद्रास, पत्र, १६ व २५ एप्रिल १६६४, इं. फॅ. इन इं., १६६१–४, पृ. ३६३–४.

२६९. मद्रास, पत्र, १८ डिसेंबर १६६४, इं. फॅ. इन इं., १६६१–४, पृ. ३८२–४.

या वर्षाचे सुरुवातीस शिवाजीला आदिलशाहा व कुत्बशाहा यांची आंतून मदत असल्यामुळें त्यानें सुरत लुटलें असा आरोप ठेवून सुरतेच्या नुकसानीची भरपाई करण्याबद्दल औरंगजेबानें कुत्बशाहाशीं बोलणें लावलें.[२७०]

डच वखारवाल्यांनी सरखेल सय्यद मुझाफरातर्फे पुलिकतच्या वखारीस कोट बांधण्याची कुत्बशाहाची परवानगी मिळविली.[२७१]

कुत्बशाहानें औरंगजेबाकडे जो खंडणीचा भरणा केला होता त्यातील पुलिकत येथें पाडलेल्या रुपयाबद्दल बरीच तक्रार आली. त्यावरून नेकनामखानाने डचांस दोष दिला. कुत्बशाहाहि आपल्या अधिकाऱ्याच्या निष्काळजीपणाबद्दल त्याच्यावर रागावला.[२७०]

या वर्षाचे अखेरीस डच वखारवाल्यानी कुत्बशाहास उत्तम हत्ती नजर केला. कुत्बशाहानें डचांस मच्छलीपट्टण येथें अद्याप घरे बांधण्यास परवानगी दिली. मच्छलीपट्टणांत तेथील सुभेदाराच्या जुलुमामुळे लागलेली भाडणे मिटली व लोक स्थिरस्थावर होऊ लागले.[२७१]

हि. १०७६ (५ जुलै १६६५ ते २३ जून १६६६ इ. स.).—इ. स. १६६५च्या मार्चच्या अखेरीस जयसिग दक्षिणेत आला. येतांच कुत्बशाहा व आदिलशाहा यांच्याशी मागील खंडणी वगैरेबद्दल बोलणें लावून लढाईची दहशत दाखविली. परतु या दोन्हीहि शाहानी पडतें घेऊन तह कायम ठेवण्याचा प्रयत्न केला. जयसिगानें निर्णयात्मक कांहीच ठरू दिले नाही. त्यामुळे कुत्बशाहाने नेकनामखानास मोठ्या सैन्यानिशी सरक्षणार्थ सरहद्दीवर ठेवले व जयसिग-शिवाजी यांची लढाई चालू असतां मोगलास स्वामिनिष्ठेची पत्रे पाठवीत राहून शिवाजीसहि सैन्याची वगैरे मदत केली.

जयसिगानें या दक्षिणी त्रयीतून शिवाजीस प्रथम फोडून त्याला आदिलशाहाशी लढण्यास उद्युक्त केलें. नतर जुलै-आगस्टमध्ये कुत्बशाहाशी बोलणे लावून त्याला आदिलशाहास मदत न करण्याविषयी लिहिले. त्याचप्रमाणे मैत्री वृद्धिगत करण्यासाठीं कांहीं सुटी वगैरेहि देण्याचे आश्वासन दिले. नतर २९ डिसेंबर १६६५

---

२७०. मॉन्युमेंटा हिस्टॉरिआ इंडिआ, ९ आक्टोबर १६६४चा वृत्तांत, जर्नल ऑफ दि बॉंबे हिस्टॉरिकल सोसायटी, व्हॉ ३, नं. २, सप्टेंबर १९३०, पृ २७८-९, २८२.

२७१. मॉन्युमेंटा हिस्टॉरिआ इंडिआ, जर्नल ऑफ दि बॉंबे हिस्टॉरिकल सोसायटी, व्हॉ. ४, नं. १, मार्च १९३१, पृ. ७७.

रोजी जयसिंग सैन्यासह विजापुराजवळ आला. तेव्हा कुत्बशाहानें नेकनामखानास आदिलशाहाच्या मदतीस जाण्यास सांगितलें. नेकनामखानाबरोबर बारा हजार घोडदळ व चाळीस हजार पायदळ होते. जयसिंगाने कुत्बशाही सैन्य आदिलशाहाच्या मदतीस येत आहे असे ऐकून ता. ५ जानेवारी १६६६ रोजीं वेढा उठविला व मोगली सैन्यास मागे परतण्याचा हुकूम दिला. कुत्बशाही सैन्य जानेवारीच्या अखेरीस विजापुरास पोहोचले. आदिलशाहाने नेकनामखान व त्याच्या सैन्यास शहरांत सन्मानाने आणण्याचा हुकूम दिला व अलीबुरुजासमोर मुजरा घेतला. नंतर आदिलशाही सैन्य एका बाजूवरून व कुत्बशाही सैन्य दुसऱ्या बाजूवरून मोगलावर हल्ले चढविण्यास विजापुराहून निघाले. मोगली सैन्य आपल्या मुलखात गेल्याने कुत्बशाही सैन्यास लढाई देण्याचा प्रसगच आला नाही. शेवटी मोगल-आदिल-कुत्बशाहा याचा तह झाला व त्याची सैन्ये आपआपल्या राज्यांत परत गेली.[२७२]

मद्रासच्या पोर्तुगीज व काही इंग्रज वखारवाल्यांनी गडबड केल्यावरून नेकनामखानाने तेथील सैन्याकडून फोर्ट सेंट जॉर्जला वेढा देवविला.[२७२अ]

हि. १०७७ ते १०७९ (२४ जून १६६६ ते २१ मे १६६९ इ.स.).— कर्नाटकांत या वेळपर्यंत तनखा देऊन सरकारी सुभेदार नेमले जात असत. त्याऐवजी या वर्षी तेथे लहान लहान जहागिरी निर्माण करून त्या ठराविक भाडे-पट्ट्याने अगर खंडणीने दिल्या.[२७३]

शिवाजी आग्र्याहून १७ आगस्ट १६६६ रोजी निसटला. गोवळकोंडा प्रांतांतून हैद्राबादेवरून तो परत दक्षिणेत आला. येताच कुत्बशाहाशी खलबत करून दोघांनी मिळून राज्याचा विस्तार करण्याचे ठरविले. लढाईची चागली तयारी केली. सर्व प्रकारची मदत कुत्बशाहाने द्यावी व शिवाजीनें किल्ले काबिज करावेत

२७२. प्रो. सरकार, औरंगजेब, व्हॉ. ४, पृ. १०१, १०६, ११४, ११८, १२३; फिंच मॅन्यु, भा. १, पृ ३३६; सारसंग्रह, पृ. २८७; बु. स ६०२–५; पेजापोल्लम, पत्र, २३ जानेवारी १६६६, इं. फॅ. इन इं., १६६५–७, पृ. २२८.

२७२अ. मद्रास, पत्र, २० एप्रिल १६६६, सुरत, पत्र, १८ डिसेंबर १६६५. इ. फॅ. इन इं., १६६५–७.

२७३. मच्छलीपट्टण, पत्र, ७ जानेवारी १६६७, इं फॅ. इन इं., १६६५–७, पृ. २५४.

असें ठरलें. आदिलशाहीतील व नंतर मोगली हद्दीतील बरेच किल्ले घेतले. त्यांपैकी एकदोन फक्त कुत्बशाहाच्या हवाली झाले. बाकीचे शिवाजीनें बळकाविले.[२७४]

हि. १०८० (२२ मे १६६९ ते १० मे १६७० इ. स.).— (आक्टोबर १६६९) कुत्बशाहाच्या हेजिबाने औरंगजेबाची भेट घेतली. एक हजार मोहरा व पधरा हत्ती नजर दिले.[२७५]

हि. १०८२ (१ मे १६७१ ते १८ एप्रिल १६७२ इ. स.).— अबदुल्ला कुत्बशाहानें मुसाखानाकडून एक मशिद बाधविली.[२७६]

हि. १०८३ (१९ एप्रिल १६७२ ते ८ एप्रिल १६७३ इ. स.).— रविवार च. ३ मोहरम हि. १०८३ (२१ एप्रिल १६७२) रोजी अबदुल्ला कुत्बशाहा वारला.[२७७] अबदुल्ला कुत्बशाहानें मृत्यूपूर्वी आपल्या वजिरांस बोलावून आणून आपले मागें राज्य अबुल हसन यास देण्याबद्दल सागितले होतें. परतु अबदुल्ला कुत्बशाहा मरताच त्याची वडील मुलगी 'फतिमा खानन ऊर्फ मा साहेबा खानिझ-इ-कातन' हिने आपल्या सावत्र मुलास तख्तावर बसविण्याचा प्रयत्न केला. तिचा नवरा मिर्झा निजामउद्दीन अहमद यास त्याच्या चढेल स्वभावामुळे मोठ-मोठ्या वजिरांपैकी कोणीच साहाय्य केले नाही. फतिमा खाननने आपल्या तुर्की व सिद्दी नोकराच्या साहाय्याने राजवाडा ताब्यात घेतला. परतु मुसाखान, सय्यद मुझाफर आणि त्याचे पेशकर मादण्णा व आक्कण्णा व मलिक मिश्क मिया यांनी स्थिरस्थावर करून अबुल हसन यास तख्तावर बसविले. मिर्झा अहमद व त्याचा मुलगा मीर अली यांस केद केले.[२७८]

अबदुल्ला कुत्बशाहास एक मुलगा व तीन मुली झाल्या. मुलगा आठ महिन्यांचा होऊन ३१ डिसेंबर १६३२ रोजी रात्री वारला.[२७३]

---

२७४. मुंतखब-उल लुबाब, इलिअट डॉसन, ह्यॉ. ७, पृ २८६–७, मच्छलीपट्टण, पत्रें, १६ जुलै व ३ आणि २१ सप्टेंबर व सुरत, पत्र, नवंबर १६६६, इं. फॅ. इन इं., १६६५–७, पृ. २४५, २४७, २४९, १७५–६; जेधे शकावली.

२७५. औरंगजेबनामा, भाग २, देवीप्रसाद मुन्सिफकृत, पृ. १९.

२७६. शिलालेख, ए. इं. मॉ., १९१७–८, पृ. ५०.

२७७. कबरीवरील शिलालेख, ए. इं. मॉ., १९०७–८, पृ. २६, १९१५–६, पृ. ४०; परिशिष्ट २, पृ. ६७;

२७८. परिशिष्ट १, पृ. १४–५ व परिशिष्ट २, पृ. ८८–९०.

अबदुल्ला कुत्बशाहास बुधवार च. ६ रमझान हि. १०४० (३० एप्रिल १६३१ इ. स.) रोजी एक मुलगी झाली.[२७९] ही बहुधः वडील मुलगी असावी. हिचे लग्न मिर्झा निजामउद्दिन अहमदाशी झाले. हा इराणचा शाहा आबास दुसरा यांचा भाचा असून[२८०] मदिनाचा रहिवाशी होता. याचे पहिले लग्न मक्केस झालें. या पत्नीपासून त्याला सय्यद अली नांवाचा एक मुलगा मदिना येथे जुलै १६४२ इ. स.त झाला. त्यानतर मिर्झा निजामउद्दिन हैद्राबादेस आला व त्याचे अबदुल्ला कुत्बशाहाच्या वडील मुलीशी इ. स. १६५६ पूर्वी लग्न झाले. याचा मुलगा सय्यद अली मासुम हाहि १८ डिसेंबर १६५७ रोजी हैद्राबादेस आला. हे दोघेहि हैद्राबादेस राहात असत. मिर्झा निजामउद्दिन हा कुत्बशाही सरदाराशी नीटपणे वागत नसे. त्यास स्वतत्र अधिकार दिला नव्हता. हा व सय्यद अली यास अबदुल्ला वाग्नांच कैदेत टाकले. मिर्झा अहमद कैदेत असतानाच शनवार च. २६ सफर हि. १०८५ रोजी (२३ मे १६७४ इ. स.) सायकाळी वारला.[२८१] त्याची बायको फतिमा खानन ऊर्फ मा साहेबा खानिझ-इ-कातन ही च. २० रुव्वाल हि. १०८७ (१६ डिसेंबर १६७६ इ. स.) रोजी वारली.[२८२] तिचा सावत्र मुलगा सय्यद अली इ. स. १६८२चे सुरुवातीस कैदेतून पळाला व बऱ्हाणपुरास जाऊन औरगजेबास भेटला. त्याने त्याला नोकरीत घेतलें. दीडहजारी दिली. सय्यद अली औरगजेबाबरोबर औरगाबादेला (२२ मार्च १६८२ इ. स.) आला. त्यानें त्याला औरगाबादेची फौजदारी (Haris) दिली. तेथे तो बरेच दिवस होता. नतर त्याला माहुर वगैरे किल्ल्याची हवालदारी मिळाली. नतर तो बऱ्हाणपुरचे दिवाणीचे कामावर होता. पुढे काही दिवसानी यात्रेस जाण्याची परवानगी घेऊन मेशेद, इस्पहान वगैरे ठिकाणी गेला. शेवटी त्याने शिराझ शहरी पाठशाळा काढली व तेथेच तो इ. स. १७०५त वारला. याने बरेच ग्रथ लिहिले.[२८३]

अबदुल्ला कुत्बशाहाची दुसरी मुलगी आरगझेबाचा वडील मुलगा सुलतान महमद यास दिली होती. तिचे ४ एप्रिल १६५२ रोजी लग्न झालें व ती ता. १०

२७९. कबरीवरील शिलालेख, ए. इं. मॉ, १९२३–४, पृ. ३२.

२८०. कबरीवरील शिलालेख, ए. इं. मॉ, १९१५–६, पृ. ४०; ए. इ. मॉ, १९०७–८, पृ. २६वर तिचे कबरीवरील याच शिलालेखातील तारीख १३ सव्वाल हि. १०८७ (९ डिसेंबर १६७६ इ. स.) दिली आहे.

२८१. परिशिष्ट १, पृ. ५; परिशिष्ट २, पृ. ८३–८६.

एप्रिल रोजी सुलतान महमदाकडे गेली.[२८०] सुलतान महमद ८ जून १६५९ रोजी सुजास मिळाला. नतर आठ महिन्यांनी तो परत बापाकडे आला. औरगजेबानें त्याला ग्वाल्हेर येथें कैदेंत ठेवलें. इ. स. १६७२च्या डिसेंबरांत त्यास कैदेतून मुक्त करून दिल्लीस आणलें. नतर तो ३ डिसेंबर १६७६ रोजी वारला.[२८२]

अबदुल्ला कुत्बशाहाची तिसरी मुलगी अबुल हसन ऊर्फ तानाशाहा कुत्बशाहास दिली होती. हिचें इ. स. १६६०त लग्न झालें. हिला अबदुल्लाच्या मृत्यूपूर्वी दोन मुली व एक मुलगा झाला होता.[२८३] या मुलालाच बदी सुलतान या नांवाने संबोधले गेलें असावें. औरंगजेबानें यास कुत्बशाही बुडविल्यानतर दरबारांत दाखल करून घेतलें होतें. परतु कुत्बशाही सरदार याला मान देतात हे पाहून त्याला दरबार मना केला.[२८४]

अबदुल्ला कुत्बशाहाने आरबी व फारसी जाणणारे लोक जवळ ठेवून तत्कालीन उत्तम उत्तम ग्रथ वाचवून घेतले होते. याच्या कारकीर्दीत लेखकवर्गास बरेच उत्तेजन मिळालें व पुष्कळ ग्रथ लिहिले गेले. 'बरहाण-इ-काटेआ' नावाचा फारसी शब्दकोश अबदुल्ला कुत्बशाहासच ग्रथकर्त्यानें अर्पण केला. मगळवार हा आठवड्याच्या सुटीचा दिवस ठरविला. पुष्कळ शाळा (मदारिस-इ-अली) काढून त्यावर पगारी शिक्षक नेमले.[२८५]

२०. मीर जुम्ला:—महमद सय्यद हा इराणातील आर्दिस्तानचा राहणारा. हा एका तेलाच्या व्यापाऱ्याचा मुलगा. हा तरुणपणीच (१६३० इ. स.) हैद्राबादेस आला व एक जडजवाहीर विकणाऱ्या व्यापाऱ्याजवळ राहून बराच पैसा मिळविला. इ. स. १६३६च्या अखेरीपर्यंत तो व्यापारच करीत असावा.[२८६] लवकरच अबदुल्ला कुत्बशाहाच्या मर्जीत आल्यानें त्याला त्याने नोकरीत घेतले. नोकरीत घेतल्यावरहि त्यास स्वतत्र व्यापार करण्याची परवानगी होती. मिर्झा हमजास इ. स. १६३३त सरखेली दिली होती.[२११] बहुधः इ.स. १६३७त मिर्झा

२८२. प्रो. सरकार, औरगजेब, व्हॉ. ३, पृ. ४३–४.
२८३. परिशिष्ट १, पृ. १४–५.
२८४. परिशिष्ट २, पृ. १८२–३.
२८५. परिशिष्ट २, पृ. ५७–८ व ६८.
२८६. सुरत डायरी, २५ डिसेंबर १६३६, इं. फॅ. इन इं., १६३३–३६, पृ. ३१५.

इमजाची सरखैली सय्यद महमद अमीनास दिली असावी.[२८७] सय्यद महमदानें व्यापारासाठीं स्वतःचीच गलबते (Junks) बांधण्यास सुरुवात केली. पहिलें ८०० टनी गलबत नरसापुरास इ. स. १६३८ जुलैत बाधले.[२८८] इराणापर्यंत ही गलबतें जाऊ लागली. इ. स. १६४३त इंग्रज वखारवाल्यासहि शेकडा दीड टक्के व्याजानें रकमाहि देऊ केल्या. मीर महमद अमीन इ. स. १६४६च्या अखेरीस 'गोवळकोंडा राज्यांतील सर्वसत्ताधीश वजीर व सरखैल' समजला गेला.[२८९] इ. स. १६४५च्या अखेरीस कुत्बशाहानें कर्नाटकात श्रीरंगावर स्वारी केली. सय्यद महमदास मुख्य सेनापती नेमले. बहुधः त्या वेळी सय्यद महमदास मीर जुम्लतीचा अधिकार मिळाला असावा.[२९०] इ. स. १६४६च्या अखेरीस त्याला 'अल-नवाब' म्हणून संबोधू लागले असावेसे दिसते.[२९१] इ. स. १६४७च्या पावसाळ्यात तो युरोपिअन लोक नोकरीस ठेवू लागला. मोठमोठ्या तोफाहि त्यानें विकत वगैरे घेतल्या.[२९२] इ. स. १६५१च्या सुरुवातीस मीर जुम्ल्याच्या संपत्तीचे व सपत्तीचे पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे. "सर्व राज्याचा कारभार जवळ जवळ त्याच्याच अनुमतीने चालतो. कुत्बशाहाच्या खालोखाल यालाच सर्वजण मान देतात. त्याने वार्षिक वीस लाख पगोड्यांचा प्रांत अधिक मिळवून दिला आहे. कर्नाटकाचा जवळ जवळ सर्वच भाग त्याने जिंकला. या प्रांतात सर्व तऱ्हेचे कापड होते. जडजवाहीर, लोखंड, पोलाद, सोडा वगैरे जिन्नस येथे सर्वच मिळतात. हिंदु राजाकडून वार्षिक चाळीस लाखांची खंडणी वसूल करतो. त्याच्या खास मालकीचे चार हजार घोडे, तीनशें हत्ती, चारपांचशे उंट, दहा हजार बैल असून त्याचा व्यापार गोवळकोंडा, विजापूर, व मोगली प्रांतात चालतो. शिवाय पेगु, तेनासरी, आचीन, आराकन, इराण,

२८७. मच्छलीपट्टण, पत्र, २६ सप्टेंबर १६३७, इं. फॅ. इन इं., १६३७–४१, पृ. ३०. या पत्रात सरखैलीचा प्रथम उल्लेख आला आहे.

२८८. सुरत, पत्र, २६ जुलै १६३८, इं. फॅ. इन इं.,१६३७–४१, पृ. ८०.

२८९. सुरत, पत्र, १७ जानेवारी १६४३, इं. फॅ. इन इं., १६४२–४५, पृ. ८८.

२९०. मद्रास, पत्र, २१ जानेवारी १६४६ व १० फेब्रुवारी १६४६, इं. फॅ. इन इं., १६४६–५०, पृ. २५६ या पत्रात प्रथमतःच सय्यद महमदास मीर जुम्ला म्हटल्याचें आढळतें.

२९१. मद्रास, पत्र, ४ जानेवारी १६४७, इं. फॅ. इन इं., १६४६–५०, पृ. ७०.

२९२. मद्रास, पत्र, ९ आक्टोबर १६४७, इं. फॅ. इन इं.,१६४६–५०, पृ. १६६.

बंगाल, मक्का, मेदक, मालदीव व मादागस्कर या बदरांतहि त्याची गलबते जातात व व्यापार करतात. त्याचीं सध्यां दहा मोठीं गलबते असून तो आणखीहि बांधीत आहे. "[२९३] इ. स. १६५५च्या अखेरीस त्यानें जवळजवळ दीडशे कोस लांबीचा प्रांत कुत्बशाहींत सामील केला. परंतु इ. स. १६५५त त्याला स्वतंत्र होण्याची इच्छा झाली. आदिलशाहाकडे प्रथम बोलणे लावले. परंतु तेथे त्याच्या इच्छेप्रमाणे घडून न आल्यामुळें त्यानें औरंगजेबातर्फे शहाजहानाशी बोलणे लावले. त्यामुळें त्याच्यांत व कुत्बशाहांत वैमनस्य आले. शेवटी अबदुल्ला कुत्बशाहाने त्याची मुलेमाणसें कद करून मालमत्ताहि २१ नवंबर १६६५ रोजी जप्त केली. परंतु मीर जुम्ला व त्याचा मुलगा महमद अमीन यांस मोगली नोकरीत घेतल्यानें त्यांस २३ जानेवारी १६५६ रोजी मोगली सैन्यात मुक्त करण्यात आले. नतर औरंगजेबाने गोवळकोंड्यास वेढा घातला. तो चालू असता ता. २० मार्च १६५६ इ. स. रोजीं मीर जुम्ला औरंजेबाला हैद्राबाद येथें भेटला. परंतु शहाजहानाचा कडक हुकूम आल्यामुळें सबध कुत्बशाही मोगलांच्या घशांत घालण्याचा त्याचा बेत फसला. एप्रिल १६५६त तह झाला. त्यात कर्नाटक प्रात मीर जुम्ल्याची जहागीर झाली व त्यास कुत्बशाहीत पूर्ववत् व्यापार करण्याची परवानगी राहिली. परंतु यानतर कर्नाटकाचा कारभार त्याला स्वतःस पाहणे अशक्य झाल्याने दक्षिणेतील हिंदु राजे व कुत्बशाहा यांनी आस्ते आस्ते तो प्रांत घेतला.[२९४] औरंगजेबाने मीर जुम्ल्यास दिल्लीस ७ मे १६५६ रोजी रवाना केले. तो तेथे ७ जुलै १६५६ला गेला. मीर जुम्ल्यास मुआइझमखान असा किताब देऊन त्यास शहाजहानाने आपला मुख्य वजीर केलें नतर २६ नवंबर १६५६ रोजी त्याला विजापुरच्या स्वारीत औरंगजेबास मदत करण्यासाठी जाण्याचा हुकूम झाला. मीर जुम्ला दिल्लीहून १ डिसेंबर रोजी निघाला व १८ जानेवारी १६५७ रोजी औरंगाबादेस आला. २८ फेब्रुवारी रोजी बिदराजवळ गेला व २ मार्चला बिदरास वेढा घातला. पावसाळ्यापर्यंत वेढा चालूच राहिला. मध्यतरी मीर जुम्ल्याने आपलें सैन्य कुलबर्ग्यापर्यंत नेऊन बरीच लुटालूट केली. परंतु आदिलशाहाशी तह करण्याचा हुकूम आल्यावरून औरंगजेबास दक्षिण पादाक्रांत करण्याच्या मीर जुम्ल्याच्या आकांक्षेस आळा घालावा लागला. पुन्हां औरंगजेबानें तहान्वयें परेडा घेण्याच्या इराद्यानें आदिलशाहाशी लढाई सुरू केली. इकडे

२९३. लिटलटन व वेंकटचें मद्रासहून पत्र, १७ जानेवारी १६५१, ई. फॅ. इन इं. १६५१-४, पृ. १२.

शहाजहान आजारी झाला व त्याचे दुखणे दिवसेदिवस वाढू लागलें. त्याने दारास तख्ताचा वारस केलें. तेव्हां दारानें औरंगजेबाचा मदतगार मीर जुम्ला यास दक्षिणेंतील लढाईची सबब सांगून त्याची मुख्य वजिरी दूर केली. त्याचा मुलगा महमद अमीन दरबारांत काम पाहात असे त्याला दरबार मना केला. परेडा घेतल्यानंतर परत दरबारी यावे असा शहाजहानच्या नावाने मीर जुम्ल्यास हुकूम काढला. औरंगजेबानें मीर जुम्ल्यास २८ सप्टेंबर १६५७ रोजी परेडावर पाठविले. त्याच्या अपेक्षेप्रमाणे किल्ला हाती येण्याचे चिन्ह दिसेना. तरी त्याला अशा वाटत होतीच. औरंगजेबाने आदिलशाहीचा बेत ओळखला व त्याने ४ नवंबर १६५७ रोजी सुलतान महमदास मीर जुम्ल्याच्या मदतीस रवाना केले. तरीहि किल्ला हाती येईना. औरंगजेबाचा तर दिल्लीच्या राजकारणाकडे अधिकाधिक ओढा पडू लागला. तेव्हा त्याने सुलतान महमदास परत बोलावून सुलतान मुआइझमाला परेडावर पाठविले. परंतु किल्ला हाती येईना. इकडे औरंगजेब तख्तासाठी प्रयत्न करू लागल्याचे समजताच मीर जुम्ल्यास दिल्लीस येण्याविषयी डिसेंबर १६५७त ताकीदपत्रे धाडली. उलट औरंगजेबाने या पत्राचा फायदा घेऊन मीर जुम्ल्यास तांतडीने परत बोलाविले. तो १ जानेवारी १६५८ रोजी औरंगाबादेस पोहोचला. त्यास औरंगजेबानें भेटण्यास बोलाविले. तो नाखुषीने त्याला भेटला. परंतु औरंगजेबाने त्याला ताबडतोब कैद केलें. नतर औरंगजेब तख्तावर येतांच त्याची दौलताबादेहून सुटका झाली. तो दौलताबादेहून निघून प्रथम औरंगजेबास भेटला. त्यास खान-इ-खानन असा किताब देऊन त्याला जानेवारी १६५९त मुजा बिहार प्रांतांत पळून गेला होता त्याच्या पाठलागार्थ पाठविला. १२ मे १६६० पर्यंत त्याला मुजाशीच झगडावें लागले. नतर मीर जुम्ल्यास बंगालच्या सुभेदारीवर पाठविले. त्याने कुचबिहार व आसामचा प्रांत काबीज केला. परंतु या मोहिमेवर असतांनाच तो डिसेंबर १६६२त आजारी झाला व नतर ढाक्का येथे १ एप्रिल १६६३ रोजी वारला.[२९४] मीर जुम्ल्याचा मुलगा महमद अमीन कांही दिवस दिल्लीस होता. शेवटी त्याला लाहोरची सुभेदारी दिली होती. तेथें तो बरीच वर्षे होता. मीर जुम्ला मरतांच त्याचा दक्षिणेंतील व्यापार व दर्यावर्दी व्यवहार सर्व बुडाला.

---

२९४. प्रो. सरकार, औरंगझेब व्हॉ. १, पृ. २५८–३११, ३४१–६३; व्हॉ. २, पृ. १३७–८८, व्हॉ. ३, १५६-७९; परिशिष्ट २, पृ. ७०, ७४-९; मद्रास, पत्र, नवंबर १६५६ व २८ जानेवारी १६५७, व्हेस्टिजेस ऑफ ओल्ड मद्रास, भा. १, पृ. १६५–८.

२१. अबुल हसनचे पूर्ववृत्तः—अबुल हसनच्या पूर्वजांची अगर घराण्याची [illegible] ही माहिती अद्यापि उपलब्ध नाही. त्याच्या बापाच्याहि नावाचा कोठे उल्लेख आढळत नाही. तो अरब असून चागल्या व प्रसिद्ध घराण्यातील होता. तो गोवळकोंड्यास आला व कुत्बशाहास भेटला. तेव्हा त्याच्या फारसी बोलीवरून व इराणी पेहराव व वागणुकीवरून त्यास कुत्बशाहाने आपल्या नौकरीत ठेवले. एक लहानसा सुभा दिला. आस्ते आस्ते तो चढत चढत मोठ्या हुद्यावर आला व वारला. त्यास जहागिर वगैरे मिळाली नसल्याने त्याच्या मृत्यूनतर अबुल हसनला गरिबीत दिवस काढावे लागले. अबदुल्ला कुत्बशाहाच्या घोडदळात त्याने नौकरी धरली व त्यास दरमहा दहापधरा पगोड्याचे वेतन मिळू लागले. बापाच्या मृत्यूनतर त्यानें जवळजवळ चवदा वर्षे अशा हलाखीत काढली.[२९५]

याच सुमारास अबदुल्ला कुत्बशाहानें आपल्या तिसऱ्या व आवडत्या मुलीसाठी सुलतान महमद नावाच्या एका सय्यद घराण्यातील तरुणाची योजना केली होती. परतु त्याला आपण पातशाहाचा जांवई होणार या कल्पनेने पछाडल्यामुळे तो राज्यातील मोठमोठ्या सरदाराशी व वजिराशी अगदी उद्दामपणाचे वर्तन करू लागला. त्या योगाने त्याचे व कुत्बशाहाचा वडील जावई मीर महमद याचेहि वांकडें आले. शेवटी कुत्बशाहाच्या वजिरानी —बहुधः मुझाफरखानाने— सुलतान महमदाऐवजी दुसरा एखादा उच्च घराण्यातील व स्वरूपवान वर शोधावा असे अबदुल्लाच्या मनात भरवून दिले. अबदुल्लाने मुसाखान व सय्यद मीर जाफर यांचा सल्ला घेतला. त्यास मुझाफरखानाचा विचार पटला. कुत्बशाहाने वर शोधण्याचा त्या वजिराना हुकूम दिला. त्यानी अबुल हसनची निवड केली. सय्यद मीर जाफर यानें अबुल हसन यास घरी बोलावून आणलें व त्याला इकडे तिकडे कुशल प्रश्न विचारून त्याच्या बापाच्या थोरवीबद्दल वरीच प्रशसा केली. त्याच्या त्या वेळच्या देनावस्थेबद्दल दिलगिरी प्रदर्शित केली. मोठी नोकरी मिळणे शक्य असल्यास मदतहि देण्याचें आश्वासन दिले. या अवधीत कुत्बशाहाने अबुल हसनास पडद्याआडून चांगले पाहून घेतले. त्याचें रूप त्याला प्रथम पसत आले नाही. मीर जाफरने काळजीन व गरीबीनें त्याची चर्या तेवढी प्रफुल्ल दिसत नाही, परतु त्यास थोडीशी सुस्थिति प्राप्त होतांच तो सुदर दिसेल असे सांगितलें. कुत्बशाहाने प्रयत्न करून पाहाण्याची आज्ञा दिली. मीर जाफरने आपल्या सराफास (पोतदारास ?) अबुल हसनची खासगी

२९५. परिशिष्ट १, पृ. २–३.

गाठ घेऊन त्याला लागेल तो पैसा देण्याचा व त्यास अशा प्रकारची आज्ञा आहे हे न समजू देण्याचा हुकूम दिला. सराफांनी अबुल हसनशी मैत्री संपादिली. त्यास थोडथोडा पैसाहि कर्जाऊ देऊ लागले. दोनतीन हजार होनांपर्यंत कर्ज दिलें. बहुधः थोडा अधिक खर्च करून व मेजवान्या देऊन नोकरीत बढती करून घेण्याचा उपाय सुचविला असावा व अशा तऱ्हेने प्राप्ती वाढताच कर्जफेड करण्याची सवडहि त्यांनी दिली असावी. पैसा मिळूं लागताच त्याने घोडे, नोकरचाकर वगैरे ठेवले व याप्रमाणे मुखाने आयुष्य जाऊ लागताच थोड्याच महिन्यांत तो चांगला दिसू लागला. मीर जाफरने त्याच्या चर्येत व वर्तनात बराच बदल झालेला पाहतांच त्याने पुन्हा त्यास कुत्बशाहास दाखविण्याची खटपट केली. तेव्हा तो कुत्बशाहाच्या मनांत भरला व त्याने अबुल हसन वारवार त्याच्या नजरेस पडेल अशी व्यवस्था करण्याचा हुकूम दिला. दिवसेंदिवस अबदुल्लाच्या मनात तो जास्तच भरू लागला. शेवटी अबदुल्ला कुत्बशाहाने आपली मुलगी अबुल हसन यास देण्याचा पक्की बेत केला. हा गुप्तपणे केलेला निश्चय मूर्त स्वरूपांत आणण्याची आज्ञा झाली. मुलतान महमद किंवा मीर अहमद यास दखलहि लागू दिली नाही.[२९६]

एके दिवशी सायकाळी कुत्बशाहानें जाफर बेग, डबीर व एक घोडेस्वार अबुल हसनला आणण्यास रवाना केला. त्या वेळी अबुल हसन आपल्या मित्र-मंडळीस मेजवानी देण्यांत दंग झाला होता. सरकारी अधिकारी दाराशी आलेले पाहताच तो बराच गोंधळला. विशेषतः कुत्बशाहाकडील अगरखा पुढे करतांच तर तो अगदीच घाबरला. त्याला तो अगरखा विषारी असून कुत्बशाहानें आपल्याला मारण्याच्याच उद्देशाने पाठविला असावा असें वाटून त्यानें डबीरास 'आपण कांही एक गुन्हा केला नसून अगदी इमानाने वागत आलो आहो. जर कांही अलीकडे अधिक खर्च करून माझ्या कुलास योग्य अशा इतमामाने वागतो हाच जर गुन्हा

२९६. परिशिष्ट १, पृ. ३–१०, परिशिष्ट २, पृ. ७९–८१. लग्नाचा हा मजकूर विशेष संभवनीय दिसतो. हा समकालीन माणसानें लिहिला असल्यानें महत्त्वाचा आहे. हें कारस्थान गुप्त असल्यानें लोकांनीं अबुल हसनच्या लग्नाविषयीं अनेक तर्क केले असल्यास नवल नाही. अबदुल्ला कुत्बशाहासारखा शाहा आपल्या आवडत्या मुलीला वाटेल तो वर पकडून आणून तिचे त्याच्याशीं लग्न लावील ही गोष्ट अशक्य आहे. इतिहासकाराना खरे कारण व हें लग्न कसें घडून आलें याची हकीकत न समजल्यामुळें त्यानीं दैवी चमत्कार, साधूचे आशीर्वाद वगैरेसारखीं कारणें दिलीं आहेत. (परिशिष्ट २, पृ. ८१–३) परंतु तीं व्यवहारास धरून नाहींत.

वाटत असेल तर तसें न करण्याची' त्याने हमीहि दिली. शेवटी हताश होऊन तो अंगरखा घेतला व इमानानें व नेकीनें नोकरी करणाराचा अशा तऱ्हेनें नाश न करितां सांभाळच करावयास पाहिजे, असा कुत्बशाहास निरोप सांगून अगात तो अंगरखा चढविण्यास सुरुवात केली. जाफर बेग व इबीर यानी अंगरखा चढविण्यास मदत केली व नतर सलाम करून त्यास सागितले की, कुत्बशाहाने तुमच्यावर राग धरून तुम्हांस मारण्यासाठी आम्हांस पाठविले नसून तुम्हास तो मानसन्मान देणार आहे म्हणून घेऊन जाण्यासाठी धाडले आहे. तेव्हां आमच्या-बरोबर तुम्हास आनदाने व तावडतोब आले पाहिजे. शेवटी उत्तम सजविलेल्या घोड्यावर त्यास बसावयास सांगितले. अबुल हसन भीतभीत घोड्यावर बसला व जाफर बेग व इबीर याच्यामध्ये राहून जाऊ लागला. कुत्बशाहाच्या महालात जाताच त्याचें त्याच रात्री (इ. स. १६६०) अबदुल्ला कुत्बशाहाच्या तिसऱ्या मुलीशी लग्न लागले.[२९५]

या लग्नाची बातमी दुसरे दिवशी जाहीर होईपर्यंत ती मीर अहमद किवा सुलतान महमद यास समजली नव्हती. दुसरे दिवशी सुलतान महमद गोवळकोंड्या-हून पळून गेला व मीर जुम्ल्याचा मुलगा महमद अमीन हा या वेळी दक्षिणेत होता त्यास भेटला. नतर सुलतान महमदास महमद अमीनाने आपली मुलगी देऊन त्याचे तिच्याशी लग्न लावले. सुलतान महमद मोगलांचे नोकरीत शिरला.[२९८]

अबुल हसनचे लग्न झाल्यानतर त्याला चांगले दिवस लागले. कुत्बशाहाने त्याचेकडे स्वतत्र कारभार सोपविला नव्हता, तरी त्याची मर्जी दिवसेदिवस वाढतच होती. त्यास जरूर ते द्रव्य मिळत असे व तोहि राज्यकारभारात ढवळाढवळ न करितां कुत्बशाहाची मर्जी सांभाळून वागत असे. वजीर व सरदार याचीहि त्याचे-वर बरीच मर्जी असे. याप्रमाणें अकरा वर्षे लोटली. त्यास दोन मुली व एक मुलगाहि झाला. शेवटी अबदुल्लाने आपल्या मुख्य वजिरांस बोलावून आणून त्यास त्याच्या मागे अबुल हसन यास राज्य द्याव व तसें करण्यांत शक्य ती मदत करावी याविषयी त्यांचेकडून कुराण हाती देऊन शपथाहि घेवविल्या. अबदुल्ला मृत्यु पावताच अबुल हसन ऊर्फ तानाशाहा कुत्बशाहीच्या तख्तावर आरूढ झाला.[२९९]

---

२९७. परिशिष्ट १, पृ. ११–१३.

२९८. परिशिष्ट १, पृ. १३; परिशिष्ट २, पृ. ८८.

२९९. परिशिष्ट १, पृ. १३–१४. अबुल हसन किती समजुतदार व धोरणी होता हें यावरून दिसून येते.

२२, अबुल हसन ऊर्फ तानाशाहा कुत्बशाहाः—अबदुल्ला कुत्बशाहा वारल्यानंतर अबुल हसन ऊर्फ तानाशाहा कुत्बशाहा रविवार च. ३ मोहरम हि. १०८३ (२१ एप्रिल १६७२ इ. स.) रोजी मुसाखान, सय्यद मुझाफर व त्याचे दोन पेशकर मादण्णा व आक्कण्णा याच्या साहाय्याने तख्तनशीन झाला.[२७८]

हि. १०८३ (१९ एप्रिल १६७२ ते ८ एप्रिल १६७३ इ. स.).—(एप्रिल–मे १६७२ इ. स.) शिवाजीचा हेजीब निराजीपंत भागानगरास जाऊन एक लक्ष होनाचा तह करून भागानगरीहून सहासष्ट हजार होन घेऊन शिवाजीकडे जेष्ठ शुद्ध ५मी (२१ मे १६७२ इ. स.) रोजी परत आला.[३००]

अबुल हसन राज्यावर येण्यापूर्वीच नेकनामखान वारला होता.[३०१] त्याचे जागी मुसाखानाची ता. २५ एप्रिल पूर्वीच नेमणूक झाली होती. मुसाखानास खान-इ-खानन असा किताब दिला.[३०२] सय्यद मुझाफर याजकडे सरखेली होती. ती मुसाखानास दिली व सय्यद मुझाफरखानास पेशवाई व दिवाणीचे काम सांगितले. मीर जुमला हा किताब दिला. मादण्णा यास मजमुदारी व आक्कण्णा यास सबनिविसी दिली.[३०३]

३०० जेधे शकावली.

३०१. नेकनामखानाच्या कबरीवरील शिलालेखात त्याच्या मृत्यूची तारीख चं. १० जिल्हेज हि १०८३ व कबर पुरी झाल्याची तारीख च १२ जमादिलाखर हि. १०८४ दिली आहे. (ए. इ. मॉ., १९०७-८, पृ. २५ व १९१५–१६, पृ. ३९). परंतु यांतील मृत्यु. तिथीच्या वर्षांचा आकडा चुकीचा असावा. तो हि. १०८२ पाहिजे. नेकनामखानाचा ता. २३ फेब्रुवारी १६७२चा कौल उपलब्ध आहे. (ओल्ड मद्रास व्हेस्टिजिस, भा. १, पृ. ३४४) त्यानंतर २५ एप्रिलच्या कन्सल्टेशनमध्ये त्याच्या मृत्यूची व मुसाखान त्याच्या जागी नेमल्याची व त्यानें २३ फेब्रुवारीचा कौल कायम केल्याची वार्ता गोवळकोंड्याहून मद्रासेस पोहोंचल्याचा उल्लेख आहे (ओल्ड मद्रास व्हेस्टिजिस, भा.१,पृ. ३४८). ता. ५ फेब्रुवारीच्या पत्रात नेकनामखान आजारी असून जमिनोस खिळल्याचा उल्लेख आहे. (सदर पृ. ३४७) यावरून नेकनामखान चं. १० जिल्हेज हि. १०८२ (३० मार्च १६७२ इ. स.) रोजी वारला असावा.

३०२. परिशिष्ट १, पृ. १६; मद्रास कन्सल्टेशन, २५ एप्रिल १६७२ इ. स., ओल्ड मद्रास व्हेस्टिजिस, भा. १, पृ ३४८.

३०३. परिशिष्ट १, पृ. १६, चं. १० रजब हि. १०८१ ची (१४ डिसेंबर १६७० इ. स.) फर्मानें, भा. इ सं म त्रैमासिक, व. १३, अं. ४, चैत्र १८५५; पृ. ६६-८

माहे सव्वाल हि. १०८३ (जानेवारी १६७३ इ. स.)त कुत्बशाहाचा हेजिब जडजवाहीर व चिनी भांडी औरंगजेबाकडे नजर घेऊन गेला. तेव्हा त्यास त्याऐवजी तीन लाख रुपये नक्त देण्याचा हुकूम झाला.[३०५]

ता. १० जुलै १६७२ इ. स. रोजी फ्रेंच आरमार मेट थोमजवळ येऊन उतरले. डी ला हाय हा या आरमाराचा मुख्य सेनापति होता. त्याने मेट थोम येथील मुसलमानी अधिकाऱ्याकडे धान्यसामग्री देण्याबद्दल विनति केली. तो अमान्य केली. तेव्हा ता. १३ रोजी डी ला हायने मागे मच्छलीपट्टणास फ्रेंच लोकास वाईट रीतीने वागविल्याबद्दल व या वेळीहि मदत देण्याचे नाकारले म्हणून हल्ला करण्याचे ठरविले व चार लढाऊ गलबते व शंभर लोक घेऊन किनाऱ्यावर आला. कुत्बशाही सुभेदाराने त्यास विरोध केला. तेव्हा त्याने गलबतांतून तोफाचा मारा चालू ठेवून किनाऱ्यावर उतरला. गावात शिरला. तेथील हवालदाराने दाणागोटा पुरविण्याचे कबूल केले. परतु तो नेण्यासाठी फ्रेंचाची माणसे येताच त्यास तो न देता घालवून लावले. ता. १४ जुलै रोजी फ्रेंचानी आपले शंभर लोक व चार तोफा कॅ. रिबेरेबरोबर शहराच्या उत्तरेस पाठविल्या व मुख्य सैन्य दक्षिणेस ठेवले. दुसऱ्या दिवशी लढाईची इतर सामग्री वगैरे उतरताच डी ला हायने हवालदारास दाणागोटा न पुरविल्यास हल्ला चढविण्याची भीति घातली. कुत्बशाही हवालदाराने लढाईस सुरुवात केली. फ्रेंच गलबतांतून तोफा उडव लागले. किल्ल्याच्या दक्षिणेच्या बाजूस मुख्य हल्ला झाल्याने कुत्बशाही सैन्य तिकडे गेले. किल्ल्यातील लोकांनीहि चांगलेच शौर्य दाखविले. तेव्हां फ्रेंचाना मागे हटावे लागले. उत्तरेकडे कुत्बशाही सैन्य नाही हे पाहून रिबेरेने आपले लोक तटास शिड्या लावून आत उतरविले. किल्ल्यांतील लोकांची कत्तल केली व किल्ला ताब्यात घेतला. डो ला हाय पश्चिम दरवाजाने किल्ल्यांत गेला. यात कुत्बशाहाकडील ३०-४० लोक मारले गेले व शंभरसव्वाशें कैद झाले. बावीस तोफा व दारुगोळा फ्रेंचास मिळाला. शहर लुटले गेले. परतु हवालदाराच्या वाड्याखेरीज इतर ठिकाणी त्याना काहीच प्राप्ती झाली नाही. नतर किल्ल्याचे तट वगैरे दुरुस्त केले. गलबतावरील तोफाहि आणविल्या. दाणागोटा मिळविण्याचा प्रयत्न केला, परतु लोक त्यांस तो देईनात. तेव्हा आदिलशाही शेरखान लोदीकडून तो आणण्यासाठी गलबते पाठविली.

---

३०५. देवीप्रसादजी मुन्सिफकृत औरंगजेबनामा, हिंदी, भा. २ पृ. ४१-२.

कुत्बशाहाकडील तेथील सैन्याचा सेनापती बाबासाहेब व त्रिंबक यसरा राज व मडल नायक यांनी फ्रेंचांस दाणागोटा न मिळू देण्याची खटपट चालविली. सेट थोमजवळील कोदवकम येथे सैन्य ठेवले. अशा रीतीने अडवणुक झालेली पाहतांच फ्रेंचांनी या सैन्यावर हल्ला केला. परतु कुत्बशाही घोडदळाने पाठलाग केल्याने फ्रेंच जेमतेम सेट थोम येथे जाऊन पोहोचले. ता. २४ आगस्ट रोजी कुत्बशाही २००० सैन्य सेट थोमजवळ गेले व काही घरे जाळली. डी ला हायने पुढे जाऊन तोंड दिले. ४०० कदमावर असलेल्या एका देवळात तळ दिला. कुत्बशाही सैन्यास आणखी मदत आली व ते सैन्य एक हजार घोडदळ व चार हजार पायदळापर्यंत गेले. ता. ३ सप्टेंबर रोजी कुत्बशाही सैन्याने पश्चिम बाजस तळ देऊन किल्ल्यास वेढा घातला. डी ला हायनेहि सन्य वाढवून किल्ल्याची मजबुती केली. नतर दहापधरा दिवसानी कुत्बशाही सैन्याने आपला तळ पुढे सरकाविला. ता. १९ सप्टेंबर रोजी कुत्बशाही सैन्याने किल्ल्यावर तोफाचा मारा सुरू करण्यास प्रारभ केला. ता. २० रोजी लढाई झाली. तीत फ्रेंचांकडील दोन सरदार पडले. सप्टेंबरच्या अखेरीस रिबेरने एका मशिदीच्या आश्रयाने राहिलेल्या कुत्बशाही सैन्यावर हल्ला चढविला. त्यांत थोडेसे नुकसान झाले. ता. १० आक्टोबर रोजी मुसलमानी सैन्याने सेट लुई बुरजावर हल्ले चढविण्यास सुरुवात केली. फ्रेंचास २०० अधिक सैनिकाची पोर्टो नोव्होहून २१ आक्टोबरला मदत आली. तेव्हा ता. २१ आक्टोबर रोजी डी ला हायने दोन कप्त्या व २०० नावाडी याच्या साहाय्याने तोफाच्या जोगावर हल्ला चढविला. कुत्बशाही सैन्यातील २०० लोक मेले. ता ६ नवबर रोजी मुसलमानी सैन्याने फ्रेंचाच्या आघाडीवर हल्ला चढविला व त्यात त्याचे तीन सरदार मारले गेले. नवबर महिन्याच्या अखेरपर्यंत सारखे हल्ले चालूच होते नतर कोलबर्ट बुरुजाकडे काही सैन्य गेले व तेथे हल्ले चढवू लागले. ता. ५ डिसेंबरलाहि लढाई झाली. तीत मुसल्मानांची सरशी झाली व ते पुढे सरसावले. थोडेच दिवसानी डी ला हाय यास थोडीशी जखम झाली व रिबेर वगैरे जखमी झाला. ता. १४ डिसेंबर रोजी कुत्बशाही सैन्यानें फ्रेंचाची एक चौकी मारली. या लढाईत फ्रेंचांचे बरेच लोक मारले गेले. बाकी राहिले त्यांना पकडून त्याची कत्तल करण्यात आली. ता. १६ डिसेंबरला कुत्बशाही सैन्याने पोर्ट रोयल, कोलबर्ट व सेंट लुई बुरुजांवर हल्ले चढविले. नतर दोन दिवसांनीं दक्षिणेकडूनहि मारा करण्यास सुरुवात केली. फ्रेंच तटदुरुस्ती वगैरे सारखी करीत राहिले. ता. २५ डिसेंबरला कोलबर्ट बुरुजाजवळ चकमक

झाली. तींत २०–२५ लोक डी ला हायने ठार केले व पश्चिम बाजूस खदक खणण्यास प्रारंभ केला. ता. ६ जानेवारी १६७३ रोजीं मार्टिन डी ला हायला येऊन मिळाला. त्याने इंग्रजांची मदत मिळविण्याचा प्रयत्न केला, परंतु तो सफल झाला नाही. या महिन्यांत फ्रेंचांची बरीच पिच्छेहाट झाली. मुसलमानांचेहि शंभरएक लोक मारले गेले होते. फेब्रुवारीच्या सुरुवातीस फ्रेंचास पोर्टो नोव्होहून आणखी दोनशें सैनिकांची मदत आली. ता. १२ फेब्रुवारीस पुन्हां हल्ला चढविला व कुत्बशाही सैन्यांतील एक मोठी तोफ काबिज केली. परंतु दुसऱ्याच दिवशी मुसलमानी सैन्याने ती हिसकाविली. ता. २७ फेब्रुवारीस फ्रेंचानी कोलवर्ट बुरुजाजवळ पुन्हां निकराचा हल्ला चढविला. हातघाई झाली. तींत मुसलमानाकडील दोनशें लोक मारले गेले. दुसऱ्या दिवशी पुन्हा चकमक उडाली. तींत मडल नायक मारला गेला. बाबासाहेब व त्रिंबकराजास थोड्या जखमा झाल्या. मुसलमानी सैन्य माघारी पुनामल्लीस गेले. फ्रेंचानी मुसलमानी सैन्याने तयार केलेले खदक वगैरे बुजवून टाकले व एक तुकडी त्रिप्लिकेनला पाठविली. या तुकडीने तेथील एका देवळाचा तांबा घेऊन त्याची मजबुती केली. ती तुकडी तेथेच चौकी बांधून राहिली.

या अवधीत डच व फ्रेंच याचे युद्ध चालू झाले व फ्रेंचास मच्छलीपट्टण वगैरे ठिकाणी त्रास होऊ लागला. दाणागोटा मिळावा तोहि नीटसा मिळेना. तेव्हा मार्च महिन्याच्या अखेरीस डी ला हाय व मार्टिन मच्छलीपट्टणास गेले व तेथील सुभेदाराच्या तर्फे कुत्बशाहास व सय्यद मुझाफरखानास पत्रे पाठवून बोलणे लावलें. मात्र मुसलमानी गलबत धरणे, जाळणे वगैरे कार्यक्रम डी ला हायने चालूच ठेवला.[३०६]

हि. १०८४ (९ एप्रिल १६७३ ते २८ मार्च १६७४ इ. स.).— मीर जुम्ला व दिवाण मुझाफरखान आणि सरखेल व खान-इ-खानन मुसाखान याचे वाकडे आले. अबुल हसनने ते भांडण मिटविण्याकडे मुद्दामच दुर्लक्ष केले. उलट तें विकोपाला जाऊन या दोन बळजबरी व सर्वशक्तिमान समजणाऱ्या वजिरांनी एकमेकाचा पाडाव करावा अशी त्याची इच्छा होती. त्यामुळे अबुल हसनने राज्यकारभार या दोघावर सोंपवून आपला काल राजनीति व इतर कारभारासाठी नियम वगैरे लिहून काढण्यात खर्च करू लागला. मुसाखान व त्याचे लोक लाच खातात व सैन्याचे पगार योग्य रीतीने देत नाहीत वगैरे गोष्टी मुझाफरखानानें तानाशहाच्या

३०६. मार्टिन वगैरेच्या हकीकती, ओल्ड मद्रास ब्हेस्टिजिस, भाग १, पृ. ३१२–६.

कानावर घातल्या. परंतु त्यानें त्या मनावर घेतल्या नाहीत. मुझाफरखानानें मुसाखानाच्या हिशेबनिसांस कैद केले. त्यावरून मुसाखानास राग आला व तो आपल्या लोकांनिशी दिवाणाच्या वाड्याकडे मुझाफरखानास ठार करण्याच्या उद्देशाने गेला. परंतु मुझाफरखान जाल्या भित्रा असल्याने त्यानें स्वसरक्षणार्थ निवडक लोक ठेवले होते व त्याचे पगार वगैरे वेळचे वेळेवर देऊन त्यांस खुष राखले होते. त्यानी मुसाखानास वाड्यांत शिरू दिलें नाही. नतर तानाशाहाकडून निरोप आल्यावरून व इतर मोठमोठ्या सरदारांनी मध्यस्थी केल्यावरून मुसाखान नाइलाजास्तव परतला. मुझाफरखान मात्र फार घाबरला व तो तावडतोब तानाशाहाकडे गेला व असे झाल्यास कामाचा निभाव कसा लागेल वगैरे सागून सरक्षणार्थ विनति केली. मुझाफरखान घरी आला व तानाशाहाने मसाखानास सागून पाठविले की, दोघानी एकविचारें राहावे अशी वर्तणूक ठेवली पाहिजे. परतु मुसाखानानें उलट मुझाफरखानास पुष्कळ अपशब्द वापरले. शेवटी तानाशाहाची त्याने क्षमा मागितली. काही दिवसानी तानाशाहाने मुसाखानास भेटण्यास बोलावले. परतु मुसाखान जाण्यास कचरू लागला. शेवटी बरीच दिरगाई केल्यानतर राजमहालात गेला. राजमहालाच्या आवारात जाताच त्याला बेडी घालून कैद केले. राजाची अवज्ञा करणे, सरकारी नोकरास माराहाण करणे, अफरातफर करणे, मोगली वकिलास खडणी योग्य प्रकारे न देऊन पातशाहापादशाहात वाकडे आणणे वगैरे आरोप त्याचेवर ठेवले व त्याची मालमत्ता वगैरे जप्त केली. त्यात कोल्हारचे बरेंच जडजवाहीर मिळाले.[३०७] तानाशाहाने मुसाखानाकडील कर्नाटकाची सुभेदारी व सेनापतित्व मिष्क मियानकडे च. २३ रबिलावलापूर्वीच (२९ जून १६७३ इ. स.) दिले होते. सरखेलीचा व इतर कारभार तानाशाहा स्वतःच पाहू लागला.[३०८]

३०७. परिशिष्ट १, पृ. १७-९.

३०८. परिशिष्ट १, पृ १९. चं. २३ रबिलावल हि. १०८४च्या (१९ जून १६७३ इ. स.) मुकुंद घोरपडे यास काढलेल्या फर्मानात "कर्नाटकचा सुभा मुसाखान याजकडून दूर करून मिया मुष्क यास दिला आहे," असा उल्लेख आहे. भा. इ. सं. मं. त्रैमासिक, वर्ष १३, अंक ४, पृ. ६८ मलिक मिष्क 'कर्नाटकी सैन्याचा सेनापति' असा उल्लेख हि. १०८५च्या मोहरमच्या (एप्रिल १६७४ इ. स.) फर्मानात आहे. ए इं. मॉ., १९१७-८, पृ. ५२.

हुकूम काढणें तो 'मादो भानजी (मादण्णा) मज्मुदार' तानाशाहाच्या 'परवानगीनें' काढू लागला.[३०९]

इ. स. १६७४च्या सुरुवातीस औरंगजेबानें इस्लामखानाचा मुलगा मीर अबदुल रहमान यास हैद्राबादेस पाठविलें.[३१०]

मोगलांशी लढाई चालू ठेवण्यासाठीं कुत्बशाहाने शिवाजीस पैशाची वगैरे मदत गुप्तपणें दिली.[३११]

सेंट थोमचा वेढा चालू होता. डी ला हाय व मार्टिन यानी मच्छलीपट्टणच्या सुभेदारातर्फे बोलणे लावून एक लाख क्राउन्स पेशकश दिल्यास सेंट थोम फ्रेंचास देण्याचे फर्मान आणवून देण्याचे कबूल केले. डी ला हाय ता. २४ जूनला सेंट थोमला परत आला. नतर थोडेच दिवसानी मुसाखानानें मच्छलीपट्टणच्या सुभेदाराच्या व मुझाफरखानाच्या झालेल्या या बेतास विरोध केल्याचें समजल्यावरून फ्रेंचानी पुन्हा पूर्ववत् लढाईची तयारी ठेवली. डी ला हाय सेंट थोमला येण्यापूर्वीच उच्च आरमार तेथे येऊन ठेपले होते. त्यानी डी ला हायवर हल्ला चढविला. परंतु तो कसा तरी बचावून सेंट थोमला पोहोचला. २९ जूनपासून लढाईस सुरुवात केली. आगस्टच्या सुरुवातीस बावासाहेबाच्या जागी चिनापली मिर्झाची नेमणूक झाली. ता. १० आगस्ट रोजी रात्री डी ला हायने हल्ला चढविला. परंतु मुसलमानी घोडदळाने त्याला पळावयास लावले व त्याचे बरेच लोक मारले. सप्टेंबरच्या सुरुवातीस पाचशे हॉलडर्स सेंट थोमला येण्यास निघाले व रिक्रॉफ फॉन गोअन्स पुलिकतहून डच सैन्याचा दुसरा काफिला घेऊन निघाला. ११ सप्टेंबर

३०९. कुत्बशाही फर्मान चं ५ सव्वाल हि १०८४(३० डिसेंबर १६७३ इ. स.)चें, गोपीनाथरावकृत (कामकोटी पीठाचे ताम्रपट, पृ. ११९–२०). हा ताम्रपट चुकीचा वाचला गेल्यामुळें तो इ. स. १७१०चा असून औरंगजेबाचा आहे असें म्हटले आहे. मादा भानुजी म्हणजे मादण्णा ही माहिती नसल्याने ती चूक झाली आहे. कुत्बशाही फर्मानें–पहिले चं. २४ रज्जब हि. १०८५ (१५ आक्टोबर १६७४ इ. स.)चे, दुसरें च. २५ साबान हि. १०८६ (४ नवंबर १६७६ इ. स.)चे–भा. इ. सं. म. त्रैमासिक, व. १३, अं. ४, पृ. ७० व ७२.

३१०. देवीप्रसादजी मुन्सिफकृत औरंगजेबनामा, हिंदी. भा. २, पृ ४७.

३११. मुंबई, पत्रे, २९ सप्तेंबर, १ व २३ आक्टोबर १६७३ इ. स., इंग्लिश रेकॉर्डस ऑन शिवाजी, भा. १, पृ. २८७ व २९८.

१६७३ला हे सैन्य सेट थोमला आले. नतर दोन दिवसांनी पाचसहाशें डच व मुसलमानी घोडदळानें शहरावर हल्ला चढविण्याची भीति दाखविली. १४ सप्टेंबर रोजी डच त्रिप्रिकेनला गेले व मुसलमानी सैन्य फ्रेचांच्या उजव्या बाजूस जाऊन वसलें. ता. १९ सप्टेंबर रोजी डच व मुसलमानी सैन्यानें सेट थोमजवळील एक गाव जाळले. दुसऱ्या दिवशी डच आरमारानें फ्रेचाच्या गलबतावर तोफा झाडल्या. ३० सप्टेंबरला आणखी डच आरमार आले. परतु रिक्लोफ सीलोनला गेला व सेट थोमवरील सेनापतित्व हर पविलनला दिले. नतर पावसाळ्यात फारशा चकमकी उडाल्या नाहीत. ३ आक्टोबरला उत्तरेस एक चकमक झडली. १८ आक्टोबरला डी ला हाय आरमारी लढाई देण्याकरिता त्रिप्रिकेनला गेला. पुष्कळ लोक लढाई पाहण्याकरिता जमले. परतु लढाई झाली नाही. ३० आक्टोबरला एक लहानशा चकमक उडाली. नतर ११ व २५ नवबरला आणखी चकमकी उडाल्या. त्यात विशेष मेला. डिसेंबरात फार पाऊस पडला. २५ डिसेंबर १६७३ला आणखी एक चकमक उडाली व फ्रेचानी एक तळें फोडले. फ्रेचांस दाणागोळा अगर बाहेरील मदत मिळू न देण्याची सक्त खटपट केल्याने फ्रेंचाचा निभाव लागणें कठीण झाले. मार्टिन स्वतः शेरखान लोदी, जिजी व मदुरेचा नायक वगैरेना भेटला परतु मदत मिळण्याची चिन्हें दिसेनात. इ. स. १६७४ च्या २५ जानेवारीस डी ला हायला आणखी एक जबरदस्त झाली. मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात किल्ला सोडून जाण्याची फ्रेंच तयारी करू लागले. परतु तीन गलबतें भरून तांदूळ येऊन पोहोचल्यानें थोडासा धीर आला.[1]

हि १०८५ (२० मार्च १६७४ ते १७ मार्च १६७५ इ. स.).— फ्रेंचाचा जोर दिवसेंदिवस कमी होत चालला. त्यांचे सनिक त्यास सोडून इंग्रांकडे येऊ लागले. २१ एप्रिल १६७४ रोजी जे वादळ झाले त्यात बावटळीची भर पडली. त्यायोगानें बराच नाश झाला. ता. ११ जुले रोजी डचाचे बारा मोठ्या गलबताच आरमार त्रिप्रिकेनला आले. रात्री त्यानी तोफाचा मारा केला. ता. २ आगस्टला फ्रेचानी हल्ला देण्याचें टरविले. परतु त्या दिवसाचा हल्ला चढविणारा मुख्य सेनापति डनव्हेल डचास जाऊन मिळाला. फ्रेंचात मुळीच त्राण राहिला नाही. धान्यहि राहिले नाही. तेव्हा ता २० आगस्ट रोजी त्यानी डचांशी तह करण्याचें

१. मार्टिन व इतरांच्या हकिकता, ओल्ड मद्रास ब्रेस्ट्रिजिस, भा. १, पृ- ३२७–३०.

ठरविले व ता. २४ला बोलणें लावून ता. २७ आगस्ट १६७४ रोजी तह केला. ता. १९ सप्टेंबर रोजी फ्रेंच सेट थोम सोड्न मद्रासला निघून गेले व किल्ला कुत्बशाही सैन्याच्या ताब्यांत दिला.[३१३]

अबुल हसननें किवामउद्दिनावरोबर नऊ लाख रुपयाची पेशकश, जवाहिर व हत्ती पाठविले. किवामउद्दिनास आल्यानतर व जातांना औरगजेबाने वस्त्रे दिलीं.[३१४]

या वर्षाच्या अग्वेरीस शिवाजीच्या सैन्याने कुत्बशाहीतील भागानगर-जवळील दोन शहरें लुटली. वरीच मालमत्ता नेली.[३१५]

हि. १०८६ (१८ मार्च १६७५ ते ५ मार्च १६७६ इ. स.). — च. २५ साबान (४ नवबर १६७५ इ. स.) रोजी कुत्बशाहान खानापूरकर नागोजी व मुकुदजी घोरपडे यास अशी आज्ञा केली की, 'लतीफशाहावरोबर तुम्ही जाऊन शत्रूच्या अल्ट्र बालमपेठच्या गढीवरून घसरून तेथील हरामखोराना योग्य शिक्षा दिलीत. गनीम मोड होऊन पळून गेला. तुम्ही शत्रूची जागा घेतलीत. आतां तुमच्या लष्करापासून दोन गाव अतरावरील एका गढीत हराम-खोरांनीं तळ दिला आहे. ती गढी घेऊ इच्छिता. तरी तुम्ही लतीफशाहाशी सगनमत करून त्या गढीवर चाल्न जाऊन घ्यावी. शत्रु नेस्तनाबूद झाल्याचे कळवावें. म्हणजे तुमचा उत्कर्ष केला जाईल.'[३१६]

मुसाखानास केद केल्यानतर मुझाफरखानाला अगदी मनमुराद कारभार करण्याची सवड मिळाली. अधिकाऱ्याच्या नेमणुकी तानाशाहास न विचार-तांच होऊ लागल्या. लोकांच्या नुकसानीबद्दल तक्रारी येऊ लागल्या. कोणाचीच दाद लागेना. असा भयकर अव्यस्थित व अफरातफरीचा

३१३. मार्टिन व इतरांच्या हकिकती वगैरे, ओल्ड मद्रास व्हेस्टिजिस, भा. १, पृ. ३२७–३५.

३१४. देवीप्रसादजी मुन्सिफकृत औरंगजेबनामा, हिंदी, भा. २, पृ. ५६.

३१५. कारवार, पत्र, २२ एप्रिल १६७५ इ. स., इंग्लिश रेकॉर्डस ऑन शिवाजी, भाग २, पृ. ४८.

३१६. कुत्बशाही फर्मान, चं. २५ साबान हि. १०८६ चें, भा. इ. सं. त्रैमासिक, व. १३, अंक. ४, पृ. ७२.

कारभार चालू लागला. तानाशाहाने शेवटपर्यंत दुर्लक्ष केलें.[३१७] परंतु मिर्झा अहमद इ. स. १६७४त वारल्यानंतर व सुलतान महमद व औरंगजेब यांचा पुन्हां बेबनाव झालेला पाहताच[३१८] व विशेषतः औरंगझेबाने अबुल हसन राज्यावर आल्याबद्दल तक्रार न करितां त्याने पाठविलेली पेशकश स्वीकारलेली दिसतांच[३१९] तख्तास कोर्णातरी वारस उभा करून राज्यात यादवी उत्पन्न करण्याची अबुल हसनची भीति गेली. तेव्हा मुझाफरखानास त्यानें दरबारास बोलाविले. तेथे प्रथम त्याची पुष्कळ स्तुति केली. नतर त्याच्या सर्व चुकाची, दुर्वर्तनाची व अनिष्ट कारभाराची जाणीव करून दिली. नतर त्यास कामावरून दूर केल्याचे व यापूर्वी चागली सेवा केली असल्याने एक लहान सुभा दिल्याचे सागितले. त्या सुभ्याची व्यवस्था पाहून कोणत्याहि रीतीने गडबड न करिता राहावे अशी आज्ञा दिली. तोहि निमटपणे निघून गेला.[३१८] हा प्रकार च. २५ साबान हि. १०८६ (४ नवंबर १६७५ इ. स.) नतर[३१९] व २८ जुलै १६७६च्या पूर्वी[३२०] घडून आला असावा. बहुधा तो इ. स. १६७५च्या डिसेंबरच्या अखेरीस घडला असावा. मुझाफरखानाचा मादण्णास कारभार मिळताच त्याने मोठा वाडा बाधण्यास मुहूर्तावर ता. १६ जानेवारी १६७६ इ. स. (बुधवार, माघ शुद्ध पचमी)स सुरुवात केली व घाईघाईने तीन महिन्यानी म्हणजे ता. १० एप्रिल १६७६ इ. स. (सोमवार, वैशाख शुद्ध सप्तमी)स तो पूर्ण केला.[३२१] मलिक मिष्क मियानची सरखेली व कर्नाटकाची सुभेदारी एक लाख दहा हजार पगोड्याची पेशकश घेऊन महमद इब्राहिम यास दिली व त्याला नवाब असा किताब दिला.[३२२] मलिक मिष्कास पेशवाई

३१७ परिशिष्ट, पृ. १९–२०; मद्रास, पत्र, १६ जुलै १६७५ इ. स., ओल्ड मद्रास व्हेस्टिजिस, भाग. १, पृ. ३५५–६.

३१८. परिशिष्ट, १ पृ. २०–१.

३१९. नेगोजी व मुकुंदराव घोरपडे यास च. २५ साबान हि. १०८६ (४ नबंबर १६७५ इ. स.)चें फर्मान दिले आहे. त्यात मादो भानजी मजमुदार असेंच नांव दिले असून ते 'परवानगी'ने काढले आहे. भा. इ. सं. मं. त्रैमासिक, वर्ष १३, अं. ४, पृ.७२.

३२० मद्रास, पत्र, २३ जुलै १६७६, ओल्ड मद्रास व्हेस्टिजिस, भा. १, पृ. ३५६.

३२१. परिशिष्ट ३, पृ. १९६ वरील २५ व २६ टीपांतून १६७२च्या तारखा असाव्यात म्हणून शंका प्रदर्शित केली होती. परंतु आतां मुझाफरखानाच्या बडतर्फीचा नक्की काल समजताच व मादण्णाच्या मृत्युतारखेंतून पृ. १९८वर नमूद केलेली बारा वर्षे धरून देता शकपद्धतीनें इ. स. १६७६च्या सुरुवातीचा काल नक्की असावासा वाटतो.

(Keeper of the Royal Seal) दिली व हिशवतपासनीसाचे काम त्याचेकडे सोपविलें.[३२२] पोडाला लिंगाप्पा (मादण्णाचा पुतण्या) यास कर्नाटकाची सरखैली दिली व महमद मिर्झा अमीनच्या जागी पुन्हा बाबासाहेबास सरलष्कर केले.[३२३]

हि. १०८७ (६ मार्च १६७६ ते २३ फेब्रुवारी १६७७ इ. स.).— आदिलशाही सरदारात भांडणे लागली व मोगली बहादुरखानाने शिवाजीशी सगनमत करून आदिलशाही मुलखावर मारगे हल्ले चढविले. ही अनिष्ट परिस्थिति पाहून तानाशाहाने आदिलशाहा व शिवाजी याच्यात इ. स. १६७६च्या जुलैत तह घडवून आणला. त्यांत शिवाजीकडे कोल्हापुरापलीकडील पाच कोसावरील कृष्णतीरापर्यंतचा मुलुख राहू द्यावा व त्याबद्दल शिवाजीने दोन लक्ष रुपये पेशकश व एक लक्ष होन वार्षिक खंडणी द्यावी असे ठरले.[३२४] परंतु हा तह लवकरच मोडला व मोगल कुत्बशाहा व शिवाजी यांनी एक होऊन आदिलशाहीतील पठाणांचे वर्चस्व मोडण्याचा विचार केला.[३२५]

हि. १०८८ (२४ फेब्रुवारी १६७७ ते १२ फेब्रुवारी १६७८ इ.स.).— शिवाजी व कुत्बशाहा याच्यात जे बोलणे झाले त्याचा आशय शिवाजीने मालोजी घोरपडे यास कळविला. तो असा:— ' हल्ली आदिलशाही बहलोलखान पठाणी घेतली. पादशाहा लहान लेकरू. नाव मात्र. ते आपले कैदेत ठेवले आहेत. आणि तख्त व छत्र विजापूरचा कोट पठाणाने कबीज केला आहे. काही गुबारून मिळाला नाही. ऐशियास दक्षिणचे पादशाहीस पठाण जाला. हे गोष्टी बरी नव्हे. पठाण बळावला म्हणजे एका उपरी एक कुली दक्षिणियाची घरे बुडवील कोणास तगो देणार नाही. ऐसे आम्ही समजोन हजरत कुत्बशाहा पातशाहा यासी पहिलेपासून मजुबान राखली होती. त्यावरून साप्रत हजरत कुत्बशाहानी मेहरबानी करून 'हुजूर भेटीस येणे'

---

३२२. परिशिष्ट १, पृ. २१; हि. १०८९ (१६७८ इ. स.) चे कुत्बशाही फर्मान, ए इं. मॉ., १९१७–८, पृ. ५४. मिआन मिष्क याला रविवार च. २९ गविलावल हि १०९१ (१८ एप्रिल १६८० इ. स.) रोजी दफन केल्याचा त्याच्या कबरीवरील शिलालेखात उल्लेख आहे. ए. इं. मॉ., १९१७–८, पृ. ५६.

३२३. राजापूर, पत्र, २४ जुलै १६७६, इंग्लिश रेकॉर्डस ऑन शिवाजी, भाग २, पृ. ९४.

३२४. मुंबई, पत्र, १९ मार्च १६७७, इंग्लिश रेकॉर्डस ऑन शिवाजी. भा. २, पृ. ११४.

म्हणून दस्तखत मुबारक व दस्त पजीयानसी फर्मान सादर केला.[३२५] त्यावरून आम्ही येऊन हजरत कुत्बशाहाची बरोबर १२ हजार पायदळ व २४ हजार घोडदळ घेऊन ता. ४ मार्च १६७७ इ. स. रोजी जाऊन भेटी घेतली.[३२६] भेटीचे समई पादशाही आदब आहे की शिरभोई धरावी, तसलीम करावी. परतु आम्ही आपणावरी छत्र धरिले असे, ही गोष्ट कुत्बशाहास मान्य होऊन शिरभोई धरणे व तसलीम करणे हे माफ केले. पादशाहा तिकडून आले; आम्ही इकडून गेलो.[३२५] राजे लोकाच्या वहिवाटीप्रमाणे स्वतंत्र दरवाजाने प्रवेश केला. विशेष आसन तयार केले होते.[३२६] पादशाहानी बहुतच इज्जती होऊन गळ्यास गळा लावून भेटले. आम्हांस हाती धरून नेऊन जवळी बैसविले. किती एक मेहेरबानी जाहीर केली. आम्हीहि जमी मुजरात करून ये तैसी केली आणि कुत्बशाहाचा व आपला घटी बरेपणा करून घेतला. या उपरी राजकारण विषयी हजरत कुत्बशाहानी महादणापतास व आम्हांस एकचित्त करून ऐसा तह केला की, जो काय उभयवर्गी तह व्हावा तो आपण कबूल करावाच. ऐसा कुल मनसबा व मदार आम्हावरि टाकिला आहे की, 'आपली पादशाही जितकी वाढवू ये तितकी वाढविणे. पठाणाची नस्तनाबूद करणे. दक्षणची पादशाही आम्हा दक्षणियाच्या हाती राहे ते करावे' म्हणून त्यास हा मनुसुबा ये प्रसंगी आमचे हातास आल्या उपरि आम्ही हाच विचार केला की, जे काही आपले जातीचे मराठे लोक आहेती ते आपल्या कटात घेऊन कुत्बशाहासी त्याची मुजरात करावी. दौलत देवावी, त्याचे हाते पादशाही काम घेऊन पादशाहाची दराज करावी. आणि तुम्हा लोकाच्या दोस्तताहि चालेत, घर राहेत, ते करावे. आपल्या जातीच्या मराठिया लोकाचे घर करावे हे आपणास उचित आहे....तुम्ही मराठे लोक, कामाचे, तुमचे घर करावे ऐसे मनी धरून हजरत कुत्बशाहासी बहुत गोष्टी बोलोन, तुम्हास हजरत कुत्बशाहाचा कोलाचा फर्मान घेऊन पाठविला आहे.... तुमचे पुत्रपौत्र आठवीत व दौलत थोर होए व हजरत कुतुबशाहाचे काम तुमचे हाते होऊन ये ऐसा समय असे. जरी पठाणाचीच चाकरी करून राहो म्हणाल, तरी पठाण कांही तुम्हास थोर दौलत देणार नाही. आणि पठाणास तरी हजरती कुतुब-

३२५. मालोजी घोरपडे यास शिवाजीचें पत्र, मार्च १६७७ इ. स. चें, सरस्वति मंदिर, इतिहासमंजरी, पृ. ९७.

३२६. जेधे शकावली, डाग रजिस्टर, पृ. ३१९-२३, २२, सप्टेंबर १६७७चा अहवाल, डच वृत्तांत, ऑर्न भा २६८, पृ. १-११.

शाहा व आम्ही व तमाम दख्खनी मिळोन चालोन घेऊन बुडवीतच आहो."[३२५] मादण्णानें शिवाजीची उत्तम व्यवस्था ठेविली होती. दोन हजार होनांचा रोज खर्च होत होता.[३२६]

बहादुरखान, तानाशाहा व शिवाजी यांनी एकजुटीने आदिलशाहीचे लचके तोडण्याचें ठरविलें.[३२७] तानाशाहानें २ लक्ष पायदळ व २० हजार घोडदळ दिवाण मादण्णा आणि सरलष्कर इब्राहीमखान यांच्या हातांखाली देऊन, त्याना विजापुराकडे १६७७च्या मार्चात रवाना केलें. बहादुरखान दिलेरखानासह गुलबर्ग्यावर गेला. कुत्बशाही सैन्य सरहद्दीवर थांबलें.[३२८] शिवाजी जिंजीवर चालून गेला[३२९]. शिवाजीबरोबर सरलष्कर मिर्झा महमद अमीन आपल्या १ हजार घोडदळ व ४ हजार पायदळासह स्वारीवर गेला.[३३०] याप्रमाणे सर्व बाजूनी उचल झालेली पाहताच सिद्दी मसाउद आदिलशाही राजकारण घेऊन तानाशाहाकडे जून १६७७त आला. त्यामुळे[३३१] गोवळकोड्याच्या राजकारस्थानांत जरा गडबड उडाली. जूनच्या अखेरीस बहादरखान, दिलेरखान व बहलोलखान गुलबर्ग्यापाशी एकत्र येतांच ते कदाचित् एक होऊन कुत्बशाही हद्दीत शिरतील म्हणून महमद इब्राहिमास नीट खबरदारीने राहण्याचा हुकुम झाला. सिद्दी मसाउदच्या विनतीचा विचार करून आदिलशाहीतील यादवी मोडण्याचा तानाशाहाने बेत केला व त्याप्रमाणे सिदी मसाउद, कसलाकोंटी, तिमराज व सय्यद मखदुम यांस मुलतानाच्या मदतीस पाठविले. कसलाकोंटीला सहा लाखांचा मुलूख देऊन एक लक्ष पायदळ उभारण्यास सांगून त्याला शिर्पींच्या मार्गाने जाण्यास सांगितले.[३३१] परंतु इकडे गुलबर्ग्यास जुलै महिन्यात मोंगलाशी बहलोलखानाने तह केला. त्यांत मोंगलानी आदिलशाहाकडून आठ वर्षेपर्यंत नालब्दी घेऊ नये; दोघांनी मिळून कुत्बशाहावर चालन जावे; त्याचा मोड केल्यानंतर सर्वांनी

३२७. डाग रजिस्टर, १६७७, १ एप्रिल १६७७, भा ११, पृ. ९८

३२८. मद्रास, कन्सल्टेशन, ९ मे १६७७, इं. रे. ऑन शिवाजी, भा. २, पृ. ११७; मनुशी, व्हॉ. २, पृ. २०३-४.

३२९. मद्रास, पत्र, १९ जून १६७७, इं. रे. ऑन शिवाजी, भा. २, पृ. १२५.

३३०. गोवळकोंडा, पत्र, १६ जून १६७७, मद्रास, पत्र, १९ जून १६७७, इं.रे. ऑन शि., भा. २, पृ. १२३ व १२६.

३३१. गोवळकोंडा, पत्र, ३ जुलै, तिरुमदवाड, पत्र, १६ जुलै १६७७इ. स., इं. रे. ऑन शिवाजी, भा. २, पृ. १२९ व १३१.

मिळून शिवाजीवर चाल करून जावे; तो पुरा नम्र होईपर्यंत थाबू नये; अशी कलमे ठरली. ही बातमी कुत्बशाहास समजतांच त्याने व शिवाजीने कर्नाटकी व इतर दख्खनी राजासमवेत एकमत करून युद्ध करण्याचा निश्चय केला.[३३२] आगस्ट-मध्ये बहलोलखान मोगलास मिळाला व त्यांची जोड सैन्ये कुत्बशाहाशी लढण्यासाठी गुलबर्ग्याजवळ तयार झाली. त्यानी कुत्बशाहास सागून पाठविले की, मोगल आणि आदिलशाहा यांचा शत्रु शिवाजी त्यास गोवळकोडेकरानी वाट दिली. तरी त्याला धरून मोगलाचे हवाली करावा. तसाच आदिलशाही शेख मिनाजसहि धरून पाठवावे.[३३३] गोवळकोडेकरानी बहादरखानाशी बोलणे लावले. औरगजेबाच्या हुकुमावरून शिवाजीस मदत केल्याच्या गुन्ह्याबद्दल कुत्बशाहाने दोन कोटी रुपये व दहा हजार घोडे द्यावेत अशी बहादरखानाने मागणी केली. नतर ती दोन कोटीवरून एका कोटीवर आली. परतु कुत्बशाहाने फक्त पाच लाख द्यावयाची तयारी दाखविल्यावरून मोगली सैन्य त्रिविनिकोजवळ आले. ही बातमी कुत्बशाहास लागताच मिर्झा मसाउद, सय्यद मखदुम, सर्जाखान वगैरे सरलष्कर, सरखेल व कर्नाटकातील काही फाज मिळून तीस हजार घोडदळ गिवनीस एकत्र जमविले. मोगलाचे चारपाच हजार स्वार व बहलोलखानाचे सैन्य कुत्बशाहावर हल्ला करणार असे कळताच कुत्बशाहाने मोगलाशी लढाई देण्याचा हुकुम दिला. मोगली तळापासन एक कोसावर मगलीग येथे कुत्बशाही सेना रुजू झाली व हिडोलशा व इतर सरदारानी मोगल-आदिल फाजेची कुरापत काढून त्याना अगावर घेत घेत मुख्य सैन्याजवळ आणले. १५ सप्टेंबर १६७७ रोजी लढाई झाली. मोगलाकडील प्रोही (?) हसनखान शायीने लढला. परतु बहलोलखानाच्या स्वारानी माघार घेतली. दिलेरखानाने कुमक केली म्हणून बाज सावरली. कुत्बशाही थोडे लोक जखमी झाले, परतु मोगलाचे ५०० घोडे मेले, ५-६ सेनापतीहि पडले. मोगल-आदिल सैन्याचा पराजय झाला. बहादरखानाचा हस्तक जखमी झाला. त्याचा खिदमतगार मारला व डेऱ्यास आग लावली. या लढाईची बातमी समजताच तानाशाहान मादण्णास स्वासाच कुमक जाण्यास सांगितले. परतु मादण्णाने पलपल येगाणा, मिर्झा मजर, गुड चारुलो, शेख मिनाज वगैरे सरदार सप्टबरच्या तिसऱ्या

३३२. सुरत, ३ आगस्ट १६७७ इ. स., ई. रे. ऑन शिवाजी, भा. २, पृ. १३४.

३३३. गोवळकोंडा, पत्र, २६ आगस्ट १६७७ इ. स., ई. रे. ऑन शिवाजी, भा. २, पृ. १३५; जेधे शकावली.

आठबड्यांत पाठविले. तीन दिवसांनंतर कुत्बशाही सिरलोर येंगाणा बरोरे मोगलांवर चालून गेले. परंतु मोगल-आदिल सैन्यानें माघार घेऊन त्याचा पाठलाग करणाऱ्या कुत्बशाही सैन्यास एका अडचणीच्या जागी गाठले. या वेळी मोगली सैन्यास कुमकहि येऊन मिळाली. तेव्हा त्यांनी कुत्बशाही बरेच लोक कापून काढले. नोनत व निशाणें काबिज केली. सेनापतींना कैद करणार तोंच कुत्बशाही सरलष्कर व त्याचे सैन्य मदतीला धावून गेले. त्यामुळे युद्धाचा रंग पालटला. मोगली सन्य मागे हटू लागलें. नतर पुन्हा चकमकी उडाल्या. परत त्यात कोणासच यश मिळाले नाहीं. कुत्बशाही सैन्याने मोगल-आदिलशाही रसद मारून आणली. तेव्हा अडचणीत सांपडलेल्या मोगली फौजेने ता. २० आक्टोबर १६७७ इ. स. रोजी गोवळ-कोंड्याच्या गोटावर हल्ला करून मुलामाणसांची कत्तल करून दाणागोटा नेला. कुत्बशाही सरलष्कराचा मोड होऊन त्याला मागे हटावे लागले. या वेळी सजातीय लोकाशीं लढण्याचे पठाण सरदारानी नाकारले. त्यावरून गोवळकोंडयास त्यांच्या घराचर पहारे ठेवले. लढाई चालू होती. तरी तहाची वाटाघाट चालूच होती.[३३४]

आदिलशाहीत दक्षिणी व पठाण सरदारात यादवी माजून राहिली होती. त्यामुळे आदिलशाहीच्या ऱ्हासाची चिन्हे स्पष्ट दिस लागली. मसाउदखानाने या वेळीं उठाव करून आदिलशाही वाचविण्याचा निश्चय केला व त्याने कुत्बशाहास मध्यस्थी करण्याचा आग्रह केला. तानाशाहाने अब्दुल करीम उर्फ बहलोलखानाची भेट घेतली. त्याची समजूत घातली. या भेटीत असे ठरले की, बहलोलखानाने आदिल-शाही कारभार मसाउदखानाच्या हवाली करावा व पठाणांच्या पगाराचे देणे देण्यासाठी तानाशाहाने मदत म्हणून सहा लक्ष होन द्यावेत. आक्कण्णास आदिलशाहाचा मुख्त्यार म्हणून विजापुरात ठेवून द्यावे. याप्रमाण करार झाल्यानंतर आक्कण्णा व महमद इब्राहिमचा मुलगा मिर्झा सजर यास कुत्बशाही तीनचार हजार स्वारा-निशी मसाउदखान व बहलोलखानावरोबर विजापुरास रवाना केले. मसाउदखान व बहलोलखान दिलेरखानास भेटले. दिलेरखानानें या व्यवस्थेस मान्यता दिली. परंतु शिवाजीशी लढण्याचे कलम मध्येच लादले. ता. ८ जिल्काद हि. १०८८

३३४. गोवळकोंडा, पत्रे, १९ सप्टेंबर व २८ आक्टोबर १६७७ इ. स., इं. रे. ऑन शि., भा. २.पृ. १३६-७,१४३-४; देवीप्रसादजा गुप्तीकृत औरंगजेबनामा, हिंदी, भा. २, पृ. ७४, डाग रजिस्टर, न्यू भा. १८,८ नवंबर १६७७, पृ ३९५-६; मनुशी, व्हॉ. २, पृ. २२२-३.

(३ जानेवारी १६७८ इ.स.) रोजी बहलोलखान वारला.[३३५] त्यामुळे मसाउदखानाने रचलेला व्यूह ढांसळला. दिलेरखानहि मोड झाल्यामुळे परत गेला. सर्जेखान व सिद्दी मसाउद ५० हजार घोडदळानिशी विजापुरास जाऊ लागले. तेव्हा बहलोलखानाने आपल्या मागें विजापूरच्या सरक्षणार्थ ठेवलेल्या जमशिदखानाने मसाउदखानास कळविले कीं, माझ्या कारभारांत तुम्ही काहीहि ढवळाढवळ न करता कुत्बशाहाकडील सहा लक्ष होनाची रक्कम तावडतोब आणून पोहोचवाल तर किल्ला देईन. ही हकीकत तानाशाहास कळवून रकमेची मागणी केली. परंतु मसाउदखानाची धरसोडीची वागणूक पाहून त्याने रक्कम देण्याचे नाकारले.[३३६]

हि. १०८९ (१३ फेब्रुवारी १६७८ ते २ फेब्रुवारी १६७९ इ.स.).— च. ९ मोहरम गुरुवार (२१ फेब्रुवारी १६७८ इ. स.) रोजी सिद्दी मसाउद विजापूरचे किल्ल्यात आला व कारभार हातीं घेतला. नतर दोनतीन दिवसात कुत्बशाहीकडील बरोबर आणलेल्या लोकाची परत रवानगी केली व शिवाजी, कुत्बशाहा व आदिलशाहा यांनी एकत्र होऊन दिलेरखानाची दक्षिणेतून उचलबागडी करण्याचा बेत मुक्रर करून कुत्बशाहाकडे सहा लाख होनाची मागणी केली. परंतु मसाउदखानाचा ओढा मूलतः मोगलाकडे असल्याने कुत्बशाहाने हमी घेतलेली रक्कम दिली नाही. उलट जमशिदखानास पठाणाच्या देण्याची अत्यत निकट लागली.[३३७] ते बहलोलखानाच्या नातेवाइकास त्रास देऊ लागले. जमशिदखानाने विजापूरचा किल्ला बळकावून शिवाजीस देऊ केला. तेव्हा सर्जेखान कुत्बशाहाचा मुलूख घेण्याकरिता इ. स. १६७८च्या मार्चात गोवळकोंड्यास गेला. किल्ला मसाउदखानानें परत घेतल्याचे कळल्यावरून कुत्बशाहाने युद्धखर्चाकरिता कर्जाऊ दिलेल्या एक कोटी होनाची सूट दिली. परंतु दक्षिणेतील या त्रयींचा सघ मोडला.[३३८] उलट मोगल व विजापूरकर यानी शिवाजीविरुद्ध कट केला.[३३९] यामुळे मादण्णा

३३५. बुसातिन सलातिन, हिंदी, पृ. ६५०–९, जेधे शकावली कारकीर्द, पत्र, १३ डिसेंबर १६७७, इ. रे. ऑन शि., भा. २, पृ. १४८

३३६. बुसातिन सलातिन, हिंदी, पृ. ६५९–६५; कारवार, पत्रे, १६ व २३ जानेवारी १६७८, मुंबई, पत्रे, १४ व २१ फेब्रुवारी १६७८, राजापूर, पत्र, २८ फेब्रुवारी १६७८, इ. रे ऑन शि., भा.२, पृ. १५१, १५२, १५३, १५६ व १५७, मच्छलीपट्टण, पत्र, ११ मे १६७९, डाग रजिस्टर, न्यू २१, पृ. २०५.

३३७. राजापूर, पत्र, ३ एप्रिल १६७८, इ. रे. ऑन शि, भा. २, पृ. १६०.

३३८. मच्छलीपट्टण, पत्र, २ जुलै १६७८, डाग रजिस्टर, न्यू. १२, पृ. २६७.

व तानाशाहा याना गोवळकोंडा सोडून जातां येणें धोक्याचें झालें व त्यामुळे त्यांना मच्छलीपट्टण वगैरे प्रांतातील जुलै महिन्यात ठरविलेला दौरा तहकूब करावा लागला.[३३९] नतर डिसेंबरच्या अखेरीस तो मच्छलीपट्टणास गेला. तेथे डचानी सहा हजार होन व इग्रजानी तीन हजार होनांची पेशकश दिली. परतु सुलतान मुआइझम दक्षिणेंत आल्यावरून तानाशाहाला तातडीने ता. ४ जानेवारी १६७९ रोजी परतावे लागले.[३४०]

हि. १०९० (३ फेब्रुवारी १६७९ ते २२ जानेवारी १६८० इ. स.).— जानेवारीच्या सुरुवातीस दिलेरखान गोवळकोड्याच्या सरहद्दीवर येऊन ठेपला. खडणीची रक्कम जबरीने वसूल करण्यासाठी तो चालून गेला होता. खडणीपैकी ७ लाख (गिल्डर) होन वसूल व्हावयाचे होते. म्हणून तानाशाहाने सुलतान मुआइझम दक्षिणेत आलेला समजताच त्याच्या अभिनदनार्थ एक वकील मोठा नजराणा घेऊन पाठविला व दिलेरखानाची मोहीम थाबविण्याबद्दल विनति केली.[३४१] पावसाळ्यानतर (आक्टोबर) मोगलांनी कुत्बशाहाकडे बाकी राहिलेल्या खडणीबद्दल सोन्याची ४० मोठी पिपें, मुआइझमकरिता कुत्बशाहाची मुलगी व शिवाय हिरेजडित सलकडी जोड इत्यादिकाची मागणी करण्याकरिता गोवळकोड्याम वकील पाठविला. नतर दिलेरखानानें आपल्या सैन्याच्या खर्चाकरिता २४ पिपे सोन्याची आणखी मागणी घातली व ती न दिल्यास गोवळकोड्यावर चालून जाण्याची धमकी दिली. त्यास कुत्बशाहाने कळविले की, मजजवळ इतके द्रव्य नाही, राजकन्येचा दुसऱ्या तरुणाबरोबर आधीच वाग्निश्चय झाला आहे. आणि सलकड्यावर हिऱ्याएवजी स्फटिकाचीच योजना होऊ शकेल.[३४२] याप्रमाणे रोकडा जबाब मिळाल्याने शाहाजादा मुआइझम व दिलेरखान यानी आपली सैन्ये गोवळकोड्याच्या हद्दीत नेली. परतु शिवाजीनें

३३९. मद्रास, पत्र, ८ जुलै १६७८, इ. रे. ऑन शि., भा. २, पृ. १६७.

३४०. मद्रास, पत्र, ६ व ८ जानेवारी १६७९, लेटर्स फ्रॉम फोर्ट सेंट जॉर्ज ते इतर अधिकारी, व्हॉ. १६७९, पृ. २ व १२, कन्सल्टेशन, १३ जानेवारी व ६ व १७ फेब्रुवारी १६७९, डायरी आणि कन्सल्टेशन बुक, व्हॉ. १६७९–८०, पृ. २, १५ व १७, मार्टिनचे मेमॉयर, पृ २९९ अ.

३४१. मार्टिन मेमॉयर, पृ. २९९ अ, मच्छलीपट्टण, पत्र, ११ मे १६७९, डाग रजिस्टर, न्यू. २१, पृ. २०५.

३४२. मच्छलीपट्टण, पत्र, २५ आक्टोबर १६७९ इ. स., डाग रजिस्टर, न्यू. ४, पृ ४९९.

आपल्या सैन्यानिशी जाऊन त्यांच्या पिछाडीवरून हले चढविल्यामुळे त्याना माघार घ्यावी लागली.[३४३] दिलेरखान विजापुराकडे वळला. तेव्हां शिवाजीची मदत आपणास मिळत आहे हें पाहून तानाशाहानेहि मुआइझम यास कळविले की, आता बाकी राहिलेली खडणी देण्याचा आपला विचार नाही व काही झाले तरी यापुढे आपण ती देणार नाही.[३४४] मोगलांनी प्रथम विजापूरची मोहिम यशस्वी करण्यासाठी सर्वस्व खर्चण्याचे ठरविल्याने कुत्बशाहावर चालून न जाता ते तिकडेच गेले. त्यामुळे आदिलशाही सरदाराची त्रेधा उडाली. त्यानी व शिवाजीने कुत्बशाहाकडे (नवंबर १६८०) मदत मागितली. कुत्बशाहाने सरलष्कर व दुसरे सेनापति यास त्याप्रमाणे हुकुमहि दिला. परंतु इतक्यात मोगलाचा हेजिब येऊन त्याने 'तुम्ही विजापुरास मदत केल्यास मोगलाचे सैन्य विजापुरात आहे तेच पुढे येऊन गोवळकोड्यावर स्वारी करील' अशी धमकी दिली. त्यामुळे कुत्बशाहाने आपले सैन्य मदतीस न जाऊ देता (डिसेंबर १६७९ इ. स.) गुप्तपणे शिवाजीकडे पैसा पाठविला व त्यास सैन्य उभे करण्यास सांगितले.[३४५]

हि. १०९१ (२३ जानेवारी १६८० ते १२ जानेवारी १६८१ इ.स.).—मोगली सैन्यास विजापूरच्या हल्ल्यात यश येईना व शिवाजीने त्याना सतावून सोडले. त्याने त्यास मोगली मुलुखात शिरून लुटालूट आरंभिली. शिवाय उत्तरेकडीलहि राजकारण आले. दिलेरखानासहि कर्नाटकातून त्याच्या अपेक्षेप्रमाणे मदत होईना. तेव्हा दिल्लीहून सुलतान मुआइझमास हुकुम आला की, नवाब खलिल उल्ला-खान (महमद इब्राहीम) याचेतर्फे तह घडवून आणण्यासाठी तानाशाहास विनंति करावी. परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाही. मोगली सैन्यास रसद न मिळाल्यामुळे ते पुन्हा विजापुराहून (फेब्रुवारी) निघून गेले. विजापूरकराना कुत्बशाहाने शिवाजीच्या तर्फे बरीच मदत दिली.[३४६]

३४३ कोरोमंडलची पत्रे, १६ नवंबर १६७९ इ. स., डाग रजिस्टर, न्यू २६, पृ. ५४०.

३४४. डाग रजिस्टर, न्यू १, पृ. ५५४.

३४५. गोवळकोंडा, पत्र, १४ जानेवारी १६७९ इ. स., फॉ. रे., फो. सें जॉ., भा २८, पृ. ३४.

३४६. कोरोमंडलची हकीकत, ७ व २१ फेब्रुवारी १६८०, डाग रजिस्टर, न्यू १६ पृ. २४४., व पुनरुक्त, १३ मे १६८०, न्यू २३, पृ. २८०-१.

एप्रिल १६८०त मदुरेचा नायक व एकोजी यांचे वैनमस्य आलें. त्या वेळी एकोजीकडील रघुनाथपतानें कुत्बशाहाची मदत मागितली. परतु जिजी व त्याखालील मुलखावर कुत्बशाहाने आपला हक्क दाखवून तो परत देण्यास कळविले. रघुनाथ पडितानें कुशल वकील पाठवून मादण्णावरोवर बोलणे लावले.[३४५]

हि. १०९२ (१३ जानेवारी ते ३१ डिसेंबर १६८१ इ. स.).— इग्रजाचें व पोडला लिंगाप्पाचे नीट जमेना. मास्टरचा जबरदस्तीचा कारभार सहन करण्याइतका तो भित्रा नव्हता. त्याने मास्टर गडबड करू लागताच इग्रजाची रसद व व्यापार बद केला. त्यावरून एप्रिल १६८१त मादण्णा, आकण्णा व महमद इब्राहीम यांस त्यांनी पत्रे लिहून लिंगाप्पाच्या विरुद्ध तक्रार केली. आकण्णा जानेवारीत तिरुपतीवरून परत गोवळकोंडयास गेला होता. पोडला लिंगाप्पानें इग्रजास स्वरमरीत पत्र लिहिले की तुम्हास येथे राहाण्यास परवानगी दिली ती आमच्या लोकांस तुम्ही निर्वध करावा म्हणून नाही. जर तुम्ही तसे कराल तर येथील ३-४ हजार सैन्यापेक्षा अधिक सैन्य चालून येईल. आकण्णाने दरबारतर्फे इग्रजाच्या वकिलास समज दिली की. कोणत्याहि बाबतीत जे काही बोलणे करावयाचे तें प्रथम तेथील सुभेदारापाशीच केले पाहिजे. इतकेच नव्हे तर वार्षिक पेशकशीची रक्कमहि तावडतोब भरली पाहिजे अशी ताकीद केली.[३४६]

नवबर १६८१त मोगली सैन्य नर्मदापार आल्याचे समजल्यावरून आकण्णाने श्रीस्थलास जाण्याचा बेत रहित केला. भिक्षा सजर व इतर सरदारास घोडदळासह सरहद्दीवर सरक्षणार्थ रवाना केले. मोगलास करार केलेल्या वार्षिक खडणीतील काही भागावद्दल पधरा हत्ती, बरेच मण सोने व चादी पाठविण्याचे ठरले.[३४९]

हि. १०९३ (१ जानेवारी ते २० डिसेंबर १६८२ इ. स.).—च. १६ जमादिलावल हि. १०९३ (१४ मे १६८२ इ. स.) गोजी कुत्बशाहाचा

३४७. गोवळकोंडा, पत्र, एप्रिल १६८० इ. स , डाग रजिस्टर, न्यू २, पृ. ७२४-९.

३४८. मद्रास, कन्सल्टेशन, ६ जानेवारी, २७ व ३१ मार्च, ७ एप्रिल १६८१ व पोडला लिंगाप्पाचे काजिवरमहून पत्र, १० जुले १६८१; गोवळकोंडा, पत्र, २१ जुले, १६८१ इ. स., डायरी आणि कन्सल्टेशन बुक, १६८०-८१, पृ ८९; १६८१, पृ. १३ व १४ व १५, लेटर्स फ्रॉम फोर्ट सेंट जॉर्ज, व्हॉ. I-१-१६८१-२, पृ १, ३ व १२.

३४९. गोवळकोंडा, पत्र, १९ सप्टेबर १६८१ इ. स., लेटर्स ट फोर्ट सेंट जॉर्ज, व्हॉ. १, १६८१-२, पृ ३७.

वकील मोहमद मासूम याने गोवळकोड्याहून आणलेली २ लाख ४४ हजार रुपयांची पेशकश बादशाहास नजर केली.[३५०]

ता. १ जानेवारी १६८२ इ. स. रोजी मादण्णा व आक्कण्णा यांनी पोडला लिंगाप्पाच्या शिफारसीवरून इब्राजास सालाबादप्रमाणे व्यवहार करण्यास परवानगी दिली. मास्टरच्या जागी वुलियम गायफर्ड आल्याने इब्राजाचा कारभार सुरळीत चालू लागला.[३५१]

मोगल दक्षिणेत उतरल्यामुळे राज्यात सर्वत्र अस्थिरता आली. हुकेरीच्या राजाने वसवापट्टण घेतल्यामुळे मार्च महिन्यांत कुत्बशाहाचा महमद इब्राहीमवर बराच रोष झाला. मोगली परचक्रामुळे सर्व मोठमोठे कारभारी चिंताक्रांत व राजकारस्थानांत व्यग्र होऊन गेले.[३५२]

ता. ११ मे १६८२ इ. स. रोजी तानाशाहा मादण्णाच्या घरी गेला व त्याने महमद इब्राहीमची सरलष्करी आक्कण्णास दिली व कर्नाटकची सुभेदारी पोडला लिंगाप्पास दिली. त्यामुळे नेकनामखानाकडे पूर्वी जो सुभा होता तो लिंगाप्पाकडे आला. लिंगाप्पास हत्ती, घोडे, तरवार, सन्मानाची वस्त्रे वगैरे पाठविली. महमद इब्राहीमकडे राहिलेली सरंजामी मिळविण्यासाठी मच्छलीपट्टणचा हवालदार हसन बेग जुलैत गोवळकोड्यास येऊन खटपट करू लागला.[३५३]

इ. स. १६८२च्या जुलैअखेर मोगली सैन्याने आदिलशाही मुलखांत शिरून लढाईची कुरापत काढली. तेव्हा गोवळकोंडेकर व सभाजी यांनी विजापूरच्या मदतीस काही सरदार व सैन्य रवाना केले. आगस्टच्या अखेर मादण्णास मोगली परचक्रामुळे मुलकी कारभार पाहण्यास मुळीच वेळ मिळेना. तेव्हां तो कारभार आक्कण्णाकडे दिला.[३५४] त्यामुळे आक्कण्णास निरनिराळ्या प्रांतात फिरून पाहाणी वगैरे

---

३५०. देवप्रसाद जो मुनिअफक्र ऑरंगजेबनामा, हिंदी, भाग २, पृ. ११८.

३५१. मादण्णा व आक्कण्णाची फर्माने, १ जानेवारी १६८२ इ. स., लेटर्स टु फोर्ट सेंट जॉर्ज, व्हॉ. २, १६८२, पृ. १८.

३५२. गोवळकोंडा, पत्र, मार्च-एप्रिल १६८२ इ. स., लेटर्स टु फोर्ट सेंट जॉर्ज, व्हॉ. २, १६८२, पृ. २६.

३५३. गोवळकोंडा, पत्र, १७ मे, व मछलीपट्टम, पत्र, ३ जुलै १६८२ इ. स., लेटर्स टु फोर्ट सेंट जॉर्ज, व्हॉ. २, १६८२, पृ. ३९ व ५८.

३५४. गोवळकोंडा, पत्रे, २ आगस्ट व ६ सप्टेंबर १६८२ इ. स., लेटर्स टु फोर्ट सेंट जॉर्ज, व्हॉ. २, १६८२, पृ. ६८ व ९४.

करण्यास सवड होईना व त्याला आपल्या दोऱ्याचा कार्यक्रम वेळोवेळी तहकूब करावा लागला.[३५५]

हि. १०९४ (२१ डिसेंबर १६८२ ते १० डिसेंबर १६८३ इ. स.).— इ. स. १६७५च्या अखेरीस सय्यद मुझाफरखान याचा दिवाणीचा कारभार काढून घेतला होता. त्यानतर तो कैद झाला असावा. त्याला सोडण्याविषयी औरंगजेबाकडून लिहून आलें. त्यावरून त्याला कुत्बशाहानें सोडलें. तो आपल्या दोन मुलांसह च. २० जमादिलावल (८ मे १६८३ इ. स.) रोजी बादशाहास भेटला. औरंगजेबानें त्यास सन्मानाची वस्त्रें व जडाऊ खजर बक्षिस दिला. त्याच्या दोन मुलास मनसबी व असलतखां व निजावतखां असे किताब दिले.[३५६]

हि. १०९५ (११ डिसेंबर १६८३ ते २७ नवंबर १६८४ इ. स.).— च. १२ जमादिलाखर (१८ मे १६८४ इ. स.) रोजी शुजाअत हैदराबादी औरंगजेबास जाऊन मिळाला. त्याला पांच हजारी, पांच हजार स्वाराची मनसब व शुजाअतखां हा किताब मिळाला.[३५७] च. १८ जमादिलाखर (२४ मे १६८४ इ. स.) रोजी हाजी महताब हैदराबादी मोगलास जाऊन मिळाला.[३५८]

च. २३ रजब (२७ जून १६८४ इ. स.) रोजी कुत्बशाहाने अलमगीर बादशाहाकडे ऐन उल्मुल्क नावाचा वकील पाठविला. हा महमद जाफरचा मुलगा असून तो अकबराबरोबर बड करून दक्षिणेत पळून गेलेल्यापैकी एक होता असे कळल्यावरून त्यास च. २५ रजब (२९ जून) रोजी कोतवालाने कैद केले व त्याची मालमत्ता जप्त केली. कुत्बशाहास त्याने बऱ्याच थापा दिल्याबरून त्याला त्याने नोकरीत घेतले होते. तो अकबराकडे होता ही गोष्ट त्याला माहित नव्हती. नतर कांही दिवसांनी अलमगीर बादशाहाने ऐन उल्मुल्कास तीनशेची मनसब देऊन त्याला आपल्या नोकरीत ठेवून घेतले.[३५९]

---

३५५. मदापोलम, पत्र, १४ सप्टेंबर, मच्छलीपट्टण, पत्र, १२ आक्टोबर, पेडापोलम, पत्र, २१ आक्टोबर १६८२ इ. स., लेटर्स टु फोर्ट सेंट जॉर्ज, व्हॉ. २,१६८२, पृ. ९६, १०२ व १०३.

३५६. देवीप्रसादजी मुन्सिफकृत औरंगजेबनामा, हिंदी, भा. २, पृ. १२४.

३५७. देवीप्रसादजी मुन्सिफकृत औरंगजेबनामा, हिंदी, भा. ३, पृ. ७.

३५८. देवीप्रसादजी मुन्सिफकृत औरंगजेबनामा, हिंदी, भा. ३, पृ. ८.

३५९. देवीप्रसादजी मुन्सिफकृत औरंगजेबनामा. हिंदी, भा. ३, पृ. ८.

च. २९ सावान (२ आगस्ट १६८४ इ. स.) रोजी मिर्झा महमद व विहारीदास यास कुत्बशाहाने दिलेले अठरा हजार रुपये व दोन हत्ती परत देण्याची आज्ञा झाली.[३६०]

• सप्टेंबरच्या सुमारास कुत्बशाही व मराठा सैन्य मोगलानी विजापुरास वेढा घातला होता म्हणून आदिलशाहाच्या मदतीस गेले.[३६१]

हि. १०९६ (२८ नवंबर १६८४ ते १८ नवंबर १६८५ इ. स.).— इ. स. १६८५च्या सुरुवातीस सर्व दक्षिणीयानी मोगलाशी सामना देऊन त्याना पालवून देण्याचे गुप्त कारस्थान जोरांत चालू केले. सभाजीराजाने रामचंद्रपतास कुत्बशाहाकडे पाठवून या गुप्त कारस्थानात सर्वास सामील करून घेण्याबद्दल बोलणे लावले. या कारस्थानाची कल्पना कुत्बशाहाने आदिलशाहास लिहिलेल्या फर्मानावरून येते.[३६२] त्या पत्रातील मजकुराचा साराश असाः " अलमगीर पादशाहा दौलताबादेस आल्यानतर त्याने आम्हाकडे एक हेजिब पाठवून ' आम्ही मराठे छत्रपति सभावर डोळा ठेवून आलो आहोत. तरी आपण आपला फाजफाटा आमच्या मदतीस देऊन नालबदीहि देणे.' तेव्हा आम्ही जवाब पाठविला का, दख्खणची पातशाही व आमची पातशाही निरनिराळी नाही. त्यावरून मोगल आपलेवर चालून आला आहे. भिण्याचे कारण नाही. आम्ही पसा पुरवू. आपण सर्जाखानास दिलदिलासा देऊन त्यास सरसुभा करून मोगलावर रवाना करावा. महाराज छत्रपति सभाजी राजे याचेकडे एक खत हेजिबाबरोबर पाठवून त्याचेकडून मोगलाचा फन्ना उडविण्यासाठी घोडदळाची मदत मागावी. आम्ही खासे कमर बाधून कुलवर्म्यास जात आहोत. तुम्हीहि कमर बाधून यावे. सभाजी तयारीने येतच आहेत. यात तुमच्या राज्यास धक्का लागणार नाही. माधवराव हेजीब सर्व काही सागून पाठविला आहे. आदिलशाहाकरिता एकदोन मेवा, एकदोन घोडे व चार हत्ती, सहा सारगी घोडी पाठवीत आहे. ममुदखानास कोटाच्या रक्षणास ठेवलेत

३६०. देवीप्रसादजी मुन्सिफकृत औरगजेबनामा, हिंदी, भा. ३, पृ. ९.

३६१. कारवार, पत्र, १५ सप्टेंबर १६८४ इ स , फॅक्टरी रेकॉर्डस, व्हॉ. १०९ (मूळ).

३६२ शिवसाहित्य, खंड २, ले ३९४, पृ ३९५—९७. या फर्मानावरील पैवस्ती चं. ५ रबिलाखर (१ मार्च १६८५ इ. स.) आहे. यावरून हें फर्मान फेब्रुवारीच्या दुसऱ्या पंधरवड्यात लिहिले गेले असावे. वृ. स., हिंदी, पृ. ७५१.

तरी पुरे आहे. सभाजीनें चार हिशे (?) करड्या घोड्यांची सचणी केलीच आहे. आम्हांस माल्गुजार वगैरे लोकानीं कळविलेंच आहे की, याप्रमाणें कारस्थान करावे. म्हणून हा कारभार हातीं घेतला आहे. यात यश आलें तर तुम्हांस आम्ही आपली मुलगी देऊन कायमची दोस्ती करू. दख्खणची पादशाही सांभाळणे अवश्य म्हणून पैसे व हेजिब पाठविला आहे. तरी मुरीदखान व बहलोलखान यास दिलदिलासा द्यावा. कर्नाटकी राजे राचेवाल यांस बोलावून घ्यावें. त्या योगानें आपणास जोरच मिळेल. सभाजीने आम्हाकडे रामचद्रपत हेजीब पुरकळ गुप्त गोष्टी सांगून पाठवीला आहें. त्यास आपलेकडे पाठवीत आहे. त्याचे म्हणणे नीट ऐकून घेऊन त्यास इष्ट असाच जवाब द्यावा."[३६३] याप्रमाणे पत्र गेले. नतर लवकरच मार्चच्या अखेरीस कुत्बशाहानें विजापुराच्या मदतीस तीन हजार स्वार व तीन लाख होन खर्चासाठी पाठविले.[३६४]

कुत्बशाहाने मोगलांशी वैर स्वीकारल्याचे वर्तमान सोलापूर येथील हेजिब महमद मासूम व महमद जाफर यांस कळविले. त्यांत, शिकदर पोरका पाहून त्याचा नाश करण्यास औरगजेब उद्युक्त झाल्यानें त्याच्या साहाय्यास जाणे जरूर म्हणून एका बाजूने शिकदर व सभाजी आपल्या अगणित फौजेनिशी लढत आहेत, तरी आम्हीहि आमच्या ४० हजार घोडदळानिशी खलिलउल्लाखान पलग हल्ला यास दुसऱ्या बाजूने पाठवित आहोत वगैरे मजकुर होता. परतु हे पत्र औरगजेबाच्या हाती च. ४ सावान (२७ जून १६८५ इ.स.) रोजी पडले. तेव्हा औरंगजेबास राग आला. त्याने खान जहान बहादुर व शहा अलम यांस गोवळकोड्यावर चालून जाण्याचा हुकूम दिला[३६५].

च. २४ रमजान (१५ आगस्ट १६८५ इ. स.) रोजी अबाजीपत हैद्राबादहून विजापुरास जाऊन आदिलशाहास भेटले. आदिलशाहास मदत दिली व सभाजी महाराजाकडून देवविली.[३६६]

औरगजेबानें गोवळकोड्यावर लढाई करण्याचं ठरविलेले समजताच कुल-बर्ग्याच्या किल्लेदाराचा मुलगा जान निसारखान आणि मालखेडच्या किल्लेदाराचा भाऊ पर्विझ बेग यांनी सेरमची गढी घेतली. तेव्हां अबुल हसनने शेख मिनाज,

३६३. जेधे शकावली.

३६४. परिशिष्ट २, पृ. ९३-४; देवीप्रसादजी मुन्सिफकृत औरंगजेबनामा, भा. २, पृ. २०–१; प्रो. सरकार, औरं, भा. ४, पृ. ३४२.

३६५. बु. स., हिंदी, पृ ७५३.

रुस्तमराव व बराखान यास ती गढी परत घेण्यास पाठविले. कुत्बशाही सैन्य आलेलें पाहताच जान निसारखान सेरमच्या किल्ल्यांत जाऊन बसला. नतर खान जहान बहादुर आपले दोन मुलगे हिम्मतखान व सिपेहदारखान, इराजखान व इतर उमरावानिशी जलदीने धावून आला. त्याला अडविण्यासाठी कुत्बशाहाने महमद इब्राहिमास रवाना केले. परतु खान जहान बहादुर त्याची गाठ पडण्यापूर्वीच मालखेडास येऊन पोहोचला. खलिलउल्लाखानहि त्या जागी आला व त्यानें मोगली सैन्यास गराडा घातला. खान बहादुर मोर्चे बाधून व खदक खणून बसला. किरकोळ हल्ले होत असत. याप्रमाणे एक महिना लोटला. आगस्टच्या सुरुवातीस कुत्बशाही सन्यानें मोगली फौजेवर हल्ला चढविला. हिम्मतखान, सिपेहदारखान व इराजखान उजवीकडून, रजपूत व अफगाणी सैन्य डावीकडून व खान जहान बहादुर समोरून असे प्रतिकार करू लागले. परतु यापूर्वी शेख मिनाज व बराखान यानी दोनतीन बाजूनी मोगली मोर्चावर हल्ला चढविला. बरेच लोक मारले. तोफाचीहि पर्वा न धरता मोगली फौजेचा बराच नाश करू लागले. हे पाहून मोगली सरदार हत्तीवरून लढू लागले. सिपेहदारखान, जगतसिग हाडा व शर्झाखान याचेवर शेख मिनाज धावून गेला. मोठी धुमश्चक्री उडाली. शेख मिनाजने एक बुणगा मारला. रुस्तुमराव हिम्मतखानावर चालून गेला. त्याच्या हातघाईत हिम्मतखान, सफदारखान व जसवत बुंदेला हे जखमी झाले. हिम्मतखानाने बापाजवळ मदत मागितली. परतु या वेळी खलिलउल्लाखानाने व बंडखानाने खान जहान बहादुरास घेरून टाकला होता. बंडखानाचा हात जखमी झाला म्हणून खान जहान वाचला. मोगलाची सर्व बाजूनी दाणादाण उडाली. इतक्यात कर्मधर्मसयोगाने राजा रामसिहाचा हत्ती मर्दीस आला व त्याने तीनचार मणाच्या साखळीने शत्रुसन्यात घुसून दिसेल त्यास झोडपून काढण्यास सुरुवात केली. बंडखान धाडशी व ताकदवान होता. तो त्या हत्तीवर चालून गेला. परतु त्याचा घोडा भीतीने बेफाम झाल्याने तो घाब्यावरून खाली पडला व ताबडतोब मरण पावला. या गोधळाचा फायदा घेऊन खान जहानाने कुत्बशाही सैन्यावर निकराचा हल्ला चढविला. कुत्बशाही सैन्य एकदोन कोस मागे हटले.[३६६]

शहा अलम आपल्या सैन्यानिशी कुत्बशाहीस आला. कुत्बशाहानेहि आणखी कुमक पाठविली. खान जहानाने शहा अलम यास तातडीने येण्यास लिहिल्यावरून

३६६. परिशिष्ट २, पृ. ९४-९; खाफीखान, इ. डा., व्हा. २, पृ. ३१ -५; प्रो. सरकार, औरंगजेब, भा. ४, पृ. ३४१ ;

तो घाईने आला व ते तावडतोब कुत्बशाही सैन्यावर चालून जाऊ लागले. सूर्योदयाच्या सुमारास दोन्ही सन्याची गांठ पडली. हेरावळीत शहा अलमचा मोठा मुलगा मुईझउद्दिन व खान जहान होते. त्याचेवर जोराचा हल्ला झाल्याने तीन हत्ती, चारपांचशें घोडे व बरेच पायदळ ठार झालें. कुत्बशाही सैन्य तोफांना न जुमानता, तळांत घुसले व दाणादाण उडव् लागले. तेव्हा सय्यद अबदुल्ला, ख्वाजा अबदुल मक्करम व राजा मानसिंग मदतीस आल्याने कुत्बशाही सन्य थोपवून धरले गेले. तीन दिवस लढाई झाली व दोन्हीहि सैन्यांचा बराच नाश झाला. शेवटी कुत्बशाही सैन्याने माघार घेतली. मोगलानी एकदीड कास पाठलाग केला. परंतु सायकाळ झाल्याने मोगली सैन्य परत फिरले.[३६७]

या लढाईनतर कुत्बशाही फाजेने मोगलावर चोरटे हल्ले चढविले. याप्रमाणे चार महिने गेले. अलमगिराच्या रागाबद्दल लिहून आलेल्या पत्रामुळे खान जहानाचा विरस झाला होता व शहा अलम अबुल हसनशी शक्य तर तह घडवून आणण्याची सारखी खटपट करीत होता. मोगल सैन्याने काबिज केलेली सेरमची गढी व कोंहीरचा प्रांत यांवरील हक्क सोडून कुत्बशाही सैन्य परत जाईल तर मी तह घडवून आणतो असे शहा अलमचे म्हणणे होते. खलिलउल्लाखान तह करण्यास उद्युक्त झाला होता. परंतु शेख मिनाज, रुस्तुमराव वगैरे मडळी प्रात सोडण्याच्या विरुद्ध होती. याच वेळी कुत्बशाहाकडून आणखी कुमकहि येऊन पोहोचली. कुत्बशाही सैन्याने हल्ला चढविण्याची तयारी केली.[३६८]

आक्टोबर १६८५च्या सुरुवातीस कुत्बशाही सन्याने तोफांच्या सरबत्तीस प्रारंभ केला. बुणगा पूर्वेकडे तीनचार कोसावर नदीच्या पलीकडे नेला. मोगली हेरावळीत मुइझउद्दिन, खान जहान, सफदारखान व हिम्मतखान होते. चद्रावळीत सय्यद अबदुल्लाखान व इतर सरदार होते. त्यास कुत्बशाही दोन कटकानी घेरले. शहा अलमने कुमक म्हणून एक तुकडी मागे ठेवली होती. तिचेवरहि एका कुत्बशाही तुकडीने हल्ला चढविला. खास शहा अलमच्या बरोबर बरेच रजपूत राजे होते. त्याच्यावर कुत्बशाही मुख्य सैन्य चालून गेले. भयकर रण माजले. शेवटी कुत्बशाही सैन्य मागे हटू लागले. बुणग्यापर्यंत आले. मोगलानी पाठलाग केला. शेख मिनाजने मोगली हेरावळीचा सेनापति मुइझउद्दिन यास निरोप पाठवून इस्लामी रिवाजाप्रमाणे

३६७. परिशिष्ट २, पृ. ९९–१००.

३६८. परिशिष्ट २, पृ १०१–३

नायकमुलांस रणक्षेत्रापासून दूर पोहोंचविण्यापुरता तीनचार घटकांचा अवसर द्या नंतर आम्ही लढाई देऊ असे कळविले. मुझझउद्दिनने विनति मान्य केली व कुत्बशाही सरदारास हत्तीवरून नायकमुले व मालमत्ता शेजारील गढीवर पोहोचवू दिली. दुसरे दिवशी पुन्हा घनघोर रण माजले. दोन्ही बाजूकडील बरेच लोक मारले गेले. कुत्बशाही शेख मिनाज व रुस्तुमराव जखमी झाले. मोगलाकडीलहि काहीं सरदार जखमी झाले. दोन्हीहि बाजूकडील सरदारानी आपल्या शौर्याची पराकाष्ठा केली. खलिलउल्लाखान व इतर पठाण सरदाराचा शहा अलमकडे ओढा होता. त्यामुळे त्यांनी प्रथमपासूनच अगचोरीने काम चालविले होते. सायकाळपर्यंत युद्ध झाले. रात्री सैन्ये आपापल्या तळावर गेली. महमद इब्राहीम फितुर झाल्याचा संशय आल्यावरून त्याचा बंदोबस्त होऊन आला होता. परंतु (ता. ८ ऑक्टोबरच्या सुमारास) खलिलउल्लाखान रात्रीच पळून जाऊन मोगलास[३६९] मिळाल्याने कुत्बशाही सैन्याने रातोरात आपला मुक्काम हलवून हैद्राबादेची वाट धरली. शहा अलमहि त्यांचा पाठलाग करीत हैद्राबादेस आला.[३७०]

कुत्बशाही फौजेने माघार घेतलेली समजताच अबुल हसनने आपले जडजवाहीर वगैरे रातोरात गोवळकोंड्याच्या किल्ल्यात नेले. हैद्राबादेतील लोक नेता येईल ती मालमत्ता घेऊन बाहेर गावी जाऊ लागले. ज्याना किल्ल्यात जाणे शक्य होते ते रात्री किल्ल्यांत गेले. या गडबडीत चोर व दरवटखोर लोकांनी मनसुबाद लूट व जाळपोळ करण्यास सुरुवात केली. दुसऱ्या दिवशी सकाळी शहा अलमचे सैन्य हैद्राबादेस येऊन दाखल झाले. तेहि लुटालुट व जाळपोळ करू लागले. कल्पनातीत लुटालुट झाली. नायकमुलास त्रास झाला. शहा अलमने सुझावेल नेमून बऱ्याच प्रयासाने स्थिरस्थावर केली. अबुल हसनने क्षमा मागून तहाचे बोलणे लावले. शहा अलमने मध्यस्थी करण्याचे कबूल केले व तहाच्या अटी सांगितल्या की, अबुल हसनने दोन लाख होन खंडणी म्हणून एक कोटी बीस (काही ठिकाणी ५०) लक्ष रुपयांची पेशकश तात्पुरती भरावी. मोगली सैन्याने घेतलेल्या सरंजाम व

३६९. महमद इब्राहिम खलिलउल्लाखानास अलमगिराने सहा हजारी सरदारी व ६००० स्वार देऊन महाबतखान असा किताब दिला. इ. स. १६८६त त्याला वऱ्हाडची सुभेदारी दिली व इ. स. १६८७त सातहजारी देऊन प्रथम कर्नाटकात व नंतर पंजाबच्या सुभ्यावर पाठविले. तो इ स. १६८८त वारला.

३७०. परिशिष्ट २ पृ. १०३-८, सनुशा, खंड २, पृ २८८-९४.

कोहीर वगैरे प्रांत मोगलांकडे राहूं द्यावा. मादण्णा व आक्कण्णा यांस कारभारावरून दूर करावें. अबुल हसनने बहुतेक सर्व अटी कबूल केल्या.[३७१]

शहा अलमनं हैद्राबाद फत्ते केल्याची वगैरे बातमी अलमगिरास कळविली. ती सलख जिल्काद (१९ आक्टोबर १६८५ इ. स.) रोजी अलमगिराच्या मिळाली. याच सुमारास कुत्बशाही फौजेच्या मदतीनें विजापुरच्या वेढ्यांत मोगलांचा पराजय झाला होता.[३७२] त्यामुळे कुत्बशाहाची मदत बंद करण्यासाठी नाइलाजास्तव शहा अलमच्या विनतीवरून अबुल हसनला वस्त्रें धाडलीं व तह मान्य केला. शहा अलम यास चाळीस हजारी व तीस हजार स्वारांची मनसब झाली. महमद इब्राहिमचे दोन दाऊद व अबुल हसनचा मेव्हणा शरीफुलमुल्क व इतर लोक शहा अलम यास मिळाले. त्यांसहि वस्त्रे वगैरे देण्याचा हुकुम झाला.[३७३]

सय्यद मुझाफ्फर खानाचा मुलगा मीर हशम व नातू अब्दुल करीम औरंगजेबाकडून शहा अलमसाठी जडजवाहीर व अबुल हसनकरिता वस्त्रे वगैरे घेऊन आला. शहा अलमचा मुक्काम त्या वेळी कोहीरला गेला होता. तेथून तो सैन्यासह अबुल हसनची वस्त्रे देण्यासाठी हैद्राबादेस येत असता तो औरंगजेबाच्या हुकुमावरून दर्शनी कारण निराळे दाखवून गोवळकोंड्याचा किल्ला घेण्यासाठी येत आहे, अशी कडी उठली. तेव्हा शेख निजाम चालून गेला व वाटेत त्यास महकाल (मुनगळ) येथे गाठले व हल्ला चढविला. मीर हशम व इतर लोक मारले गेले. बरोबर सौदागरहि होते. त्यांची मालमत्ता लुटली गेली. अब्दुल करीम यास कैद केले होते. परंतु चार दिवसानंतर त्यास अबुल हसनने शहा अलमच्या छावणीवर आणून सोडले.[३७४]

च. १६ जिल्हेज (४ नव्हंबर १६८५ इ. स.) रोजी महमद इब्राहीम, शरीफुलमुल्क व मोहमदतकी वगैरे लोकास मोगली नोकरीत घेतले गेले.[३७५]

तहात ठरलेल्या खंडणीची भरपाई पुढे तीनचार महिने झाली नाही व मादण्णा व आक्कण्णाला कारभारावरून दूर करणेहि अबुल हसनला जड गेलें.

३७१. परिशिष्ट २, पृ. १०८-११; मनुची, व्हॉ. २, पृ. २९३-४.

३७२. कारवार, पत्र, ८ आक्टोबर १६८५ इ. स., फॉ. रे., व्हॉ. १०९.

३७३. देवीप्रसादजी मुन्शिफकृत औरंगजेबनामा, भा. ३, पृ. २६.

३७४. देवीप्रसादजी मुन्शिफकृत औरंगजेबनामा, भा. ३, पृ. २७, परिशिष्ट २, पृ. १२४.

विजापूरच्या हल्ल्याचें कामहि दिरगाईने व असमाधानकारकपणे चाल्ल्यामुळें अलमगिरानें गोवळकोंड्याकडे कानाडोळा केला.[३७५]

हि. १०९७ (१८ नवंबर १६८५ ते ८ नवंबर १६८६ इ. स.).— खान जहान हैद्राबादेहून नऊदहा दख्खणी सरदारांसह परत गेला. त्यास व या नवीन मिळालेल्या सरदारास च. ७ सफर (२३ डिसेंबर १६८५ इ. स.) रोजी बहुमानाची वस्त्रे मिळाली.[३७६]

च. १६ रबिउलअव्वल (३१ जानेवारी १६८६ इ. स.) रोजी कुत्बशाहीतून पळून गेलेले महमद इब्राहीम, शरीफुलमुल्क व त्याचे मुलगे हिदायतुल्लाह व इनायतुल्लाह आणि अबदुर कादिर यास अलमगिराने मोठमोठीं बहुमानाची बक्षिसे व मनसबी दिल्या.[३७७]

जानेवारीच्या अखेरीस मादण्णाने लिंगाप्पास हैद्राबादेस परत बोलावून त्याचे जागी अबदुल नबीची नेमणूक केली.[३७८]

मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात यल्लमतराय याने गुप्त कट करून सेरोमा, जानीबेग व अबुल हसनच्या इतर नोकराच्या साहाय्याने मादण्णा व आकण्णा हे कामकाज आटोपून दुपारी जेवण वगैरे वाजता परत जात असता त्यास ठार मारले. मादण्णाचें शीर शहा अलमने च. १ जमादिलावल (१६ मार्च १६८६ इ. स.) रोजी बहादुर अलिम्बाबरोबर अलमगिराकडे पाठविले.[३७९] याच दिवशी अबुल हसनचा एक भाऊबंद जेनुल आबिद्दीन हा मोगलाकडे गेला. त्यास वस्त्रे व सोलापूरची फौजदारी मिळाली.[३८०]

च. ३० रजब (१२ जून १६८६ इ. स.) रोजी अबुल हसनकडून गेलेले शंभर हत्ती शहा अलमने आपला नोकर मोमिनच्या याजबरोबर अलमगिराकडे पाठविले. अबुल हसनचा वकील मोहमद मासूम याची भेट करविली.[३८१]

---

३७५. परिशिष्ट २, पृ ११५.

३७६. देवीप्रसादजी मुन्सिफकृत औरंगजेबनामा, भा. ३, पृ. २८.

३७७. देवीप्रसादजी मुन्सिफकृत औरंगजेबनामा, भा. ३, पृ. २९.

३७८. कन्सल्टेशन, मद्रास, ४ फेब्रुवारी १६८६ इ. स., डायरी अड कन्सल्टेशन बुक, १६८६, पृ. १८.

३७९. देवीप्रसादजी मुन्सिफकृत औरंगजेबनामा, भा. ३, पृ. ३०.

३८०. देवीप्रसादजी मुन्सिफकृत औरंगजेबनामा, भा. ३, पृ. ३२.

जूनच्या सुरुवातीस कर्नाटकचा सुभा व्यंकटपतीस झाला. त्याने घोरपडे वगैरे कर्नाटकातील सरदारास दिलदिलासा देऊन कुत्बशाही पातशाही कामावर त्यांनी रुजू होण्यासाठी प्रयत्न करण्यास सुरुवात केली.[३८०अ]

च. ६ जिल्हेज (१४ ऑक्टोबर १६८६ इ. स.) गोजी कासिमखानास वसवापट्टणवर जाण्यास अलमगिराने आज्ञा केली.[३८१]

च. २२ जिल्हेज (३० ऑक्टोबर १६८६ इ. स.) खान फिरुझ जंग यास औरंगजेबाने इब्राहिमगड घेण्यासाठी जाण्याचा हुकूम दिला.[३८१]

हि. १०९८ (८ नवंबर १६८६ ते २८ ऑक्टोबर १६८७ इ. स.).—ता. १२ सप्टेंबर १६८६ गोजी बिजापूरची आदिलशाही बुडविल्यानंतर अलमगिराने बाकी राहिलेली पेशकश वसूल करण्याकरिता सादतखान नावाचा हेजीब कुत्बशाहाकडे पाठविला. नंतर ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस मुक्काम नेमले. कासिमखान व खान फिरुझ जंग कुत्बशाही हद्दीत शिरले. तेव्हा अबुल हसनने पेशकशीच्या भरपाईसाठी दागदागिने व जडजवाहीर देण्याचे सादतखानाच्या समतीने ठरविले. परंतु सादतखानाने ते नेण्यास मुद्दामच दिरंगाई केली. च. २९ मोहरम (६ डिसेंबर १६८६ इ. स.) गोजी औरंगजेब हजरत ख्वाजा बंदे नवाज मुहम्मद गायसु दाराझच्या दर्शनासाठी कुलबर्ग्यास आला. अबुल हसनने अलमगीराकडे पाच लक्ष रुपये दानधर्मार्थ पाठविले. बाईबादने पेशकशीबाबत जडजवाहीर व दागदागिनेहि सादतखानाकडे पाठविले व त्याचेकडे अलमगीराचा माफीचा कौल व ऐवजाची पावती मागितली. परंतु ती मिळाली नाही. उलट अलमगीर गोवळकोड्यावर चालून येत असल्याची बातमी आली. अलमगिराने कुलबर्ग्याहून च. १० सफर (१६ डिसेंबर १६८६ इ. स.) गोजी कूच केले. अबुल हसनने अलमगीर कुत्बशाही बुडविण्यासाठी उद्युक्त झाला आहे हे पाहून सादतखानास दिलेले जडजवाहीर सक्तीने परत घेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांत यश आले नाही. नंतर अबुल हसनने क्षमा करण्याबद्दल अलमगीराकडे नजरनजराण्यासह विनंति केली. परंतु तिचाहि उपयोग

३८०अ. कन्सल्टेशन्स, मद्रास, १८ जून व ४ आगस्ट १६८६, डायरी व कन्सल्टेशन बुक, १६८६, पृ. ४८ व ६०; कुत्बशाही फर्माने–घोरपडे यांस–चं. ११ रमजान १०९७ (२३ जुलै १६८६), भा. इ. सं. मं. त्रैमासिक, व. १३, अंक ४, पृ. ७३, व इंग्रजांस, २४ मार्च १६८७, लेटर्स टु फोर्ट सेंट जॉर्ज, व्हॉ. ४, १६८६–७, पृ. ११६.

३८१. देवीप्रसादजी मुन्सिफकृत औरंगजेबनामा, भा. ३, पृ. ३८-९.

झाला नाही. संभाजीराजास मदत केल्याचा व त्यास एक लाख पगोडे दिल्याचा मुख्य आरोप ठेवून अबुल हसन याची विनंति अमान्य केल्याचे सादतखानाकडून कळविलें. तेव्हा तहाची आशा सुटली. शेख मिनाज, सर्जाखान व अबदुर रझाक लारी ऊर्फ मुस्तफाखान यास मोगली सैन्यावर चाल न जाण्यास सांगितले. दुसऱ्याच मुक्कामावर त्याची मोगली आघाडीच्या सैन्याशी चकमक उडाली. परंतु येथें इब्राहीमगड फत्ते करून फिरझ जंग जलदीने कुच करून येत आहे असे समजताच कुत्बशाही सैन्य मागे फिरले. त्र २४ रबिलावल (२९ जानेवारी १६८७ इ.स.) रोजी मोगली सैन्य हद्राबादेहून एक कोसावरील कलारसला आले व मोर्चे वगैरे बांधण्यास सुरुवात केली. रोजचे रोज हल्ल्यावर हल्ले चढत व होते. फिरझभोवती कुत्बशाही सैन्य होते. त्यांच्यावर हल्ला चढविण्यासाठी आलमगेबाने हुकम दिला. त्याबरून फिरझ जंगचा बाप कुलीजखान बहादूर शेट दरवाजापर्यंत चालून गेला. परंतु तेथे तोफेचा गोळा लागल्याने त्याचा हात जायबंदी झाला. तीनचार दिवसांनी तो मेला. नतर मोर्चे पुढे ढकलणे, डमडमे रचणे वगैरे काम जोरांने चालू होतेच. अबदुर रझाक, शेख निजाम वगैरेनी आपल्या ४०-५० हजार स्वारानिशी बाहेरून सारखे हल्ले चढविण्याचाहि सपाटा चालू ठेवला होता. एके दिवशी फिरझ जंग मोर्चा पुढे सरकवीत असता कुत्बशाही सैन्याने मोगली सैन्याची दाणादाण उडविली. किशोरसिंग हाडा वगैरे जमीनदार मारले. दोन्ही बाजूचे बरेच लोक मारले गेले. कुत्बशाही सैन्यहि मागे फिरले. त्र. ७ रबिलाखर (७ फेब्रुवारी १६८७ इ. स.) रोजी सफशीकनखानाने किल्ल्यावरील तोफाचा मारा थांबविण्यासाठी एका मोठ्या तोफेकरिता डमडमा रचला व नतर तो फिरझ जंगाच्या ताब्यात दिला. परंतु कुत्बशाही सैन्याने अर्ध्या रात्रीचा हल्ला चढवून तो जमीनदोस्त केला व रुजतखां, सलाबतखा वगैरे मोगली सरदारास कद करून नेले.[३८२] दोन दिवसांनी पुन्हां डमडमा उभारला व पुढे दोन दिवसांनी अबुल हसनने कद केलेल्या मोगली सरदारास मोगली सैन्यापाशी नेऊन मुक्त केले. नतर सफशीकनखानाकडे मोर्चाचे काम दिलें. त्यानी ते पुन्हा तितक्याच यशस्वी रीतीने पार पाडले. ७-८ मार्च १६८६ला एक चकमक उडाली. तीत ४०० लोक ठार झाले. बहुतेक मोगलाकडीलच होते.

---

३८२ मच्छलीपट्टण, गोवळकोंडा, पत्र, २२ फेब्रुवारी १६८६, लेटर्स टू फोर्ट सेंट जॉर्ज, व्हॉ ४, १६८६–७, पृ. १३.

मोगली थोर सरदार मारला गेला.[३८३] किल्ला एकदोन दिवसात अलमगिराच्या हवाली होणार म्हणून वाटत होते. परंतु आता पावसाळा संपेपर्यंत तरी तो पडत नाही अशी खात्री वाटू लागली. त्याचप्रमाणे किल्ला उत्तम रीतीने लढविला जात आहे असेहि सर्वास वाटू लागले. तेव्हा फितुरीने अगर लबाडीने किल्ला हाती आणण्याची खटपट चाल झाली. तीतहि यश येईना. किल्ल्यावरील लोकांनी चागलीच जाग राखली.[३८४] च. १२ रज्जब (१४ मे १६८७ इ. स.) रोजी फिल्झ जगने रात्री शिड्या लावून किल्ल्यांत शिरण्याचा प्रयत्न केला. परंतु हस्तुमख्वा व फिल्झ जग जखमी झाले. पुष्कळ लोक मारले गेले. मोगली सन्याची घरीच नासाडी झाली. च. १४ रज्जब (१६ मे १६८७ इ. स.) रोजी कुत्बशाही सैन्याने डमडम्यावर हल्ला चढविला व इज्जतखानाने हल्ला परतविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यात त्याचे ७० लोक मारले गेले. दुसरे दिवशी किल्ल्याच्या बुरुजावर मोठी तोफ आणल्याने व मारा सुरू केल्याने मोगली सैन्यात नेमके गोळे पडू लागले. खास औरगजेबाच्या डेऱ्यावरच गोळे येऊ लागले. तेव्हा त्या बुरुजासमोर मोठा डमडमा रचून त्यावर तोफा चढवून बुरुज उडविण्याचा हुकुम झाला. त्यातहि यश आले नाही. नतर एक मोठी शिडी तयार करून ती लावन हल्ला चढविण्याचा हुकूम दिला. प्रथम औरगजेबच शिडीवर चढला. परंतु पाय निसटल्याने खाली आला.

मोगली सैन्याने गोवळकोड्यास वेढा दिला. परंतु त्यात यश येणे कठीण झाले. दुष्काळाने धान्याचा पुरवठा मुळीच होत नसे. मभाजीने कुत्बशाहाच्या मदतीसाठी १२००० घोडदळ व ५० हजार पायदळ पाठविले. ते २५ मार्चच्या सुमारास मोगली सैन्यावर हल्ले चढवू लागले.[३८५] त्यानी मोगली सैन्याची बाहेरून येणारी रसद अजिबात बद केली. रोगराई वाढल्यामुळे लोकहि फार मरू लागले. सैन्याची व्यवस्था पाहण्याचे कामहि कोणी अगावर घेण्यास धजेना, इतकी मोगली सैन्याची

---

३८३. गोवळकोडा, पत्र, १२ मार्च १६८७ इ. स., ले. टु फो. से. जॉर्ज, व्हॉ ४, १६८६–७, पृ. १०३.

३८४. गोवळकोंडा, पत्र, २४ एप्रिल, मच्छलीपट्टण, पत्र, २२ मे १६८७ इ स, व २ जून १६८७, ले. टु. फो. से. जॉ., व्हॉ. ४, १६८६–७, पृ. १४९–५१.

३८५. गोवळकोडा, पत्र, २५ मार्च १६८७, मद्रास, पत्र, २९ सप्टेबर १६८७, ले. टु. फो. सें. जॉर्ज, व्हॉ. ४, १६८६–७, पृ. ११२ व O C. ५६२१. इं. ऑ लायब्ररी.

हलाखी झाली. मुलतान अकबराच्या साथीदारांनी उत्तर हिंदुस्थानांत धुमाकूळ घातला. तेव्हां अलमगिरास उत्तर हिंदुस्थानच्या राजकारणाबद्दल विशेषच काळजी लागली व दक्षिणेतील कारभाराकडे थोडेसें दुर्लक्ष करून परतावे की काय या चिंतेंत तो पडला. औरंगजेबानें कुत्बशाही सरदार फोडण्याची पराकाष्ठा केली. त्यात त्याला थोडे यश आले. च. २६ रजब (२९ मे १६८७ इ. स.) शेख निजाम मोगलास जाऊन मिळाला. त्यास मुकर्रबखान असा किताब, पांचशे मोहरा व एक हजार रुपये नजर दिले. सहा हजारी व सहा हजार स्वाराची मनसब दिली. मोत्याची तलवार, रत्नजडित खंजर, सरपेच, घोडे वगैरे दिले. मलिक मुनाव्वर व शेख अबदुल्ला यास वत्याच्या इतर भाऊबंदास मोठमोठे किताब व मनसबी दिल्या. याप्रमाणें मोठा बहुमान केल्यानें अबुल हसनचा भाचा मोगलास मिळाला. उलट मोगली सैन्याची हलाखी पाहून मोगली सैनिक व सरदार कुत्बशाहाकडे जाऊ लागले. ज्याना जाता येईना ते कुत्बशाहास आतून मदत करू लागले. किल्ल्यावरून तोफाचा मारा चालू होता. त्यामुळे मोगली सरदार मारले जखमी होत किंवा भाजले जात. त्यातून पावसाळा सुरू झाल्यानें वेढ्याचे काम तसेंच रेंगाळत चालले. च. १४ सावान (१६ जून १६८७ इ. स.) रोजी रात्री मोठे वादळ झाले व मुसळधार पाऊस पडला. पुष्कळ सामानसुमान वाहून गेले. माणसाना आधार न राहिल्याने बरीच माणसे पुरात बुडाली. जिकडे तिकडे चिखल झाला. डेरे, राहुट्या जमीनदोस्त झाल्या. मुद्दाम रचलेला मातीचा डमडमा समूळ वाहून गेला. याप्रमाणे मोगली सैन्य संकटात पडलेले पाहून पहाटे (१७ जून १६८७ इ. स.) कुत्बशाही सैन्याने हल्ला चढविला. अबदुर रझ्झाकच्या शौर्यापुढे कोणाची मात्रा चालेना. मोगली सरदार पळू लागले. कोणी चिखल आगाला लाथून निसटले. कोणी लपले. पुष्कळ मोगली सैनिक कापून काढले व कैद केले गेले. पुरामुळे फिरूझ जगास या सैन्याच्या मदतीस येता येईना. तेव्हा ७०-८० हत्ती पाण्यात घालण्याचा प्रयत्न केला. परंतु वाट मिळेना. अर्ध्या रात्रीवर फिरूज जग सैन्यास येऊन मिळाला. कुत्बशाही सैन्यानें मोगली सरदारास कुत्बशाहाकडे नेले. तेव्हा अबुल हसननें त्यांस फार सन्मानानें वागविले. इज्जतखान व सरबराहखान यास मोगली सैन्यांत परत पोहोचविलें. सरबराहखानास अबुल हसननें आपली धान्यसामग्री व दारुगोळा दाखविला व त्याची खात्री करून दिली कीं, आणखी वर्षसहा महिने तरी किल्ला लढविण्याचें सामर्थ्य कुत्बशाहीत आहे. परंतु त्याच वेळी अबुल हसनने अलमगिराजवळ तहाबद्दल

वाटाघाट करण्यासाठी त्यास सांगितलें व पत्रहि दिलें. त्यात निष्कारण इस्लामियांचें रक्त न सांडण्याबद्दल व सुभेदार म्हणूनहि म्हणवून घेण्यास राजी असल्याचें कळविले. उलट किल्लाच लढविणें जरूर असेल तर तोहि लढविण्याचे सामर्थ्य असल्याचें व मोगली सैन्यांतील विपद्ग्रस्त लोकासाठी ५-६ लाख पोती धान्य पुरविण्याचे अगिकारलें. परतु औरगजेबाने या विनतीचा अव्हेर केला. सफशीकनखानास पुन्हा डमडमे व मोर्चे बाधण्याची आज्ञा झाली होती. त्याने तीन दिवस सारखी मेहनत घेऊन हातची गेलेली सर्व जागा काबिज केली. च. १९ साबान (२० जन १६८७ इ. स.) रोजी किल्ल्याचे बुरुज उडविण्यासाठी खणलेले सुरुग पेटविण्याची आज्ञा झाली. सुरुग उडताच हल्लेहि चढविण्यास सैन्याची तयारी होती. बुरुजावर किल्ल्यातील लोकानी जमावे म्हणून मोगली सैन्यात ओरडाओरड सुरू केली. परतु सुरुग लावल्याची बातमी अवदुर रझाक यास लागल्यापासून त्याने आतले बाजूने खणून सुरुगातील दारू काढून घेतली व काहीत पाणी ओतून भिजवून फुकट घालविली होती. हुकुम होताच पहिला सुरुग लावला. परतु त्यातील तोडावरील दारूने फक्त पेट घेतल्यामुळे जो काही किल्ल्याचा भाग उडाला तो मोगली सैन्यावरच जाऊन पडला. त्यामुळे मोगली सैन्याचे फार नुकसान झाले. जवळजवळ १२०० लोक ठार झाले. याप्रमाणे मोगली सैन्यात गोधळ झालेला पाहताच कुत्बशाही सैन्याने हल्ला चढविला. मोर्चे मारून काढले. नतर औरगजेबाने अधिक कुमक पाठविली. तेव्हा कुत्बशाही सैन्य माघारी गेले. दोन्ही बाजूचे बरेच लोक प्राणास मुकले. मोगली सैन्याने स्थिरस्थावर करताच व मोर्चे बाधताच दुसरा सुरुग उडविला. या वेळीहि फक्त तोडावरील दारू पेटल्याने जे दगड धोंडे उडाले त्या योगे मोगली सैन्यात हलकल्लोळ उडाला व जवळ जवळ २००० लोक मेले. पुन्हा या गोधळाचा फायदा घेऊन कुत्बशाही सैन्याने हल्ला चढविला. परतु फिरङ्ग जग आपल्या लोकानिशी मदतीस आल्यानें फारसें नुकसान झाले नाही. तरी ५३४ लोक मारले गेले. याप्रमाणे दोन वेळा झालेल्या नाशाची बातमी ऐकून अलमगीर रागावला व कलारसला आला व तेथून निकराने हल्ला चढविण्याचा हुकूम दिला. मोगली सरदारानीहि आपली पराकाष्ठा करून दाखविली. परतु इतक्यात वादळ झाले व पाऊस पडला. खदक पाण्यानें भरून गेले. डमडमे वाहून गेले. कुत्बशाही फौजेने मोर्चा मारून काढला. तोफा नेल्या व मोठ्या तोफांस खिळे ठोकले. खदक भरण्यासाठी आणलेली पोती बुरुजाची

खिडारे भरून काढण्याकडे लावली. अशा तऱ्हेने मोगली सैन्याचा पाडाव झाल्याने त्यांची फारच निराशा झाली. दुसऱ्या दिवशी (२१ जून १६८७ इ. स.) औरंगझेब तसाच तिसरा सुरुंग उडविण्यासाठी निघाला. सुरुंगाला वत्ती देण्याचा प्रयत्न केला. परंतु तो पेटेना. तेव्हां तपासून पाहाता त्यातील दारू काढून नेल्याचें व वात तोडून टाकल्याचे दिसून आले. या दगलीत किल्लयावरून तोफांचा व बाणाचा मारा होत होता. फिरूझ जगास दोन जखमा झाल्या व इतरहि सरदारास दुखापती झाल्या. नतर वेढ्याचे सेनापतित्व महमद अझमकडे दण्यात आले.

कुत्बशाहीतील इतर मोठमोठी शहरें घेण्यासाठी सरदार रवाना केले जले १६८७त कुत्बशाहीतील महत्त्वाचा कोउपल्लीचा किल्ला फितुरीने मोगलाचे हवाली झाला. पुष्कल सपत्ती मोगलांस मिळाली. इतरत्रहि सैन्याच्या तुकड्या रवाना झाल्या होत्या. त्यानी मुलख काबिज करण्याचा सपाटा लावला. वेढ्याचे काम मात्र अगदीच सथ होते कुत्बशाही सरदारास फितुर करण्याचा सारखा प्रयत्न चालू होता. शेख निजाम मोगलास मिळणार अशी खास बातमी लागताच अबुल हसननें त्यास कैद केलें. कुत्बशाहीकडे फक्त अबदुर रझाकखान लारी व अबदुल्लाखान पणी असे दोघेच काय ते नावाजलेले सरदार बाकी राहिले होते. त्यास सहा हजारी व इतर मनसबी बहाल देण्याबाबतचे फाल व फर्मानेहि अलमगिरान पाठविली. परतु अबदुर रझाक अढळ राहिला. च. ७ रमजान (८ जुल) रोजी अलमगिरने मोर्चे व डमडमे खासा पाहिले. नतर फितुरीचे जोरीने प्रयत्न सुरू झाले. शेवटी कुतुबखानाने अबदुल्लाखान पणीशी सधान बांधले. ठराविक वेळेस किल्ल्याचा खिडकी दरवाजा उघडून देण्याचे त्याने कबूल केले. त्याप्रमाणे च २४ जिल्काद (२२ सप्टेंबर १६८७ इ. स.) पहाटे मोगली सन्य खिडकी दरवाजाने आत शिरले. अबदुर रझाकने कपड्याचीहि पर्वा न करिता धावून जाऊन तो शत्रुवर तुटून पडला. किल्ला-इ-आर्कपर्यत लढत गेला. हजारो तरवारी व भाले त्याच्यावर पडत असतांहि त्यानें मोगली सन्याची दाणादाण उडविली. सर्व शरीर जखमानी भरून गेले. तोंडावरच बारा जखमा झाल्या. डोळ्यावर मास लोबले. घोडाहि जखमी झाला. लगाम ढिली पडली व घोडा पळत जाऊन एका झाडाखाली उभा राहिला. त्यास तेथे कोणी ओळखले व बेशुद्ध स्थितीत घरीं नेले. या अवर्णनीय शौर्याचें व नेकीचें औरंगजेबानें

३८६. कन्सल्टेशन, मद्रास, २९ जुलै १६८७ इ. स., डायरी व कन्सल्टेशन बुक, १६८७, पृ. १०६.

कौतुक केलें. त्याला बहुमानानें बागविलें. त्याची चांगली सुश्रूषा करविली. अबुल हसनने अशा रीतीने शेवट झालेला पाहतांच येणाऱ्या संकटास स्वस्थ चित्ताने तोंड देण्यासाठी स्वस्थ राहिला. सुहुल्लाखानादि सरदार त्याच्याकडे गेले असता त्याने स्वस्थपण राज्य सोडल्याचें सांगितलें व तो सज्जा घोड्यानिशी औरंगशाहास जाऊन भेटला. गळ्यातील मोत्याचा कंठा औरंगजेबाची भेट घेतली. औरंगजेबाने त्यास चांगल्या रीतीनें बागविण्याचा हुकूम दिला. दरबारात येण्याची माफी दिली. याप्रमाणे औरंगजेबाने कुत्बशाहीचा नाश केला.[३८७]

च. २९ जिल्काद (२७ सप्टेंबर १६८७) रोजी अबुल हसनचा मानलेला मुलगा अबदुल्ला यास ४ हजारी व ४ हजार स्वारांची मनसब दिली.[३८८]

हि. १०९९ (२८ आक्टोबर १६८७ ते १६ आक्टोबर १६८८ इ.स.).—च. १४ रविलाखर (७ फेब्रुवारी १६८८ इ. स.) रोजी अबुल हसन यास जान सिपहारखानाबरोबर दौलताबादेस रवाना केले. सर्व व्यवस्था योग्य प्रकारे ठेवण्या बद्दल व खर्चास वार्षिक ५० हजार रुपये देण्याची आज्ञा झाली.[३८९]

च. १९ जिल्काद (७ सप्टेंबर १६८८ इ. स.) रोजी औरंगजेबाने अबुल हसनच्या तीन मुलींची लग्ने लाऊन दिली. पहिलीस शिकंदर आदिलशाहास पूर्वी ठरल्याप्रमाणे दिली. दुसरीचे शेख महमदाचा मुलगा मोहमद उम्मर याजबरोबर लग्न लावले. तिसरी असदखानाचा मुलगा इनायतखान यास दिली. लग्नाचे वेळी बहुमानाची वस्त्रे, घोडा व हत्ती अलमगिराने प्रत्येकास आहेर दिले.[३९०]

अबुल हसननें १८ वर्षे कारागृहवास सोसला असा समज आहे. तो बहुधः हि. ११११–१२ (१७०० इ. स.)त आवेच्या विकारानें वारला असावा. त्याला दौलताबादेस सय्यद राज कातलच्या शेजारी दफन केले.[३९१]

३८७. परिशिष्ट २, पृ. १२०–७०; देवीप्रसादजी मुन्सिफकृत औरंगझेबनामा, भा. ३, पृ. ४०–५०; मुंतकब-उल-लुबाब, इ. डॉ., व्हॉ. ७, पृ. ३२३-३६; प्रो सरकार, औ., व्हॉ. ४, पृ. ३५६–८६; मनुशी, व्हॉ. ३, पृ. २५२; व्हॉ. २, पृ. ३०५–०८; कन्सल्टेशन, मद्रास, १२ व १४ नवंबर १६८७; डा. व कन्स. बुक, १६८७, पृ. १७५–७.

३८८. देवीप्रसादजी मुन्सिफकृत औरंगजेबनामा, भा. ३, पृ. ५०.

३८९. देवीप्रसादजी मुन्सिफकृत औरंगजेबनामा, भा. ३, पृ. ५४.

३९०. देवीप्रसादजी मुन्सिफकृत औरंगजेबनामा, भा. ३, पृ. ५६; बु. स., हिंदी, पृ. ७५६.

३९१. परिशिष्ट २, पृ. १८१–२.

अबुल हसन यास बदी सुलतान या नांवाचा एक मुलगा होता. तो औरंगजेबाच्या गोटात राहात असे. मोठा झाल्यावर त्याला दरबारांतहि जावें लागे. परंतु दक्षिणी सरदार त्याला पादशाहासारखा लवून मुजरा करीत. हे पाहून त्यास दरबार मना केला.[३९२]

अबुल हसनची एक बहीण त्याचे जवळच होती. तिचा नवरा व मुलगा मात्र शेवटी अलमगिरास जाऊन मिळाला. अबुल हसनने एका धनगरिणीच्या मुलीवरोवर लग्न लावले होते व ती त्याची फार आवडती होती. त्यामुळे त्याची पट्टराणी ताज महाल हिला तिचे विषयी असूया उत्पन्न झाली. अबुल हसन शिकारीस गेला असता तिने तिला ठार मारले. त्यानतर ताज महाल आजारीच होती.[३९३]

कर्नाटकाचा सुभा महमद इब्राहिमास झाल्याने त्या प्रांतातील किल्ले वगैरे आक्टोबर १६८७तच मोगलाच्या हवाली झाले.[३९४]

कुत्वशाही सरदाराना फितूर करून घेऊन त्याना मोठमोठ्या मनसबी दिल्याने अबुल हसन पकडला गेल्यानतर कुत्वशाहीचा अभिमान धरून तिचे पुनरुज्जीवनाचा प्रयत्न करण्यास कोणीच मागे राहिला नव्हता. उलट पठाणाचा मोगलाकडे ओढा अधिक. हिंदूनी स्वतत्र प्रयत्न करावयाचा तर हिंदूची सत्ता नाहीशी झाल्याला बरीच वर्षे झाली होती. त्यामुळे त्याचे स्वतत्रपणे वजन वाढेल अशी परिस्थिति राहिली नव्हती. सभाजीहि अचानक पकडला गेल्यान आधार राहिला नाही. पिरीया नायकाने थोडीशी मदत व मेहनत घेतली. परंतु त्याचा किल्ला ता. २८ नवंबर १६८७ रोजी मोगलाच्या हाती जाताच त्यालाहि मोगली चाकर व्हावे लागले. मागे कुत्वशाहीतील कलाकौशल्य व थोरवी दाखविणारा कांही इमारती मात्र शिल्लक राहिल्या.

२३. **मादण्णा व आकण्णा**:—मादण्णा यास शिवाजीने महादण्णा[३९५] व त्याच्या फर्मानात मादो[३९६] किंवा मादो[३९७] असें म्हटले आहे. आकण्णास आधुनिक इतिहासकारांनी अकण्णा असे सबोधले आहे. परंतु परदेशीय, मराठी व सस्कृत तत्कालीन पत्रातून आकण्णा असेच म्हटले आहे. अकण्णा हें नांव बरोबर दिसत नाही.

३९२. परिशिष्ट २, पृ. १८२–३.

३९३. मनुर्शा, भा. ४, पृ. १९७–८.

३९४. मद्रास, मच्छलीपट्टण, वगैरे ठिकाणचीं पत्रे, १७–२८ आक्टोबर १६८७, ले. टु फो. मे. जॉ., व्हॉ. १६८७.

मादण्णाच्या घराण्याची फारशी माहिती उपलब्ध नाही. त्याचे वडील भानुपत हे वारंगळ प्रांतांत हनुमकोंडा गांवी राहात असत. हे ब्राह्मण गृहस्थ तेथील मुलकी कारभाराचें व करवसुलीचें काम पहात असत. त्यांची बायको भागम्मा हीहि एका कुलीन ब्राह्मण घराण्यातील होती. तिच्यापासून भानुपतास चार पुत्र झाले. त्यांतील आक्कण्णा हे थोरले, मादण्णा दुसरे, विसण्णा तिसरे व मृत्युंजय चवथे होत.[३९५] त्यांस एक मुलगी होती. तिचीहि मुले वेंगण उर्फ रुस्तुमराव व गोपण्णा उर्फ रामदास हीं मोठी शूर व कर्तबगार झाली. मादण्णाचा पुतण्या पांडल लिंगाप्पा हाहि कर्नाटकाच्या सुभेदारीपर्यंत चढला.[३९६] मादण्णास एक मुलगा होता. त्याची मुंज ता. ४ जानेवारी १६८२ रोजी झाली व लग्न नंतर १२ आक्टोबर १६८२ रोजी झाले.[३९७] मादण्णाचा खून झाला तेव्हा आक्कण्णाचा एक मुलगा दोन वर्षांचा होता. त्यास त्याच्या दाईने आक्कण्णाचा एक हसन नांवाचा मित्र होता त्याच्या आश्रयास नेऊन त्यास वांचविले.[३९८] मादण्णाच्या कुटुंबासबंधी एवढीच माहिती सध्या उपलब्ध झाली आहे.

भानुपताने मादण्णा व आक्कण्णास त्या वेळच्या शिवाजीप्रमाणे हिशेबाचे वगैरे काम आपल्या नजरेखाली शिकविले. योग्य वेळी त्यांच्या मुंजी व लग्नेंहि केली. मादण्णानें हिंदवी, फारसी व इतर भाषांत चांगलेच प्राविण्य मिळविले होते. आक्कण्णा व मादण्णा जेव्हा वयात आले तेव्हा आपल्या बापाच्या कारभारात केवळ भागीदार राहाणें त्यांच्या आकांक्षी स्वभावास पटेना. म्हणून व्यवहाराची चांगली माहिती होताच मोठ्या नोकरीच्या शोधार्थ ते हैद्राबादेस इ. स. १६६०पूर्वीच आले.[३९९] इ. स. १६६०च्या सुमारास ते मीर जाफरकडे पोतदारीच्या कामाबद्दल (Shroff) असावेत. अबुल हसन याचे अबदुल्ला कुत्बशाहाच्या मुलीशी लग्न घडवून आणण्यात यांच पोतदाराची मीर जाफरने नेमणूक केलीसे दिसते.[४००] त्यामुळे

---

३९५. परिशिष्ट ३, पृ. १८७–८

३९६. मद्रास, पत्रे, व्हेस्टिजिस व फोर्ट सेंट जॉर्ज रेकोर्डस.

३९७ गोवळकोंडा, पत्रे, २१ जानेवारी १६८२ व नवंबर १६८२ व १ जानेवारी १६८३, ले. टु फो. सें जा., पृ. १६६.

३९८. परिशिष्ट ३, पृ. २०२

३९९. परिशिष्ट ३, पृ. १८८.

४००. परिशिष्ट १, पृ. ९.

अबुल हसनची व याची प्रथमपासूनच मैत्री जडली होती. त्यानी या वेळी अबुल हसनवर एक प्रकारे मोठेच उपकार केले होते. सय्यद मीर जाफर इ. स. १६६३त बारूल्यानंतर[२६६अ] त्याची सरखेली सय्यद मुझाफराकडे आली.[३०३] तेव्हां मादण्णा व आकण्णा त्याचे हाताखाली काम करू लागले. इ. स. १६६६त ते पोतदारीचेच(Shroff) काम करीत होते.[३०४] नंतर वाढत वाढत इ.स. १६७२च्या सुरवातीस मुझाफरखानाचे मुख्य पेशकार (Secretaries) झाले होते.[३०५] अबुल हसन २१ एप्रिल १६७२ रोजी तख्तावर आला. त्या वेळी मुझाफरखानावरोवर या पेशकारानीहि वरीच मेहनत घेतली. सय्यद मुझाफराकडे दिवाणीचा कारभार आला त्याच वेळी मादण्णास मजमुदारी व आकण्णास सबनिविशी मिळाली.[३०३] इ.स. १६७३च्या जून महिन्यात मुझाफरखानाकडील मीर जुम्लतीचा कारभार दूर झाला व सरखलीचे काम अबुल हसन स्वतःच पाहू लागला. तेव्हा फर्मीने वगैरे काढणे ता माझी मानजी 'परवानगीने' काढ लागला.[३०९] इ. स. १६७५च्या अखेरीस मुझाफरखानासहि दिवाणीवरून दूर केले. त्या वेळी राज्याचा सर्व कारभार मादण्णाकडे आला. सूर्यप्रकाशराव असा किताब मिळाला.[३१०] मादण्णा व आकण्णानी हेदराबादेत इ. स. १६७६च्या सुरवातीस मोठा वाडा बांधला.[३११] मुसाखान व मुझाफरखानाच्या वेळीओढीत कर्नाटक पातातील वसूल बराच थकला होता व तेथील काही पडपाळेगार लोकानी बंडाचे निशाण उभारले होते. मादण्णाकडे कारभार येताच प्रथम त्याने कर्नाटकाची व्यवस्था लाविली.[३१२] आपल्या स्वतःचे व चांगले कारभारी नेमले. त्यातच त्याने आपल्या नातलगांस सर्वत्र कारभार देऊन पाठविले होते. धाकटा भाऊ विरण्णा यास सेनेची बक्षीसगिरी दिली. मुर्तुजयाला आपला कारभारी अगर पेशवा केले.[३१३] एका भाच्याला - वेंगण्णास-रुस्तुमराव असा किताब देवून दुय्यम सेनापती केले. दुसरा भाचा गोपण्णा ऊर्फ रामदास यास भद्राचलमची तर्फदारी देवविली. पुतण्या पोटला लिंगाप्पा यास निरनिराळी कामे देऊन शेवटी कर्नाटकाची सुभेदारी दिली.[३१४] इ.स. १६७५-७६त

---

४०१. हॅबर्ट जर्नल, जर्नल ऑफ दि इंडिअन हिस्टरी, व्हा.१०,भा.२,नं.२९, पृ.९२.

४०२ हॅबर्टचा मादण्णाच्या चित्रावरील लेख, कामकोटा पीठाचे ताम्रपट, पृ. १३०.

४०३. परिशिष्ट ३, पृ. १९४

४०४ परिशिष्ट ३, पृ १९५.

४०५. राव बहादुर कृष्णस्वामी आयंगारचा लेख 'अबुल हसन व त्याचे वजीर मादण्णा व आकण्णा', जर्नल ऑफ दि इंडिअन हिस्टरी, भा २९, पृ ९२ व ९४.

राज्यांत जिकडे तिकडे चांगली व्यवस्था व स्थिरस्थावर केल्यानतर परराष्ट्रीय कारभाराकडे ते लक्ष देऊ लागले.

आदिलशाहीत पठाणाचा वरचष्मा झाला. मोगली पठाणांकडे त्यांचा दिवसेंदिवस जास्तच ओढा ओढू लागला. कुत्बशाहीतील पठाण उमराव मोगलांस सामील होऊ लागले. त्यांतून आदिलशाहीत शिकदर अगदीच अल्पवयी असल्यानें मोगलांच्या तडाख्यांतून दक्षिणी राज्यें वाचविण्याची मोठीच चिंता उत्पन्न झाली होती. या वेळी मादण्णाने कुत्बशाहास पुढे करून शिवाजीच्या साहाय्याने आदिलशाहीतील पठाणांचे प्राबल्य कमी केले. इ. स. १६७८-९त मोगलाविरुद्ध लढण्यास सिद्ध नसलेल्या पठाणाची सख्या पाहून दक्षिणेतील पठाणाविरुद्ध दक्षिणीयांच्या कारस्थानास बराच नेट लावला. कुत्बशाहीतील बऱ्याच जागा दक्षिणीयाना दिल्या गेल्या. आदिलशाहीतहि तशीच व्यवस्था लावण्यास भाग पाडले. मोगलांच्या विरुद्ध मराठेच मदत करतील व शेवटपर्यंत टिकतील या आशेने मराठ्यास शक्य ती मदत देण्याचा सपाटा ठेविला व अशा तऱ्हेने दक्षिणी राजानी सघ निर्माण केल्यामुळें मोगलांस अफाट सेना आणून तीनचार वर्षे कोठेच यश मिळवितां आलें नाही. मादण्णा व आक्कण्णा यांच्या मसलती चालू होत्या तोपर्यंत यश मिळण्याची आशा मोगलास नव्हती. दक्षिणी मोहरी व प्यादी हाताशी ठेवून आपल्या बुद्धीच्या जोरावर डाव चागलाच रगविला. डाव उलटलेला पाहातांच औरगजेबास मात्र मादण्णाच्या नाशाची आवश्यकता भासली. त्याचा खून झाल्यानंतर अवघ्या एका वर्षातच मोगलांनी दोन मोठ्या पातशाह्या धुळीस मिळविल्या व दुसऱ्या वर्षात महाराष्ट्रराज्य व कर्नाटक पादाक्रान्त केले. यावरून मादण्णाच्या परराष्ट्रीय मसलतीतील महत्त्व व त्याचे कर्तृत्व याचा बोध होतो.

मादण्णा आक्कण्णाची मूळची गरिबी होती. नोकरीची सुरुवात वार्षिक शभर होनापासून झालेली. शेवटी वाढत वाढत वीस हजार सैन्य खास त्यांच्या सेनापतित्वाखाली आलें व तैनातहि ७५ हजार होनांपर्यंत वाढली. सपत्ती हाती येऊ लागतांच मादण्णा आक्कण्णा दानधर्महि जोरात करू लागले. काशीपासून रामेश्वरापर्यंत मुख्य मुख्य तीर्थांचे ठिकाणी सदावर्ते घातली व देवळे बांधली. तिरुपती बगैरेंच्या यात्रेस सवडीनुसार जातच असत. हैद्रावादेस एक तळे व त्याच्या

काठावर बांधलेल्या विश्वेश्वराच्या देवळांत ते नित्य नेमाने दोनदां दर्शनास जात. अशा तऱ्हेने मोठ्या इतमामाने बारा वर्षे काढली. सर्वांस त्यांचेबद्दल विशेष आदर वाटे.[४०६] परंतु याच वेळी असूया व स्वार्थ यांनी पीडित झालेल्या शत्रूंचीहि संख्या वाढत होती. अबुल हसनची बाजू घेतल्यानें मादण्णा आक्कण्णास अबदुल्लाच्या मोठ्या मुलीचे व तिच्या नवऱ्याचे पारिपत्य करिताना तिची आई त्यांची कायमची शत्रु बनली. दुसरी मुलगी अबुल हसनच्या धनगरीण बायकोमुळे क्षुब्ध झाली होती. पठाणाचा कावा ओळखून त्यास चतुराईने नामोहरम केल्याने पठाण उमराव आतून चरफड़ लागले. सर्व दक्षिणी शाह्यांची सूत्रे हाती धरल्याने मोगलांस मादण्णाच्या शिरावेरीज काहींहि प्रिय वाटेना. त्यामुळे कुत्बशाहानें शहा अलमशी तह करताच मोगलास मादण्णाविरुद्ध कट घडावण्यास चांगलेच फावले. मादण्णाविरुद्ध अबुल हसनचे मन कलुषित करण्याचे सारखे प्रयत्न होऊ लागले. अबुल हसनने त्याचेवरील विश्वास अढळ ठेवण्याचाहि शक्य तो प्रयत्न केला. मोगलाचा हस्तक यल्लमराव व अबुल हसनच्या महालातील जानी बेग, सेरमादि बाया व इतर पठाण यांनी कट केला. मादण्णाला हा कट समजला.[४०७] परंतु मोगलाच्या सान्निध्यामुळे त्याला त्याचा नीटसा बंदोबस्त करता आला नाही. त्याने आपल्या जहागिरीचे कोलकुंडा, हसनाबाद व गजगोपाळपेठ हे तीन तर्फ आपल्या भावादिकास दिले. जवळील संपत्तीहि दूर केली.[४०८] अशा तऱ्हेने काही दिवस जातात न जातात तोंच कटवाल्या लोकांनी ते राजवाड्यातून काम आटापून बाहेर पडत असतां दुपारी ११-१२च्या सुमारास त्यास ठार केले. अबुल हसनला फार विषाद झाला. त्यानंतर तो अत्यंत बेदरकारीने वागू लागला. कटवाल्यांनी मादण्णा आक्कण्णाची प्रेते रस्त्यांतून फरफटत नेली. त्याच्या बायकामुलांस ठार केले. घर जाळले.[४०९] मादण्णाचें शीर शहा अलमकंड पाठविले व शहा अलमने ते १६ मार्च १६८६ इ. स. रोजी ओरंगजेबाकडे रवाना केले.[४१०]

साराश, मोगली परचक्राविरुद्ध दक्षिणी राज्यांची सूत्रे यशस्वी रीतीनें

४०६. परिशिष्ट ३, पृ. १९४-५, २००-२, कामकोटी पिठास आग्रहार, कामकोटी पिठाचे ताम्रपट, पृ. १३३-६; डच जर्नल वॅगरे.

४०७. परिशिष्ट ३, १९८-२०२.

४०८. परिशिष्ट ३, पृ. १९९, २०१.

४०९. परिशिष्ट ३, पृ. २०२; डच जर्नल, मनुशी वॅगरे.

चालवितांना दैवगतीनें मादण्णा आक्कण्णांस कालवश व्हावें लागलें. सर्वसामर्थ्यवान अलमगिराचा रोष झालेला दिसताच तोंडपुजे हॅवर्टसारख्या परदेशीय व स्वार्थी मोगली इतिहासकरानीं त्यांच्याबद्दल अवहेलनात्मक व विपर्यस्त मजकूर लिहिला असल्यास नवल कसचे? औरंगजेबासारख्या बलवान शत्रूच्या रोषाच्या प्रमाणावरूनच मादण्णाच्या राज्यतत्त्वाच्या परिणामाचें खरे महत्त्वमापन करतां येतें.

२४. सामाजिक रीतिभाति:—हिंदु, मुसलमान व इतर परदेशीय लोकांस आपापल्या धर्माप्रमाणें वागण्याची पूर्ण मुभा होती. क्वचित् प्रसंगी वैयक्तिक आकांक्षेसाठी धर्माभिमान जागृत झाल्याची उदाहरणें दृष्टोत्पत्तीस येतात. परंतु ती अगदीच विरळा होत. उलट परस्परांच्या धर्मांबद्दल मोठा आदर ठेवून हिंदुमुसलमान प्रजा राहात असे. राज्यकारभारात धार्मिक भावनेपेक्षा राजाची अगर शाहाची स्वार्थी दृष्टि व आकांक्षाच प्रत्ययास येतें. त्याजगी कारणावरून झालेल्या तंट्यांबखेड्यांत धार्मिक भावनाचा संबंध जोडण्यात येतो. परंतु तो वस्तुस्थितिनिदर्शक आहेसा दिसत नाही.

राजकीय व इतर व्यवहार सकाळपासून दुपारपर्यंत चालें. हिंदूचा मंगळवार आठवड्याच्या सुट्टीचा दिवस होता. गुरुवार हा मुसलमान लोक उपवासाचा व मृतांच्या कबरींची पूजाअर्चा करण्याचा दिवस मानीत. सरकारी अधिकारी याच दिवशी गत पातशाहाच्या कबरीस भेट देत. ताबुताच्या व पंजाच्या मिरवणुकी, त्या वेळी सरकारी खर्चाने निघणाऱ्या स्वाऱ्या, महमद पैगंबराचा जन्मदिवसोत्सव बगैरेबरोबर होळी, जत्रा, यात्रा व दसऱ्याचे समारंभहि धिनधोमाट पार पडत. मादण्णाच्या कारकीर्दीत सय्यद व उमरावहि हिंदु समारंभात भाग घेऊ लागले व मुसलमानासाठी मशिदी बांधण्यात हिंदु जहागिरदार मदत करू लागले. हिंदु इस्लामी पीरांची भक्ति करीत. देवळात साठविलेली संपत्ति लुटल्याची थोडी फार उदाहरणें जरी इतिहासात नमूद झालेली असली तरी त्यावरोबर देवळास दिलेल्या देणग्याचे उल्लेखहि पुष्कळ आहेत. साराश, दरम्यानी मुसलमानाबद्दल हिंदूत आपुलकीची भावना जसजशी वाढू लागली तसतशी हिंदुमुसलमानातील सामाजिक व धार्मिक श्रेष्ठाश्रेष्ठत्वाची भावना लयास जात चालली.

मोठ्या माणसाची अगर राजाची भेट घेणें ती रिक्त हस्तें न घेण्याची रूढी कायम होती. या रूढीचा यूरोपीय लोकांनी लाचलुचपतीत विपर्यास केला आहे.

त्याचप्रमाणे भाडेपट्ट्याचा खंड ठरवून प्रांत देण्यापेक्षां आगाऊ खंडणीबद्दा रकम घेऊन जहागिरी देण्यात येत. त्याचप्रमाणे नोकरी वगैरेतहि पेशकशी देण्याची चाल होती.

मोठमोठे सरदार व सरकार सदावर्ते अथवा लगरखाने व पाणपोया घालीत. पाठशाळा बऱ्याच उघडल्या गेल्या होत्या व मोठमोठ्या शहराशी टपालाची व्यवस्था ठेवली होती.

२५. **कुत्बशाही लढाया व युद्धपद्धति:**—सन्याची रचना सर्वत्र सारखीच होती. जितक्या सैन्याची सरदारी मिळे तितक्या सैन्याची मनसब मिळेच असें नाही. विशेषतः कुत्बशाहीतील सैन्य सरकारी खजिन्यातून पोसलेले असे व सन्याचे सरदार अथवा सेनापति सरकारी तेनाती नोकर असत. सैनिकास नियमित दाड करावयास लावणे वगैरे शिस्ती सतराव्या शतकांत रूढ होऊ लागल्या होत्या. गोलदाज यूरोपीयच असत. प्रत्येक सरदारास निरनिराळी निशाणे, मोर्चेले वगैरे दिली जात. चिलखते, शिरस्त्रोप वगैरे दिले जात ते सरकारी शस्त्रागारांतून दिले जात. वर्षातून दोनदा तरी सरदार आपल्या सैन्यानिशी जाऊन कुत्बशाहास मुजरा देत. सैनिकांत हिंदुमुसलमान हा भेद नसे. सरदार आपला जनानखाना शक्य तर जवळ बाळगीत.

पावसाळा सपल्यानतर सप्टेंबरच्या अखेरीस बहुधः लढाईवर कूच होत असे मेच्या अखेरास सैनिकास रजा मिळे. जरूरच असेल तर क्वचित्प्रसगी पावसाळ्यातहि युद्ध चालू राही. रणयुद्धाचे प्रसग होता होई तो टाळले जात. रण झालेच तर सैन्याचा वृणगा ३-४ मैल मागे ठेवून उजवी, डावी व मुख्य अशा तुकड्या करून होई. कुमकेची तुकडी प्रसगविशेषी पुढे येत असे. वेढ्याचे वेळी खदक खणणे, डमडमे रचून तोफा लावणे, सुरुग उडविणे, शिड्या लावून किल्ल्यांत घुसणे वगैरे मार्ग स्वीकारले जात. परतु प्रत्यक्ष लढाई-पेक्षा रसद मारणें. पाणी नासवणे. शत्रूस दुसरीकडून शह देणे, फितुर करणें, खडणी वगैरे देऊन तात्पुरता शत्रु घालवून देणें वगैरे मार्गाचाच विशेष अवलंब केला जाई. कुत्बशाहीत तर पशाच्या बळावर लढाई टाळण्याचा विशेष प्रयत्न केला गेला. कर्नाटकी सैन्य शत्रूकडील लोकाचे कान व नाक कापून शत्रूस सतावण्यांत फार तरबेज होते. त्याचप्रमाणे हातघाईत दक्षिणी सैन्य उत्तरहिंदुस्थानी सैन्यावर तेव्हांच मात करी. लढाया चालू असताहि एकमेकांचे वकील एकमेकांच्या राज-

धानींत राहूं शकत. त्यामुळें शत्रूस बातमी लागत असे. रणांगणात मेलेल्यांना दहन अगर दफनविधी होत असे. पहांटेपासून सायंकाळपर्यंत लढाई झाल्यानंतर काळोख पडतांच लढाई थांबविली जाई. बहुधः नदीच्या आश्रयाने किंवा एकाद्या गढीच्या आश्रयानें सैन्याचे तळ पडत. शत्रूच्या मुलुखातून जातांना मुलुख उध्वस्त करितंच करण्यांत येत असे. बहुधः तीं गांवे शत्रूच्या ताब्यांतून हवाली होत व शक्य ती मदत करून वाचवून घेत.

कुत्बशाहीत व्यापारी गलबतें बरीच तयार केली गेली होती. परंतु आरमार या दृष्टीने कुत्बशाहीने कधीच तयारी केली नाही.

२६. मुरार जगदेवः—मुरार जगदेव किंवा मुरारि पंडित यांची माहिती अगदींच उपलब्ध नाही असे म्हटले तरी चालेल. इब्राहीम आदिलशाहा इ. स. १६२८ त वारल्यानंतर दौलतखान मुख्य वजीर झाला व खवासखान म्हणवूं लागला व मुरारि पंडितास आपला कारभारी केले.[४१०] शहा जहानाने परिंड्यावर स्वारी केल्यामुळें खवासखानाने मुरारीस इ. स. १६३२च्या जुलैत सर लष्कर करून पाठविले. त्यान परिंडा घेतला व मुल्क मदान तोफ विजापुरास नेली.[४११] शहाजहान दक्षिणेतून जाईपर्यंत तो आदिलशाही सरहद्दीवर रक्षण करीत होता. नंतर कुत्बशाहाकडील खंडणी वसल[४१२] करून तहहि केला.[४१३] इ. स. १६३३च्या फेब्रुवारीत कुत्बशाहाकडे अबदुल्लाच्या बहिणीचे महमद आदिलशाहाशी लग्न लावण्यासाठी सर्व वऱ्हाडी मंडळीसह आला व ता. १८ फेब्रुवारी १६३३ रोजी लग्न झाल्यानंतर परत निघाला.[४१४] वधु व वऱ्हाडी मंडळी विजापुराजवळ येतात तोच त्याला दौलताबादेच्या वेढ्याच्या मदतीस रवाना केले. परत त्याचे व फत्तेखानाचे न पटल्यामुळे व आदिलशाही सरदारातहि फूट झाल्याने त्याला तेथे फारशी कामगिरी करितां आली नाही.[४१५] इ. स. १६३५च्या अखेरीस खवासखानाचा खून झाला. त्यानंतर एक महिन्यातच मुरारीहि मारला गेला.[४१६] साराश जी हकीकत उपलब्ध आहे ती ५–६ वर्षांची व अगदी थोडी आहे.

४१०. जेधे शकावली; बादशाहानामा.
४११. महमदनामा, शिवाजी निबंधावलि, भा. २, पृ. ८१.
४१२ परिशिष्ट २, पृ. ६२–५; महमदनामा, शि. नि., भा. २, पृ ८५–६.
४१३. महमदनामा, शि. नि., भा. २, पृ. ८९.

मुरारि पंडिताचे एक इ. स. १६३१तील खुर्दखत व त्याच बाबतचा एक उल्लेख आहे. त्यांत मुरारीस 'महाराज राजाधिराज मुरारीपंडित साहेब' असें म्हटलें आहे. इ. स. १६३३तील दानपत्रात 'धर्मावतारो राजाधिराजः महाराजः राजश्रीः पंडितः मुरारिः जगदेकप्रभुः सार्वभामप्रतिनिधिः' असे संबोधले आहे.[४१४] महमद आदिलशाहाच्या तर्फे अग्रमान घेऊन मुरारि पंडित कुत्बशाहीत गेले होते ही गोष्टहि बरीच महत्त्वाची आहे. यावरून मुरारि पंडित वयस्क असावेत व खवासखानाचे कारभारी होण्यापूर्वी मोठ्या तोलाचे सरदार असावेत असा तर्क करण्यास बरीच जागा आहे. शिवाय 'महाराज राजाधिराज' वगैरे किताब दक्षिण कर्नाटकातच अधिक रूढ होते. यावरून कदाचित् हे मुरारि पंडित व इब्राहिम कुत्बशाहाकडे दक्षिण कर्नाटकाचे इ. स. १५८०च्या सुमारास सुभेदार झालेले मुरारि पंडित ब्राह्मण[४१५] एकच असण्याचा संभव आहे; शिवाय मुरारि पंडितास एवढा मोठा दर्जा प्राप्त होण्यास मूळ वशपरंपरेची काहीतरी जहागिरदारी अथवा सुभेदारी असणे शक्य दिसतें. कदाचित् इब्राहीम कुत्बशाहाविरुद्ध दौलतखानास तख्तावर आणणारा जगदेवराव[४१६] ब्राह्मण व मुरारि पंडिताचा बाप जगदेवराव हेहि एकच गृहस्थ असण्याचा बराच संभव दिसतो. अधिक शोध लावून हा तुटलेला धागा जुळेल असे वाटतें.

२७. **कुत्बशाहीचे इतर पातशाह्यांशी संबंध**:—बहामनी राज्यांतून सर्वांत लहान व शेवटी निर्माण झालेली कुत्बशाही प्रथम बहामनी राजाचा अभिमान धरून इमादशाहीशी होताहोईतो सख्यत्वानें राही. बहामनी राज्याचा नाश झाल्यानंतर आदिलशाही विशेष प्रबळ होती. निजामशाही व विजयानगरचे राजे एकेकटे आदिलशाहीशीं झगडण्यास समर्थ नव्हते. उलट दक्षिणेतील कुत्बशाहीचा विस्तार आदिलशाहीच्या हिताआड येण्यासारखा असल्यानें आदिलशाहीशीं सख्यत्व राखणें कठीण जाई. त्यामुळे इमादशाहीनंतर कुत्बशाही निजामशाहीच्या तंत्रानें वागत व त्याच्या मदतीच्या जोरावर आदिलशाहीशी टक्कर देत. विजयानगर अथवा

४१४. शिवचरित्रप्रदीप, खुर्दखत, १० नोव्हेंबर १६३१ इ. स., पृ. ९२; सनदापत्रें, ले. १३, पृ. १८.

४१५. मागील पृष्ठ ४६ पाहा.

४१६. मागील पृ. ३१-२ पाहा.

दक्षिणच्या हिंदु राजाची वेळीअवेळी मदत घेतली जाई; तरी त्याची राज्ये गिळंकृत करण्याची कुत्बशाहीची आकांक्षा इस्लामी व हिंदी वजीर व उमरावांच्या कारभारांत सारखीच होती. निजामशाहीचा मोड होण्याचे मुमारास पठाण व दक्षिणी मुसलमानाच्या मनांतील कुत्बशाहीबद्दलच्या आपुलकीच्या भावात थोडेच अंतर पडू लागलें. मोगली सत्ता प्रबळ झालेली दिसू लागली. त्यामुळे पठाणी सरदारचा ओढा प्रसंगविशेषी मोगलाकडे पडू लागला. परंतु मोगलांस दक्षिणेतील राज्यकारस्थानात लक्ष घालण्यास प्रथम सवडच झाली नाही. मात्र मोगला सामर्थ्य पाहून व आदिलशाहीची कुरापत काढण्याची नेहमीची प्रवृत्ति जाणून कुत्बशाहीने मोगलाशी वाटेल त्या शर्तीवर व अपमान सहन करूनहि सख्यत्व राखले. मोगली सत्ता प्रबळ. परंतु दक्षिणी राजाच्या सघापुढे तिला यश मिळण्याची आशा फार थोडी होती. मोगलांस त्यामुळें दक्षिणेतील एकाद्या शाहीस बगलेत मारून दुसरीचे लचके तोडावे लागत. परंतु निजामशाही बुडविण्याच्या वेळी केलेल्या चुकीचे प्रायश्चित्त आदिलशाहीसच अधिक भोगावे लागल्यानें मोगलांशी तात्पुरते सहकार्य केले तरी ते तितकें परिणामकारक होऊ देत नसत. शिवाजी व जयसिंग याच्या तहानतर मराठी राज्य कायम राहते व शिवाजी कपटाने कैद केला गेला असतांहि पळून आला ही गोष्ट दक्षिणेतील राज्यकारस्थानास नवीन दिशा देण्यास कारण झाली. शिवाजी व मोगल यांची स्वरी व मनापासून मैत्री कधीच होणे शक्य नाही व शिवाजीस आदिलशाहीचेच लचके तोडल्याशिवाय विस्तारास मार्ग नाही हे पाहून मराठशाहीशी कुत्बशाहीने कायमची मैत्री टिकविली. त्यामुळे आदिलशाहीचा कुत्बशाहीस क्वचित्च उपद्रव होऊ लागला. परंतु इ. स. १६७६ नतर मोगलांनी उचल खाऊन दक्षिणेतील राज्यकारस्थानात वरीच उलथा-पालथ करण्याचा प्रयत्न केला. पठाणी सरदारास फोडण्याचा यत्न झाला. त्यामुळें पठाणाची सत्ता—विशेषतः आदिलशाहीतून—नष्ट करण्याची खबरदारी घ्यावी लागली. मोगलांशी प्रत्यक्ष शत्रुत्व न दिसू देता मोगली सत्ता दक्षिणेतून काढून लावण्याची आकाक्षा - कदाचित् आवश्यकता - कुत्बशाहीस पटली व आदिलशाहीच्या अभिमान्या-नाहि पटली होती. उलट मोगली राजकारण आदिलशाहीचा नाश झाल्याशिवाय यशस्वी होणारे नव्हते. त्यामुळे मोगलाची दृष्टि आदिलशाहा व मराठराज्य यांचेवर विशेष असल्याने त्याना कुत्बशाहीला जगविणे भाग पडे. उलट कुत्बशाहीचे अस्तित्व आदिलशाही व मराठराज्य कायम ठेवण्यात होते. त्यामुळे मोगली परत्वे येतांच

कुत्बशाहीला बिनशर्त पेशाची व इतर मदत सारखी देत राहून आदिलशाही व मराठी राज्याची एकी राखण्यासाठी पुष्कळच स्वार्थत्याग करावा लागला व झीजहि सोसणे भाग पडले. परंतु मादण्णाच्या मृत्यूनें दक्षिणेतील सूत्रचालक अकस्मात् नाहींसा झाल्यानें दक्षिणेतील या तीन राज्यातील एकतानत्व तुटले व त्यामुळे व. विशेषतः मुसलमान सरदारांनी मोगलांनी देऊ केलेल्या मोठ्या मनसबी व हुद्यांच्या आशेवर फितुरीस सुरुवात केल्याने दक्षिणेतील योग्य धोरणानें व यशस्वी रीतीने चाललेले राज्यकारस्थान बिघडले गेले व कुत्बशाहीच्या अंगी चांगले सामर्थ्य असतानासुद्धा तिचा नाश झाला.

२८. **कुत्बशाहीचे शिवशाहीशीं संबंधः**—सतराव्या शतकाच्या दुसऱ्या अर्धाच्या सुरुवातीस मीर जुम्ल्याने कुत्बशाही वाढविली. परंतु मोगलास मिळाल्याने तिला तितकाच जोराचा धक्का दिला. मोगल कुत्बशाहीच्या कर्नाटकावर हक्क सांगू लागलेले पाहतांच आदिलशाहीस कुत्बशाही पादाक्रान्त करण्यास फावले. परंतु आदिलशाहीस शिवाजी शत्रु उत्पन्न झाल्याने त्याला मदत देत राहून आदिलशाहापासून बचाव करून घेण्याचे चांगलेच साधन इ. स. १६६६त कुत्बशाहीच्या हाती आले. शिवाजीसहि माणसांपेक्षा पैशाच्या मदतीचीच विशेष जरूर होती व ती देण्यात व घेण्यात प्रत्यक्ष पुरावा मिळणे दुरापास्त असल्यानें ज्याचेविरुद्ध ती दिली गेली त्याच्यासही बरोबर धरण्याचे प्रयोजन पडत नसे. प्रथम सातआठ वर्षे ही मदत करण्यात केवळ आदिलशाहास शत्रु उत्पन्न करण्याचा उद्देश होता. परंतु मादण्णा कारभारावर येताच त्याला आपल्या पाठीमागे शिवशाही आहे हे कुत्बशाही व आदिलशाहीतील मोगली किंवा पठाणी सरदारास दाखविणे आवश्यक होते. त्यानें या सामर्थ्याच्याच जोरावर दक्षिणेतील सूत्रे आपल्या हाती खेचून आणली. अर्थात् त्याने शिवशाहीस हरतऱ्हेने मदत केली असल्यास नवल नाही. उलट शिवाजीस इस्लामी शाह्यांशी जरूर तर मत्री करण्याचे साधन मादण्णाच्या मुख्य वजिरीनें चांगलेच साध्य झाले होते. त्यामुळे मराठशाहीने मादण्णाच्या तत्त्वाने वागून आदिलशाहीशी रगात आलेले भांडण बरेच वेळा थोपवून आदिलशाहीला जगू दिले. मोगली परचक्राच्या वेळी तर मराठी सैन्यावरच पुष्कळ मदार होती. त्यामुळें शेवटपर्यंत सभाजीची पाठीराखी करून कुत्बशाही व आदिलशाहीचा पांचसहा

वर्षे नाश होऊ दिला नाही. शिवशाहीच्या विस्ताराला आधार कुत्बशाहीचाच मिळत राहिल्यानें शिवशाहीला सारखे झगडण्यास कठीण गेलें नाही.

२९. **कुत्बशाहीचा नाश:**—इस्लामी कुत्बशाहीचा नाश औरंगजेबाने केला तो मादण्णा व संभाजी यांचेमुळे केला ही समजूत अगदी चुकीची दिसते. इस्लामी सत्तांनी इस्लामी राज्ये गिळंकृत केली नाहीत असे नाही. बहामनी राज्य, बरीदशाही वगैरे दक्षिणेंतील शाह्या इस्लामियानीच बुडविल्या. फत्तेखानाच्या हाती असलेली निजामशाही तो शरण गेला तरी शहाजहानानें बुडविली. इराणच्या शहांशी तर कित्येक वर्षे खास अलमगिरानेच भाडण चालविलें होते. जयसिंगाच्या दक्षिणेंतील मोहिमेत आदिलशाहीवर शस्त्र धरण्याचे काहीच प्रयोजन नव्हतें. त्यानंतर आदिलशाही राज्य बुडविण्याचे वार्षिक प्रयत्न होतच असत. साराश, अलमगिरानें कुत्बशाहीस जगू दिले असतें हें समजणे व्यवहारास धरून नाही. जयसिंगानें शिवाजीचा पराभव करून आदिलशाहीचा नाश करण्याचा प्रयत्न केला व तसाच प्रयत्न अलमगिरानेंहि संभाजीवर यश मिळताच केला असता यांत शका दिसत नाही. हिंदूशी भांडताना इस्लाम पुढें करण्यात मागे प्रयत्न झाले व त्यातील मुख्य विजयानगरचे राज्य बुडविण्यात यशस्वीहि झाला. त्याचप्रमाणे या वेळीहि हा यत्न साधता तर मराठराज्य सहज नाश पावते व आदिलशाहीच्या नाशासाठी होणारा वार्षिक उपक्रम चालूहि ठेवता आला असता. निजामशाहीसारखा आदिलशाहीचा नाश होताच कुत्बशाही बुडवून हिंदुस्थानच्या पातशाहीची अलमगिराची आकाक्षा सहज पुरली असती. परतु या वेळी इस्लामी व हिंदु हा भेद दक्षिणेतील राजांनी न राखतां मोगलास परकीय लेखून त्याच्या सन्यास जेरीस आणल्याने त्याचा खजिना सपला व सैनिकांत त्राण राहिला नाही. आदिल व कुत्बशाहीचा समूळ नाश झाला परतु त्याचबरोबर मोगली शक्तीहि अजिबात क्षीण झाली व अलमगिराची हिंदुपत सम्राटत्वाची आकाक्षा अपुरी राहिली. दक्षिणेतील शत्रु हतबल न होता चिकाटी धरून झगडत राहिला. पठाणी व मुस्लमानी सरदारांच्या धर्मोडीच्या कारभारामुळे त्यांचेवर विश्वास बसणें शक्य नव्हते. त्यामुळे इस्लामी सत्ता निर्माण करण्यात दक्षिणीयांनी मदत न करतां स्थानिक मराठ्यांचीच पाठीराखी केली.

३०. उपसंहार:—कुत्बशाहीच्या इतिहासातील राजकीय प्रसंगांची शकावलीच्या रूपाने रूपरेषा शक्य तोंवर समकालीन व विश्वसनीय साधनांच्या आधारें देण्याचा प्रयत्न केला. या रूपरेषेवरून कुत्बशाही राजकारणाचा ओघ व महत्त्व समजून येण्यासारखे आहे. दहाव्या प्रकरणांत लिहिल्याप्रमाणे तत्कालीन साधनांचा अधिक बारकाईने अभ्यास झाला पाहिजे. तसा अभ्यास करण्याला हा आराखडा उपयोगी पडावा हाच यात मुख्य उद्देश आहे. उपलब्ध साधनांवरून कुत्बशाहीचा सुसगत इतिहास सामध्याने देण्याचा प्रयत्न केला असता तर आधीच वाढलेला हा प्रस्ताव फारच लाबला असता. परतु तसा विस्तार न करितां अभ्यासास साधनाची निवड करण्यासाठी दिशा दाखवून व इतिहासलेखनाच्या तयारीत शक्य ती भर टाकून, सशोधनाचे कार्य सुलभ करणें एवढेच कार्य येथे केले आहे.

परिशिष्टात दिलेली कुत्बशाहीची साधने छापण्यास दोनअडीच वर्षांपूर्वी वाईच्या मोदवृत्त छापखान्यात प्रथम सुरुवात झाली. छापखान्यातील अडचणीमुळें छपाईत चुका बऱ्याच होऊ लागल्या व इग्रजी छपाई मनासारखी होईना. काही दिवसानतर कामासच विराम पडला. हस्तलिखित परत आणल्यानतर दुसरीकडे छापण्याची व्यवस्था करावयाची तर सबध वर्ष आजारानें ग्रस्त केले. त्यामुळे गेल्या सप्टेंबरच्या प्रसगी हा ग्रथ प्रकाशित करता आला नाही. प्रस्तावात शकावलीच्या रूपाने कुत्बशाहीचा इतिहास द्यावा ही प्रो. पोतदारांची कल्पना मला पटली व त्याप्रमाणे गेल्या फेब्रुवारीपासून त्या उद्योगास लागलो. परतु शरिराच्या दुर्बलतेमुळे त्याची तितकी मेहनत घेता आली नाही. जे काहीं करता येणे शक्य झाले तेवढेच करून हा प्रस्ताव लिहून व छापून घाईनेच आज पुरा करीत आहे.

या कामी परिशिष्टात दिलेल्या मॅकेन्झी कलेक्शनमधील ऐतिहासिक साधनाचा उपयोग करण्यास परवानगी दिल्यामुळे प्रथम लडनच्या इडिआ ऑफिसचे आभार मानले पाहिजेत. नेहमीप्रमाणे माझे मित्र व सहा यायी श्री. नेर, श्री. दत्तात्रय कृष्ण देवधर व गोविदराव पाटील यानी मला हरप्रकारे साहाय्य केले. म्हणून माझ्या दुर्बलावस्थेतूनहि हे पुस्तक बाहेर पडू शकले. श्री. माधवराव चोरघडे, श्री. दत्तोपत

आपटे व श्री. अभ्यंकर यांनी पुस्तकांचा पुरवठा केला. त्यामुळे या प्रस्तावाचें काम बरेंच सोपे झाले. प्रो. वर्मा यांनी फारसी मजकुराचे भाषांतर अगर गोषवारा व श्री. खरे यानी बादशाहानामा वगैरेंतील कांही फारसी फर्मानांचे भाषांतर करून दिल्यानें त्या साधनाचा उपयोग करिता आला. त्याचप्रमाणे श्री. सदाशिवराव सरदेसाई यानी माझी सोय व प्रकृतिमान पाहून छपाईच्या कामात पुरकळच मदत केल्याने मला या प्रस्तावाच्या तयारीपासून छापून घेण्याचे काम दोन अडीच महिन्यात उरकून घेण्याची शक्ति राहिली. या सर्वांनी मनोभावान साहाय्य करून मला उपकृत करून ठेवले आहे. त्यांच्या या उपकारांची परतफेड आभार मानण्यापलीकडे मला कशी करिता येणार ?

शेवटी भारत इतिहास संशोधक मंडळाचे चिटणीस प्रो. पोतदार यानी माझेकडून या कामी अक्षम्य विलंब व दिरंगाई झाली असताना व विशेषतः या पुस्तकाच्या प्रसिद्धीविषयीच्या त्यांच्या जाहीर निवेदनास बाध आला असताना सुद्धा हें काम मला माझ्या सवडीनेच करू दिले. त्यांच्या या सौजन्याबद्दल मी त्यांचा व भारत इतिहास संशोधक मंडळाच्या चालकांचा अत्यंत आभारी आहे.

गायकवाडवाडा, पुणे,
ता. २५ एप्रिल १९३४ (मोहरम).

वा. सी. बेंद्रे.

QUTBSHĀHI OF GOLCONDĀH

IN THE

SEVENTEENTH CENTURY

1 The History of a Late Revolution in the Kingdom of Golconda (Mackenzie Collection) 1

2. Chapters VI and VII from " Hadiqat u'l-Alam " (Mackenzie Collection) 23

3 Some Account of Akana and Madana, Chief Ministers of Tanashah Badshah of Golconda (Mackenzie Collection) 187

THE HISTORY OF A LATE REVOLUTION IN THE KINGDOM OF GOLCONDA.

The Account of the Revolution[1], and those other matters which are discours'd of in this Appendix, might have fallen in very luckily in some part of the preceding Voyage[2], had [p. 525][3] I been so fortunate as to have had the perusal of the Papers while the Book was a finishing; but not coming to my Hands 'till it was printed, I thought it best to affix them to it, as both agreeable to the Subject, and containing things in them very remarkable and New: And must needs own the peculiar Obligation I am under to a very worthy Gentleman Mr. Daniel Sheldom, in the free and kind Communication of these Memoirs I shall not therefore detain the Reader with any further account of this matter, but pass on to what I am satisfied will be

1 Of 1673—74 A D.

2 "A Voyage to Surat of 1689" by J Ovington, published by Jacob Tonson in London in 1696 A D

3 The numbers in the rectangular brackets indicate the end of the pages in the printed copy of the "Voyage" of 1696.

very agreeable to him, viz The History of this Revolution in Golconda.

The present King[4] of Golconda was Son to an Arabian[5] of good Family and Esteem, but low in Estate and Fortune; to raise which, resolving to Travel, and seek Employment from some foreign Prince, he came to Golconda[6]; and, by the Favour of some persons of Quality, the opportunity of presenting himself and his Service to King Cotub[7] Sha; who, being pleased with his Person and manner of Address, gave him a small Government, wherein he behav'd himself [p. 526] so well, that he was advanc'd to one of the most considerable Commands of the Kingdom, in which and his Prince's favour he continued 'till his Death; After which his Estate (being very great) was seiz'd[8] on by the King, who is the general Heir of all his Nobles and Persons employ'd by him (none of those Countreys having any Hereditary Estates) so that his Son was reduc'd to a very poor Condition; but, having that left which could not be taken from

---

